[... १ ५.] सरसवाङ्मयरत्नमाला [रत्न ३८ वें.

मॅडम रोलंद

ग्रंथकार

श्रीयुत मंडले

एप्रिल] किंमत सव्वा रुपया. [इ. स. १९२२

संपादक

तात्या नेमिनाथ पांगळ.

प्रकाशकः - सरसवाङ्मयप्रसारक मंडळी. मुंबई नं. ४ व पुणें शहर.

सुवाङ्मयेन गीतेन युवतीनां च लीलया॥ यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशुः

सरसवाङ्मय रत्नमाला, रत्न ३८ वें.

मॅडम् रोलंदचें चरित्र.

लेखक

श्रीयुत वासुदेवराव दामोदर मुंडले.

बालमनुस्मृति, भारतमुक्ताहार, आर्यांची चतुर्विधनीति, फ्रेंचवाङ्मयरत्नमाला, महिलाक्लेश-निवारण, चीन देशाची माहिती; नेपोलियन, काव्हूर, व बिस्मार्क, थॉमसपेन यांचीं चरित्रें, इत्यादि पुस्तकांचे कर्ते.

प्रकाशक.

तात्या नेमिनाथ पांगळ.

संपादकः—सरसवाङ्मय रत्नमाला व चालक—सरसवाङ्मय-प्रसारक मंडळी, मुंबई नं. ४ व पुणें शहर.

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर.

" जगद्धितेच्छु प्रेस " शनवार, पुणें.

किंमत सव्वा रुपया.

प्रकाशकाचे दोन शब्द.

या मालेंत प्रसिद्ध होणारें हें तिसरें चरित्रात्मक पुस्तक होय. पहिलें-महात्मा गांधींचा बंदिवास, दुसरें-लोकमान्यचरितसुधा व रोलंदबाईचें चरित्र हें तिसरें होय. आमच्या वाचकवर्गाला चरित्रविषयक पुस्तकेंही आवडूं लागलीं आहेत आणि म्हणून मधून मधून अशा तऱ्हेचीं चरित्रविषयक व शास्त्रीय माहितीनें मनोरंजक केलेलीं अशीच लहान पुस्तकेंही प्रसिद्ध करण्याचें आम्हीं ठरविलें आहे. असो.

स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या व्यक्तींची गणना केव्हांही थोर विभूतींतच होते, आणि थोर लोक अशांच्या थोरवीचें महत्वहि प्रसंगोपात्त गौरवानें वर्णन करितात. प्रस्तुत चरित्रनायिकेचाही उल्लेख, आपलें मुंबईचे गव्हर्नर नामदार सर जॉर्ज लॉइड साहेब यांनीं, ता. १६ माहे आगस्ट सन १९२१ रोजीं, मुंबई युनिव्हर्सिटीच्या पदवीदानसमारंभाचे वेळीं, चॅन्सेलर म्हणून जें भाषण केलें त्यावेळीं स्वातंत्र्याची मिमांसा करतांना केला असून, रोलंदबाईला फांसावर लटकाविण्याची शिक्षा केल्यावर तिनें जे अखेरचे उद्गार काढले त्यांचाही उल्लेख गव्हर्नर साहेबांनीं आपल्या भाषणांत मोठ्या आस्थेनें केला आहे.

"Liberty! Liberty!! what crimes have been committed in thy name!!!"

"स्वतंत्रते! स्वतंत्रते! तुझ्या नांवावर या जगांत किती तरी गुन्हे केले जात आहेत!" हेच ते उद्गार होत.

आज देशांत महात्मा गांधींचें स्वराज्य, खिलापत, असहकारिता सरकाराविषयीं असतोष व स्वदेशी चळवळ यांसंबंधीं विचारांची लाट उसळली असतांना गव्हर्नर साहेबांच्या मनश्चक्षूंपुढें, प्रस्थापित सरकारी सत्ता उलथून पाडण्यासाठीं झगडणाऱ्या रोलंदबाईचा या वेळीं चरित्रपट दिसला, यांत निःसंशय जरी कदाचित् अनेक हेतु असले, तथापि त्या बाईस कां अपेश आले! आणि एके काळीं तिच्याच पक्षास असणारे लोक, सत्ता हातीं येतांच तिच्याविरुद्ध कसे उठले आणि त्यांनीं तिचा अन्यायानें कसा नाश केला, हें नीट रीतीनें सर्वांना कळावें; आणि अशा स्वजनाचा नाश

करण्याच्या चुका, स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्यांच्या हातून पुनः घडूं नयेत, हें सांगण्याचा कदाचित् नामदार साहेबांचा प्रमुख हेतु असावा, असें आम्हांस तरी वाटतें. कारण, पुष्कळ वेळां एखादें राष्ट्रीय कार्य करीत असतांना मतभेद उत्पन्न होऊन दोन पक्ष निर्माण होतात. आणि ते तडजोडीचा मार्ग विसरून अगदीं भिन्न भिन्न दिशेनें यत्न करितात. अशा वेळीं राष्ट्रकार्य जें साधावयाचें असतें तें दूरच राहतें आणि दुफळी, दोन पक्ष अथवा फाटाफुट झाल्यानें "तिसऱ्याचें" मात्र फावतें. फाटाफुट झाल्यानें कसे अनर्थ होतात आणि दोन्ही पक्षांचें ऐक्य असल्यानें कसे लाभ होतात अर्थात् 'त्रयस्थाला' कसें नमावें लागतें हेंही सर्वांना विदीतच आहे. दुफळी किंवा परस्परांविषयीं द्वेष, हीं न ठेवतां, कोणतीही चळवळ एकीनें, संघशक्तीनें करावी आणि ती तशी न केल्यास रोलंदबाई-प्रमाणें, स्वातंत्र्याच्या नांवाखालीं कसा अन्याय घडतो हेंच नामदार साहेबांनीं त्या वेळीं व्यक्त करण्यासाठीं त्या स्त्रीचें चरित्रकथन केलें असावें असें आम्हांस वाटतें. त्या दृष्टीनें नामदार साहेबांचा हेतु व तदनुरुप पदवीधरांना केलेला उपदेश आम्हांस मोठा बहुमोलाचा वाटला आणि त्यामुळें इतक्या आस्थेनें उल्लेख केलेल्या रोलंदबाईचें चरित्र मराठींत लवकर प्रसिद्ध करण्याची आमचीही उत्सुकता वाढली.

मराठीसाहित्याचे भक्त श्रीयुत वासुदेवराव मुंडले यांचा मराठी वाचकांशीं चांगलाच परिचय असून त्यांनीं आजवर लिहिलेलीं—नेपोलियन चरित्र, बिस्मार्क, काव्हूर वगैरे चरित्रें तर विद्वानांच्या प्रशंसेस पात्र झालींच आहेत. रोलंदबाईचें हें चरित्रही त्यांच्याच उज्वल लेखणींतून उतरलें असून आजच्या प्रसंगीं हें चरित्र सर्वस्वी वाचण्यालायक असेंच झालेलें आहे. कारण जहाल व नेमस्त असे दोन पक्ष असणाऱ्या या आमच्या देशांतील उभयपुरुषीं लोकांना रोलंदबाईच्या चरित्रापासून पुष्कळच गोष्टी शिकतां येण्यासारख्या आहेत. तेव्हां असें उत्कृष्ट पुस्तक रा. वासुदेवराव मुंडल्ये यांनीं आम्हांस लिहून दिलें याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानून, वाचकांची तूर्त रजा घेतों.

रविवार पेठ पुणें.
ता. १।३।२२.

ता. ने. पांगळ.

प्रस्तावना.

अर्वाचीन काळांतील जगाच्या इतिहासांत जे अद्भूत, परम कारुणिक आणि एकसमयावच्छेदेंकरून हर्ष व विषाद उत्पन्न करणारे प्रसंग घडून आलेले आहेत त्यांत, फ्रान्स देशांतील १८ व्या शतकांतल्या राज्यक्रांतीस अग्रस्थान दिलें पाहिजे. एडमंड बर्क नांवाच्या इंग्रजी ग्रंथकारानें तर ह्या प्रसंगास अनुलक्षून लिहितांना जगांतील इतिहासांत ह्या प्रसंगाच्या तोडीचा दुसरा प्रसंग क्वचितच आढळून येईल असें म्हटलें आहे व तें अगदीं सार्थ आहे. ह्या क्रांतीमुळें युरोपांतील राजकीय, सामाजिक व कांहीं अंशीं धार्मिक कल्पनांमध्यें पुष्कळ महत्त्वाचा फेरफार झाला. प्रचलित महायुद्धामुळें सध्यां जसें सर्व जगांतील विचारांचें वातावरण पार बदलून गेलें आहे तसाच कांहींसा प्रकार उपर्युक्त राज्यक्रांतीनंतर युरोपखंडांत झाला. ही राज्यक्रांति केवळ राजकीय स्वरूपाचीच नसून तिच्या मुळांशीं धार्मिक व सामाजिक जुलमांचा नायनाट करण्याचीहि भावना होती. ह्या क्रांतीपूर्वी राजा, धर्मगुरु व मोठमोठे सरदार ऊर्फ जमीनदार यांनीं आपापला बडेजाव माजवून सामान्य रयतेस पिळून काढून त्यांस आपले गुलाम बनविण्याचा कारखाना अनेक शतकें चालू ठेवला होता. ह्या त्रिवर्गाच्या जुलमामुळें कमजास्त प्रमाणानें युरोपांतील बहुतेक देशांतील सामान्य लोक गांजले होते. परंतु ह्या जुलमापासून **मनुष्यजातीची** सुटका करण्याचे प्रयत्न प्रथमतः फ्रान्स देशांतील लोकांनींच केले. इतर देशांतील लोकांनीं स्वतःपुरते असले कांहीं यत्न केले असतील; पण सर्व जगांतील–निदान तत्कालीन सर्व युरोपियन राष्ट्रांतील मानवजातीस स्वातंत्र्य, समता, व भ्रातृभाव [illegible] उदात्त भावनांचें बाळकडु पाजून त्यांना तेजस्वी करण्याचा मान फ्रेंच रा[illegible] दिला पाहिजे व तसा तो इतिहासज्ञांकडून देण्यांतहि येतो. वरील भ[illegible] युरोपांतील व फ्रान्सांतील गांजलेल्या अशा सामान्य जनतेच्या मनांत उत्प[illegible] करण्याचें काम व्होलतेअर, रूसो, कॉंदरसेत, वगैरे मोठमोठ्या नामांकित समदर्शी तत्त्ववेत्त्यांनीं केलें व पुढें झालेली क्रांति ही त्यांच्या ह्या श्रमाचाच परिपाक होय. याप्रमाणें ह्या क्रांतीचे मूळ हेतू अत्यंत शुद्ध होते व त्या कारणानें त्यांत फ्रान्सांतील अनेक शीलवान व बुद्धिवान लोक पडून उदयास

आले. अशा लोकांपैकींच प्रस्तुत चरित्राची नायिका ही एक होती. ह्या क्रांतीचें प्रारंभींचें शुद्ध स्वरूप जर अखेरपर्यंत कायम टिकलें असतें तर तिच्या चरित्राचा शेवट इतक्या लवकर न होतां ज्या हेतूकरितां तिनें आपलें प्राण धोक्यांत घातले त्या लोकस्वातंत्र्याच्या व समतेचा पूर्णपणें लोकांस उपभोग घेऊं देणारी स्थिर व व्यवस्थित अशी राज्यसंस्था स्थापून ती चालविण्याचे कामीं तिनें आपल्या थोर व विद्वान् पतीसह त्यांच्या इतर सवंगड्याबरोबर आपलें उरलेलें आयुष्य खर्च केलें असतें. परंतु दुर्दैवानें बदर क्रांतीस पुढें अविचाराचें व अनिष्ट असें वळण लागल्यामुळें तींत आगांतुकपणें उत्पन्न झालेल्या द्वेष मत्सरादि मनोविकारांनीं पेटविलेल्या होमकुंडांत अकालींच तिची आहुति पडल्यामुळें तिचे मूळ हेतु कांहीं काल तसेंच अपूर्ण राहिले. 'कांहीं काल' असें म्हणण्याचें कारण असें कीं, उपर्युक्त अनिष्ट परिस्थितीमुळें जरी मॅडम रोलंद व तिचे सहाध्यायी, इतकेंच नव्हे तर त्यांच्या मागून त्यांचा छल करणारे क्रांतिकारक पुढारीही एकामागून एक त्यांनीं स्वतःच पेटविलेल्या खाईंत भस्मसात् झाले व पुढें थोडा काल नेपोलियनची अनियंत्रित सत्ता फ्रान्सांत स्थापन झाली तरी लोकस्वातंत्र्य व समता ह्या भावनांचा क्रांतिकारकांनीं जनतेंत जो प्रसार केला तो तसाच कायम टिकला. नेपोलियनच्या कर्तबगारीमुळें जनतेंतील ह्या भावनेस आलेल्या भरतीची लाट कांहीं काळ थबकली हें खरें; पण त्याला देखील तिचा बिमोड करतां आला नाहीं. एवढेंच नव्हे तर तिला मर्यादित स्वरूपांत योग्य असें वळण देऊन तिचा परिपोष करण्याचें काम नेपोलियनला करावें लागलें. त्याला देखील आपली सत्ता वाढविण्याकरतां लोकांचें-जनतेचें-अनुरंजन करावें लागलें! म्हणजे ह्या क्रांतीपूर्वी, जनता म्हणून कोणी आहे कीं नाहीं याची राजास खातरजमा देखील नसे; ती स्थिति ह्या क्रांतीनें कायमची पालटून टाकली व राजा झाला तरी तो जनतेकरतां आहे, जनता कांहीं राजाकरतां नाहीं हें तत्त्व युरोपांतील सर्व लोकांच्या गळीं उतरविलें. नेपोलियन स्वतः तर ह्या तत्त्वास अनुसरून वागतच असे; पण जेथें जेथें त्यानें दिग्विजय केला व नवीन राज्यें स्थापिलीं तेथें सुद्धां कळत अथवा न कळत ह्या तत्त्वाचा प्रसार त्यास करावा लागलेला आहे. या दृष्टीनें पहातां, जरी उपर्युक्त

फ्रेंच राजक्रांतींत अतिशय अघोर कृत्यें घडून निष्कारण अशी पुष्कळ प्राणहानि झाली तरी एकंदरीनें तिजपासून जगाचें, निदान युरोपचें तरी कल्याणच झालें असें पुष्कळ विद्वान् इतिहासकारांप्रमाणें आमचेंहि मत आहे. परंतु अखेरीस म्हणजे जिरॉंदिस पक्षाचा नाश होण्याचे सुमारास व तेथून पुढें त्या राज्यक्रांतीस जें हिडिस स्वरूप प्राप्त झालें तें अत्यंत गर्हणीय होतें व फ्रान्स म्हणूनच त्यांतून निभावला. इतर देशांत त्याचे लोकस्वातंत्र्यावर फारच अनिष्ट परिणाम झालें असते असेंच आम्हांस वाटतें. ह्या प्रकारापासून राजकीय स्वातंत्र्य मिळवूं इच्छिणारांनीं पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. फ्रान्सच्या ह्या राजक्रांतीस जें वरीलप्रमाणें अघोर स्वरूप प्राप्त झालें याचें मुख्य कारण अनेक शतकांपासून तेथें माजून राहिलेली सामाजिक विषमता व धर्माच्या नांवावर एका विशिष्ट वर्गाकडून अज्ञान जनसमूहावर होत असलेला जुलूम हें जरी असलें तरी जॅकोबिन पक्षांतील कित्येक उच्छृंखल व स्वार्थी पुढाऱ्यांचा अविचारीपणाहि त्यास बराच कारणीभूत झालेला आहे. या लोकांच्या अविचारी कृत्यांचें समर्थन आजपर्यंत कोणीहि समंजस व निस्पृह अशा इतिहासकारास करतां आलेलें नाहीं. यावरून त्यांच्या ह्या अविचारामुळें देशाचे खरे हितचिंतक व कर्तबगार अशा अनेक थोर स्त्रीपुरुषांस लोकक्षोभास निष्कारण बळी पडावें लागलें आहे. परंतु अशा स्थितींतहीं त्यांनीं आपल्या मतानुसार शक्य तेवढी देशसेवा करून व आपल्या सत्यवादीत्वावर विश्वास ठेऊन अखेर आपल्या मतांकरतां ते प्राण देण्यासहि तयार झाले! त्यांच्या ह्या धीरोदात्त-पण अत्यंत करूणास्पद-अशा कृतीमुळें मानवी इतिहासास एक प्रकारचें भूषण प्राप्त झालें आहे व त्यांचा आत्मयज्ञ हा अनेक राष्ट्रांतील थोर व कर्तबगार देशभक्तांस मार्गदर्शक बनून राहिला आहे. अशा थोर लोकांची विचारसरणी व कृती य[illegible] आमच्या देशांतील लोकांस थोडासा परिचय करून द्यावा म्हणून त[illegible] पैकीं एका तेजस्वी स्त्रीचें हें चरित्र लिहिण्यांत आलें आहे.

बा. दा. मुंडले.

अर्पणपत्रिका.

हें लहानसें वाक्पुष्प, माझी परम पूज्य स्वर्गस्थ मातोश्री 'गंगा ऊर्फ राधाबाई' मुंडले हिच्या आत्म्यास अत्यंत श्रद्धापूर्वक व प्रेमादरानें वाहिलें असे.

[कार्तिक शु. १३
शके १८४३]

तिचा नम्र पुत्र,
वा. दा. मुंडले.

अनुक्रमणिका.

मॅडम रोलंदचें चरित्र.

प्रकरण १ लें.

कुलवृत्तांत व बाल्यदशा.

इ० स० १७५४ चा सुमार. ह्या समयीं पॅरिस येथील मजुर व कामगारवर्ग यांच्या मनामध्यें कांहीं विलक्षण विचार घोळूं लागले होते. ते विचार सत्यास व न्यायास अनुसरून होते, तरी ते उघडपणें बोलून दाखविण्याचा समय अद्याप आलेला नव्हता. सबब मनांतल्या मनांतच त्यांचें चिंतन करण्यांत तल्लीन होणें अथवा फार झालें तर आपल्या जिवलग मित्रांशीं त्यांसंबंधानें गुप्तपणें वाटाघाट करणें, यांशिवाय मनाचें समाधान करण्यास सदर लोकांस अन्य मार्ग खुला नव्हता. आपले विचार मन मोकळें करून आपल्या बांधवांस सांगतां येऊं नयेत, ही अत्यंत अन्यायाची व उद्वेगजनक गोष्ट आहे, असें त्यांस वाटत असे; परंतू ह्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य त्यांचें ठिकाणीं नसल्यामुळें ते वारंवार मनांतल्या मनांत जळफळत असत. सारा दिवसभर काबाडकष्ट करून उरलेला सायंकाळचा वेळ शुष्क चैनींत अथवा मौजा मारण्यांत न घालवितां आपल्या स्थितीसंबंधानें व वर निर्दिष्ट केलेल्या अन्यायासंबंधानें विचार करण्यांत ते घालवित असत. प्रत्येक प्रसंगीं ते भोजनाच्या मिषानें आपल्या स्नेही व आप्तमंडळींस आपल्या घरीं बोलावून त्यांच्याशीं वरील विषयांवर वादविवाद करीत. अशा प्रसंगीं प्रत्येक वक्ता गंभीर व उत्तेजक वाणीनें आपल्या स्नेही वर्गास स्वप्रतिपादनांतील सत्य पटवित असे. वर लिहिलेल्या काळीं पॅरिस शहरामध्यें असा प्रकार पुष्कळ घरांत चालूं होता. परंतु जाहिरपणें त्याची परिस्फुटता होण्याचा मात्र संभव नव्हता. अशा लो[कां]पैकींच ग्रेशॉं फ्लिपॉं नांवाचा एक नकसकाम व खोदकाम करणारा गृहस्[थ] ... पॅरिस येथें 'का द आरफेव्हर' नामक रहदारींच्या रस्त्यावर ... रहात्या घराच्या तळमजल्यावर सदर गृहस्थाचा कारखान[ा] ... वर तो आपल्या कुटुंबासह रहात असे. सदर गृहस्थाची ... [अंत]र्गतः ... तिला

मुळें त्याचें रहातें घर भपकेदार सामानानें भरलेलें नव्हतें, तथापि संसारास अवश्य अशा सर्व वस्तु तेथें होत्या. त्या गृहस्थाची गृहिणी ही फार सज्जन व कुशल बाई असल्यामुळें घरांत जिकडे तिकडे उत्तम प्रकारची व्यवस्था व टापटीप असे. अशा सामान्य प्रतीच्या व टापटीपीनें वागणाऱ्या कुटुंबाची एकंदर रहाणीही साधी असल्यामुळें घरांत जिकडे तिकडे आनंद, शांतता व उत्साह यांचें साम्राज्य असल्याचा भास होत असे, आणि सदर गृहस्थाच्या (गृहिणीच्या नव्हे) मनांत वारंवार जे असंतुष्ट विचाराचे काहूर माजत असे, तें बाजूस ठेवलें तर वरील प्रकारचें साम्राज्य त्या घरांत खरोखरीच नांदत होतें असें मानण्यास मुळीच हरकत नाहीं. ह्या गृहस्थाच्या गृहिणीचें नांव मॅडम फ्लिपाँ असें होतें. हिची वृत्ती तिच्या पतीच्या अगदीं विरुद्ध होती. तिचे ठायीं धर्मश्रद्धा, विनय, परमेश्वरावर दृढ विश्वास वगैरे गुण विशीष्टपणें वसत होते. तत्कालीन रोमन कॅथलीक धर्मपंथाच्या तत्त्वांसंबंधानें मनांत कसलीही शंका न आणतां सदर पंथास ती अत्यंत पूज्य मानीत असे, तिचें मन निर्मळ, शांत, आनंदी व उत्साही होतें. त्याचप्रमाणें परमेश्वरावर तिची दृढ भक्ति असून जगांतील प्रत्येक गोष्ट त्याच्या इच्छेनेंच घडत असतें, अशी तिची समजूत होती. स्वतःची साधारण गरीबस्थितीही त्याच्या इच्छेनुसारच आपणांस प्राप्त झाली आहे, असें समजून ती त्याबद्दल कधींही खेद मानीत नसे. तसेंच तिजहून श्रीमान् अशा सरदार वगैरे लोकांचा ती कधीं हेवाही करीत नसे. असलेल्या स्थितींत समाधान मानून आपल्या कुटुंबाप्रीत्यर्थ सकाळपासून संध्याकाळपर्यंत श्रम करण्यांत ती आपला काळ घालवीत असे, आणि मधून मधून आपल्या असंतोषी व अस्वस्थ मनाच्या पतीस समाधान व शांतता यांजवर रचलेली गाणीं गाऊन रिझवीत असे. फ्लिपाँ याचें आपल्या स्त्रीवर अत्यंत प्रेम होतें जरी उभयतांच्या स्वभावांत महदंतर होतें, तरी त्यामुळें त्याचे तिजवरील प्रेम कमी झालें नव्हतें; इतकेंच नव्हे तर मॅडम फ्लिपाँच्या सश्रद्ध व आनंदी वृत्तीचा कधीं कधीं फ्लिपाँ याजवर पगडा बसे.

अशा प्रकारच्या ह्या प्रेमळ कुटुंबास एकंदर ८ मुलें झालीं, परंतु त्यांपैकीं शेवटीं एकच त्यास लाभलें. हें कन्यारत्न असून त्याचें नांव जेन मेनाँ उर्फ जेन मेरी होतें; हीच आमची चरित्र नायिका होय. हिचा जन्म इ०स० १७५४ मध्यें झाला आणि तेव्हांपासूनच ती आपल्या कष्टी व असंतोषी बापाचे दैवत बनली.

इतक्या मुलांतून हें एकच मूल जगलें असल्यामुळें मॅडम फ्लिपाँचें तिजवर अवर्णनीय प्रेम होतें. तिच्या गृहव्यवस्थेचें व सर्व कार्याचें जेन हें केंद्रस्थान बनलें. तात्पर्य, आई व बाप या दोघांची ती केवळ जीव कीं प्राण होऊन बसली. त्यांना सर्व जग काय तें तिजमध्यें भरलेलें आहे असें वाटे. मॅडम फ्लिपाँच्या मनांत तिला उत्तम प्रकारचें धर्म-शिक्षण देऊन परमार्थाकडे व मोक्षमार्गाकडे तिचें मन वळवावें असें होतें, परंतु हा विचार बापास बिलकुल पसंत पडेना. तो आपल्या मनाशीं म्हणें, ' सरदार व राजे लोकांची सामान्य बुद्धीची पशुतुल्य अशीं मुलें संपत्ति, वैभव व चैन याचा यथेच्छ उपभोग घेत आहेत तर माझ्या ह्या चलाख व अल्पवयांतही भावी विशालबुद्धीची साक्ष पटविणाऱ्या मुलीनेंच काय म्हणून असला निरर्थक श्रमकारक मार्ग स्वीकारावा ? हें विचार त्या महत्त्वाकांक्षा बापाच्या अंतःकरणांत चैतन्यरूपी अग्नि एकसारखा प्रज्वलित करीत होते. त्या अग्निची ज्वाला जरी मंद व अदृश्य होती तरी तो कधींही विझून गेला नाहीं. त्यानें केवढें मोठें कार्य केलें, हें पुढें कळून येईलच.

जेनला चौथें वर्ष लागलें नाहीं, तोंच ती वाचावयास शिकली; आणि तेव्हांपासून वाचनाचा एकसारखा इतका नाद लागला कीं, तिला पुस्तकें पुरविण्याचें कामीं तिच्या बापास गरीबीमुळें बरीच पंचाईत पडूं लागली! सामान्य मुलांचें ठिकाणीं अशा वयांत असणारा उच्छृंखलपणा, पोरगटपणा व खेळाडूपणा यांचा तिचें ठिकाणीं गंधही नव्हता. तिला बोलतां येऊं लागल्यापासून तिचा बाप नेहमीं तिला कारखान्यांत आपल्या बरोबर घेऊन जात असे आणि तेथें आपले सर्व विचार तिच्या कानावर घाली. जेनही लक्ष देऊन ते विचार ऐकत असे. सरदार लोकांचा उर्मटपणा, राजे लोकांचा गर्व आणि तत्कालीन विषम राज्यपद्धतिमुळें झालेली आपली निकृष्ट दशा, यांचें विस्तृत वर्णन करून त्या गोष्टी तिच्या मनावर ठसविण्याचा ग्रेशँ फ्लिपाँ हा वारंवार इतका प्रयत्न करी कीं, कधीं कधीं, ती बिचारी त्याचें बोलणें ऐकण्यास कंटाळून आपल्या आईकडे धांव घेई. तेथें तिला समाधान व शांतपणा आढळून येई. असा प्रकार नेहमीं चाले; परंतू शेवटीं तिच्या बापांच्या विचारांचाच तिजवर पगडा बसला आणि त्यामुळें लवकरच तिला औदासिन्य प्राप्त होऊन तिचे ठायीं विचारशक्ति एकदम जागृत झाली!

सृष्टिसौंदर्य आवलोकन करण्याची जेनला मोठी हौस असे. निसर्गतः (कृत्रिम नव्हे) जें जें कांहीं सुंदर व सुशोभित (Sublime) असेल तें तिला

फार आवडे. शृंगार विरहित कविता, वीरांची व त्यांच्या पराक्रमांचीं वर्णनें ह्यांची तिला विशेष गोडी असे. प्लुटार्कनें लिहिलेलीं चरित्रें, हें पुस्तक नेहमीं तिच्या उशाशीं असे. तें पुस्तक ती वारंवार मोठ्या उत्साहानें वाची. त्या पुस्तकांतील प्राचीनवीर-विभूति हे तिचे एकातांतील मित्र बनले होते. तिच्या अत्यंत जिवलग मित्राप्रमाणें ती त्याजवर प्रेम करीत असे; इतकेच नव्हे, तर मानसपूजेनें त्यांना आळवीत असे. ह्या वीरांशीं तिचा इतका निकट संबंध झाल्यामुळें सहजगत्या त्यांच्या मनोवृत्ति तिच्या मनोवृत्तींत भिनून गेल्या.

अर्थात् त्यांच्या कृत्यांचें आपणही अनुकरण करावें अशी जबरदस्त इच्छा तिचे ठायीं उत्पन्न झाली. आपण रोमन स्त्रीच्या जन्मास आलों नाहीं याबद्दल तिला फार वाईट वाटूं लागले व एक दिवस तर ती त्याबद्दल ढळढळा रडलेली तिच्या बापानें पाहिली! बिचारीला त्यावेळीं असें थोडेंच माहित होतें कीं, बुद्धिमत्ता, सहिष्णुता, शौर्य यांच्या साह्यानें आपण असें कांहीं कृत्य करणार आहों कीं, ज्याचा इतिहास, रोम व ग्रीक इतिहासांतील अत्यंत अभिमानदायक गोष्टींनाही मागें सारील!

जेनला पुस्तकें वाचण्याचा अतोनात नाद असे, म्हणून मागें सांगितलेंच आहे. हीं पुस्तकें ती केवळ लौकिकार्थ वाचीत नसे. तर प्रत्येक पुस्तकांतील महत्त्वाचा भाग आपल्या तीव्र धारणाशक्तीच्या साह्यानें ध्यानांत ठेवून त्याजवर वारंवार विचार करीत असे. अशाप्रकारें पुस्तकें वाचण्यांत तिचें मन इतकें गढून जात असें कीं, त्यापासून तें परावृत्त करण्याचा काय तो एकच मार्ग होता. तो, तिला फुलें आणून देणें हा होय. तिच्या आयुष्यांतील प्रत्येक स्थितींत फुलें व पुस्तकें हींच काय तीं तिच्या सुखाचीं व समाधानाचीं साधनें होतीं. पुस्तकें व आईबाप यांच्याच सहवासांत नेहमीं असल्यामुळें जेनला कोणीही खेळगडी अथवा सवंगडी नव्हते. प्रौढ मनापासून उद्भवणारे विचार व विकार ह्यांशीं तिचें बाल्यावस्थेंत संघटन झालें होतें. यामुळें लहानपणापासून तों मरेपर्यंत तिच्या चेहेऱ्यावर एक प्रकारची गंभीर व विलक्षण पाणीदार छटा दिसून येत असे. तिचा चेहेरा जात्या फारसा सुंदर नव्हता, तरी वरील गोष्टींमुळें तो फार मनोवेधक दिसे.

जेन जों जों वाढत चालली तों तों ग्रेशाँ फ्लिपाँ हा तिच्या मनोवृत्ती आधिाधिक जागृत करण्याचा प्रयत्न जारीनें करूं लागला. ती ३–४ वर्षांची असतां तो तिला आपल्या कारखान्यांत नेऊन आपले विचार कळवीत असें; परंतु पुढें जणूं काय आपल्या विचारांतील सत्य तिला पटवून देण्याकरितांच कीं काय, तो

तिला निरनिराळ्या स्थळीं फिरावयास नेऊन लोकांच्या विषम स्थितीचें चित्र उदाहरणासह तिजपुढें रेखाटूं लागला.

उन्हाळयाच्या दिवसांत तिसरे प्रहरीं तो आपल्या सदर मुलीस बरोबर घेऊन 'बुलव्हर्द' नांवाच्या रमणीय प्रदेशाजवळ फिरत असलेला दिसून येई. ह्या ठिकाणीं सरदार, राजपूत्र वगैरे लोक उत्तम प्रकारचा पोषाख करून आपल्या शृंगारलेल्या घोड्यांच्या गाड्यांतून जात आहेत, त्यांच्या गाडीच्या पुढच्या व मागच्या भागीं चित्र-विचित्र पोषाख केलेले त्यांचे नोकर मोठ्या ताठ्यानें लोकांस दूर होण्याकरितां (रस्ता सोडण्या करितां) पुकारीत आहेत, गाड्यांच्या मागून रक्षक लोक शुभ्र व उमद्या घोड्यावर बसून दौडत आहेत, अशा प्रकारचा भव्य, नेत्रांस दिपविणारा व लहान मुलांची कल्पनाशक्ती गुंग करून टाकणारा देखावा त्यांच्या दृष्टीस पडे. तो देखावा आपल्या मुलीस पूर्णपणें दिसावा म्हणून **ग्रेशाँ फ्लिपाँ** तिला आपल्या हातांनें पोटांशीं धरून उंच करी व ती सानंदाश्चर्ययुक्त मुद्रेनें त्यांजकडे पाहूं लागतांच ती म्हणे– तो पहा, तो लॉर्ड, त्याची बायको व मूल हीं कशीं मोठ्या थाटानें आपल्या गाडींत लोळत आहेत! त्यांना तेथें लोळण्याचा मुळींच हक्क नाहीं; ते जर किनखापी गाद्यांवर आराम करीत आहेत आणि सर्व प्रकारची चैन भोगीत आहेत, तर मी आणि माझें मूल यांनींच काय म्हणून ह्या पाय भाजणाऱ्या जमिनीवरून चालावें अशी ती कुरकुर करी. **ग्रेशाँ फ्लिपाँ** हा खिन्न होऊन मुकाट्यानें आपल्या मुलीस घेऊन घरीं परत येई.

वरील सारखे देखावे पाहून आपल्या बापानेंही गाड्या घोडे बाळगावे, नोकर चाकर ठेवावे असें **जेनला** वाटे. परंतू विषम परिस्थितीमुळें आपल्या बापास तसें करणें शक्य नाहीं असें जेव्हां तिला कळून आलें तेव्हां तत्कालीन विपरित समाजस्थिती, त्यामुळें लोकांवर होणारे अन्याय व तत्कालीन राजकीय परस्थिती ह्या गोष्टींकडें तिचें विशेष लक्ष वेधलें.

त्या वेळीं तिचें वय सुमारें १०-११ वर्षांचें होतें. त्याच सुमारास तिनें 'ऑरिस्टिडस् धी जस्ट्'' 'ब्रूटस्' आणि 'ग्राचिची माता' यांचीं चरित्रें वाचलीं. त्यासमयीं ग्रीस व रोम हे देश आपल्या प्राचीन प्रसिद्ध स्त्रीपुरुषांसह तिच्या डोळ्यांसमोर येऊन उभे राहिले आणि पॅरिस शहरांतील तत्कालीन लोकांचा नामर्दपणा व सरदारसंचा रंगेलपणा याचा तिला तिटकारा वाटूं लागला. त्यावेळेपासूनच तिच्या अंतःकरणांत मोठमोठीं महत्वाचीं व उदात्त कृत्यें करण्याच्या महत्त्वाकांक्षेचें बीज रुजूं लागलें.

ग्रेशाँ फ्लिपाँ व त्याची स्त्री यांचा स्वभाव कसा परस्पर विरुद्ध होता हें मागें सांगितलेंच आहे. ह्या दोन परस्परविरुद्ध स्वभावाच्या माणसांच्या सहवासांत व शिक्षणांत जेनचें बालपण गेल्यामुळें दोघांच्याही अंगचे गुण तिच्यांत उतरले होते. स्वातंत्र्यप्रियता, उद्योगशीलता, स्वाभिमान, साहस, धैर्य, तत्त्वज्ञान वगैरे गुण तिनें आपल्या बापापासून उचलले होते. तसेंच सहिष्णुत्व, परोपकारबुद्धि, धार्मिकता, भूतदया व सत्यप्रीति हे गुण तिच्या मातेपासून तिला प्राप्त झाले. परमेश्वरानें अगोदरच तिला उत्तम प्रकारची बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती व कल्पनाशक्ती देऊन ठेवली होती. त्यांत वरील गुणांची भर पडली. मग काय विचारता? दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें!

जेनला ११ वें वर्ष पूर्ण होतांच तिला तत्कालीन पद्धतीप्रमाणें अवश्य असणारें सर्व शिक्षण द्यावें असा तिच्या आईबापांनें विचार केला व तिजकरितां एक मठ नियमित केला. कारण त्याकाळीं फ्रान्समध्यें तरुण स्त्रियांचें शिक्षण केवळ संतिणींकडूनच (Nuns) निरनिराळ्या मठांतून चालत असे. ह्या मठांस पुरुषांचा संपर्क नसे व तेथें राहणाऱ्या सर्व स्त्रिया गोषांत रहात असून त्यांचा बाहेरच्या जगाशीं कोणताही संबंध नसे. अशा प्रकारच्या एकांत व शांत स्थलीं आतां आपण जाणार हें पाहून जेनला फारच उत्साह वाटूं लागला. ज्या विषम जगाचा तिला तिटकारा येऊं लागला होता, तें जग सोडून एकांतांत निर्वेधपणें आपणांस आपल्या इष्ट विषयांचा अभ्यास करण्यास स्वास्थ्य मिळेल या आशेनें ती सदर मठांत जाण्यास अगदीं उत्सूक झाली व आईबापांची आज्ञा होण्यापूर्वीच 'मला तेथें लवकर पाठवा' असें तिनें होऊन आपल्या आईस कळविलें! मुलीची इतकी उत्सुकता पाहतां, तिच्या आईबापांनीं तिला लवकरच पॅरिस येथील सिस्टरहूड ऑफ दि कॉन्ग्रेशन नांवाच्या मठांत पाठविलें. तेथें गेल्यावर जेननें आपला अभ्यास सुरू केला. तिची ज्ञानलालसा अप्रतिम होती. दिवसांतील प्रत्येक तास निरनिराळ्या विषयास वांटून दिलेला होता. याप्रमाणें ज्ञानार्जनांत तिचा काळ इतका भराभर जाऊं लागला कीं, त्याचें तिला भानही नसे. जें जें म्हणून पुस्तक तिच्या हातीं येई, तें मोठ्या उत्सुकतेनें वाचून त्यांतील महत्त्वाचा भाग ती आपल्या ध्यानांत ठेवी व फावल्या वेळीं त्याचें मनन करी. अशाप्रकारें कादंबऱ्या, अद्भुतकथा, चरित्रें, प्रवासवर्णनें, इतिहास, राजकीय तत्वज्ञान, कविता, नीति-

शास्त्रावरील प्रबंध वगैरे पुस्तकें वाचून त्यांतील महत्त्वाचा सर्वभाग ध्यानांत ठेऊन त्याचें मनन करण्याचा तिनें सपाटा चालविला होता. तिला इतर मुलींप्रमाणें खेळण्याचा नाद मुळींच नव्हता. तिच्या बरोबरीच्या इतर मुली विश्रांतीच्या वेळीं जेव्हां आपापल्या वयानुरूप असे खेळ खेळत त्यावेळीं ही एकटीच बागेमध्यें फुलांची शोभा पहात अथवा आकाशांतील चित्रविचित्र ढगांची मौज पहात फिरत असे. जगांत निसर्गतःच जें जें सुंदर असेल त्याचे ठिकाणीं परमेश्वराचा अंश आहे, अशी तिची कल्पना असल्यामुळें, अशा वस्तूंवर तिचें फार प्रेम असें. वादनकला व चित्रकला ह्यांतही ती बरीच प्रवीण झाली. मन अत्यंत प्रगल्भ, उदात्त व बहुश्रुत होण्यास ज्या ज्या म्हणून गोष्टी अवश्य होत्या त्या सर्वांचा तिनें व्यासंग सुरू ठेवला होता. सदर मठामध्यें धर्मशिक्षण मिळण्याची आयतीच सोय असल्यामुळें धार्मिक विषयांचेंही थोडें बहुत ज्ञान तिला प्राप्त झालें होतें.

तिची कल्पनाशक्ति जाज्वल्य असल्यामुळें त्या मठांत असलेल्या देवळांतील देवापुढें जळत असलेले भव्य दीप व त्यामधून देवळांतील घुमटांत पडणारा मंद मंद प्रकाश, घंटानाद, साधु व संतिणी यांची प्रार्थनेच्या वेळची गंभीर मुद्रा व स्वर, त्यांचें विशिष्ट पोषाख वगैरे गोष्टींचा तिच्या मनावर विलक्षण परिणाम झाला; आणि परमेश्वर हा कोणी तरी एक वैभवशील शक्तिमान् सुंदर व दिव्य असा महात्मा आहे असें तिला वाटूं लागलें व त्याच्याबद्दल तिचें मनांत पूर्ण आदरभाव उत्पन्न झाला. तात्विक दृष्ट्या तिला रोमन कॅथलिक पंथाच्या मतांचें रहस्य कळलेलें नव्हतें आणि वर सांगितल्याप्रमाणें परमेश्वरासंबंधानें तिचे ठायीं अगोदरच विश्वास उत्पन्न झाला असल्यामूळें तें कळण्याची फारशी आवश्यकताही नव्हती, असो. अशा प्रकारें निरनिराळ्या प्रकारचें ज्ञान संपादन करण्यांत जेनचा काळ चालला आहे, तों मधेंच तिच्या मनावर व भावी आयुष्यक्रमावर विलक्षण परिणाम करणारी एक गोष्ट घडून आली. ती कोणती हें पुढील प्रकरणांत कळवूं.

प्रकरण २ रें.

शिक्षण आणि निरीक्षण.

मागील प्रकरणांत ज्या गोष्टींचा उल्लेख आहे ती गोष्ट अशीः– जेन ज्या मठांत शिक्षण मिळविण्याकरितां राहिली होती त्याच मठांत एके दिवशीं एका अत्यंत सुंदर व तरुण स्त्रीनें संसारग्रस्त काळजीस कंटाळून मठस्थ संन्यासिनीची दीक्षा घेतली. रोमन कॅथलिक पंथाच्या रीतीप्रमाणें अशा प्रसंगीं अनेक धार्मिक संस्कार करावे लागतात. तें पाहून कोणाही मनुष्याच्या मनावर एक प्रकारचा विलक्षण परिणाम होऊन त्याच्या उच्च व उदात्त मनोवृत्ती क्षणभर तरी जागृत झाल्यावाचून राहणार नाहींत. मग जेन सारख्या सुबुद्ध व कल्पक मुलीच्या मनावर त्यांचा अप्रतिहत असा विलक्षण परिणाम झाल्यास नवल तें काय? त्या प्रसंगीं सदर स्त्रीनें सर्व अलंकार व दिव्य वस्त्रें यांचा त्याग करून संन्यास धर्मास योग्य असा केलेला साधा पोषाख, कंठीं व मस्तकीं धारण केलेलीं फुलांचीं स्तवकें, मुखासह सर्व शरीर आच्छादून टाकणारा काळा झगा (बुरखा), तसेंच पाद्री लोकांचा मंत्र-घोष, प्रार्थना, जलसंमार्जन, क्रूसपुजा, त्यासमोर सदर स्त्रीची सर्व जगाचा त्याग करून देवाचें चरणीं आपलें भावीं आयुष्य वाहिल्याची प्रतिज्ञा, देवालय व मठ सोडून क्षणमात्रही बाहेर न जाण्याविषयींची शपथ वगैरे प्रकार पाहून जेनला गहिंवर आला व तिच्या नेत्रांतून अश्रूधारा वाहूं लागल्या! इतक्या सुंदर व तरुण स्त्रीनें अशा वयांत ऐहिक उपभोगांचा त्याग करण्याचें धैर्य दाखविलेलें पाहून तिला आश्चर्य वाटलें व तिचे ठायीं स्वार्थत्यागाची भावना विशेष जागृत झाली. ग्रीक व रोमन स्वार्थत्यागी स्त्रियांचीं चरित्रें तिनें वाचलेलीं होतीं, तीं सदर प्रसंगीं तिच्या डोळ्यासमोर येऊन उभीं राहिलीं व आपणही कांहींतरी सत्कार्य करण्याकरितां स्वार्थत्याग करण्यास तयार व्हावें, असें तिला वाटूं लागलें. ह्याप्रमाणें जरी तिच्या-मनांत विचार घोळूं लागलें, तरी कांहीं दिवसानंतर तिच्या विचारी व संस्कृत-रीत चाललेल्या मनास तसला स्वार्थत्याग फारसा आवडेना, अशा प्रकारचा स्वार्थ-त्याग, धार्मिक व नैतिक दृष्टया जरी श्रेयस्कर असला तरी त्यामुळें समाजाचें प्रत्यक्ष फारच थोडें कल्याण होण्याचा संभव असल्यामुळें ज्या स्वार्थत्यागानें समा-

जाचें प्रत्यक्ष कल्याण करण्यास अवकाश सांपडेल तो स्वार्थत्याग अधिक श्रेष्ठ असें तिच्या मनानें घेतलें आणि समाजाचें प्रत्यक्ष कल्याण करण्याचा एखादा मार्ग-त्यांत कितीहि अडचणी, दु:खें व हाल-कष्ट सोसण्याची पाळी आली तरी स्वीकारून त्यांत आपलें आयुष्य घालवावें, असा तिनें आपल्या मनाशीं संकल्प केला! अशा उदात्त विचारांनीं तिच्या मनांत कायमची वसति केल्यामुळें जगांतील सामान्य लोकांचा व्यवहार व आयुष्यक्रम तिला तुच्छ वाटूं लागला. व मोठमाठीं लोकोपयोगी कृत्यें करण्याची महत्त्वाकांक्षा तिचे ठायीं पूर्णपणें स्थिरावली. वाचक-हो? ह्या बारा वर्षांच्या मुलीचे विचार अथवा मनोराज्य हें अशा प्रकारचें होते! तिच्या वयाकडे व परिस्थितीकडे पाहतां तें केवळ मनोराज्यच होतें; परंतु हें मनोराज्य एकाद्या अल्लड, अपरिपक्व व लहरी अशा मनाचे नव्हते; तर उत्कृष्ठ बुद्धिमत्ता, विचारशक्ति, सदसद्विवेक, उदात्त कल्पनाशक्ति या मंत्र्यांच्या सहाय्यानें परिपक्व, संस्कृत व कार्यक्षम होत चाललेल्या मनाचें होतें. असो.

सदर मठांत शिक्षणसंपादनांत एक वर्ष घालविल्यावर तेथील प्रिय झालेल्या भगिनींचा संतीर्णींचा मोठ्या कष्टानें निरोप घेऊन **जेन** आपल्या घरीं आली. ह्या मठांतील भगिनीवर्गांत सरदार घराण्यांशीं संबंध असलेली एक बाई होती. तिचा व **जेनचा** अत्यंत स्नेह जमला होता; तो **जेन** मरेपर्यंत तसाच कायम होता. तिच्याशीं **जेनचा** नेहमीं पत्रव्यवहार चालू असे. **जेन** जेव्हां घरीं परत आली तेव्हां तिचीं आईबापें कांहीं सांसारिक काळजींत व विवंचनतें असल्यामुळें **जेनच्या** शिक्षणाकडे त्यांच्यानें पाहिजे तितकें लक्ष देववेना, सबब त्यांनीं तिला तिच्या आजीच्या घरीं कांहीं दिवस राहण्यास पाठविलें. ह्या ठिकाणीं तिनें मठाप्रमाणेंच एकांतांत वाचन, मनन व सृष्टिनिरीक्षण ह्यांत सुमारें एक वर्ष घालविलें. आजीच्या घरीं असतांना आपल्या मठांतील मैत्रिणीस व आई-बापांस भेटण्यास ती कधीं कधीं जो काल खर्च करी तेवढा मात्र फुकट जात असे; बाकी बहुतेक सर्व वेळ कोणत्या ना कोणत्यातरी विषयाचें ज्ञान संपादण्याकडे नेमलेला असे. परमेश्वर व निसर्ग यांना अनुलक्षून एकांतांत ती आपल्या मनाशीं तासच्या तास बोलत असे. इतक्या कालाच्या सतत वाचनानें व मननानें तिच्या-अंगीं आतां चांगला बहुश्रुतपणा आला होता. व राजकीय, सामाजिक आणि धार्मिक विषयांचेंही तिला बरेंच चांगलें ज्ञान प्राप्त झालें होतें. तिची बुद्धी दिवसांनुदिवस अधिक कुशाग्र होत चालली होती. दीर्घोद्योग, कर्तृत्वशक्ति व उत्साह ह्या

गुणांची झांकही तिचे ठायीं आतां झळकूं लागली होती; प्रत्येक विषयाचें ज्ञान आपणांस असावें, अशी तिची महत्त्वाकांक्षा होती; आणि म्हणूनच आपल्या बापाच्या धंद्याचेंही तिनें ज्ञान संपादिलें. खोदकाम करण्याचें हत्यार हातांत घेतल्यापासून थोडयाच दिवसांत तें काम ती इतकें सुंदर करूं लागली कीं, तिच्या बापानें तोंडांत बोट घातलें! पुढील आयुष्यांत फुरसतीच्या वेळीं, ती कित्येक प्रकारच्या फुलांची नकशी पितळेच्या तुकडयांवर कोरून ते तुकडे आपल्या स्नेहांस नजर करीत असे. अशाप्रकारें आपली मूलगी अनेक गुणसंपन्न होत आहे, हें पाहून **ग्रेशाँ फ्लिपाँ** हा आपणांस धन्य मानून घेऊं लागला.

जेनच्या उत्साही व उद्योगी वृत्तीला तो अत्यंत उत्तेजन देत असे. बाप व मुलगी यांच्यामध्यें वारंवार राजकीय गोष्टीबद्दल मनःपूत चर्चा होत असे. त्यांत **जेनची** विषयप्रतिपादनशैली पाहून कधीं कधीं तिचा बाप चकित होई. याप्रमाणें **जेनची** चौदा वर्षें पूर्ण झाल्यावर तिला, गृहिणीस अवश्य असें गृहशिक्षण देण्यास तिच्या आईनें सूरवात केली. निरानिराळे भोजनाचे पदार्थ काटकसरीनें परंतु चांगलें कसे करावे, बाजारांतून मांस, (फ्रेंच लोक मांस खातात) भाजी फळफळावळ वगैरे जिन्नस कसें हुषारीनें आणावें वगैरे गोष्टी ती थोडयाच काळांत चांगल्या तऱ्हेनें शिकली.

जेन आपल्या आजीच्या घरीं असतां तिच्या भावी मनःस्थितीचें दिग्दर्शन करणाऱ्या एक दोन गोष्टी घडून आल्या, त्या येथें नमूद करणें अवश्य आहे. **जेनची** आजी ही **मॅडम द बोमोरेल** नांवाच्या एका सरदार घराण्यांतील स्त्रीच्या मुलांची शिक्षक होती. ह्या संबंधामुळें एका सणाचे दिवशीं सदर **बोमोरेल** बाईनें **जनला** व तिच्या आजीला आपल्या घरीं बोलाविलें होतें. या आमंत्रणास अनुसरून **जेनची** आजी **जेनला** घेऊन तेथें गेली. **मॅडम द बोमोरेल ह्या** स्त्रीचा दिवाणखाना भपकेदार सामानानें शृंगारलेला असून तेथील भिंती नाना तऱ्हेच्या चित्रांनीं सुशोभित केलेल्या होत्या. खिडक्यांमध्यें चिकाचे व मण्यांचे पडदे सोडलेले होते. प्रत्येक भिंतीच्या मध्यभागीं एक मोठा बिलोरी आरसा टांगून ठेवलेला होता. दिवाणखान्यांत जाण्यास तीन मोठे दरवाजे असून त्या प्रत्येकांत किनखापी पडदे लोळत होते. मधल्या दरवाज्यापासून १०।१२ हातांच्या अंतरावर एक मोठें टेबल असून त्यावर निरनिराळ्या प्रकारचीं पेयें, उपहाराचें सामान व चित्रविचित्र रंगाच्या फुलांचे गुच्छ, चिनी मातीच्या व कांचेच्या नकशीदार पात्रां-

मधुन ठेवलेलें होते. निरनिराळ्या प्रकारचे दिवे, वाद्यें व इतर चैनीचे पदार्थही तेथें पुष्कळ होते. ज्यानें हें वैभव कधींहीं पाहिलेलें नाहीं तो सदर दिवाणखान्यांत येतांच चकित होऊन जाण्यासारखा तेथील एकंदर थाट होता. जेनची आजी जेव्हां **जेनला** घेऊन ह्या राजविलासी बाईच्या वाडयांत आली तेव्हां सदर बाईसाहेब पूर्वोक्त दिवाणखान्यांतील एका किनखापी गादीनें मढविलेल्या कोचावर विणकाम करीत बसल्या होत्या. **जेन**ची आजी आल्याची खबर त्यांच्या चाकरानें त्यांना कळवितांच ' तिला येथें पाठीव ' असें ह्मणुन त्या पुन्हां आपलें काम करूं लागल्या. थोडयाच वेळांत **जेन**सह तिची आजी तेथें येऊन पोंचली. परंतु बाईसाहेब आदरसत्काराच्या नियमास अनुसरून त्यांस सामोऱ्या गेल्या नाहींत किंवा बसल्या जाग्यावरुन नुसत्या हालल्यासुद्धां नाहींत. नाहीं म्हणावयाला मोठया आढयतेचा स्वर काढून ' Ah ! Miss Phlippon, good morning to you! ' (कुमारी फिलीपा, नमस्कार !) असें मात्र फ्रेंच भाषेंत म्हणाल्या. ह्या बाईसाहेबांचें हें अशा प्रकारचें उद्धट वर्तन पाहून **जेनला** अत्यंत राग आला व ती मोठया त्वेषानें स्वताःशीं ह्मणाली, ' काय ! माझ्या आजीला ह्या घरांतील माणसें मिस् ह्मणून हांक मारतात' ! अशा प्रकारें झालेल्या अपमानामुळें मनामध्यें जळफळत परंतु निरुपायास्तव बाहेर न दाखविता **जेन** आपल्या आजीशेजारीं तशीच उभी राहिली. नंतर **मॅडम द बोमोरेल** व तिचे सदर पाहुणे यांचें पूढील प्रमाणें संभाषण झालें :—

मॅडमः—(जेनच्या आजीस) ' तुम्ही आलां हें पाहून मला फार आनंद वाटतो. पण ही सुंदर मुलगी कोणाची ? तुमची नात वाटतें ? ही फार चांगली बायको होईल. मुली, चल इकडे यें. हं ! जरा लाजाळू दिसते. ही तुमची नात किती वर्षांची आहे बरं ? थोडयाच दिवसांत ती सुरेख दिसूं लागेल. ती अगोदरच एखाद्या मोठया मुलीसारखी दिसत आहे.

अशा प्रकारें उत्तराची वाट न पाहतां बाईसाहेब बराच वेळ बडबडल्या व शेवटीं **जेन**कडे (जिनें आरंभापासून खालीं घातलेली मान ह्या वेळपर्यंत मुळींच वर उचलली नव्हती) वळून तिचा हात धरून ह्मणाल्याः—

' कितीतरी सुंदर हात हा ! खरोखरींच हा मोठा दैववान् असला पाहिजे. तूं आपल्या दैवाची कधीं परीक्षा पाहिली आहेस काय ? '

जेनः—छे ! बाईसाहेब, मला ती हौस नाहीं.

मॅडमः—किती उत्तम आवाज हा ! इतका गोड व इतका स्पष्ट, तरी पण

किती गंभीर आहे ! बरं, मुली, तुझा अंमळ भाक्तिमार्गाकडे ओढा आहे नाहीं बरं ?

जेनः—परमेश्वरासंबंधानें माझें काय कर्तव्य आहे तें मला माहित आहे व तें कर्तव्य बजावण्याचा मी प्रयत्न करीत असते.

मॅडमः—फार चांगले, मुली! तूं बुरखा (संन्यास) घेऊं चहातेस नाहीं काय ?

जेनः—पुढें माझें काय होईल हें मला माहित नाहीं व त्याविषयीं तर्क करीत बसण्याचीही तूर्त माझी इच्छा नाहीं.

मॅडमः—(जेनच्या आजीस) किती सुंदर उत्तर ! तुमची नात जबरदस्त वाचणारी आहे नाहीं कां ?

जे० आजीः—होय बाईसाहेब; वाचन ही तिची अत्यंत आवडती गोष्ट आहे.

मॅडमः—हं ! हं ! मी समजलें त्याचें कारण पण लक्षांत ठेवा, अशानें ती स्वतः कदाचित् ग्रंथकार होईल; आणि तसें झाल्यास खरोखरीच वाईट !

मॅडम द बोमोरेल हिचे शेवटचे शब्द ऐकतांच **जेनच्या** अंगाची लाहीलाही होऊन गेली! यापुढें तिच्यानें त्या मूर्ख व उद्धट बाईच्या घरीं राहवेना. सबब तें घर सोडून जाण्यास ती अगदीं उतावळी झाली. प्रसिद्ध रोमन कुमारिकेच्या अंगीं असलेले गुण व योग्यता आपले ठिकाणीं आहे, असें तिचें मन तिला साक्ष देत होतें. अशा स्थितींत वरच्यासारखे कमीपणाचें व अपमानास्पद शब्द तिच्यानें कसे ऐकून घेववतील ? कदाचित् त्याच वेळेस तिनें त्या बाईसाहेबास चांगलें झणझणीत उत्तर दिलें असतें; परंतु तिची आजी तेथें असल्यामुळें तिच्याकडे पाहून तिला स्वस्थ बसणें भाग पडलें. असो.

वरील गोष्ट घडून आल्यानंतर थोडयाच दिवसांनीं **जेन** आपल्या आजीबरोवर **मराया आंतोनितें** नांवाच्या राणीच्या व्हर्सेलस येथील राजवाडयांत एक आठवडाभर राहण्यास गेली होती. बोलून चालून राजवाडाच तो; तेव्हां तेथील ऐश्वर्य **जेन**सारख्या सामान्य स्थितींतील मुलीस दिपवून टाकण्यासारखें असलें तर त्यांत नवल काय ? परंतु **जेन** त्यास दिपली नाहीं अथवा तें पाहून तिच्या मनास भुरळ पडली नाहीं हें मात्र नवल खरें-तिच्या वयाची दुसरी कोणतीही मुलगी सदर राजवैभव पाहून क्षणभर तरी भांबावली असती व त्या वैभवास मोहून गेली असती. परंतु, त्या वैभवाचा अंशतः उपभोग घेण्याची

जेनला सवलत असतांही ती त्यांत दंग झाली नाहीं; इतकेंच नव्हे तर सदर राजवाड्यांत होणाऱ्या मोठमोठ्या मेजवान्या, नाच, गाणेंबजावणें, मदिरापान वगैरे गोष्टींकडे ती तात्त्विक दृष्टीनें पाहूं लागली. अर्थात सदर गोष्टी तिला मूर्ख-पणाच्या वाटूं लागल्या. राजवाडयांतील लहान मोठया नोकरांचा हांजी हांजी-पणा पाहून त्यांबद्दल तिच्या मनांत तिरस्कार उत्पन्न झाला! राजवाडयांतून वरील प्रकारच्या चैनींत होत असलेली पैशाची उधळपट्टी व गरीबांस पोट भर-ण्याचीही पडत असलेली मुष्किल या परस्परविरोधी गोष्टींची ती आपल्या मनांत तुलना करूं लागली. लोकांकडून करांच्या रूपानें मिळविलेल्या पैशाचा विनि-योग त्याच्या हितार्थ न होतां वरीलप्रमाणें केवळ कांहीं विवक्षित व्यक्तींच्या चैनी-कडे व्हावा हें तिला पसंत पडेना. ह्या निरर्थक उधळपट्टीमुळेंच लोकांवर जबर कर लादण्याची पाळी येत आहे, असा तिचा ग्रह झाला. व त्यामुळें राजवाडयां-तील विलासांचा २।३ दिवसांतच तिला तिटकारा वाटूं लागला. ती आपला बहुतेक वेळ वाचनांत व वनस्पति, फुलें, तारे, ढग वगैरे नैसर्गिक वस्तूंच्या अव-लोकनांत घालवूं लागली! अशाप्रकारें पांच सहा दिवस गेल्यावर एके दिवशीं तिच्या आजीनें ' मुली, तुला येथें कसें काय वाटतें, ' असें तिला विचारलें, तेव्हां ती म्हणाली — ' मी येथून केव्हां जाईन असें मला झालें आहे. कारण, जर मी आणखी कांहीं दिवस येथें राहीन तर येथील मनुष्याबद्दल माझे मनांत अत्यंत द्वेष उद्भवून काय करूं व काय न करूं असें मला होऊन जाईल. ' हें ऐकून तिची आजी म्हणाली, ' कां बरें? त्यांनीं तुझें काय घोडें मारलें आहे? यावर त्या तेरा वर्षाच्या तत्त्ववेत्तीनें असें उत्तर दिलें कीं—" आजी, त्यांना पाहून समाजातील विषमता व तदन्वयें बहुजनसमाजावर होणारा अन्याय हीं माझ्या पुढें मूर्तिमंत उभीं राहून मनांत संतापजनक संवेदना उत्पन्न करितात ! "

याप्रमाणें इतक्या लहान वयांतच जेन स्वदेशांतील सामाजिक व राजकीय परिस्थितीविषयीं विचार व मनन करूं लागली- पुढें तिच्या ठायीं जनतेविषयीं जी अप्रतिम कळकळ व सहानुभूति उत्पन्न झाली व ज्यांनीं तिला प्रजेची सत्ता व हक्क संस्थापित करण्याकरिता दीर्घ परिश्रम करण्यास प्रवृत्त केलें, त्यांचें बीज एव्हांपासून तिच्या अंतःकरणांत रुजूं लागलें होतें. आपल्या आजीच्या घरीं एक वर्ष घालविल्यानंतर जेन आपल्या बापाच्या घरीं आली हें मागें सांगितलें आहे. ह्यावेळीं तिचा बाप कर्जांतून मुक्त झाला होता. यामुळें जेनला

आपला अभ्यास चालू ठेवण्यास जीं जीं पुस्तकें व साधनें हवीं होतीं तीं सर्व तिला मिळूं लागलीं. तिचा वाचनाचा व्यासंग आतां फारच वाढला होता. इतिहास, राजनीति, समाजशास्त्र या विषयांवरील बहुतेक सर्व पुस्तकें तिनें आपलीशीं केलीं. हीं पुस्तकें वाचीत असतां त्यांतून अनेक चिरस्मरणीय गोष्टींचें टिप्पण आपल्या स्मरण वहींत उतरून घेऊन त्यावर तिनें आपले स्वतःचे विचारही नमूद करून ठेवले होते. अशा प्रकारचें प्रत्येक महत्त्वाचें पुस्तक तिनें मनन पूर्वक वाचलें; यामुळें तिला शास्त्रीयदृष्टी उत्पन्न होऊन इतिहासाचें व राजनीतीचें हृद्गत अथवा मर्म कळूं लागलें होतें. सद्गुणांकडे तिचा ओढा मुळचाच असल्यामुळें इतिहासाच्या परिशीलनानें सत्यनिष्ठा, स्वदेशाभिमान, अतुल स्वार्थत्याग, धैर्य, धाडस, सहिष्णुता, भूतदया वगैरे जे मनुष्याची उत्तम दानत बनविणारे सद्गुण त्यांचें तिच्याशीं दृढ साहचर्य होऊं लागलें. तिचें मन उदात्त व उदार होऊन त्याचे ठायीं उज्वल व शुद्ध भावनांचा उदय झाला. इतकी योग्यता जरी तिच्या अंगीं आली होती, तरी प्रसंगविशेषीं हलकें काम करण्यासही ती मागें पुढें पहात नसे, तसेंच आपल्यापेक्षां गरीब, हीन व अज्ञान लोकांत कारणपरत्वें मिसळण्यास तिला लाज वाटत नसे. फ्रान्सच्या तत्कालीन सामाजिक रीतीचा विचार केला ह्मणजे तिच्या ह्या वर्तनांतील थोरपणा लक्षांत येणार आहे. ती इतकी विद्वान झाली होती तरी आपल्या आईबापांचा तिनें कधींहीं उपमर्द केला नाहीं. प्रसंगीं आपला अभ्यास सोडून आईच्या देखरेखीखालीं ती कधींकधीं स्वयंपाकही करी व बाजारांत जाऊन भाजीपाला, मांस (आश्चर्य कसलें फ्रेंच लोक मांस खातात) वगैरे जिन्नस विकत आणी. तिचा स्वभाव इतका गोड बनला होता, कीं, बाजारांतल्या भाजी विकणाऱ्या स्त्रीनें हिला पाहतांच इतर गिन्हाइकांस मागें सारून अगोदर हिला जिन्नस द्यावा. गिन्हाइकामध्यें कित्येक मोठमोठे लोक असत, त्यांस हें पाहून राग येई; पण तिजपुढें बोलण्याची कोणाचीही छाती होत नसे. तिचा गंभीर चेहरा पाहतांच ते चपापून मागें सरत ! यावरून ज्ञानाचें तेज किती आहे याची कोणासही कल्पना करतां येईल. इतकें होतें तरी तिला स्वतःच्या ज्ञानाबद्दल कधींहीं अहंकार उत्पन्न झाला नाहीं. आपल्या मनाचें समत्व तिनें कधींही ढळूं दिलें नाहीं. व्यक्तिविषयक सुखाची तिला फारशी लालसा नव्हती. व्यक्तीच्या सुखांपेक्षां समाजाचें व राष्ट्राचें सुख पाहणें अधिक श्रेष्ठ असें ती मानूं लागली, आणि यामुळेंच पुढील आयुष्यांतील प्रत्येक

निनिरराळ्या अवस्थेंत मनाची समता न ढळूं देतां धैर्यानें व शांतपणानें आपले दिवस कंठिले. असो.

फ्रान्सच्या तत्कालीन राज्यपद्धतीचें व समाजनिर्बंधाचें **जेन** जों जों सूक्ष्म परिक्षण करूं लागली तों तों तिचें मन खेदानें जास्त उद्विग्न होऊं लागलें. रोमन कॅथलिक पाद्र्यांचा रंगेलपणा, ताठा, अहंपणा, ऐदीपणा व आळसांत आयुष्य घालविण्याची प्रवृत्ती हीं पाहून त्याधर्मावरील तिची श्रद्धा डळमळूं लागली. तिच्या बापाच्या विचारांनीं तर तिला अश्रद्ध बनविण्याचें कांमीं आधिकच भर घातली. तिच्या आईच्या धार्मिक, पवित्र व सश्रद्ध वृत्तीचा तिजवर अधिक पगडा बसला होता हें खरें; वरंतु वरील गोष्टींचा विचार जेव्हां जेव्हां तिच्या मनांत येई, तेव्हां तेव्हां तो तिच्या ठायीं धर्माविषयीं भ्रम उत्पन्न केल्यावांचून रहात नसे. सुविचारांतीं अंत:करणास ज्या गोष्टीं पटतील तेवढयाच सत्य व श्रद्धेस पात्र असें तिच्या मनानें घेतलें. अर्थात् तिच्या प्रत्येक विचारसरणींत व वागणुकींत उंचतम **मनोविकारांस** स्थान मिळूं लागलें.

मठामध्यें असतांना निरनिराळे दिव्य समारंभ पाहून रोमनकॅथलिक धर्माविषयीं तिला जो वाऊ वाटूं लागला होता, तो आतां नाहींसा होऊं लागला. तथापि ती केवळ नास्तिक बनली नाहीं. खिस्तीधर्माची नैतीक तत्त्वें तिला मान्य होती, व तदनुसार वागण्याचा तिचा निश्चय होता. तसेंच परमेश्वराचें अस्तित्वही तिला नाकबूल नव्हतें; तथापि तत्कालीन लोकांच्या परिस्थितींतील दु:सह वैषम्यामुळें परमेश्वराच्या न्यायीं व दयाळुपणाबद्दल तिला कधीं कधीं संशय उत्पन्न होई. अशा प्रसंगीं सदसद्विवेक बुद्धीला देवाचें स्थान देऊन तिची आज्ञा ती मोठया आदरानें पाळीं.

धार्मिक परिस्थितीवरून ती राजकीय परिस्थितीकडे वळली, तों तेथेंही तिला जिकडे तिकडे वैषम्य व असमाधान हींच दिसूं लागली.

आपणापेक्षां ज्ञानानें फारच कमी पण केवळ सरदार घराण्यांत जन्मल्यामुळें समाजांत श्रेष्ठ गणलेलीं स्त्रीपुरुषें आपणासमक्ष सोनेरी रंगानें मढविलेल्या गाडयांतून लवाजम्यासह मोठया ऐटीनें इकडून तिकडे फिरत आहेत व गरीब, सद्गुणी आणि साध्याभोळ्या लोकांशीं मोठया ताठयानें वागत आहेत आणि त्यांची चैन अप्रतिहत चालावी म्हणून लोकांच्या खिशांतील पैसे राजसत्तेच्या साह्यानें त्यांच्या खिशांत जात आहेत असें तिला आढळून येऊं लागलें. समाजशास्त्राचा तिनें अभ्यास केल

असल्यामुळें समाजरचनेचीं सुतत्त्वें तिला चांगलीं माहीत होतीं. सबब तत्कालीन समाजाची वरील विषम व अन्यायात्मक स्थिति पाहून तिचे मनांत, त्यांविषयीं तिटकारा उत्पन्न झाला. बहुजनसमाजास दारिद्र्य पंकांत बुडवून टाकणारी व सरदार, राजे यांची यथास्थित चैन चालविणारीं करांची सांथ पाहून तिचें मन संतापानें व खेदानें व्याप्त होऊन ही स्थिती मानवजातीच्या कल्याणाकरितां सूधारलीच पाहिजे असें तिच्या मनांत येऊं लागलें. ग्रीस व रोम येथील स्वतंत्र व लोकप्रिय राजकीय संस्था तिला फार प्रिय झाल्या होत्या. तशा धर्तीवर स्वदेशांतील राजकीय संस्थांत फेरबदल करितां येईल कीं नाहीं यासंबंधाचे विचार तिच्या मनांत वारंवार घोळूं लागले. याप्रमाणें तिचें मन भावी फ्रेंच राजक्रांतीच्या अफाट व भयंकर समरांगणावर चळवळ करण्यास हळुहळु तयार होत होते.

प्रकरण ३ रें.

यौवनावस्था.

जेनला आतां सोळावें वर्ष लागलें होतें. अर्थात् ह्या वयांत कुमारिकांच्य मनांत जे नैसर्गिक विकार उत्पन्न होतात त्यांचा संचार तिच्या मनांतही होऊं लागला होता. परंतु इतर अज्ञ मुलीप्रमाणें ती ह्या विकारांनीं बेहोष झाली नाहीं. सारासारविचाराचा त्या विकारांस आळा घालून ह्या संबंधानें जी गोष्ट करावयाची ती फार विचारानें करावयाची असा तिचा निश्चय झाला होता. तिच्या अंगचे गुण व तिची विद्वत्ता पाहून अनेक लहान मोठ्या घराण्यांतील पुरुष तिच्या बापाजवळ तिच्याबद्दल मागणी करूं लागले; *

---

* ह्या वेळेस फ्रान्समध्यें मुलींची लग्नें जुळविण्याची चाल आमच्याकडील पूर्वापार चालत आलेल्या चालीस कांहींशी अनुसरूनच होती. सबब वरांना हल्लीं प्रमाणें प्रत्यक्ष मुलींशीं ठराव न करतां तिच्या आईबापांकडे धांव घेणें भाग पडत असे.

ह्यासंबंधानें तिच्या बापास दररोज अनेक पत्रें येऊं लागलीं. आपल्या मुलीची योग्यता जाणून ह्या पत्रांचीं योग्य उत्तरें देण्याचें काम त्यानें तिजकडेच सोंपविलें होतें. हीं उत्तरें ती आपल्या बापाच्या नांवानें लिहून त्याच्या स्वाधीन करी; नंतर ग्रेशँ क्रिपाँ हा त्यांवर आपली सही करून तीं रवाना करीत असे. सदर उत्तरें लिहित असतांना स्वतःच्या भावी कल्याणाबद्दल वडिलाच्या नात्यानें आपण स्वतःच बाटाघाट करीत असल्याचें पाहून तिला एक प्रकारची मौज वाटे. जेनच्या बापाच्या मतें, व्यापार हें पैसा व अधिकार मिळविण्याचें चांगलें साधन असल्यामुळें, आपल्या मुलीनें एखाद्या बड्या व्यापाऱ्याच्या मुलास वरावें, असें होतें. परंतु जेनला हा विचार पसंत नव्हता. ज्याचें बुद्धिसर्वस्व वणिजवृत्तींत खर्च व्हावयाचें त्याच्याशीं शरीरसंबंध झाल्यास आपल्या विद्वत्तेचें, उदात्त विचारांचें, कल्पनांचें व महत्वाकांक्षेचें चीज होणें दुरापास्त आहे असा तिचा समज होता. सबब, एका श्रीमंत व्यापाऱ्याशीं लग्न करण्याचा तिचा बाप जेव्हां तिला आग्रह करूं लागला तेव्हां ती नम्रपणें म्हणाली:— "बाबा, उदात्त कल्पना व विचार यांच्या प्रदेशांत भराऱ्या मारणारें माझें मन केवळ पैशाकडे पाहून कोणासही वरूं शकणार नाहीं, त्याला मी काय करूं ? माझ्या विचारांशीं ज्याचे विचार जुळतील त्यासच मीं वरावें हें इष्ट नाहीं काय ? मला तर असें वाटतें कीं, अशा पुरुषासच मीं वरावें. ज्याच्याविषयीं आपल्या मनांत आदर व सहानुभूति नाहीं, अशा पुरुषाशीं लग्न करण्यापेक्षां अविवाहित राहिलेलें काय वाईट ?"

यावर त्यांचें पुढीलप्रमाणें आणखी संभाषण झालें.

ग्रेशँ क्रिपाँ:—पण, मुली, व्यापारी लोकांत विद्वान्, उच्च मनोवृत्तीचे व उदात्त मनाचे लोक नाहींत, अशी तुझी समजूत आहे काय ? मला वाटतें कीं, तुला सांगुन आलेल्या वरांपैकीं पुष्कळ व्यापारी बहुश्रुत, सद्गुणी व सदाचरणी असे आहेत.

जेन—:असतील. पण माझा पति होणाऱ्याचे अंगीं जें ज्ञान, जी रसिकता, जें बुद्धिचातुर्य व जी कार्यक्षमता असावी, असें मला वाटतें, ती ह्यांच्या ठिकाणीं दिसून येत नाहीं.

ग्रेशँ फ्रिपाँ:-तर मग एखाद्या कौन्सिलरास वरावें, असा तुझा मानस दिसतो! पण लक्षांत ठेव कीं, हे लोक विद्वान्, बहुश्रुत, कल्पक, हुशार व बुद्धिमान् जरी असतात, तरी ते फार गर्विष्ठ असून त्यांच्याजवळ द्रव्याचा बहुतेक अभावच असतो.

जेन:--अमुक एका विशिष्ट धंद्यांतील पुरुषास वरावें असा माझा मुळींच आग्रह नाहीं. ज्याच्यावर मी खरोखर प्रेम करूं शकेन अशाच पुरुषाला मीं वरावें, असें माझें म्हणणें आहे.

ग्रेशँ फ्रिगाँ--पण असा मनुष्य व्यापारी लोकांत सांपडणार नाहीं असा तुझा ग्रह झालेला दिसतो. पण विचार कर; संपत्ति व सुख यांचा लाभ व्यापाऱ्याशिवाय इतरत्र फारसा होत नसतो.

जेन:--बाबा, मला माहीत आहे कीं, व्यापाऱ्यांचें मुख्य तत्त्व म्हणजे एकादी वस्तु अति स्वल्प किंमतीस पैदा करून ती अत्यंत महाग विकाव-याची. स्वतःची द्रव्यतृष्णा शांत करण्याकरितां गरीब बिचाऱ्या मजुरांच्या पोटावर हे लोक पाय देतात! अशा लोकांबद्दल माझ्या मनांत पूज्यभाव असणें शक्य नाहीं.

ग्रेशँ फ्रिगाँ:--सर्वच व्यापारी असे असतात असें तुला वाटतें काय? सत्य व प्रामाणिकपणा ह्यास अनुसरून वागणारे व्यापारी नाहींतच काय?

जेन:--नाहींत असें मी म्हणत नाहीं; पण अशांची संख्या फारच थोडी व त्यांत माझ्या विचारांशीं ज्याचे विचार जुळतील असा मनुष्य सापडणें कठीणच.

ग्रेशँ फ्रिगाँ:-तुझ्या कल्पनेप्रमाणें सर्वतोपरी योग्य असा मनुष्य मिळा-लाच नाहीं, तर मग तूं काय करशील?

जेन-:असा मनुष्य नच मिळाला तर मी जन्मभर अविवाहित राहीन.

ग्रेशँ फ्रिगाँ:--असें करणें, तुला हल्लीं वाटत आहे तितकें सोपें व सुखावह नाहीं. कदाचित् तुझी अशी समजूत असेल कीं, अद्याप वेळ गेली नाहीं. पण तूं जर असाच हट्ट धरलास तर सांप्रत चालून येत असलेल्या वरांची संख्या हळू हळू कमी कमी होत जाईल व मग तुझी काय स्थिती होईल, याची तुला विचारांतीं कल्पना येईलच.

जेन:-कांहीं झालें तरी माझें मन बदलावयाचें नाहीं. योग्य कालपर्यंत

आझे मनाप्रमाणें वर न आढळला तर जन्मपर्यंत अविवाहित राहून मीं आपला देह सत्कार्यार्थ खर्च करीन.

ग्रेशॅ फ्रिगॅः--असें बोलणें फार सोपें आहे, पण त्याप्रमाणें वागणें किती कठीण आहे याचा नीट विचार कर, इतकेंच तुला माझें आतां आग्रहपूर्वक सांगणें आहे.

जेनच्या आईलाही आपल्या मुलीचें लवकर लग्न व्हावें व आपल्या डोळ्यांदेखत तिचा संसार चांगल्या प्रकारें थाटला जावा, असें वाटत होतें.

म्हणून तिनेंही तिचें मन वळविण्याची पुष्कळ खटपट केली; पण तिचा फारसा उपयोग झाला नाहीं. तिची प्रकृति दिवसानुदिवस थकत चालली होती व तशांत ह्या सुमारास तिला अर्धांगवायूचा रोग जडला, यामुळें तर जेनच्या लग्नाविषयीं ती फारच उतावीळ झाली. शिवाय दुसरीही एक गोष्ट तिच्या मनांत ह्यासंबंधानें विशेष काळजी उत्पन्न करूं लागली. ती अशी कीं, तिचा नवरा अलिकडे बाहेरख्याली व स्वच्छंदी बनत चालला होता. जुगार खेळण्याचें व्यसन त्याला जडत चाललें होतें, व त्यामुळें कधीं कधीं तो अपरात्रपर्यंतही घरीं येत नसे. अशा स्थितींत जर आपण इहलोक सोडून गेलों, तर पाठीमागें आपल्या मुलीची काय अवस्था होईल, याबद्दल तिचे मनांत धास्ती उत्पन्न झाली. ह्या सुमारास एका श्रीमंत रत्नपारख्यानें जेनबद्दल मागणी घातली; परंतु जेन त्यास वरण्यास कबूल नव्हती. ह्यासंबंधानें एके दिवशीं तिचें व तिच्या आईचें पुढीलप्रमाणें संभाषण झालें:—

आई—(खेदजनक मुद्रा करून) ह्या मनुष्यास तूं कां नाकारतेस ? त्याचा स्वभाव चांगला असून त्याची सद्वर्तनाबद्दल चांगली ख्याति आहे. शिवाय आपल्यापेक्षां तुझी योग्यता जास्त आहे, हें तो जाणत आहे. तुझ्याविषयीं त्याच्या मनांत फार आदर असल्यामुळें तूं सांगशील तसें वागण्यास तो मोठ्या आनंदानें कबूल होईल.

जेन—आई, केवळ माझ्या कह्यांत राहणारा नवरा मला नको आहे.

आई—पण मुली, तुझ्यासारख्या चमत्कारिक व लहरी मुलीस स्वामित्व गाजविणारा नवरा कसा खपेल ?

जेन—स्वामित्वाचा आव घालून मजवर अधिकार चालविणारा नवरा तर मला नकोच; पण त्याचप्रमाणें केवळ बाइलबुद्धद्या असाही मनुष्य माझें प्रेमास पात्र होणें शक्य नाहीं. असल्या नवऱ्यावर सत्ता गाजविण्यास मला लाज वाटेल.

आई—हं; समजलें. तुला असा नवरा पाहिजे कीं, त्यानें ' मी तुझा स्वामी आहें, ' असें हवें तर समजावें; पण वस्तुतः सांगण्याबाहेर तिळमात्रही जाऊं नये.

जेनः—छे! छे! तसें नाहीं. मला असा वर पाहिजे कीं, जो माझ्या मनोवृत्तींच्या व कल्पनांच्या विहारांत खिन्न अथवा कष्टी न होतां, मनःपूर्वक सुख मानून माझ्या सौख्यांत भर टाकील.

आई—मुली, असा वर कल्पनासृष्टीशिवाय इतरत्र सांपडणें शक्य नाहीं. जगामध्यें कोणतें कुटुंब इतकें सुखी आहे ? दोन मनुष्यें सारख्याच प्रकृतीचीं कशीं असणार ? त्यांतल्या त्यांत शक्य तेवढी निवड करावयाची इतकेंच. बाकी भर्ता व भार्या ह्यांच्या गुणांत व स्वभावांत तंतोतंत साम्य कोठेंच आढळून येत नाहीं. तूं आतां २० वर्षांची झाली आहेस; तेव्हां मला वाटतें, अविवाहित राहण्यापेक्षां चालून आलेल्या ह्या वरांशीं मी मरण्यापूर्वीं तुझा विवाह व्हावा, हेंच तुझ्या हिताचें आहे.

हे शेवटचे शब्द ऐकतांच जेनचे डोळे पाण्यानें भरून आले. आईच्या मृत्यूची कल्पना प्रथमच तिच्या डोळ्यांपुढें दिसूं लागली व तिचें मन क्षणभर गोंधळून गेलें. तिची आई तिचें शांतवन करून म्हणाली, "मुली, अशी घाबरी होऊं नकोस; मी आतांच मरतें असें नाहीं; परंतु माझ्या मरणाचे दिवस जवळ येत चालले आहेत. जर तुझें लग्न झालें नाहीं, तर माझ्यामागें तुजवर काय काय संकटें ओढवतील याचा नेम नाहीं. आपल्या घरची स्थिति तुला माहीतच आहे. मग विनाकारण आलेला वर कां नाकारतेस ? त्याशीं विवाह केल्यास तुला सुख लागेल." यावर जेनच्या तोंडून असावधपणें ' होय, तुला हल्लीं जसें सुख लागत आहे तसेंच मलाही लागेल,' असे शब्द निघून गेले ! हे शब्द ऐकतांच तिच्या आईचें काळीज चर्र होऊन गेलें. नवऱ्याच्या दुर्वर्तनामुळें तिची जी शोचनीय स्थिति झाली होती तिचा त्या शब्दांनीं तिचे हृदयांत प्रकाश

पडला व दुखाःवेगानें तिच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले ! त्यानंतर जेन-जवळ तिच्या लग्नाची गोष्ट तिनें कधींही काढली नाहीं ! आपल्या आईच्या दुःखद अवस्थेबद्दल व बापाच्या दुर्वर्तनाबद्दल जेनला फार वाईट वाटे. आपल्या वर्तनानें त्या दोघांमध्यें सख्य व प्रेम राखण्याचा ती पुष्कळ यत्न करी. तिचे बापावर तिचें चांगलें वजन असल्यामुळें पुष्कळ वेळां तिच्या सदर प्रयत्नास चांगलें यश येत असे, परंतु असंतोष, विषम परिस्थिति, तींतून सुटण्याची निराशा, तदंगभूत असणारें औदासिन्य, जगाविषयीं उत्पन्न झालेला कंटाळा, वगैरे गोष्टींनीं ग्रेँश फ्रिपॅां याचें मन विटून गेलेलें होतें व त्याची महत्त्वाकांक्षा सफल होण्यास वाव न सांप-डल्यामुळें त्यास आपल्या जीविताविषयीं कंटाळा आला होता. त्याच्या मनाचीं सर्व बंधनें शिथिल होऊन त्याची विचारशक्ति पगू झाली होती. यामुळें त्याचें मन वाटेल तिकडे सैरावैरा धावूं लागलें होतें; अशा स्थितींत उपदेशाचा काय उपयोग होणार ? अर्थात् जेनच्या पूर्वोक्त वज-नाचें पारडें दिवसानुदिवस कमी होत चाललें ! ग्रेँश फ्रिगॅांची ही अवस्था तरुण, उतावीळ व अपक्क बुद्धीच्या लोकांनीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. अपरिपक्क व उच्चतर ज्ञानाच्या संस्कारांनीं पवित्र व उदात्त न झालेल्या मनांत राजकीय महत्त्वाकांक्षा उत्पन्न होऊन ती सफल होण्याचा लवकर संभव नसला म्हणजे, निराशेनें व्याप्त होऊन तें मन कसें वैतागून जातें व बेताल होतें, हे ग्रेँश फ्रिपॅां याच्या उदाहरणावरून स्पष्ट होण्यासारखें आहे. असो. गृहस्थिति अशी असल्यामुळें जेनच्या आईला रात्रंदिवस चैन पडत नसे. अर्थात् तिच्या खालावत चाललेल्या प्रकृतीस आराम वाटण्याकरितां केलेले औषधोपचार निष्फल होत. याप्रमाणें कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं प्रकृतीस बरें वाटावें म्हणून ग्रेँश फ्रिपॅां व जेन यांसहित तिनें सेन नदींतून एक दोन दिवस जलपर्यटन केलें. यामुळें तिला अंमळ हुशारी येऊन बराच तकवा वाटूं लागला. हें पाहून जेनलाही समाधान वाटलें; पण हें समाधान केवळ क्षणिक असून आपल्या आईस वाटत असलेली ही हुशारी मालवित्या दिव्याच्या मोठ्या होणाऱ्या ज्योतीप्रमाणें आहे, हें त्या बिचारीला ठाऊक नव्हतें ! सदर कुटुंब वरील पर्यटन आटपून घरीं येतांच जेन आपल्या मठांतील एका भगिनीस भेटावयास गेली

नेहमींप्रमाणें तेथें अधिक वेळ न राहतां ती जेव्हां घाईनें घरीं परत जाऊं लागली तेव्हां तिच्या भगिनीनें ' परत जाण्याची इतकी घाई कां करतेस ? ' असें तिला विचारलें.' तेव्हां ती म्हणाली, ' माझ्या आईकडे मी जितकी लवकर जाईन तितकी चांगली. यावर तिची भगिनी अगाथा म्हणाली, ' तुझ्या आईची प्रकृति हल्लीं बरी आहे, असें तू आतांच म्हणालीस ना ? ' यावर, ' होय ती नेहमींपेक्षां हल्लीं पुष्कळ बरी आहे, हें खरें; पण अलीकडे तिला सोडून फार वेळ दूर राहण्यास मला कसेंसेंच वाटतें.' असें उत्तर देऊन जेन तावडतोब आपल्या घरीं आली. घरांत पाय टाकते तोंच तिच्या आईची प्रकृति बेताल झाल्याचें वर्तमान तिला कळलें ! त्याबरोबर ती तडक आपल्या आईच्या खोलीकडे गेली; परंतु ती तेथें पोंचण्यापूर्वींच बहुतेक सर्व आटपलें होतें ! वायूच्या झटक्यानें तिची आई अर्धवट बेशुद्ध होऊन तिची वाचा बंद झाली होती ! जेननें तिला बोलविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण तो निष्फल झाला ! जेनच्या डोळयांतून आतां अश्रुधारा वाहूं लागल्या. थोड्या वेळानें तिच्या आईनें अंग हालवून बोलण्याचा यत्न केला; पण तो सिद्धीस जाईना. तेव्हां तिनें आपला एक हात जेनच्या मुखावरून फिरविला व तिचे पाण्यानें भरलेले डोळे पुसले. इतक्यांत धर्मगुरू तिला प्रायश्चित्त देण्याकरितां तेथें आला. त्यावेळचा तो गंभीर समारंभ पाहून जेनला अत्यंत गहिंवर आला व क्षणैक मूर्च्छाही आली ! त्या मूर्च्छेंतून ती सावध होण्यापूर्वींच तिच्या आईचा प्राण निघून गेला होता ! जेनला आजपर्यंत दुःख कसें असतें याचा प्रत्यक्ष अनुभव नव्हता. यामुळें तिच्या सुखाचा मुख्य आधारस्तंभ जी तिची आई, ती मृत झालेली पाहून तिच्या मनाला मोठा धक्का बसला ! दुःखानें तिचें अंतःकरण इतकें व्याप्त झालें कीं, आईच्या मृत्यूनंतर कित्येक महिनेपर्यंत तिला कांहींच सुचेनासें झालें.

जेनची आई वारल्यावर तिच्या बापाचें वर्तन फारच बेताल झालें. त्यानें आपल्या घरांत एक वाईट चालीची स्त्री आणून ठेविली व तिच्या नादानें तो वागूं लागला. जेननें आपल्या बापास ताळयावर आणण्याचा पुष्कळ यत्न केला, पण तो सफल झाला नाहीं. तिच्या आईनें काटकसर करून घरांत जी थोडीबहुत माया करून ठेवली होती तिचा विध्वंस

होऊं लागला ! ज्या लोकांशीं भाषण करणेंही गैर अशा हलक्या लोकांस तिचा बाप घरीं जमवून त्यांच्याशीं पत्ते खेळण्यांत व दारू पिण्यांत आपला वेळ घालवूं लागला.

स्वतःचे कारखान्याकडे तो दुर्लक्ष करूं लागला, यामुळें त्याच्या प्राप्तीचें मान कमी होत चाललें होतें; तथापि खर्च एकसारखा वाढतच होता. ही भयंकर स्थिति पाहून जेनच्या कित्येक मित्रांनीं पुढें तिला भिक्षा मागण्याची पाळी न यावी म्हणून कायदेशीर उपायांनीं तिच्या आईच्या उत्पन्नांतून तिला दरसाल २० पौंडांची नेमणूक मिळण्याची तजविज केली. जेनला आतां, आपल्या घरांत तेथें कोणी प्रेमाचें माणूस नसल्यामुळें—चैन पडेना. तथापि आपला बाप अजूनही सुधारेल अशी तिला आशा वाटत असल्यामुळें तिनें तें घर सोडलें नाहीं. तिनें आपलें लक्ष फिरून वाचनाकडे लावलें ! आईचा मृत्यु, बापाचे पूर्वींचे विचार, त्याची हल्लींची स्थिति व त्यामुळें तिची निकृष्ट दशा इत्यादि गोष्टींच्या विचारानें मन विरक्त झालें ! परंतु ही विरक्तता ती मठामध्यें असतांना संन्यासिणीची दिक्षा घेण्याकरितां आलेल्या तरुण स्त्रीच्या विरक्ततेसारखी नव्हती. तर ती समर्थांच्या ‘ उदासीन ते वृत्ति जीवीं धरावी ! अती आदरें सर्व सेवा करावी ’ ह्या प्रसिद्ध उक्तींतील तत्व तिचे मनांत ठसविणारी होती ! संसरांतील निरनिराळया अवस्था ह्या नश्वर परंतु अपरिहार्य असल्यामुळें मनुष्यानें त्यांतील सुखदुखांकडे लक्ष न देतां आपलें श्रेष्ठ कर्तव्य करीत असवें, अशी वरील गोष्टींच्या विचारानें तिची भावना झाली. तिच्यासारख्या उदात्त, सुसंस्कृत व प्रगल्भ मनाचे ठिकाणीं अशी भावना उत्पन्न होणेंच इष्ट होतें. ही भावना मरेपर्यंत तिच्याठायीं जागृत होती. आणि यामुळेंच मोठमोठ्या संकटांच्या प्रसंगींही ती कधीं कर्तव्यपराङ्मुख झाली नाहीं. असो, या सुमारास तिला उत्तेजन आणण्यासारखी एक गोष्ट घडून आली; ती सांगून हें प्रकरण पुरें करूं.

मागें जेन आपल्या आजीबरोबर ज्या मॅडम बोमेरेला भेटावयास गेली होती तिचा नवरा कांहीं कामाकरितां एके दिवशीं ग्रेशँ फ्रिपाँ याच्या कारखान्यांत आला होता. तेव्हां जेनचे कांहीं लेख तिच्या बापानें मोठ्या

अभिमानानें त्याला दाखविले. ते पाहून तो फारच खुष झाला. त्यांतील विचारसरणी व भाषापद्धति त्याला इतकी आवडली कीं, त्याच्यानें जेनला एक अभिनंदनपर पत्र पाठविल्याशिवाय राहवेना. ह्या पत्रांत त्यानें तिची पुष्कळ स्तुति करून आपल्या प्रचंड पुस्तकालयाचा वाटेल तेव्हां उपयोग करण्याची तिला परवानगी दिली होती. तसेंच, तिला आपलें सर्व आयुष्य वाङ्मयाच्या सेवेंत घालविण्याचा उपदेश करून लवकरच एखादें पुस्तक लिहिण्यासही सुचविलें होतें. जेनला तिच्या तत्कालीन निकृष्ट स्थितींत हें पत्र वाचून फार आनंद झाला व एक प्रकारची उमेद आली. सदर पत्रांतील परवानगीचा तिनें लवकरच चांगला उपयोग करून घेतला. यापुढें पुस्तक, लेखणी, व स्मरणवही हाच तिच्या साऱ्या दिवसाचा व्यापार बनला!

प्रकरण ४ थें.

विवाह.

जेन मठांत असतांना ' सोफिया कामेत ' नांवाच्या एका कुलीन घराण्यांतील स्त्रीशीं तिचा स्नेह जमला होता. तो स्नेह पुढें इतका दृढ झाला कीं, मठांतून बाहेर पडल्यानंतर जन्मभर एकमेकांचें परस्परां वर अत्यंत प्रेम होतें. यामुळें त्यांच्यामध्यें वारंवार पत्रव्यवहार होत असे. ' सोफिया कामेत ' ही बाई आमेन्स नांवाच्या शहरांतील रहिवाशी होती. ह्याच शहरांत रोलंद, द ला फ्लातेअर नांवाचे एक प्रतिष्ठित घराण्यांत जन्मलेले सभ्य व सुशिक्षित गृहस्थ रहात होते. ते ' इन्सपेक्टर ऑफ् मॅनुफॅक्चर्स ' ह्या मोठ्या महत्त्वाच्या हुद्यावर असल्यामुळें त्यांचा बहुतेक काल प्रवासांत जात असे. विद्याव्यासंगाची त्यांना चांगली गोडी होती. अर्थशास्त्र हा त्यांचा आवडता विषय असल्यामुळें त्या विषयाशीं निकट संबंध असणाऱ्या 'व्यापार, यंत्रशास्त्र, व शेतकी' या विषयांवर त्यांनीं अनेक चांगले ग्रंथ प्रसिद्ध केलेले होते; यामुळें विद्याव्यासंगी लोकांत

त्यांची पुष्कळ प्रसिद्धि झालेली होती. हे गृहस्थ वर सांगितलेल्या सोफिया कामेतच्या बापाचे स्नेही असल्यामुळें तिच्या घरीं ते वारंवार जात येत असत ! तेथें जेनचें नांव वारवार त्यांच्या कानावर येई. तिचा एक फोटोही त्यांना सोफिया कामेतनें दाखविला होता. जेनबद्दल सोफिया कामेतचें मनांत फारच आदर वसत होता. यामुळें तिच्या अनेक गुणांचें वर्णन सहजगत्या तिच्या भाषणांतून बाहेर पडत असे. तें ऐकून अशा विद्वान स्त्रीशीं आपला परिचय असावा असें मॉशर रोलंद यांस वाटूं लागलें. आपल्या मैत्रिणीबद्दल मॉ. रोलंद यांच्या मनांत आदरभाव उत्पन्न झालेला पाहून सोफिया कामेतलाही पुष्कळ समाधान वाटलें व यापुढें ती जेनच्या पत्रांतील कित्येक उतारेही मॉ० रोलंदला वाचून दाखवूं लागली. त्या उताऱ्यांतील विचारपद्धति व भाषासरणी पाहून मॉ० रोलंद याची, जेनचा परिचय करून घेण्याची इच्छा फार बळावली. त्यांनीं जेनला भेटण्याचा आपला निश्चय सोफिया कामेत हिला कळवून तिजजवळ, आपणास एक ' अभिज्ञानपत्र ' देण्याविषयीं विनंति केली. सोफिया कामेतनें त्यांची ही विनंति मान्य करण्याचें मोठ्या आनदानें कबूल केलें. पुढें, थोड्याच दिवसांनी कांहीं कामानिमित्त मॉ० रोलंद यास पॅरिस येथें जाण्याचा प्रसंग आला. तेव्हां सोफिया कामेतनें त्यास एक 'अभिज्ञानपत्र ' देऊन खुद्द जेनलाही तिनें मॉ० रोलंदची माहिती देणारें एक निराळें पत्र लिहिलें.

एके दिवशीं जेन आपल्या अभ्यासाच्या खोलींत स्वतःशींच कांहीं गुणगुण करीत बसली असतांना एकाएकीं मॉ० रोलंद यांची स्वारी तेथें आली; त्याबरोबर जेन एकदम चपापून उठली व त्यांस आदरपूर्वक प्रणाम करून जवळच असलेल्या खुर्चीवर आसनस्थ होण्याची तिनें त्यांस विनंति केली. त्या विनंतीस मान दिल्यावर मॉ० रोलंद यांनीं आपणाबरोबर आणलेलें सोफिया कामेतचें पत्र जेनच्या स्वाधीन केलें, त्यांत पुढील मजकूर होता:—

" प्रिय मैत्रिणी !

ज्या तत्त्ववेत्त्याविषयीं मीं तुला वारंवार लिहिलें त्यांच्याच हातून हें पत्र तुला मिळेल. मॉ० रोलंद हे गृहस्थ सुसंस्कृत असून जुन्या चाली-

रीतीचे भोक्ते आहेत. त्यांच्या ठिकाणीं, जुन्याविषयीं अत्यंत आदर, नव्याविषयीं अनादर आणि स्वतःच्या सद्गुणांविषयीं विशेष श्रद्धा याशिवाय अन्य दोष नाहींत. त्यांच्या सुविचारपरिप्लुत संभाषणापासून तुला पुष्कळ समाधान वाटेल अशी मला आशा आहे......" इ० इ०

हें पत्र वाचतांच जेन, मॉ० रोलंद यांजकडे बारीक दृष्टीनें पाहूं लागली. तेव्हां तिला त्यांच्या थोर योग्यतेची साक्ष पटून त्यांजविषयीं तिचे मनांत पूज्यभाव उत्पन्न झाला.

मॉ० रोलंद यांचें वय ह्या वेळीं सुमारें चाळीस वर्षांचें होतें. ते दिसण्यांत उंच असून त्यांचा बांधा सडपातळ होता.

त्यांच्या शरीराची एकंदर ठेवण प्रमाणशीर व व्यवस्थित अशी होती. त्यांच्या बोलण्यांत व वर्तनांत एक प्रकारचें गांभीर्य व प्रसंगावधान दिसून येई. तसेंच एकांतवासांत व विद्याभ्यासंगांत कालक्रमण करणारे मनुष्याचे ठिकाणीं जगांतील सामान्य व्यवहारासंबंधानें जें एक प्रकारचें औदासिन्य वसत असतें, तेंही त्यांच्या ठायीं आढळून येत असे. त्यांचें कपाळ भव्य होतें व शिवाय रुंद असून त्यांजवरील केंस विरळ व सुशोभित होते. यामुळें त्यांचा मूळचा भव्य चेहरा विशेष मोहक दिसे. दुसऱ्याचें भाषण ऐकतांना त्यांच्या चेहऱ्यावर गांभीर्याची व संथपणाची झांक दिसून येत असे. किंबहुना ते सदर भाषण संबंधानें अगदीं उदासीन आहेत असा भास होई; परंतु वस्तुतः तें त्यांच्या परम विचारशीलतेचें लक्षण होतें. त्यांचें कोणाशीं संभाषण चाललें असतांना जर त्यांस कोणी खिजविलें तर त्यांस राग येत नसे-इतकेंच नव्हे, तर उलट त्यांच्या सतेज चेहऱ्यावर आनंदयुक्त हास्याची छटा उमटत असे. त्यांचा आवाज गोड असून खणखणीत होता. त्यांची बोलण्याची पद्धत आटपशीर व म्हणींनीं युक्त अशी होती. त्यांचें संभाषण विविध माहिती व विचारार्ह सूचना यांनीं भरलेलें असे. अशा प्रकारच्या मनुष्याबरोबर कांहीं वेळ संभाषण झाल्यावर जेनसारख्या उत्साही व कल्पना साम्राज्यांत विहार करणाऱ्या मुलीच्या मनांत त्यांजविषयीं विलक्षण आदर उत्पन्न व्हावा, हें अगदीं साहजिक आहे. त्या प्रशांत बुद्धीच्या तत्त्ववेत्त्याला ती प्राचीन काळच्या एखाद्या साधूप्रमाणें मानून आपल्या मनःसृष्टींत त्याचे ठिकाणीं अत्यंत लीन होऊन त्याची पूजा करूं लागली!

मॉ० रोलंद यांचीं सर्व मतें आपल्या मनामध्यें प्रज्वालितपणें वास करीत असलेल्या मनोवृत्तीशीं तादात्म्य होण्यासारखीं आहेत, असें तिला त्यांच्याशीं घडलेल्या संभाषणावरून कळून आलें. आजपर्यंत ती ज्या प्रकारच्या मनुष्याचा शोध करीत होती, त्याप्रकारचा मनुष्य आतां तिला सांपडला व तोही तिजबद्दल अत्यंत सहानुभूति बाळगणारा सांपडला; तथापि त्याजकडे प्रणय प्रेमाच्या दृष्टीनें पाहण्याची तिची छाती होईना.

ती त्यास श्रेष्ठपुरुष महात्मा मानून आपल्या मतांचें ग्राह्याग्राह्यात्व ठरविण्यास त्याच्या अभिप्रायाची आवश्यकता आहे असें मानूं लागली. यामुळें खरा शिष्य जसा आपल्या गुरूशीं वागतो, तशी ती मॉ. रोलंद यांच्याशीं वागूं लागली. त्यांचे तोंडून बाहेर पडणारे सर्व शब्द ती मोठ्या उत्सुकतेनें व काळजीपूर्वक ऐकत असे. त्यांच्या विचारांशीं आपलें नेहमीं साहचर्य असावें असें तिला वाटूं लागलें. जेननें मॉ. रोलंद यांच्या संबधानें जो एवढा मोठा पूज्यभाव व्यक्त केला तो त्यांच्या लक्षांत आला नाहीं असें नाहीं. त्या योगानें जरी त्यांच्या मनांत प्रेमभाव उत्पन्न झाला नाहीं, तरी आपलें संभाषण तिला फार आवडलेलें पाहून त्यांना पुष्कळ आनंद झाला. याप्रमाणें या दोन मनांमध्यें—अंतःकरणामध्यें नव्हे—लवकरच ऐक्यभाव उत्पन्न झाला. ह्या मानासिक ऐक्यभावानें पुढें लवकरच परस्परांचीं अंतःकरणें एकवटून टाकण्याचें नाजूक काम केलें !

मॉ० रोलंद हे नुकतेच जर्मनींतून प्रवास करून आले असून त्यानीं त्या प्रवासाचें वर्णन लिहिलेलें होतें. हें वर्णन व त्याबरोबर दुसरे कांहीं हस्तलेख त्यानीं जेनजवळ पाहाण्याकरितां दिले, हे हस्तलेख प्रवासवृत्तें, त्यांवर त्याचे स्वतःचे विचार व व्यक्तिविषयक आख्यायिका यांनीं भरलेले होते. त्यांवरून मॉ० रोलंद यांची विद्वता अभिरुची, मनःस्थिति व विचारसरणी यांची स्पष्ट ओळख होण्यासारखी होती. हे लेख जेनच्या स्वाधीन करून मॉ० रोलंद हे इटाली वगैरे देशांमध्यें प्रवासास गेले. तेथें जाण्यापूर्वी त्यांनीं पॅरिसमध्यें असलेल्या आपल्या भावाची व जेनची ओळख करून दिली. हा भाऊ पॅरिसमध्यें एका पाद्र्यांच्या जागेवर होता. प्रवासामध्यें असतां मॉ० रोलंद हे जेनला पाठवावयाचीं पत्रें व प्रवासवृत्तें वगैरे आपल्या ह्या भावाच्या मार्फत पाठवीत. प्रवासास गेल्यापासून सुमारें १८

महिन्यांनीं ते पॅरिस येथें परत आले. तेव्हांपासून जेनशीं त्यांचा परिचय दृढ होऊं लागला. त्यांनीं आपले वाङ्मयात्मक उद्देश व बेत जेनला कळविले व तिला ते फार पसंत पडलेले पाहून त्यांना पुष्कळ समाधान वाटलें. याप्रमाणें परस्परांमध्यें दिवसानुदिवस अधिकाधिक दळणवळण वाढूं लागलें; परंतु २।३ वर्षेपर्यंत प्रणयीप्रेमाची कल्पना कोणाच्याही मनांत आली नाहीं; जेनहो मॉ० रोलंद यांस आपला मार्गदर्शक मित्र समजत असे. त्यांची विद्वत्ता, बुद्धिमत्ता व रसिकता यांनींच तिचे मनांत त्यांजविषयीं अत्यंत पूज्यभाव उत्पन्न केला होता. उलटपक्षीं मॉ० रोलंद हे वडिलांच्या नात्यानें तिजवर अत्यंत ममता करीत. तिची विलक्षण बुद्धिमत्ता व तिचें चटकदार आणि मधुर भाषण व विशेषतः तिचे ठायीं आपणासंबंधानें वसत असलेला आदर पाहून ते तिजवर नेहमीं प्रसन्न असत. उभयतांना एकमेकांच्या सहवासांत अप्रतिम सुखाचा अनुभव घ्यावयास मिळे. वाङ्मयात्मक, राजकीय तात्विक, शास्त्रीय वगैरे नाना प्रकारच्या विषयांवर त्यांचीं वारंवार संभाषणें व वाद होत, मॉ० रोलंद यांची विषयप्रतिपादनशैली फार वर्णनीय असे. ते निश्चयी, स्वमताभिमानी, व किंचित् हट्टी होते. जेन त्यांना अत्यंत पूज्य मानीत असल्यामुळें त्यांच्या मतांची ती प्रशंसा करी, ती ऐकून त्यांना समाधान वाटे व त्यांचें समाधान झालेलें पाहून जेनला सुख होई. याप्रमाणें कांहीं दिवस आनंदांत घालविल्यावर मॉ० रोलंद हे आपल्या नोकरीवर रुजू होण्याकरितां पुन्हा आमेन्स शहरीं परत आले. तेथें येतांच त्यांनीं ईटलीच्या प्रवासाचें वर्णन लिहिण्याच्या उद्योगास सुरवात केली. ह्या वर्णनाचे सर्व हस्तलेख त्यांनीं जेनकडे पाहाण्याकरितां पाठविण्याचा क्रम सुरू केला. हे लेख जेन फार काळजीपूर्वक वाची; व त्यांवर आपलीं मतें व विचार हीं नमूद करून मग ते मॉ० रोलंद यांजकडे परत पाठवी. या पत्रव्यवहारांत तात्विक व राजकीय विवेचनांत मधून मधून क्वचित् स्थलीं प्रणयप्रेमसूचक असे उद्गार उभयतांच्या लेखणींतून कधींकधीं बाहेर पडत. असेही कांहीं दिवस गेल्यानंतर मॉ० रोलंद यांनीं आपला हेतु स्पष्टपणें जेनला कळविला; परंतु त्यांच्या घराण्याचा अभिमान जेनला ठाऊक होता व असल्या घराण्यांतील पुरुषाशीं लग्न करण्यासारखी

आपली स्थिति नाहीं हेंही ती जाणत होती. तसेंच आपल्या संबंधामुळें ज्या घराण्यास कमीपणा येण्याचा संभव आहे त्या घराण्याशीं संबंध ठेवण्याचा तिला एक प्रकारचा कंटाळा होता. यामुळें तिनें या बाबतींत मॉ० रोलंद यांस पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें—"मीं आपली पत्नि व्हावें, अशी तुम्हांस इच्छा उत्पन्न झालेली पाहून मला फार आनंद वाटतो. माझे माहितीचे जे लोक आहेत त्या सर्वांत आपल्याइतका मला कोणीही प्रिय नाहीं. आपण मजवर जें प्रेम करीत आहां, त्याचा योग्य मोबदला आपणांस मीं मोठ्या खुषीनें दिला असता; परंतु दुर्व्यसनामुळें माझ्या बापाची सांपत्तिक स्थिति फार वाईट झालेली असून अद्यापही त्याचें वर्तन इतकें वाईट आहे कीं, त्यामुळें त्याच्याशीं संबंध असलेल्या मनुष्यास नेहमीं खालीं पहाण्याची पाळी येते. अशा स्थितींत मीं आपली विनंति मान्य केल्यास पुढेंमागें आपल्या लौकिकास कमीपणा येऊन आपल्या मनास अस्वस्थता उत्पन्न होण्याचा संभव आहे. असें झाल्यास मला तें (आपणांविषयीं माझें मनांत खरें प्रेम असल्यामुळें) पाहवणार नाहीं याकरितां आपण मनांत आणलेला विचार सोडून द्यावा असें मी आपणांस मोठ्या दुःखानें व नम्रतापूर्वक कळवितें."

आपला नम्र—जेन.

मॉ० रोलंद यांचा जेनबरोबर लग्न करण्याचा पूर्ण निश्चय झाला असल्यामुळें त्यांनीं जेननें वरील पत्रांत दर्शविलेल्या अडचणीस मुळींच जुमानलें नाहीं; व 'काहीं झालें तरी मी त्याबद्दल मुळींच खेद मानणार नाहीं, करितां माझ्या म्हणण्यास तुम्हीं मान द्यावा, अशी माझी तुम्हांस आग्रहपूर्वक विनंति आहे.' असें त्यांनीं तिला कळविलें. ह्यासंबंधानें उभयतांमध्यें बराच पत्रव्यवहार झाला. शेवटीं मॉ० रोलंद आग्रह सोडीत नाहींत, असें पाहून जेननें त्यांच्या म्हणण्यास रुकार दिला; पण फ्रान्सच्या तत्कालीन रीतीस अनुसरून, ह्या संबंधानें आपल्या बापास एक पत्र लिहिण्याविषयीं तिनें त्यांस सुचविलें. त्याप्रमाणें मॉ० रोलंद यांनीं ग्रेशँ क्रिपाँयांस पत्र लिहून वरील गोष्टीस त्यांची संमति मागितली. ग्रेशँ क्रिपाँनें ह्या गोष्टीस संमति तर दिली नाहींच पण उलट, मॉ० रोलंद यांस उद्धटपणाचें पत्र पाठवून त्यांचें मन मात्र त्यानें दुखविलें !

आपल्या बापाचें हें वर्तन पाहून जेनला अत्यंत वाईट वाटलें व ज्या अर्थी आपल्यास आवडणाऱ्या गृहस्थाबरोबर आपणांस विवाह करतां येत नाहीं, त्याअर्थीं लग्नच करावयाचें नाहीं, असा निश्चय करून ती आपल्या बापाच्या परवानगीनें पूर्वींच्या मठांत राहण्यास गेली. मठांतील मंडळींना तिच्या येण्यानें फारच आनंद झाला व त्यांनीं तिला मदत करण्याची पुष्कळ इच्छा दर्शविली; परंतु स्वतःच्या पायांवर उभें राहण्याचा तिचा पक्का निर्धार असल्यामुळें तिनें कोणाचीही मदत स्वीकारली नाहीं. तिच्या आईच्या उत्पन्नांतून तिला दरसाल जे वीस पौंड मिळत त्यांतच आपला निर्वाह करावयाचा, असा तिनें निश्चय केला. अर्थात तिला आपला खर्च फार बेताबातानें करावा लागे. ह्या ठिकाणीं भात, बटाटे, घेवडा, मीठ व कधीं कधीं लोणी इतकेंच काय तें तिचें मुख्य भक्ष्य होतें. मठांतील स्त्रियांमध्यें मिसळण्याचे प्रसंग मोठ्या काळजीपूर्वक टाळून ती आपला बहुतेक वेळ अभ्यासांत व विचारांत घालवीत असे. दररोज संध्याकाळीं, एक तास मात्र मागें सांगितलेली तिची प्रिय मैत्रीण जी सिस्टर आगाथा, तिजबरोबर गप्पा मारण्यांत ती घालवी. तसेंच, आपल्या बापास व एका नातेवाईकास भेटण्याकरितां म्हणून आठवड्यांतून दोन वेळां मठाबाहेर जाण्याचा तिनें सांप्रदाय ठेविला होता. मॉ० रोलंद यांचा जेनच्या बापानें पत्रद्वारें जरी फार अपमान केला होता, तरी त्यांनीं तिकडे फारसें लक्ष न देतां जेनबरोबर पूर्वींप्रमाणेंच पत्रव्यवहार चालू ठेवला होता. लग्नाच्या विषयावर मात्र त्यांनीं त्यानंतर लिहिण्याचें सोडून दिलें होतें. त्यांजकडून बारंवार पत्रें येत असल्यामुळें मठांतील एकांतवास जेनला फारसा कंटाळवाणा वाटत नसे. अशा स्थितींत सुमारें ६ महिने गेल्यावर मॉ० रोलंद कांहीं कामाकरितां पॅरिस येथें आले. तेव्हां ते सहजच एके दिवशीं जेनला भेटण्याकरितां गेले. खाण्यापिण्याची आबाळ व औदासिन्य यांमुळें जेनचा चेहरा फिकट झाला होता, व प्रकृतीही थोडीशी क्षीण झाली होती. तिचा तो फिकट चेहरा व म्लान मुख पाहून मॉ. रोलंद यांस गहिंवर आला. आपणांकरितां तिला विनाकारण हाल भोगावे लागत आहेत हें पाहून त्यांना फार वाईट वाटलें. तिचें मधुर व मोहक भाषण ऐकून पुन्हां त्यांच्या मनांत मागील गोष्ट घोळूं लागली व आप-

णाबरोबर विवाह करण्याबद्दल आणि विवाहाचा समारंभ आपल्या धर्माधिकारी बंधूच्या हस्तें उरकून घेण्याबद्दल फिरून ते तिला वारंवार आग्रह करूं लागले. ह्या खेपेस फारसे आढेवेढे न घेतां त्यांचें म्हणणें जेननें कबूल केलें. याप्रमाणें इ० स० १७८० च्या हिंवाळ्यामध्यें जेन ही मॉ. रोलंद यांची धर्मपत्नी झाली. अर्थात् यापुढें मॅडम रोलंद याच नांवानें तिचा उल्लेख होऊं लागला. लग्नसमयीं मॅडम रोलंदचें वय २५ वर्षांचें असून मॉशर रोलंद याचें वय ४५ वर्षांचें होतें.

लग्न झाल्यावर पहिलें वर्ष या जोडप्यानें पॅरिस येथेंच घालविलें. हें वर्ष मॅडम रोलंदला फार सुखाचें गेलें. ह्या वर्षी मॉ. रोलंद यांनीं निरनिराळ्या कलांसंबंधानें एक पुस्तक छापण्यास सुरवात केली होती. ह्या पुस्तकाचे हस्तलेख व कच्चे खरडे (प्रूफें) मोठ्या काळजीनें तपासून मॅडम रोलंदनें आपल्या नवऱ्यास वेळोवेळीं उत्तम प्रकारें साह्य केलें. ती आपला बहुतेक वेळ त्यांच्या अभ्यासाच्या खोलींत घालवीत असे. त्यामुळें त्यांच्या सर्व विचारांशीं तिचें साहचर्य होऊन प्रत्येक कामांत तिला आपल्या नवऱ्यास मदत करतां येऊं लागली. मॉ. रोलंद यांनीं याखेपेस एका हॉटेलामध्यें सर्व प्रकारच्या सामानानें आयतीच शृंगारलेली जागा भाड्यानें घेतली होती. आपल्या नूतन स्त्रीस स्वयंपाक करण्याची जिकीर पडूं नये, म्हणून त्यांनीं ही व्यवस्था केली होती; परंतु हॉटेलांतील जेवण त्यांना मानवत नाहीं, असें जेव्हां मॅडम रोलंदच्या लक्षांत आलें, तेव्हां तें जेवण बंद करवून आपण स्वतः स्वयंपाक करण्याचा तिनें क्रम सुरू केला! नवऱ्याकरितां इतकी दगदग सोसण्यास युरोपियन स्त्रिया क्वचितच तयार होतात; म्हणून मॅडम रोलंदच्या वरील कृतीस विशेष महत्त्व दिलें गेलें आहे. पाकसिद्धी करून शिवाय नवऱ्यानें हातीं घेतलेल्या वाङ्मयात्मक व्यवसायाच्या प्रत्येक शाखेंत ती मोठ्या उत्साहानें त्यास मदत करी. तिची मदत मॉ. रोलंद यांस इतकी उपयुक्त वाटे कीं, पुढें पुढें प्रत्येक कामांत तिचा सल्ला व मदत घेतल्यावांचून ते कधींही रहात नसत. मॉ. रोलंद यांचा उद्योग लहानसहान नव्हता. अनेक शास्त्रीय विषयांवर पुस्तकें लिहिण्याचें काम त्यांनीं सारखें चालविलें होतें. यामुळें मॅडम रोलंदला तिच्या वयानुरूप चैन व विलास करण्यास फारशी फुरसत सांपडत नसे.

पण लहानपणापासूनच पोकळ चैनीकडे तिचें फारसें लक्ष नसल्यामुळें तिला त्याबद्दल केव्हांही वाईट वाटलें नाहीं. उलट, ती आपला सर्व काळ चांगल्या प्रकारच्या व्यासंगात जात असल्याबद्दल आनंद मानी. परंतु एकसारखे मानसिक श्रम केल्यामुळे तिची प्रकृति नादुरुस्त होऊं लागली; तशांत तिला ७।८ महिने गेले असल्यामुळें सदर श्रमांचा तिच्यावर विशेष परिणाम झाला—ही गोष्ट मॉं. रोलंद यांच्या लक्षांत येतांच ते हवा बदलण्याच्या हेतूनें मॅडम रोलंदला घेऊन आथेन्स शहरीं आले. या ठिकाणीं आल्यावर लवकरच मॅडम रोलंदला एक कन्यारत्न झालें! या गोष्टीला कांहीं दिवस झाल्यानंतर मॅडम रोलंदचा विद्याव्यासंग पुनः सुरू झाला. मॉं. रोलंद हे ह्या वेळीं एका विविधलेखसंग्रहाकरितां कांहीं लेख लिहीत होते. ह्या लेखांची सामुग्री जमवून तिची मांडणी करण्याचें काम तिनें इतक्या शिताफीनें बजाविलें कीं, मॉं. रोलंद यांची सदर लेखांबद्दल चोहोंकडे फारच वाहवा झाली! मॉं. रोलंदपेक्षां मॅडम रोलंदच्या लिहिण्यांत विशेष जोम असे. तसेंच तिची भाषापद्धति, स्वविचार प्रदर्शित करण्याची हातोटी व कल्पकता ही एकापेक्षां एक सरस असल्यामुळें तिच्या लेखांत प्रौढपणा, चटकदारपणा व मनोवेधकत्व फार असे. तिच्या ह्या लेखनकौशल्याचा मॉं. रोलंद नेहमीं उपयोग करून घेत असत. ह्याप्रमाणें परस्परांचे गुण परस्परांस आवडत असल्यामुळें व दोघेंही एकमेकांची योग्यता ओळखून वागत असल्यामुळें दोघांचेंही आयुष्यक्रमण मोठ्या आनंदांत व सुखांत चाललें होतें. त्यांतच अपत्यसुखाची भर पडल्यामुळें त्यांचा आनंद द्विगुणित झाला होता. मॉं. रोलंद यांना द्रव्यप्राप्ति चांगली होत असल्यामुळें संपत्तीच्या बाजूनेंही त्यांना कांहीं उणीव नव्हती. ह्या स्थितींत त्यांनीं सुमारें चार वर्षे आमेन्स शहरीं काढलीं. मॅडम रोलंदला जें कन्यारत्न झालें म्हणून मागें सांगितलें, त्यावर ह्या चार वर्षांत तिला दुसरें मूल झालें नाहीं. यामुळें त्या मुलीवर तिचें अतोनात प्रेम होतें. तिची सर्व व्यवस्था ती स्वतः पहात असे. हिचें नांव युदोरा होतें. आपल्या आईप्रमाणें ही मुलगी मोठी चलाख व पाणीदार होती. तिच्या मनोरचनेची योग्य वाढ करण्याविषयीं मॅडम रोलंद फार दक्षता बाळगीत असे. मॉं. रोलंदही आपल्या एकुलत्या व तेजस्वी मुलीचें वारंवार कौतुक

करीत असे; आमेन्स येथें चार वर्षें सुखोपभोगांत काढल्यावर मॉ. रोलंद कुटुंबासह इंग्लंडास गेले. इंग्लंडांत त्यांचें बरेंच आदरातिथ्य झालें. त्या देशांतील त्या वेळच्या कांहीं स्वतंत्र राजकीय संस्थांचें मॅडम रोलंदला मोठें कौतुक वाटलें व राष्ट्र या दृष्टीनें फ्रेंच लोकांपेक्षां इंग्लिश लोक फार उच्च दर्जाचे आहेत असें तिच्या मनानें घेतलें. इंग्लंडाहून ती जेव्हां परत आली तेव्हां फ्रान्सच्या अनियंत्रित राजसत्तेविषयीं तिच्या मनांत पूर्वीपेक्षांही जास्त असंतोष उत्पन्न झाला! इंग्लंडाहून परत आल्यावर थोड्या दिवसांनीं मॉ. रोलंद यांची बदली लायन्स शहरीं झाली. या शहरापासून जवळच मॉ. रोलंद यांची 'लाप्लातेअर' नांवाची वडिलार्जित मालमत्ता होती. हें स्थल एका डोंगराच्या पायथ्याशीं, सेन नदीच्या वळणापाशीं असलेल्या झाडींत असल्यामुळें तेथील देखावा अत्यंत रमणीय होता. उन्हाळ्याचे दिवसांत मॉ. रोलंद आपल्या कुटुंबासह येथें येऊन रहात असत. सृष्टिसौंदर्यानें सुशोभित अशा ह्या एकांत व रमणीय स्थलीं सर्व प्रकारचा सुखोपभोग घेत मॅडम रोलंदनें आपल्या आयुष्यांतील अत्यंत सुखाचीं अशीं ५ वर्षें घालविलीं. संपत्तीच्या विपुलतेमुळें तिला कोणत्याही गोष्टीची कमतरता नव्हती. हातीं घेतलेल्या वाङ्मयात्मक उद्योगांत, मॉ. रोलंदसारख्या विद्वान् व रसिक पतीच्या आणि युदोरासारख्या सुंदर मुलीच्या सहवासांत व गृहव्यवस्थेची देखरेख करण्यांत तिचा काल इतका भराभर जाऊं लागला कीं, पांच वर्षें केव्हां गेलीं हें तिला कळलेंही नाहीं! ह्या शांततेच्या ५ वर्षांमध्यें तिची दिनचर्या कशी होती, हें पाहणें आनंदकारक असल्यामुळें ती येथें देतों.

सूर्योदयाबरोबर उठून, आपला नवरा व मुलगी यांची वास्तपुस्त केल्यावर सकाळच्या जेवणाची तयारी करण्यास ती लागे. कांहीं पदार्थ आपण स्वतः हातानें करी. जेवण तयार झाल्यावर तिचें सर्व कुटुंब एकाच टेबलावर जेवावयास बसे. जेवण चालू असतां मॅडम व मॉ. रोलंद आणि युदोरा यांचा प्रेमसंवाद चालू असे. जेवण आटोपल्यावर मॉ. रोलंद आपल्या अभ्यासाच्या खोलींत जात. जातांना ते आपल्या प्रिय युदोरेला बरोबर घेऊन जात. तेथें ती आपली पेन्सिल अथवा वाचनाचें पुस्तक यांच्याशीं करमणूक करीत बसे व कधीं कधीं, आपल्या आईबापांनीं

शिकवलेले धडे वाचण्यांत आपला वेळ घालवी. ह्या वेळामध्यें मॅडम रोलंद आपल्या गृहकृत्यांवर देखरेख करीत असे. गृहकृत्यासंबंधाचें सर्व शिक्षण तिच्या आईकडून तिला उत्तम प्रकारचें मिळालेलें असल्यामुळें ती स्वतः त्यांत फार निष्णात होती. यामुळें तिच्या घरांतील व्यवस्था अगदीं चोख असे. सर्व महत्त्वाच्या गोष्टी ती बहुधा स्वतः करी व तिच्या हाताखालचे दोघे नोकरही चांगले असल्यामुळें बाकीचीं कामेंही अगदीं बिनबोभाट व व्यवस्थितपणानें होत असत. गृहकृत्यांप्रीत्यर्थ तिला रोज दोन तासच खर्चावे लागत. हें काम आटोपतांच ती मॉ. रोलंद यांस मदत करण्याकरितां त्यांच्या अभ्यासाच्या खोलींत जाई. तेथील ठराविक काम संपतांच ती दोन प्रहरच्या जेवणाची तयारी करण्यास लागे. ह्या वेळीं ती रीतीप्रमाणें सुरेख पोषाख करून मोठ्या व्यवस्थितपणानें जेवावयास येणाऱ्या पाहुण्यांचें (दोन प्रहरच्या जेवणास नेहमीं कांहीं तरी पाहुणे असतच) आदरातिथ्य करी. हें जेवण झालें म्हणजे त्या दिवसाचें बहुतेक काम संपे. जेवणानंतर जमलेली सर्व मंडळी बराच वेळ गप्पा मारण्यांत घालवीत. नंतर ते बागेंतून इकडे तिकडे फिरण्यांत व सृष्टिसौंदर्याची गंमत पहाण्यांत कांहीं वेळ घालवून आपापल्या घरीं जात. ह्या वेळांत मॅडम रोलंद आपल्या कांहीं मित्रांस पत्रें लिहिण्याकरितां अथवा युदोरेला शिकविण्याकरितां पुस्तकालयांत जात असे. स्वच्छ हवा असेल तेव्हां कधीं कधीं ती मॉ. रोलंदबरोबर कित्येक मैलपर्यंत सहल करावयास जात असे. व वाटेंत कांहीं गरीब शेतकऱ्यांच्या झोंपड्यांत जाऊन त्यांच्याशीं चार प्रेमाचे शब्द बोलून त्यांच्या स्थितीची माहिती करून घेत असे. संध्याकाळीं चहा घेतल्यावर तीं दोघेंही पुस्तकालयांत जात. कित्येक प्रख्यात व वजनदार लोक ह्या वेळीं तेथें जमत व तात्विक आणि बुद्धिविषयक विषयांच्या चर्चेंत सर्वांचाच वेळ मोठ्या आनंदांत जाई. रोजचीं वर्तमानपत्रें तेथें वाचलीं जात. वाचण्याचें काम सर्वानुमतें मॅडम रोलंदकडे दिलें जात असे. अशा प्रकारें निरनिराळ्या व्यवसायांत गुंग झाल्यावर पांच वर्षें केव्हां निघून गेलीं, याचें तिला भान नसावें यांत आश्चर्य तें काय ? असो; मॅडम रोलंद वैद्यशास्त्रांतही बरीच वाकबगार झाली होती. ती रहात असलेल्या ठिकाणच्या आसपास चांगल्या वैद्याची मदत मिळ-

ण्याचा संभव नसल्यामुळें आसपासच्या गरीब लोकांस तीच फुकट औषध देत असे. विशेष प्रसंगीं ती स्वतः त्यांच्या घरींही जाई. औषधाच्या निमित्तानें गरीब लोकांमध्यें मिसळण्याचे तिला वारंवार प्रसंग आल्यामुळें त्यांच्या कंगाल स्थितीशीं तिचा चांगला परिचय झाला होता. तसेंच त्यांच्या अंगच्या स्वाभाविक सद्‌गुणांचीही तिला पुष्कळ माहिती झाली होती. अशा सद्गुणी माणसांस कांहीं नियमित स्वार्थपरायण व्यक्तींच्या सुखाकरितां अर्धपोटीं रहावें लागत असलेलें पाहून तिचें अंतःकरण खवळून जात असे व इतके हाल भोगावे लागत असूनही लोक स्वस्थ कां ब कसे बसतात याचें तिला आश्चर्य वाटे! मानवी मनोवृत्तींचा समुद्र अशा वेळीं अगदीं शांत असलेला पाहून तिला फार दुःख होई; परंतु पुढें लवकरच ह्या समुद्रावर वादळ उत्पन्न झालेलें पहाण्याचा प्रसंग तिला आला तो कसा, हें पुढील प्रकरणांत कळवू.

प्रकरण ५ वें.

राष्ट्रीय सभा.

ह्या चरित्राच्या पहिल्या प्रकरणांत, फ्रान्सच्या लोकांच्या मनांमध्यें १७५० च्या सुमारास जे विचार घोळत होते म्हणून सांगितलें आहे, ते विचार आतां उघडपणें बाहेर पडूं लागले होते. १७५० पासून ह्या वेळेपर्यंत म्हणजे १७८५ पर्यंत जो काळ गेला, ह्या काळांत फ्रान्सच्या अनियंत्रित राजसत्तेचीं सूत्रें चालविणारे कर्ते व बुद्धिवान् लोक बहुतेक मृत्यु पावलेले असल्यामुळें सामान्य प्रतीच्या राजकारणी पुरुषांच्या हातीं येऊन तेथील राज्यव्यवस्था त्या सुमारास अगदीं अव्यवस्थित बनलेली होती. प्रधानमंडळामध्यें मतभेद व मत्सर यांचा रिघाव झालेला होता. तसेंच, लोकांमध्यें वाढत चाललेला असंतोष, सत्तेच्या व वैभवाच्या जोरावर दाबून टाकण्याचें अथवा युक्तिप्रयुक्तीनें लोकांस थोडेंबहुत संतुष्ट ठेवून

वश करून घेण्याचें ह्या प्रधानमंडळांतील लोकांत सामर्थ्य (कर्तृत्व) नव्हतें. यामुळें लोकांच्या मनांतील असंतोष बाहेर पडण्यास वाव सांपडून देशांत सर्वत्र अस्वस्थता उत्पन्न झाली. कित्येक दिवसपर्यंत सोशीत असलेल्या दुःखाला लोक अगदीं कंटाळून त्या दुःखाचा नायनाट करण्याची वेळ केव्हां येते याची ते अगदीं चातकाप्रमाणें वाट पहात बसलेले होते. पूर्वींच्या राजकर्त्यांच्या अविचारानें सरकारी तिजोरीची फार दुर्दशा झालेली होती यामुळें, याचा वाढता खर्च भागविण्यास त्यांना फार पंचाईत पडूं लागल्यामुळें लोकांवर निरनिराळे कर बसविण्याची यांना पाळी आली; परंतु लोक अगोदरच इतके हवालदिल झालेले होते कीं, त्यांना नवीन नवीन कर देण्याचें बिलकुल सामर्थ्य उरलेलें नव्हतें. सरकारला कर्ज काढण्याचीही सोय नव्हती, कारण अगोदरचेंच पुष्कळ कर्ज असून देशाची एकंदर स्थिति फारशी समाधानकारक नसल्यामुळें सरकारची कोठेंही पत राहिलेली नव्हती. तसेंच ज्या सरदार व पाद्री वर्गाचा सरकारनें वारंवार कैवार घेऊन त्यांचे खिसे भरण्याकरितां लोकांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें करडा अंमल गाजविला होता, तो वर्गही ह्या वेळेस स्वतः थोडीशी झीज सोसून सरकारास मदत करण्यास तयार नव्हता. ह्या वर्गाची ही स्वार्थलोलुपता पाहून तर कनिष्ठ वर्गांतील लोकांत त्यांविषयीं अधिकच द्वेष उत्पन्न होऊं लागला कारण, असल्या कृतघ्न लोकांच्या हिताकरितां सरकारनें लोकांस अनेक प्रकारें त्रास दिला होता. शिवाय मध्यम वर्गांतील लोक वक्तृत्व व लेख ह्यांच्या द्वारें राजकीय विषमतेचें भयंकर स्वरूप कनिष्ठ लोकांपुढें अनेक वर्षेंपर्यंत वारंवार मांडीत आले असल्यामुळें त्यांचीं मनें राज्यसत्तेविरुद्ध चळवळ करण्यास अगोदरच तयार झालेलीं होतीं, तेव्हां सरकारच्या वरील निकृष्ट स्थितीचा फायदा घेऊन त्यास प्रतिरोध करण्यास ह्यावेळीं ते साहजिक मोठ्या उत्साहानें पुढें सरसावूं लागले. अशा वेळीं फ्रान्सच्या गादीवर १६ व्या लुईसारखा दुर्बल मनाचा राजा नुकताच स्थापन झाला होता. हा राजा स्वभावतः सद्गुणी, दयाळु व उदार मनाचा असा होता, परंतु अनेक दिवसांच्या जुलमानें गांजून गेल्यामुळें क्षुब्ध झालेल्या लोकांस शांत करणारी राज्यपद्धति सुरू करण्याचें त्यास धैर्य नव्हतें. त्याचे ठायीं मान-

सिक धैर्याचा अभाव असल्यामुळें त्याला नेहमीं कोणाच्या तरी तंत्रानें चालणें भाग पडे. सांप्रत त्याच्या मनास गति देण्याचें काम त्याची राणी 'मराया अंतोनिते' हिनें आपणाकडे घेतलेलें होतें. ह्या स्त्रीला अधिकार, चैन व सुख यांशिवाय अन्य गोष्ट माहीत नव्हती. कर्तव्य व जबाबदारी यांची तिला कल्पनाही नव्हती. अशा प्रकारचीं हीं दोन माणसें या वेळीं फ्रान्सच्या गादीवर असल्यामुळें कित्येक महत्त्वाकांक्षी, स्वार्थी, दांभिक व खुशामती पुरुषांच्या हातांत राज्यकारभाराचीं सूत्रें पडलीं. अर्थात् त्यांचें लक्ष्य, लोकांची दैन्यावस्था दूर करण्याकडे न लागतां स्वतःची महत्त्वाकांक्षा तृप्त करण्याकडे व स्वतःचें वैभव वाढविण्याकडे लागूं लागलें. हें पाहून लोकांचीं मनें अधिकच भडकलीं व फार दिवसांपासून मानेवर बसलेलें राजाच्या सत्तेचें जूं झुगारून देऊन स्वतंत्र होण्याकरितां त्यांनीं राज्यक्रांतीस सुरुवात केली !

राज्यक्रांतीची गडबड पॅरिस शहरांत जेव्हां सुरू झाली त्या वेळीं मॉ. व मॅडम रोलंड ही लाप्लातेअर येथें होतीं. त्यांच्या कानावर ह्या गडबडीची बातमी तेव्हांच जाऊन आदळली. ती ऐकून मॅडम रोलंदला फार आनंद झाला आणि फ्रान्समधल्या मानवी प्राण्यांची गुलामगिरी आतां खास नष्ट होणार असें तिला वाटून तिच्या अंगांत एक प्रकारचें विलक्षण स्फुरण चढलें व हें पवित्र कार्य व्यवस्थितपणें शेवटास नेण्याकरितां आपलें तन मन धन खर्च करावयाचें,असा तिनें पक्का निर्धार केला. तिचा हा उत्साह व निश्चय पाहून शांतताप्रिय जे मॉ. रोलंद यांच्या अंगामध्येंही चैतन्य उत्पन्न झालें ! ह्या कार्याप्रीत्यर्थ तिनें जेव्हां आपलें वक्तृत्व व लेखनकौशल्य खर्च केलें, तेव्हां तिच्या मनामध्यें प्रज्वलित झालेल्या मनोवृत्ति तिच्या मित्रांच्या मनामध्येंही खळबळ करूं लागल्या. व लवकरच ते तिचे अनुयायी बनले. राज्यक्रांतीची लाट उसळूं लागताच १६ व्या लुईनें ती थांबविण्याचा बराच प्रयत्न केला परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं.

राज्यक्रांतीला एकदां सुरुवात झाली म्हणजे ती अस्तित्वांत असलेल्या राज्यसत्तेची जनतेच्या क्रोधाग्नीला आहुति दिल्याशिवाय कधींही थांबत नसते. तिचा प्रतिकार करण्याची खरी वेळ म्हटली म्हणजे ती सुरू

होण्याच्या पूर्वींची होय. एकदां तिनें आपलें विराट स्वरूप प्रकट केलें म्हणजे तिचा प्रतिकार मानवी राजाला—मग तो कितीही कां बलाढ्य असेना—करितां येणें शक्य नाहीं ! त्यातून सोळाव्या लुईसारख्या दुर्बल राजाची गोष्ट तर बोलावयासच नको ! परंतु मनुष्याचा असा स्वभावच आहे कीं, आपण उद्यां मरणार असें जरी त्याला खात्रीनें वाटत असलें, तरी तो आपलें मरण पुढें ढकलण्याचा प्रयत्न करीतच असतो. याच न्यायानें सोळावा लुईहि आपणावर येणारें अरिष्ट टाळण्याचा साधेल तसा प्रयत्न करीत होता; परंतु लोकांच्या क्षुब्धतेनें त्या वेळीं फारच भयंकर स्वरूप धारण केलें असल्यामुळें आपली सत्ता संरक्षण करण्याचे त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ होऊन निरुपायास्तव त्याला लोकनियुक्त 'राष्ट्रीय सभे'ची स्थापना करणारी शासनपत्रिका· (कॉन्टिटयूशन) जाहीर करणें भाग पडलें. ह्या राष्ट्रीय सभेमध्यें सरदार, पाद्री व सामान्य लोक ह्या तीन वर्गांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा समावेश केलेला होता. त्यांत सामान्य लोकांच्या तर्फे निवडून आलेल्या प्रतिनिधींत 'लायन्स' शहरातर्फे मॉ.रोलंद हे निवडून आले होते. राज्यक्रांतीची चळवळ सुरू झालेली ऐकतांच मॅडम व मॉ.रोलंद यांनीं लोकपक्षाचें समर्थन करणारे जे लेख लिहिले व जीं भाषणें केलीं त्यांचा लायन्स येथील व आसपासच्या लोकांवर इष्ट परिणाम घडून राज्यक्रांतीची चळवळ करणारा एक पक्ष खुद्द लॉयन्स. शहरांत निर्माण झाला होता. यामुळें त्या प्रांतांतील आबालवृद्ध मॉ. व मॅडमरोलंदला ' उद्धारक ' ह्या विशेषणानें संबोधूं लागले होते. अर्थात् राष्ट्रीय सभेची स्थापना होऊन तिचे प्रतिनिधी निवडण्याची वेळ येतांच त्यांनीं तो मान मॉ. रोलंद यांस मोठ्या आदरानें द्यावा हें अगदीं स्वाभाविक होतें. राष्ट्रीय सभेमध्यें प्रतिनिधि या नात्यानें निवडणूक झाल्यावर तिच्या बैठकीची वेळ येईपर्यंत मॉ. रोलंद हे कांहीं दिवस लायन्सला येऊन राहिले होते. मॅडम रोलंद ही आपल्या लहान मुलीसह त्यांच्या बरोबर होती. ह्या दिवसांत त्यांचे घरीं रोज मंडळींची एकसारखी रहदारी चालू असे. राज्यक्रांतीला अनुकूल व राज्यक्रांतीच्या धामधुमींत प्रत्यक्ष अंग असलेले सर्व वजनदार लोक मॅडम रोलंदच्या बसण्याच्या खोलींत महत्त्वाच्या गोष्टीसंबंधानें खलबतें करण्यास रोज संध्याकाळीं एकत्र जमत.

त्या वेळीं मॅडम रोलंदचे जोरदार व बहुश्रुत व मनोवेधक संभाषण ऐकून त्यांच्या मनामध्यें विलक्षण ईर्षा उत्पन्न होऊन स्वीकृत कार्याप्रीत्यर्थ हवीं तीं दुःखें भोगण्यास ते उत्साहानें तयार होत. तसेंच स्वातंत्र्याविषयीं प्रेम उत्पन्न करणारीं तिचीं उत्साहजनक भाषणें ऐकून गांवांतील होतकरू तरुणांना वीरश्री चढत असे. याप्रमाणें मॅडम व मॉ. रोलंद यांनीं लोकपक्षाचा पुढाकार घेतल्याकारणानें लायन्स येथील सरदार व राजपक्षाचे लोक यांनीं त्यांच्याशीं द्वेष करण्यास सुरुवात केली. यामुळें पुढें प्रत्येक दिवशीं क्रांतिकारक मंडळीच्या तोंडून त्यांचा विशेष जयजयकार हाऊं लागला. वरील दोन प्रकारच्या लोकांकडून त्यांना शिव्याशाप मिळं लागले. ह्या दोन्ही पक्षांच्या कृतींचें मॅडम रोलंद जों जों सूक्ष्म परीक्षण करूं लागली, तों तों लोकस्वातंत्र्याची कल्पना तिच्या मनांत अधिकाधिक बळावूं लागली. अर्थात् सरदार व राजपक्षाचे लोक यांचे आक्षेप व त्यांच्याकडून होत असलेली कडक टीका यांची फारशी पर्वा न करितां स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कार्मी आपलें तन, मन, धन, अर्पण करण्याचा तिनें निश्चय केला. यापुढें ' लोकस्वातंत्र्य ' हाच तिच्या कर्तव्याचा ध्येय विषय बनला व आपल्या अंगांत असलेली सर्व शक्ति एक चित्तानें तो ध्येय विषय साध्य होण्याकरितां खर्च करावयाची असं तिनं आपल्या मनाशीं ठरविलें*

---

* **मॅडम रोलंदच्या** ह्यावेळच्या मानसिक स्थितीचें वर्णन **लॅमर्टीन** नांवाच्या इतिहासकारानें पुढीलप्रमाणें केलें आहेः—

' Passionately devotes to the ideal of humanity, an adorer of antigue liberty, she took fire at the first spark of this focus of new ideas; she believed with all her faith that this revolution mwst regenerate the human race, destroy the misery of the working Classes for whom she felt the deepest sympathy and renew the face of the earth. From that day Madam Roland felt a fire kindled within her which was never to be quenched but in her blood. All the love while larg shumbring in her soul was Coungete in to enttrnsiasm and devotion for humen race.

राष्ट्रीय सभेच्या बैठकीची वेळ जवळ असल्यामुळें मॅडम व मॉ. रोलंद आपल्या मुलीसह १७९१ च्या फेब्रुवारी महिन्याच्या विसाव्या तारखेस पॅरिसमध्यें येऊन दाखल झाली. दहा वर्षांपूर्वीं मॅडम रोलंदनें जेव्हां पॅरिस शहर सोडलें, तेव्हांच्या व आतांच्या तिच्या स्थितींत जमीन अस्मानाचें अंतर पडलें होतें. तिच्या बापाचें घराणें मूळांतच फारसें प्रसिद्ध नसल्यामुळें श्रेष्ठ संपत्तिमान् लोकांत त्या वेळीं तिची विशेष प्रसिद्धी झालेली नव्हती; शिवाय तिच्या आईच्या आकस्मिक मृत्यूनें व बापाच्या दुर्व्यसनामुळें तिची सांपत्तिक स्थिति फार निकृष्ट झालेली होती. मठामध्यें तिला किती हाल भोगावे लागले होते हें आपण मागें पाहिलेंच आहे. अशा स्थितींत लोकहितार्थ मोठमोठीं कार्यें करण्याची आपली महत्त्वाकांक्षा कशी सफल होईल हा विचार वारंवार मनांत येऊन तिचें अंतःकरण तळमळत असे, पण सुदैवानें मॉ. रोलंदासारख्या थोर व प्रसिद्ध घराण्यांतील पुरुषाशीं विवाह केल्यामुळें सांप्रत मानमान्यता व संपत्ति या बाबतींत तिची स्थिति फार समाधानकारक होती. या अनुकूल परिस्थितीमुळें तिच्या अंगच्या अनेक अमोलिक गुण—पुष्पांचा विकास होऊन त्यांचा सुगंध चहूंकडे पसरूं लागला होता. लोकांवर तिचें इतकें वजन पडत चाललें होतें कीं, तिच्या तोंडून निघणाऱ्या शब्दास ते ‘ आकाशवाणी ’ प्रमाणें मानीत. आपल्या पूर्वींच्या स्थितींत इतकें अंतर पडलेलें पाहून मॅडम रोलंदला धन्यता वाटावी हें अगदीं साहजिक असून मनुष्यस्वभावास अनुसरून आहे. पॅरिस येथें आल्यावर तिनें तात्कालिन जुलमी राजसत्तेविरुद्ध लोकांचीं मनें वळविण्याचा उद्योग इतका झपाट्यानें व उत्साहानें केला कीं, थोड्याच दिवसांत सोळाव्या लुईचें सिंहासन तिच्या उपदेशानें लोकांमध्यें उत्पन्न झालेल्या शक्तीपुढें डळमळूं लागलें. मॉ. रोलंद हेही पॅरिस येथील लोकपक्षांत दिवसेंदिवस अधिकाधिक प्रिय होत चाललें होते. त्यांचें उत्तम शील, नेको, साधी रहाणी व वर्तन आणि विद्याव्यासंगामुळें त्यांचे ठिकाणीं उत्पन्न झालेली विशेष योग्यता ह्या सर्वांचा त्यांच्या सहकारी मंडळीवर पगडा बसून राष्ट्रीय सभेंत—त्यांच्या शब्दास फार मान मिळूं लागला. मॅडम रोलंदच्या अंगच्या तरतरीमुळें व तिच्या अत्यंत चित्ताकर्षक

संभाषणशक्तीमुळें मॉ. रोलंदच्या लौकिकांत विशेष भर पडत चालली होती. ह्या सुमारास तत्कालिन परिस्थितीची लोकांस पूर्ण ओळख पटण्याकरितां मॅडम रोलंदनें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. त्या पुस्तकाची भाषासरणी इतकी जोरदार व हृदयद्रावक होती कीं, अगदीं थोड्या काळांत त्याच्या साठ हजारांवर प्रती खपल्या ! ! तरी फ्रान्समध्यें त्या वेळेस वाचणाऱ्या लोकांची संख्या पुष्कळ कमी होती. यावरून तिच्या विचारांनीं लोकांचीं मनें किती वेधून टाकलीं होतीं, याची बरोबर कल्पना होण्यासारखी आहे. ती काय बोलते व काय लिहिते. यांकडे त्यावेळीं बहुतेक लोकांचे डोळे लागून राहिलें होते. ती दररोज राष्ट्रीय सभेच्या बैठकीस हजर राहून सभेंत चालत असलेला वादविवाद विशेष काळजीपूर्वक ऐकून महत्वाच्या गोष्टीचें आपल्याजवळ टांचण करून ठेवीत असे असो; आतां मॅडम रोलंदचें चरित्र पुढेंच चालविण्यापूर्वीं १६ व्या लुईनें निरुपायास्तव स्थापन केलेल्या राष्टीय सभेसंबंधानें थोडेसें विवेचन करणें (पुढील भाग स्पष्ट कळण्याकरितां) जरूर असल्यामुळें अगोदर तिकडे वळूं.

लोकाग्रहापुढें कांहीं चालेनासें झाल्यामुळें पहिल्या लुईनें राष्ट्रीय सभेची स्थापना फ्रान्समध्यें होऊं दिली खरी; परंतु पुढें ती त्यास फार जाचक होऊं लागली. राष्टीय सभा स्थापन करण्याची उचल प्रथमतः सरदार व पाद्री या वर्गांतील बहुतेक लोकांकडून झाली होती, सरकारी तिजोरीची फारच दुःस्थिति झाली असल्यामुळें ती दूर करण्याकरितां ह्या वर्गांपासून पैसे काढल्यावांचून राजास दुसरें गत्यंतर नव्हतें, हें मागें सांगितलेंच आहे. ह्या वर्गानें सामान्य व कनिष्ट वर्गांतील लोकांस अनेक वर्षेंपर्यंत यथास्थित पिळून काढलें असल्यामुळें तो फार सधन झाला होता. शिवाय त्यांचे अन्याय झांकून टाकण्यास व प्रसंगविशेषीं त्यांच्या अन्यायास प्रत्यक्षपणें मदत करण्यास सरकारानेंही कमी केलेलें नव्हतें. अर्थात् सरकाराच्या अडचणींच्या वेळीं ह्या वर्गास मदत करण्यास सांगण्याचा सरकारला हक्क होता व अन्य मार्गांच्या अभावामुळें हा हक्क बजाविण्याचा सरकारचा निश्चयही झाला होता. वस्तुतः पूर्वींचे उपकार स्मरून ह्या वर्गानें आपण होऊनच सरकारास मदत करण्यास पुढें याव-

यास पाहिजे होतें. परंतु स्वार्थातिरेकाच्या पाशांत बद्ध झाल्यामुळें सरकाराशीं कृतघ्नपणें वागण्यास ते तयार झाले. ह्या कृतघ्नपणाची मजल इतक्या दूर गेली होती, कीं, ज्या सामान्य वर्गातील लोकांस ते कःपदार्थ मानीत असत त्यांस हाताशीं धरून राजसत्ता हाणून पाडण्याचा त्यांनीं उद्योग चालविला. राष्ट्रीय सभा स्थापन करून राजाची अनियंत्रित सत्ता निःसत्व करण्याच्या कामीं आरंभीं या वर्गानेंच पुढाकार घेतला होता. असें करण्यांत त्यांचा खरा हेतु लोकांस स्वातंत्र्य मिळवून देण्याचा नसून राजाला केवळ भिवविण्याचा होता. खालच्या वर्गातल्या लोकांच्या मनोरचनेची त्यांना बरोबर माहिती नव्हती. त्यांच्या मतें ते लोक स्वातंत्र्योपभोगास अपात्र होते. ह्यामुळें ह्या सामान्य लोकांना राज्यसत्तेविरुद्ध चळवळ करण्यास फूस दिली असतां ती आपणांस घातुक होईल, अशी नुसती कल्पनाही यांच्या मनाला शिवली नाहीं. लोकांच्या चळवळीचें प्रदर्शन करून राजाला भिववून टाकावयाचें व त्याची त्रेधा उडवून टाकण्याचा प्रसंग आणून मग त्याला मदत करण्याचें आमिष दाखवून त्याला आपल्या मुठींत आणून ठेवावयाचा, असा त्यांचा उद्देश होता; परंतु त्यांच्या कपट नाटकाचे खेळ पाहून परमेश्वर इतका संतप्त झाला होता, कीं, यापुढें त्यांचे नीच हेतु हाणून पाडून कृतकर्मांचे त्यांना योग्य प्रायश्चित्त देण्याचा त्यानें जणुं काय विडाच उचलला होता, असें पुढें घडून आलेल्या हकिकतीवरून अनुमान करण्यास हरकत नाहीं. संपत्ति, अधिकार व वैभव ह्यांच्या मदानें धुंद होऊन कांहीं लोक ह्या जगामध्यें आपल्याच बांधवांना निरर्थक छळीत असतात व कांहीं कालपर्यंत त्यांना ह्या कामांत यशही येत असतें. परंतु कालांतरानें यांच्या पापाचे घडे भरून त्यांना त्यांच्या अपराधाबद्दल शासन झाल्यावांचून कधींही रहात नाहीं. आतां कधीं कधीं हें शासन जितकें लवकर व्हावें असें आपणांस वाटत असतें तितकें लवकर तें होत नाहीं, हें खरें; परंतु तेवढयावरून 'परमेश्वराच्या घरीं न्याय नाहीं,' 'आमच्या नशीबीं त्यानें दुःखच लिहून ठेविलें आहे' वगैरे निराशेचें व दुर्बलता व्यक्त करणारे उद्गार काढून कोणीही हताश होतां कामा नये. आपला दुसऱ्याकडून छळ करवून परमेश्वर आपलें सत्व

पहात असतां व त्या सत्वास आपण उतरलों -म्हणजे, नेटानें तो छल सोसून निष्कामबुद्धीनें व चिकाटीनें आपलें कर्तव्य आपण बजावीत राहिलों, कीं परमेश्वर आपला पाठीराखा होऊन आपला छळ करणारांचें पारिपत्य करवितो, यांत बिलकुल शंका नाहीं. सरदार व पाद्री यांनीं राजाला आपल्या मुठींत आणण्याकरितां लढविलेले पेंच वरील परमेश्वरी नियमानुसार उलट त्यांच्याच गळ्यांत आले! सामान्य वर्गांतील लोकांच्या साहाय्यानें त्यांनीं राष्ट्रीय सभेची स्थापना केली व आपल्या इच्छेनुसार राष्ट्रीय सभेनें राजाची सत्ताही नियंत्रित करून टाकिली; परंतु राष्ट्रीय सभा येथेंच थांबली नाहीं. राजसत्ता नियंत्रित झाल्यावर सहजच राज्य. कारभाराची बहुतेक जबाबदारी राष्ट्रीय सभेवर येऊन पडली. ही जबाबदारी चांगल्या रीतीनें पार पाडण्याकरितां तिला द्रव्याची आवश्यकता होती. राष्ट्रीय तिजोरींत तर मुळींच द्रव्य नव्हतें. अर्थात् सार्वजनिक देवस्थानांच्या नांवावर पाद्री लोकांनीं राजाकडून वारंवार जी मालमत्ता उपटली होती, ती कांहीं शर्तींवर सरकारी खात्यांत पुन्हा जमा करण्याविषयीं राष्ट्रीय सभेनें त्यांस सुचाविलें; परंतु ह्या गोष्टीस ते कबूल होईनात. इकडे द्रव्यावांचून राज्यकारभाराचें काम सुनियंत्रित चालविणें राष्ट्रीय सभेला अशक्य वाटत होतें. अशा स्थितींत पाद्री लोकांच्या हट्टास न जुमानता त्याची मालमत्ता बळजबरीनें सरकारी ठरविणें सभेस भाग पडलें. कांहीं सरदारांच्या मिळकतीही राष्ट्रीय सभेस आपल्या ताब्यांत घ्याव्या लागल्या. ह्या सर्व कामांत सामान्य लोकांतील प्रतिनिधींनीं पुढाकार घेतला होता यामुळें त्यांच्यांत व वरिष्ठ वर्गांतील लोकांत वैमनस्यें उत्पन्न होऊन राष्ट्रीय सभेंत दुही माजूं लागली. तेव्हां आपला पक्ष सबळ करण्याचें काम सामान्य वर्गानें फार नेटानें चालविलें. ह्या वर्गांतील लोकांच्या मनामध्यें पाद्री व सरदार लोकांबद्दल अगोदरच पूर्ण तिरस्कार बाणला होता, व त्यांचा पाडाव करण्याकरितां ते अगदीं टपून बसले होते. राष्ट्रीय सभेमध्यें आयताच त्यांच्यापैकीं पुष्कळांचा शिरकाव झालेला असून त्यापैकीं कांहींजण फार हुषार, चलाख व धोरणीही होते. राजसत्ता नियंत्रित होतांच त्यांनीं आपल्या सर्व बांधवांस एकत्र करून सरदार व पाद्री लोकांचा समाचार घेण्याचा बेत करून तो मोठ्या

शिताफीनें पार पाडला. त्यांनीं हें काम इतक्या उत्तम रीतीनें केलें कीं, लवकरच वरील वर्गाचा पक्ष दुर्बळ होऊन त्यांची अगदीं दाणादाण झाली. कित्येक पाद्री व सरदार जिवाला भिऊन पळून गेले. पाद्री व सरदार लोकांचा कांटा अशा रीतीनें नाहींशीं झाल्यावर सामान्य वर्गा तील लोक राजाला लोकनियुक्त मंडळाच्या तंत्रानें राज्यकारभार चालविण्यास सांगूं लागले; परंतु अशा स्थितींत लोकनियुक्त मंडळाच्या सल्ल्यानें राज्यकारभार चालविणें म्हणजे सामान्य लोकांच्या ताब्यांत जाणें असून तें आपल्या इभ्रतीस कमीपणा आणणारें आहे अशा समजुतीनें राजा त्यांच्या म्हणण्यास कबूल नव्हता. शिवाय त्याचे मंत्री, ही लोकसभा (राष्ट्रीय सभा) तरवारीच्या जोरावर मोडून टाकण्याचा त्याला वारंवार आग्रह करीत होते. त्याच्या बायकोनें त्याला असेंच करण्यास सांगितलें. इतक्या मंडळींचा उपदेश बाजूस ठेवून लोकमताला मान देण्याचें धैर्य सोळाव्या लुईसारख्या दुर्बल मनाच्या राजाच्या ठायीं कोठून असणार ? अर्थात् त्याच्या हातून ती गोष्ट घडली नाहीं व तो सैन्य जमवून राष्ट्रीय सभेचा मोड करण्याच्या प्रयत्नास लागला. हें पाहून लोकांचीं मनें ज्यास्तच खवळलीं. आरंभीं त्याच्याविषयीं त्यांच्या मनांत पुष्कळ पूज्यभाव होता; पण त्याचें हें वर्तन पहातांच तो सर्व नाहींसा झाला. राजा लोकांस शासन करण्यास तयार झाला आहे असें पाहून पळून गेलेले पाद्री व सरदार त्यास मदत करण्यास पुढें सरसावले व त्याकरितां फ्रान्सच्या बाहेर त्यांनीं एक सैन्य जमविण्यासही सुरवात केली हें पाहून तर लोक फारच चिडले. राजा व पळून गेलेले लोक यांचीं सैन्यें एकत्र झालीं तर त्यांपुढें आपला निभाव लागणें कठीण असें जाणून सामान्य वर्गांतील लोकांनीं राजाचें सामर्थ्य होईल तितकें कमी करण्याचा निश्चय केला. हा निश्चय करण्यास लोकांचीं मनें तयार करण्याचें काम, मॅडम रोलंदनें केलें. तिच्या प्रोत्साहनानें लोकांच्या मनामध्यें स्वातंत्र्यासंबंधानें इतका उत्साह उत्पन्न झाला कीं, त्याकरितां ते आपल्या प्राणाची आहुति देण्यास मोठ्या खुषीनें तयार झाले ! जे लोक इकडे तयार झालेले असतात त्यांना कोणत्या राजाची तरवार भिवविणार आहे ? व कोणत्या बंदुकीचा आवाज त्याचा उत्साह

भंग करूं शकणार आहे? स्वातंत्र्याचें वेड कांहीं विलक्षण आहे. तें ज्याच्या डोक्यांत भरलेलें आहे, असा एक मनुष्य हजार उत्तम पण भाडोत्री–शिपायांस भारी असतो. संसर्गानें त्याचें हें वेड ह्या भाडोत्री शिपायांच्या अंगामध्येंही संचार करूं लागतें व मग हे शिपाई लीन होऊन त्यालाच मदत करूं लागतात. स्वतंत्रता ही इतकी पवित्र आहे कीं, ती ज्याच्या हृदयांत प्रवेश करिते त्याचें सर्व शरीर तेजःपुंज करून मन गंगाजळाप्रमाणें निर्मळ करून सोडते. अशा मनुष्यापुढें शत्रुभावानें येण्याची कोणाची प्राज्ञा आहे? असो.

राजाचें सामर्थ्य कमी करण्याचा लोक जों जों प्रयत्न करूं लागले तों तों राजा व त्याचे मंत्री यांनीं लोकांवर अधिकच जुलूम करण्यास सुरुवात केली. लोकांच्या व राजाच्या ह्या वेळीं ज्या झटापटी झाल्या व ह्यांत जो निष्कारण रक्तपात झाला त्याचा इतिहास फार हृदयद्रावक आहे. परंतु तो प्रस्तुत चरित्राच्या मर्यादेपलीकडचा असल्यामुळें येथें देतां येत नाहीं, तथापि येथें इतकें सांगणें जरूर आहे कीं, ह्या झटापटींत लोकांनीं एकसारखा नेट धरल्यामुळें त्यांचा पक्ष विजयी झाला. सोळाव्या लुईला त्याच्या कुटुंबासह त्यांनीं 'तुलरीज' नांवाच्या राजवाड्यामध्यें आणून नजर कैदेंत ठेविलें व सर्व राज्यकारभार राष्ट्रीय सभेच्या नांवानें सुरू केला. लोकांचा विजय झालेला पाहून देशामध्यें चिकाटी धरून राहिलेले सरदार परदेशास पळून गेले. फक्त कांहीं उच्च दर्जाचे पाद्री व त्यांचे अनुयायी असलेले थोडेसे सरदार मात्र राष्ट्रीय सभेमध्यें मोठ्या धैर्यानें आपल्या पक्षाचें समर्थन करण्याकरितां आपापल्या जागेवर राहिले होते. परंतु राष्ट्रीय सभेंत त्यांचा फार वेळ टिकाव लागला नाहीं. राजा व वरिष्ठ वर्गांतील लोक यांनीं इतर लोकांस वरील झटापटींत वारंवार चीड आणलेली असल्यामुळें त्यांच्यापैकीं कांहीं जणांचीं माथीं राजसत्तेविरुद्ध व वरील वर्गाविरुद्ध इतकीं फिरून गेलीं कीं, त्यांच्या आचरणास ताळ राहिनासा झाला. विचारशक्तीची फारकत करून टाकून कायद्याचा उपमर्द करण्याचें काम त्यांनीं सुरू केलें. मारामारी, धराधर, जाळपोळ हा धंदा त्यांनीं आरंभिला. यामुळें स्वातंत्र्याकरितां सुरू केलेल्या युद्धांत अपवित्रपणाचा शिरकाव होऊं लागला. ही

गोष्ट सामान्य वर्गातल्या बहुतेक समंजस, विचारी व राजकारणी मंडळीस पसंत पडेना. मॅडम व मॉं. रोलंद ह्यांनाही ती आवडली नाहीं. हे लोक फ्रान्सला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां प्राण देण्यासही तयार होते. परंतु कायद्याला पायाखालीं तुडविण्यास व ज्या जुलमी पद्धतीचा नाश करण्याकरितां ते आपल्या सर्वस्वावर पाणी सोडण्यास तयार झाले होते, ती जुलमी पद्धत स्वतः सुरू करण्यास ते तयार नव्हते. स्वातंत्र्याचे ते पूर्ण भक्त होते, परंतु हें स्वातंत्र्य कायम टिकण्याकरितां कायद्याचें त्याला पाठबळ असलें पाहिजे, असें त्यांचें मत होतें. कायद्याचा जर भंग होऊं लागला तर समाजव्यवस्था सुरळीत चालणें अशक्य आहे, अशी त्यांची समजूत होती व ती सर्वस्वी खरी होती. परंतु पूर्वोक्त माथेफिरू लोकांस ही विचारसरणी मुळींच पसंत नव्हती. राजा व भिकारी यांना सारख्या स्थितींत आणून सोडण्याचा त्यांचा बेत होता. सरदारांची व पाद्र्यांची सर्व मालमत्ता लुटून ती लोकांमध्यें वांटून टाकावी, असें त्यांचें मत होतें, परंतु वर सांगितलेली विचारी मंडळी ह्या गोष्टीस कबूल होईना. त्यांनीं आपल्या ह्या भडकलेल्या देशबांधवांस सामोपचाराच्या गोष्टी सांगून त्यांचें मन वळविण्याचे पुष्कळ यत्न केले, पण ते सर्व व्यर्थ गेले. उलट जों जों हे त्यांना उपदेश करूं लागले तों तों ह्यांच्याबद्दल त्यांच्या मनांत संशय उत्पन्न होऊं लागला व थोड्याच दिवसांनीं त्यांनीं त्यांच्यापासून वेगळें होऊन 'जॅकोबिन्स्' ह्या नांवानें एक निराळाच पक्ष उपस्थित केला. त्याबरोबर वरील विचारी मंडळींनीं आपला एक स्वतंत्र पक्ष निर्माण केला. त्याचें नांव 'जिरॉंदिस' असें होतें. ह्या पक्षाचें जिरॉंदिस हें नांव पडण्याचें कारण असें आहे कीं, या पक्षांतील बहुतेक पुढारी लोक 'जिरांदे प्रांतातले' होते. ह्या पक्षांतील लोक राजसत्ता नष्ट करून लोकसत्ताक राज्य स्थापन करण्यास तयार होते. मात्र हें कार्य कायद्याच्या आश्रयानें व व्यवस्थित रीतीनें करण्याचा त्यांचा इरादा होता. त्याकरितां अत्याचार करण्यास अथवा राजास ठार मारण्यास ते तयार नव्हते. उलट पक्षी जॅकोबिन्स पक्षाचे लोक राजाचा वध करण्यास व कायद्यास धाब्यावर बसवून समाजाचीं सर्व बंधनें—सामाजिक, धार्मिक वगैरे—तोडून टाकण्यास अगदीं तयार झालेले होते. हे दोन्ही पक्ष चांगले प्रबळ

असल्यामुळें त्यांच्या मध्यें पुढें इतकें भयंकर रण माजलें कीं, अर्वाचीन काळांत जगांमध्यें त्याला त्याला दुसरी तोड नाहीं.

वरील दोन पक्षांपैकीं, जिरॉंदिस पक्षाचीं मतें मॉं. व मॅडम रोलंद यांना मान्य असल्यामुळें त्या पक्षाचें समर्थन करण्याकरितां त्यांनीं आपलें सर्व सामर्थ्य खर्च करण्याचा निश्चय केला. पॅरिसमध्यें त्यांनीं ह्या वेळीं राहण्यास जी जागा घेतली होती, तींत चार मंडळी जमण्याची चांगली सोय असल्यामुळें आठवड्यांतून चार रात्रीं त्यांच्या घरीं ह्या पक्षांतील प्रमुख लोक आपल्या भावी बेतासंबंधानें खल करण्यासाठीं जमत असत. ह्या लोकांमध्यें तरुण परंतु कुरूप, दिसण्यांत कांहींसा वेडसर व वागण्यांत कांहींसा रानटी असा एक वकील होता. वक्तृत्वशक्तीचा त्याचे ठायीं जरी अभाव होता, तरी राष्ट्रीय सभेमध्यें भाषण करण्याची संधी तो केव्हांही दवडीत नसे. त्याचीं चारगट भाषणें लोकांस आवडत नसल्यामुळें सभेमध्यें ते त्याचा फार उपमर्द करीत, कधीं कधीं तिरस्कार बुद्धीनें त्याची टर उडवून देत; परंतु कोणीं कितीही अपमान केला अथवा टर उडवली, तरी तो तिकडे मुळींच लक्ष देत नसे. तो आपल्या भाषणामध्यें सर्व पक्षांवर सारखा ताशेरा झाडी. यामुळें कोणत्याही पक्षास तो प्रिय नव्हता. सर्व पक्षांतील लोक त्याला सारखेंच झिडकारीत असत, तथापि त्याच्या अंगीं उत्साह, धमक, चिकाटी, संपत्ति व ऐषआराम ह्यांसंबंधानें पूर्ण तिरस्कार, कीर्ति व स्वसौख्य यांसंबंधानें औदासीन्य इत्यादि असामान्य गुण वसत असल्यामुळें, पुढें एके काळीं त्याचें महात्म्य इतकें वाढलें कीं, 'राबेस्पियर' ह्या नांवापुढें (हें त्याचें नांव) सर्व फ्रान्स देश थरथर कांपूं लागला ! हा तरुण वकील जिरांदिस पक्षाच्या पुढाऱ्यांबरोबर मॅडम रोलंदच्या घरीं जेव्हां जेव्हां येई, तेव्हां तो मौन धारण करून तिचें संभाषण फार लक्ष देऊन ऐकत असे. तिच्या रसभरित व बहुश्रुत भाषणांतलि मोहिनीनें त्याचें मन इतकें भरून जात असे कीं, तासच्या तास तो तिच्या खुर्चीशेजारीं चेंगटपणानें बसून तिच्या प्रासादिक वाणींतून सहज बाहेर पडणारे अलंकार व रूपकें लक्षांत ठेवून, तिच्या मनोवृत्तींशीं तादाम्य होऊन जात असे. ज्याप्रमाणें एकादा मनुष्य आपल्या आवडत्या पुस्तकांतील विषयांचें वारंवार पठण करीत असतो, त्याप्रमाणें

त्यानें मॅडम रोलंदच्या संभाषणाचा निदिध्यास चालू ठेविला होता. त्यामुळें पूर्वी राष्ट्रीय सभेमध्यें भाषण करीत असतांना त्याची जी टर उडत असे ती पुढें उडेनाशी झाली; इतकेंच नव्हे, तर लोक त्याच्या भाषणाकडे विशेष लक्ष देऊं लागले. मॅडम रोलंदच्या विचारसरणीशीं व संभाषणपद्धतीशीं तो इतका संलग्न होत गेला कीं, राष्ट्रीय सभेत जेव्हां जेव्हां तो कांहीं उदात्त विचार प्रदर्शित करी, तेव्हां तेव्हां त्या विषयांसंबंधानें मॅडम रोलंदच्या मुखांतून निघणारे शब्द, म्हणी, अलंकार वगैरे हुबेहुब त्याच्या तोंडून सहज निघत! रॉबिस्पियर हा स्वभावतः थोडासा धूर्त मनुष्य होता, व तत्कालीन परिस्थितीचें त्याला चांगलें ज्ञान होतें. तसाच कांहीं अंशीं खरा स्वदेशाभिमानही त्याच्या ठिकाणीं वास करीत होता; व मॅडम रोलंदच्या सहवासानें त्याला वाक्पांडित्य करण्याचेंही सामर्थ्य आलें होतें. अशा मनुष्याच्या हातून (त्याच्या अंगीं हे व मागें सांगितलेले असामान्य गुण असल्यामुळें) जिरांदिस पक्षास—जर तो त्या पक्षाचें धोरण ओळखून वागता तर—पुष्कळ फायदा झाला असता यांत शंका नाहीं. आणि त्याच उद्देशानें मागें सांगितल्यापैकीं, त्याच्या कित्येक असामान्य गुणांकडे लक्ष देऊन मॅडम व मॉं. रोलंद यांनीं त्याला वारवार प्रोत्साहन देऊन सार्वत्रिक कामांत पुढाकार घेण्यास लाविलें व आपल्या वजनानें लोकांत त्याची चहा करून दिली. परंतु त्याच्या अंगीं जे असामान्य गुण होते त्यांच्याच अतिरेकापासून पुढें त्याच्या अंगीं तितकेच प्रखर दुर्गुण उत्पन्न झाल्यामुळें पुढें तो ह्या पक्षाचा नव्हे सर्व फ्रान्स देशाचा—कट्टा दुस्मान बनला! तो कसा तें पुढें ओघानें कळून येईल.

जिरांदिस व जॅकोबिन्स ह्या दोन पक्षांशिवाय कमकुवत झालेला राजपक्षही अद्याप जीव धरून होता; त्याची कांहींतरी वाट लावणें, हें वरील दोन्ही पक्षांचें आद्य कर्तव्य होतें. तें कर्तव्य कसें बजवावें ह्या संबंधानें दोन्ही पक्षांमध्यें मोठा कडाक्याचा वादविवाद सुरू झाला. राष्ट्रीय सभेमध्यें हा वाद कडाक्यानें चालू होता तेव्हां जिरांदिस पक्षाचे निवडक पुढारी, मॉं. रोलंद यांच्या घरीं गुप्त खलबतें करण्यास रोज संध्याकाळीं जमत. मॅडम रोलंदही तेथें असे. ह्या खलबता-

मध्यें ती प्रत्यक्षपणें केव्हांही पडत नसे व मोठमोठीं उत्साहजनक भाषणेंही करीत नसे. अशा वेळीं ती सदर मंडळीपासून जरा दूर असलेल्या एका टेबलाशेजारीं वीणकाम करीत अथवा लिहित बसलेली असे. राष्ट्रीय सभेमध्यें घडवन आणण्याच्या गोष्टी कशा घडवून आणावयाच्या ह्या संबंधींचा विचार पुरुषानींच करावा. त्यामध्यें स्त्रियांनीं पडणें म्हणज आपल्या जातीची मर्यादा ओलांडून जाण्यासारखें आहे असें ती मानी. सदर खलबतें जरी ती ऐकत असे तरी त्यांत स्वतः तोंड घालण्याचें धाडस तिनें केव्हांही केलें नाहीं. सदर खलबतें चालू असतां जेव्हां कोणी पुढारी एकादा दुर्बल उपाय सुचवी व त्याचें प्रतिपादन करी, तेव्हां रागानें ती आपले दांत ओंठ चावी व तो उपाय मोडून काढून त्याऐवजीं एखादा प्रखर उपाय सुचवावा, असें तिच्या मनांत येई; परंतु मोठ्या शिताफीनें आपले तत्कालीन मनोविकार ती त्या वेळीं दाबून ठेवीत असे; पण संध्याकाळीं जेवण झाल्यावर अगदीं निवडक मंडळींत जेव्हां राजकीय विषयांवर गप्पा सुरू होत, तेव्हां तिच्या मधुर व चित्ताकर्षक वाणींतून प्रचलित राजकीय विषयांवर अनेक मार्मिक, सूक्ष्म व चौकस विचार बाहेर पडत व त्यांचा जिरॉंदिस पक्षाच्या लोकांस फार उपयोग होई. त्या विचाराच्या धोरणानेंच ते आपला कार्यक्रम ठरवीत व त्याप्रमाणें वागल्यास त्यांना यशही येई. जिरॉंदिश पक्षाचीं मतें व विचारसरणी हीं जरी राज्यक्रांतीला पोषक होतीं, तरी पुष्कळ अंशीं तीं सदसद्विवेक-बुद्धीसच धरून होतीं. राजसत्ता नष्ट करून लोकसत्ता स्थापन करणें हें जरी त्यांचें ध्येय होतें तरी त्याकरतां बेबंदशाही, जुलूम, अन्याय व अत्याचार यांचा सुळसुळाट होऊं देण्यास ते कबूल नव्हते. तथापि देशांतील कंगाल वर्ग—ज्याला स्वभावतः कोणतीही शासनसंस्था आवडत नाहीं, व जो कोणत्याही राज्यांत नेहमीं असंतुष्टच असतो तो—ह्यावेळीं अत्यंत खवळलेला होता. कारण दीर्घकालपर्यंत चालत आलेल्या जुलमी राज्यपद्धतीचे अनिष्ट परिणाम इतर लोकांपेक्षां ह्या कंगाल वर्गांतील लोकांनाच फार भयंकर रीतीनें जाचित होते. यामुळें राजा व त्याच्या पक्षाचे लोक यांचा सूड घेण्याची त्यांची प्रवृत्ति ह्यावेळीं फार तीव्र बनली होती. परंतु ज्ञानाभावामुळें इष्ट हेतुप्री-

त्यर्थ व्यवस्थित प्रयत्न करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं नव्हतें. अर्थात् त्यांना मार्गदर्शक व कर्त्या लोकांच्या मदतीची अपेक्षा होती. हे लोक त्यांना जॅकोबिन्स पक्षांत सांपडण्यासारखे होते, म्हणून त्यांनीं त्या पक्षाचा आश्रय करण्यास सुरवात केली. जॅकोबिन्स (जहाल) पक्षांतील पुढाऱ्यांना ही गोष्ट हवीच होती. या पक्षाच्या, मागें सांगितलेल्या अत्यंत जहाल मतांना व त्यांच्या कित्येक अमानुष कृत्यांना आळा घालणारा जो जिरॉंदिस (मवाळ) पक्ष त्याचा पाडाव करण्याच्या महत्त्वाकांक्षेनें या पक्षांतील लोकांना पछाडलें होतें. व ही गोष्ट सिद्धीस नेण्यास त्यांना लोकमताचा ओघ आपणाकडे वळविण्याची अत्यंत आवश्यकता होती. सांप्रत हा ओघ जिरान्दिस पक्षाच्या बाजुला होता; तो आपल्या बाजुला वळविण्याकरितां त्यांना सद-सद्विवेकबुद्धीस रजा देऊन देशांतील कंगाल वर्गाच्या छंदानें वागणें भाग पडलें. ह्या वर्गाला त्यांनीं हातार्शी धरून आपल्या प्रतिपक्षाचा पाडाव करण्याचा बहाणा करून त्यांनीं ह्या कंगाल वर्गास श्रेष्ठ वर्गांतील लोकांस ठार मारण्याची, त्यांची मालमत्ता जाळून टाकण्याची अथवा अन्य तऱ्हेनें त्यांचा नाश करण्याची कुल–मुखत्यारी दिली. ह्यामुळें जिकडे तिकडे भयंकर प्रकार सुरू झाले. हें पाहून जिरान्दिस पक्षाच्या लोकांची छाती धडाडूं लागली. ज्या राजकीय स्वातंत्र्याकरितां त्यांनीं राज्यक्रांतीस सुरवात केली होती, तें राजकीय स्वातंत्र्य असल्या अपवित्र, अघोर व निंद्य उपायांनीं मिळणें शक्य नाहीं, असें त्यांचे मत होतें. भिकाऱ्यापासून तों तहत राजापर्यंत सर्व लोक सारख्या स्थितींत आणून ठेवणें, हें अशक्य व असमंजस प्रमेय आहे, असें त्यांस वाटे. सर्व लोकांना स्वातंत्र्य असावें; परंतु तें स्वातंत्र्य सामाजिक निर्बंधांनीं मर्यादित असावें. म्हणजे जेणें-करून समाजरचना विस्कलित न होतां प्रत्येक व्यक्तीस आपल्या कर्तृत्वा-नुरूप अविच्छिन्नपणें सुखशांतता यांचा उपभोग घेतां येईल, अशा प्रकारचें स्वातंत्र्य प्रत्येक मनुष्यास असावें, अशी त्यांची विचारसरणी होती. जॅकोबिन्स लोकांनीं सध्यां जो मार्ग स्वीकारला होता, तो वरील विचारसरणीस विघातक होता. त्यांनीं पक्षाभिमानाच्या भरांत खालच्या वर्गांतील लोकांस चिथावून जीं अनन्वित कृत्यें सुरूं केलीं होतीं, त्यामुळें तेथील समाजाची सामाजिक व धार्मिक बंधनें तुटून सर्व समाज विस्कळित झाला. अर्थात् कोणाचा

पायपोस कोणाच्या पायांत राहीनासा होऊन सर्व देशभर बेबंदशाही व यादवी माजून राहिली ! आपल्या देशाची अशा प्रकारची अवस्था झालेली पाहून जिरॉन्दिस पक्षांतील लोकांस मोठी चिंता उत्पन्न झाली. राज्यक्रांतीच्या ओघामध्यें ते इतके दूर वहात आले होते कीं, त्यांना फिरून १६ व्या लुईची सत्ता स्थापन करतां येणें शक्य नव्हतें. अशा प्रकारचा प्रयत्न केला तर तो सिद्धीस जाणार नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यापासून आपला तत्काळ नाश होईल अशीही त्यांना भीति वाटत होती. बरें जॅकोबिन्स पक्षाच्या लोकांस जाऊन मिळावें तर त्यांनीं आडदांड, अज्ञान, व नीति-भ्रष्ट अशा कंगाल वर्गाला पुढें करून अनेक निंद्य व अपवित्र कृत्यें आरंभिलेलीं असून त्यांपासून ते परावृत्त होण्यासारखे नव्हते. तेव्हां त्यांच्याशीं जिरॉन्दिस लोकांचें सख्य होणें अशक्य होतें. त्यांना अशा स्थितींत जें काय करतां येण्यासारखें होतें तें एवढेंच कीं, आपल्या मतांना पूर्णपणें चिकटून राहून लोकमत आपल्या बाजूस वळवून घेण्याचा उत्कट प्रयत्न करावयाचा, व त्याच्या साहाय्यानें चालू असलेल्या राज्य-क्रांतीस योग्य वळण लावून क्रमाक्रमानें पूर्ण लोकस्वातंत्र्य मिळवावयाचें. हे लोक चांगले बुद्धिवान् व नेकीचे असून त्यांचा देशाभिमान अत्यंत शुद्ध होता. त्यांना आपल्या परिस्थितीची व संकटपरंपरेची चांगली कल्पना होती. त्यांच्यावर येणाऱ्या भावी संकटपरंपरेची कल्पना सर्वांच्या पूर्वी मॅडम रोलंदच्या डोक्यांत आली. त्याबरोबर तिनें त्यांना सावध राहण्याविषयीं अनेक प्रकारच्या सूचना केल्या. असो. जॅकोबिन्स लोकांनीं लोकच्छंदानुसार वर्तन करण्याची शिस्त ठेविल्यामुळें सामान्य जनांची सहानुभूति त्यांनीं लवकरच मिळविली. राज्यक्रांतीसारख्या भयंकर कालामध्यें लोकच्छंदानुवर्ती पुढाऱ्यांना सामान्य जनसमुदाची सहा-नुभूति मिळविण्यास फारशी अडचण पडत नाहीं. राज्यक्रांति होण्यापूर्वी सामान्य लोक त्रस्त झालेले असतात. तथापि जुलमी राजसत्तेच्या गुलामगिरीचे पाश त्यांच्या गळ्याभोंवतीं घट्ट बांधले असल्यामुळें त्यांना तोंडांतून 'ब्र' काढण्याची देखील मारामार असते. यामुळें नाइलाजास्तव त्यांना आपले मनोविकार आपल्या मर्जीविरुद्ध दाबून ठेवावे लागतात. परंतु राज्यक्रांति होण्याची जेव्हां वेळ

येते, तेव्हां त्यांच्या मनोविकारांना ऊत येतो व एखाद्या कारंजाचें तोंड बराच वेळ दाबून मग खुलें केलें असतां त्यांतून येणारें पाणी जसें नेहमींपेक्षां उंच जातें, तसेंच गुलामगिरीच्या दडपणाखालीं दीर्घकालपर्यंत दबून गेलेल्या त्यांच्या मनोवृत्ति राज्यक्रांतीसारख्या प्रसंगीं जोरानें उचंबळतात. अशा वेळीं समंजस, ज्ञानी व पुढारी म्हणविणाऱ्या लोकांनीं फार सावधपणानें वागून लोकांच्या मनोवृत्ति बेताल होऊं न देण्याकरितां अटोकाट प्रयत्न केले पाहिजेत. परंतु जेव्हां—कोणत्याही कारणामुळें कां होईना—हें धोरण त्यांस रहात नाहीं आणि दुर्दैवानें जेव्हां अशा लोकांची संख्या जास्त होते तेव्हां तेथें होणाऱ्या राज्यक्रांतींत निष्कारण अशी पुष्कळ प्राणहानि होऊन राज्यक्रांतीचे परिणामही लोकांस पुष्कळ अहितकारक होण्याचा संभव असतो. फ्रान्सची राज्यक्रांति हें ह्या गोष्टीचें ठळक उदाहरण होय. ह्या राज्यक्रांतीमध्यें जॅकोबिन्ससारखा लोकछंदानुवर्ती पुढाऱ्यांच्या स्वार्थी व असमंजस वागणुकींत निष्कारण अशी प्राणहानि फार झालेली आहे. ह्या राज्यक्रांतीच्या शेवटीं 'लोकसत्ताक,' राज्याची स्थापना न होतां कॉन्सुलेट पद्धत व तिच्या पोटांतून पुढें जें नेपोलियनचें साम्राज्य स्थापन झालें त्याचें बीजही वरील गोष्टींतच आहे. राज्यक्रांति घडवून आणतांनाही कायदा व व्यवस्था यांकडे लक्ष देणें जरूर आहे. नाहीं तर ज्या दुःखांच्या विमोचनाकरितां राज्यक्रांति करावयाची तीच निराळ्या रूपानें द्विगुणित होऊन मनुष्यप्राण्याचें स्वास्थ्य हरण करितात. एका विवक्षित व्यक्तीचा अथवा एका विवक्षित राज्यपद्धतीचा जुलूम नष्ट करून लोकांचे व्यवहार परस्परांस त्रास न होतां स्वतंत्रपणें सुखानें चालविणें हें राज्यक्रांतीचें अंतिम कार्य असतें. परंतु जेथें पूर्वोक्त बेहोषपणाचा अतिरेक होतो, तेथें हें कार्य सिद्धीस न जातां जुलमाच्या उगमस्थानांत मात्र फरक होतो. म्हणजे राज्यक्रांतीच्या पूर्वीं जर एखादा राजा अथवा एखादी राज्यपद्धति लोकांस गांजीत असली तर लोकक्षोभवन्हींत त्यांची आहुति पडल्यावर सामान्य लोकसमाजांतच तितक्याच प्रखरपणें लोकांस गांजणारी सत्ता उत्पन्न होते व राज्यक्रांतीचें वादळ शांत झाल्यावर लोकनियुक्त सभा, कौन्सिलें, कॉन्सल किंवा अशाच कांहीं गोंडस नांवाखालीं ती सत्ता फोंफावत जाऊन लोकांस असह्य असा त्रास देऊं लागते.

राज्यक्रांतीचे इष्ट परिणाम घडवून आणण्याकरितां राजसत्ता जुलमी राजाचे हातून काढून घेण्याची जशी आवश्यकता असते, तशीच ती अज्ञान, अपरिपक्व, गैरमुत्सद्दी व उतावळ्या लोकांच्या हातीं न जाईल अशीही खबरदारी घेणें जरूर असतें. परंतु जेव्हां कांहीं कर्ते पण लोकछंदानुवर्ती पुरुष स्वार्थैकदृष्टीमुळें सामान्य जनांच्या बेहोषपणास ऊत आणून स्वतंत्रतेच्या नांवावर त्यांच्याकडून हवे ते चार करवितात तेव्हां त्यांच्या कृत्यांस आळा घालणाऱ्या सुज्ञ व विचारी लोकांचा—ते अल्प असल्यास—निभाव लागत नाहीं. अर्थात् त्यांचा पाडाव केल्यावर जुलमी राजाकडून काढून घेतलेली राजसत्ता सामान्य जनांच्या हातांत जाते; परंतु ह्या सत्तेचा योग्य उपयोग करण्याचें ज्ञान व सामर्थ्य त्यांच्यापाशीं असणें संभवनीय नसल्यामुळें लवकरच ते तिचा दुरुपयोग करूं लागतात. हा दुरुपयोग होऊं लागला म्हणजे त्यांच्या छंदानें वागत आलेल्या त्यांच्या पुढाऱ्यांचे डोळे उघडतात व मग हे त्यांना आळा घालण्याचा प्रयत्न करितात. परंतु त्यांच्या उच्छृंखल मनोविकारास आळा घालूं पहाणाऱ्यांचें पारिपत्य करण्यास ह्यांनींच त्यांना शिकविलेलें असल्यामुळें ते त्यांच्या युक्तीचा त्यांच्यावरही प्रयोग करितात ! याप्रमाणें मुत्सद्दी अथवा कर्त्या पुरुषांची वाट लागल्यावर कांहीं दिवसपर्यंत बेबंदशाही माजून राहते व लोकसमाज हताश झाल्यानंतर फिरून कोणी तरी एखादा कर्ता मनुष्य राजसत्ता आपल्या हातीं घेऊन अनियंत्रितपणें तिचा उपभोग घेऊं लागतो. अर्थात् त्यामुळें राज्यक्रांतीच्या मुख्य हेतूवर पाणी पडतें. असा प्रकार न व्हावा म्हणून राज्यक्रांतीच्या वेळीं देशांतील शहाण्या व सुशिक्षित वर्गानें नेहमीं खबरदारीनें वागून सामान्य जनसमूहास खऱ्या कल्याणाच्या मार्गास वळविणें जरूर असतें, किंबहुना तसें करणें हें त्यांचें त्या काळचें मुख्य कर्तव्य होय. हें कर्तव्य बजावीत असतांना प्राण गेला तरी बेहेत्तर, परंतु यःकश्चित् सुखाच्या लालसेनें लोकच्छंदानुयायी बनून राष्ट्रहिताचें तारूं भलत्याच मार्गास भरकटत लावण्याचें आत्मविघातक काम केव्हांहि करावयाचें नाहीं, असा त्यांचा निर्धार असला पाहिजे. मॅडम रोलंद व जिरॉंदिस पक्षाचे पुढारी यांनीं अशाच प्रकारचा निर्धार केला होता. उलटपक्षीं जॅकोबिन्स लोकांनीं त्यांचा पाडाव कर-

ण्याचा सारखा प्रयत्न चालविला होता. हा हेतु सिद्धीस नेण्याकरितां त्यांनीं जिरॉदिस लोकांच्या राक्त मताविषयीं सामान्य जनामध्यें गैरसमज उत्पन्न करण्यास सुरवात केली. लोकांच्या उपजत बेहोष वृत्तीस चेव आणून त्यांच्याकडून त्यांनीं जीं भयंकर कृत्यें करविलीं तीं जिरॉदिस लोकांस मान्य होण्यासारखीं नव्हतीं. त्यांच्या दृष्टीनें हीं कृत्यें राज्यक्रांतीच्या इष्ट परिणामास विघातक अशीं होतीं, यामुळें राष्ट्रीय सभेंत व इतरत्र त्यांनीं त्यांचा निषेध केला. त्यामुळें लोकांचीं मनें त्यांच्याविरुद्ध वळविण्याची जॅकोबिन्स पक्षास चांगली संधि सांपडून त्यांत त्यांस बरेंच यश येऊं लागलें. जिरॉन्दिस लोकांच्या मनांत लोकांना खरें स्वातंत्र्य मिळवून देण्याचें नसून त्यांचा अंतस्थ ओढा राजपक्षाकडे आहे व आपला पक्ष खऱ्या लोकस्वातंत्र्याकरितां मनोभावें करून झटत आहे, असा त्यांनीं कनिष्ठ वर्गाचा ग्रह करून दिला. अर्थात् हा वर्ग त्याचा दास बनून जिरॉदिस पक्षाच्या लोकांचा हेवा व छल करूं लागला. बहुजनसमाजाचें पाठबळ दिवसानुदिवस जिरॉदिस पक्षाला मिळत आहे हें पहातांच मागें सांगितलेल्या राबिस्पियरचा कल त्या पक्षाकडे वळूं लागला. ह्या गृहस्थाला स्वमत असें मुळींच नव्हतें. जसा वारा वाहील तशी पाठ द्यावयाची असा त्यांचा बाणा होता. जो पक्ष विजयी असेल अथवा भरभराटींत असेल तिकडे जावें ही त्यांच्या मनाची साहजिक प्रवृत्ति होती. अर्थात् जॅकोबिन्स पक्ष लोकप्रिय होत चाललेला पाहतांच त्या पक्षास जाऊन मिळण्याची त्यांस इच्छा व्हावी, हें साहजिक आहे. रॉबिस्पियर जरी जॅकोबिन्स पक्षाशीं मिळून मिसळून वागूं लागला, तरी तो अद्याप लोकप्रिय झालेला नव्हता. यामुळें त्यानें जिरॉदिस पक्षाचा संबंध अजिबात सोडण्याचें धाष्टर्य केलें नाहीं.

राष्ट्रीय सभेंतील त्याच्या हालचालकिडे दिवसानुदिवस लोक प्रेमदृष्टीनें पाहूं लागले होते, परंतु त्यांचा त्यावर पूर्ण विश्वास बसलेला होता. उलट एके प्रसंगीं तो जेव्हां लोकांना आवडणार नाहीं, अशा एका ठरावाचें राष्ट्रीय सभेंत सहज समर्थन करूं लागला, तेव्हां सर्व लोकांचा त्याजवर इतका क्षोभ झाला कीं, तो रस्त्यांतून जात असतां हजारों मंडळी त्याच्याभोंवतीं जमून त्याजवर शिव्यांचा वर्षाव करून सूड घेण्याची

मनोवृत्ति प्रकट करूं लागली. हें पाहून राष्ट्रीय सभेंतील त्यांच्या वैऱ्यांनीं त्याजवर देशद्रोहाचा आरोप ठेवून त्यास देहान्त शिक्षा देण्याचा निश्चय केला. लोकमताचा प्रवाह त्याच्याविरुद्ध इतक्या जोरानें वाहूं लागल्यामुळें स्वरक्षणार्थ त्यास लपून बसावें लागलें! राबिस्पियरवर असा भयंकर प्रसंग ओढवलेला पहातांच मॅडम रोलंदचें अंतःकरण द्रवलें व त्याचा बचाव करण्याच्या उद्योगास ती लागली. प्रथमतः रात्रीं बारा वाजण्याचे सुमारास आपल्या नवऱ्यासह रॉबिस्पियर जेथें लपून बसलेला होता तेथें ती गेली. व त्याला तिनें तेथून गुप्तपणें आणून आपल्या स्वतःच्या घरांत लपवून ठेवलें! नंतर त्याच पावलीं ती बुझो नांवाच्या आपल्या एका वजनदार मित्राकडे जाऊन रॉबिस्पियरला दोषमुक्त करून त्याचे प्राण वांचविण्याबद्दल मोठ्या तांतडीनें विनंति करूं लागली. मॉ. बुझोनें प्रथमतः बरीच टाळाटाळी केली, परंतु मॅडम रोलंदचा जेव्हां विशेष आग्रह दिसून आला तेव्हां त्याच्यानें तिचें म्हणणें मोडवेना. शेवटीं त्यानें राष्ट्रीय सभेंत रॉबिस्पिअरचें संरक्षण करण्याचें अभिवचन दिलें व त्यास त्याप्रमाणें दोषमुक्त करवून त्याचें रक्षण केलें. याप्रमाणें मॅडम रोलंदनें अघटित धाडस करून रॉबिस्पियरचे प्राण वांचविले. त्या उपकाराची फेड रॉबिस्पिअरनें पुढें तिला व इतर हितचिंतकांना कारागृहांत पाठवून अथवा फांशी देऊन कशी केली, हें पुढें कळेलच! आपण वांचविलेला प्राणी पुढें आपला काळ होईल, हें त्या बिचारीला काय ठाऊक! अशा प्रकारची नुसती कल्पनाही तिच्या परोपकारी मनांत येण्याचा संभव नव्हता. असो. मॅडम रोलंदचें लोकांवरील वजन आतां गुप्त राहणें शक्य नव्हतें. जिरॉंदिस पक्षामध्यें जो जोर व जें सामर्थ्य आहे त्याचें केंद्रस्थान मॅडम रोलंद आहे, अशी दिवसानुदिवस लोकांची समजूत होऊं लागली. मॅडम रोलंदला स्वतः मोठेपणा मिळविण्याची फारशी हौस नव्हती, पण आपल्या नवऱ्याला मात्र शक्य तितक्या वैभवास व मोठेपणास नेऊन पोंचविण्याचा तिचा निश्चय होता व आपल्या तेजोबलानें तिनें तो तडीसही नेला. राष्ट्रीय सभेमध्यें जिरॉंदिस पक्षातर्फे जे जोरदार व धिटाईचे ठराव पुढें येत, त्यांचा उगम मॅडम रोलंदच्या अंतःकरणापासून झालेला आहे ह्या भावनेनें सभेंतील बहुतेक लोक मॉ. रोलंद यांस क्षुद्र

प्रकारची स्त्री लाभल्याबद्दल त्यांचें मनापासून अभिनंदन करीत, तें पाहून त्यांनाही मॅडम रोलंदबद्दल धन्यता वाटे.

राष्ट्रीयसभेच्या बैठकीस सुरुवात होऊन आतां बरेच दिवस झाले होते. एवढ्या काळांत फ्रान्सच्या स्थितींत बराच फरक पडला होता. राष्ट्रीयसभेची बैठक सुरू होण्यापूर्वीं जें लोकमत होतें, त्यांत आतां पुष्कळ फरक पडला असून लोकांमध्यें निरनिराळे तट पडले होते, अशा स्थितींत राष्ट्रीयसभा मोडून पुन्हां निवडणूक करण्याची आवश्यकता भासूं लागली. यामुळें सप्टेंबर महिन्यांत (१७९१) सदर राष्ट्रीयसभा नवीन निवडणुकीप्रीत्यर्थ बरखास्त केली. राष्ट्रीयसभा आटोपल्यावर मॅडम व मॉं. रोलंड हीं लसातेअर येथें विश्रांतीकरितां आलीं. ह्या रमणीय स्थलाची माहिती आम्हीं मागें दिलीच आहे. ह्या ठिकाणीं असतांना मॅडम रोलंदनें रॉबिस्पियर व, मॉं. बुझो यांजबरोबर सारखा पत्र्यव्यवहार चालू ठेवला होता. शिवाय जिरॉंदिस लोकांनीं आपल्या राजकीय मतांचा प्रसार करण्याच्या हेतूनें चालविलेल्या एका वृत्तपत्रासही तिनें येथून बरेच लेख पुरविले. फ्रान्स देशाची स्थिति दिवसानुदिवस भयंकर होत चालली होती. अशा स्थितींत राजकीय बावतींत पडून आपला जीव धोक्यांत घालावा किंवा लासातेअर येथेंच विद्याव्यासंगांत, शांततेंत व सुखांत काळ कंठावा असा प्रश्न त्या ठिकाणीं उभयतांमध्यें उद्भवला. हा प्रश्न ह्या वेळीं खरोखरच फार महत्त्वाचा व चिंतनीय होता; परंतु मॅडम रोलंदनें त्याचा ताबडतोब निकाल लावला. ती म्हणाली, ' आपले सर्व देशबांधव राजकीय आपत्ति नष्ट करण्याचा प्रयत्न करीत असतां, आपण येथेंच सुखांत राहिलों तर आपणाला अन्न तरी कसें गोड लागेल ! लोकस्वातंत्र्याची स्थापना करणें आपल्या जीवितांचें इतिकर्तव्य आहे; आपले हेतु सिद्धीस जाण्यास फार अडचणी आहेत; लोकच्छंदानुवर्ती लोक बहुजनसमाजास भलत्याच मार्गास लावून आमचा पाडाव करण्याच्या उद्योगांत आहेत, हेंही मला माहीत आहे; परंतु अशा परिस्थितींतच आपल्या मतांना चिकटून राहून आपलें कर्तव्य करीत राहण्यांत खरें कर्तृत्व आहे. आपले हेतू शुद्ध असून उदात्त आहेत. आपलीं मतें सत्य व सदसद्विवेकबुद्धि यांस धरून असल्यामुळें

त्याप्रमाणें वागतांना जरी आपणास मरण आलें, तरी बेहत्तर, परंतु असल्या प्रसंगीं संकटांना भिऊन माघार घेणें यासारखें घोर पातक दुसरें कोणतेंही नाहीं. मनुष्यजातीची खरी उन्नति करीत असतां मरण आलें तर त्यांत गैर काय आहे ? भित्रेपणाचा आरोप सहन करून आपल्या नांवास काळीमा लावून घेण्यापेक्षां धैर्यानें व उत्साहानें स्वकर्तव्य करीत असतां मृत्यु आलेला हजार वाटेनें बरा.' मॅडम रोलंदचें हें उत्साहजनक भाषण ऐकून मॉ. रोलंद यांस गहिंवर आला, त्याच्या मनोवृत्तींत विलक्षण खळबळ माजून राहिली व त्यांनीही आपल्या स्त्रीच्या मतास अनुमोदन दिलें. उभयतांचा ह्याप्रमाणें एक विचार झाल्यावर डिसेंबर महिन्यामध्यें दोघेही पुन्हा पॅरिस येथें आलीं, तेव्हां नव्या राष्ट्रीय सभेची निवडणूक संपून नुकतीच तिची बैठक सुरू झाली होती. ह्या नवीन सभेमध्यें गत सभेंत सभासद असलेले लोक येण्यास कायद्याचा प्रतिबंध असल्यामुळें मॉ रोलंद व त्यांचे कित्येक मित्र यांचा तींत शिरकाव झाला नाहीं. यास्तव त्यांना राष्ट्रीयसभेच्या बाहेर राहूनच आपल्या पक्षाचें कार्य करावें लागलें. राज्यक्रांतीच्या चळवळीला आतां बरेंच व्यापक स्वरूप येत चाललें होतें. ठिकठिकाणीं निरनिराळ्या मतांच्या मंडळींनीं आपल्या बाजूचें लोकमत तयार करून त्याद्वारें राष्ट्रीय सभेवर आपला दाब बसविण्याकरितां "क्लबाची" स्थापना केलेली होती, त्यांत जॅकोबिन्स व दिरॉंदिस पक्षांचे क्लब मुख्य होते. पैकीं जिरॉंदिस पक्षाच्या क्लबांची सूत्रचालणा मॉ. व मॅडम रोलंद याजकडेच प्रमुखत्वानें होती, मॉ. रोलंद हे गंभीर, मितभाषणी व सालस असल्यामुळें त्यांच्यासंबंधानें कोणाच्याही मनांत हेवा उत्पन्न होण्यासारखा नव्हता. त्यांच्या पोषाखाची रीत, राहणी व त्यांची वागणूक लोकांच्या डोळ्यांत सलण्याइतकी डामडौलाची नव्हती. त्यांच्या वृत्ति उदास व शांत असल्यामुळें, लोकांवरील त्यांचें वजन एकसारखें वाढत चाललें होतें. त्यांच्यापासून कोणालाही अपाय होण्याचा संभव नाहीं, अशी लोकांची समजूत असल्यामुळें त्यांना आपला पुढारी करण्यास जिरॉंदिस पक्षाचे लोकांस दिक्कत वाटली नाहीं. मॉ. रोलंद जितके शांत होते, तितकी मॅडम रोलंदहि चळवळींत तेजस्वी होती; तिच्या बुद्धिमत्तेचा

चोहोंकडे सारखा गौरव होत होता; तिच्या धैर्यप्रचुर सूचना, तिचा धूर्त उपदेश, एखाद्या प्रश्नाचें सहज योग्य उत्तर देण्याची तिची मनोहर पद्धति, तिची समयसूचकता, तिच्या उपरोधिक भाषणांतील (असलीं भाषणें क्वचित् प्रसंगीं होत) तीक्ष्णतेची खुमारी, तिचा आनंदी स्वभाव, लोककल्याणाविषयीं तिचें मनांत वसत असलेली दृढ कळकळ व तत्संबंधीं तिचा उत्साह आणि तिचें अगम्य व अद्भुत भाषणचातुर्य ह्यांनीं फ्रान्समधल्या तत्कालीन विद्वान् व कर्त्या पुरुषांवर इतका अंमल बसविला होता कीं, मधाच्या पोळ्याभोंवतीं मधुप्राशनार्थ मधमाशा जशा मोठ्या उत्सुकतेनें जमतात तद्वत् ही मंडळी तिच्या गुणसमुच्चयाचा आस्वाद घेण्याकरितां वारंवार तिच्या भोंवतीं जमत असे. व मधाच्या पोळ्यावर जगणाऱ्या माशा जशा त्यांतील मधुपानानें आनंद पावतात, तसेच हे लोकही त्या पाणीदार स्त्रीरूपी वल्लीच्या गुणपुष्पांचा स्वाद घेतांच आनंदी होऊन धन्यता पावत.

प्रकरण ६ वें.

मॉन्शर रोलंदची प्रधानकी.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मॉ. व मॅडम रोलंद हीं पॅरिसमध्यें आल्यावर लवकरच मॉ. रोलंद यांनीं एक वृत्तपत्र काढण्याचा विचार मुक्रर केला. या वेळीं ते 'होतेल ब्रितानिक' नामक गृहांत रहात असत. ते स्वतः जरी नवीन राष्ट्रीय सभेचे सभासद निवडून आले नव्हते तरी त्यांच्या पक्षाची बरीच मंडळी तींत निवडून आली होती. त्यांत व्हार्ग्निऑद्, गॉदेत्, ब्यूकॉस, व्हॉल्झे, ब्रिझो व बुझो वगैरे प्रमुख होते. शेवटचे दोन गृहस्थ तर जिरॉंदिस पक्षाचे बरेच नामांकित पुढारी होते. पैकीं बुझोचा व मॅडम रोलंदचा अत्यंत निकट स्नेहसंबंध होता.

ही सर्व मंडळी मॅडम रोलंदच्या घरीं (होतेल ब्रितानिक येथें) जमून प्रचलित राजकीय प्रश्नासंबंधीं चर्चा करीत असत. राजाच्या धरसोडीच्या वर्तनामुळें राष्ट्रीय सभेंत ह्या वेळीं गोंधळ माजून राहिला होता. देशांतून पळून गेलेले लोक–सरदार व पाद्री–यांस देशद्रोही ठरवून फ्रान्समध्यें येण्याची मनाई करण्याचा ठराव राष्ट्रीय सभेनें केला. त्यास राजाची प्रथम अनुकूलता दिसली; पण सरतेशेवटीं त्यानें तो नामंजूर केला ! तेव्हां लोकमत फारच खवळलें. तशांत पळून गेलेल्या सरदारांनीं कोब्लेंझ येथें सैन्य जमवून लोकपक्षाचा पाडाव करण्याची तयारी केलेली दिसून आली व या संधीचा फायदा घेऊन परराष्ट्राची स्वारी होण्याचाही संभव दिसूं लागला. यामुळें जॅकोबिन पक्षाचा कार्यक्रम जास्तच लोकप्रिय होऊं लागला. पॅरिसच्या म्युनिसिपालिटीची नुकतीच जी निवडणूक झाली तींत बहुतेक सभासद ह्याच पक्षांतून निवडून आले. अर्थात् पॅरिस येथील लोकमतावर बहुतेक ह्या पक्षाचीच छाप बसूं लागली. दँतन व रॉबिस्पियर हे ह्या पक्षाचे मुख्य पुढारी होते. लोकपक्षांमध्यें जॅकोबिन्स व जिरॉंदिस असे दोन तट जरी पडले होते तरी अद्याप ह्या दोन पक्षांतील चुरस विकोपास गेलेली नव्हती व तीव्र मतभेदाच्या बाबी खेरीज इतर बाबतींत हे दोन्ही पक्ष अद्याप परस्पर सहकारितेनें काम करीत होते. राजाच्या धरसोडीच्या वर्तनामुळें जिरॉंदिस पक्षाचें महत्व व वजन कमी होऊन जॅकोबिन क्लबामार्फत भरणाऱ्या सभांस लोकांचे थवेच्या थवे लोटूं लागले व राष्ट्रीय सभेंतील घडामोडीची चर्चा प्रामुख्यानें त्यांच्याच क्लबांत होऊं लागली. ह्या चर्चेस माँ० व मॅडम रोलंद आपल्या निवडक स्नेही मंडळीसह जात असत. त्यांचे कित्येक स्नेही तर सदर क्लबाचे नामांकित सभासदही होते.

अत्याचारांकडे कानाडोळा करणाऱ्या किंबहुना त्यास उत्तेजन देणाऱ्या जॅकोबिन पक्षाचें पॅरिसच्या जनतेवर वर्चस्व बसलेलें पाहून मॅडम रोलंदला एक प्रकारचें औदासिन्य वाटूं लागलें व ह्या गोष्टीस राजाचें धरसोडीचें वर्तन विशेष कारणीभूत झालेलें पाहून राजाबद्दल तिच्या मनांत तिटकारा उत्पन्न झाला. राजाभोंवतीं जें मंत्रिमंडळ होतें त्यांत जिरॉंदिस पक्षाचे कांहीं लोक होते व त्यांची सल्लाही तो वारंवार घेत असे; परंतु

राणीची व त्याची मुलाखत होतांच ह्या सल्लयावर विरजण पडत असे. 'राणी मराया अंतोनिते' ही फार मानी, कावेबाज व महत्वाकांक्षी स्त्री होती. तिला लोकानियंत्रणेचा कांच मुळींच सहन होण्याजोगा नव्हता व राजानेंही तो सहन करूं नये असें तिचें मत होतें. लोकपक्षाची चळवळ दंडुक्यानें मोडून टाकण्याबद्दल ती वारंवार राजाची कानउघाडणी करीत असे; परंतु तो दुर्बल मनाचा असल्यामुळें त्याच्याकडून धड तिच्या म्हणण्याप्रमाणेंही वागणूक होत नसे व धड लोकपक्षाचें म्हणणेंही त्याला पटत नसे. अर्थात् कांहीं राणीचें ऐकावें, कांहीं यांचें ऐकावें अशी अर्धवट व घरसोडीची याची वागणूक होत असे. राज्यक्रांतीसारख्या संकटाच्या कालांत अशा प्रकारच्या वागणुकीनें निभाव लागत नाहीं ही गोष्ट दुर्दैवानें १६ व्या लुईच्या लक्षांत आली नाहीं व त्या कारणानें त्याच्या हातून एकसारख्या चुकाच होत गेल्या व त्यांचे अनिष्ट परिणाम अखेर सर्व फ्रान्सला भोगावे लागले. असो; एकीकडे अत्याचाराच्या प्रवृत्तीचा जोर व एकीकडे लोकपक्षांस दिलेलीं वचनें पुरीं करण्याविषयीं राजाकडून प्रगट होणारें शैथिल्य ह्या दोहोंच्या कैचींतून खऱ्या लोकस्वातंत्र्याची स्थापना होणें दुरापास्त होत चाललेलें पाहून मॅडम रोलंदचें अंतःकरण तिळतीळ तुटूं लागलें. तिच्या चेहऱ्यावर निराशा व औदासीन्य यांची छटा दिसूं लागली व त्यामुळें तिची प्रकृतिही खालावली, ती इतकी कीं, तिच्या हातून नित्याचें कामही होईना ! मॉं. रोलंद यांनीं या वेळीं कला, उद्योगधंदे व व्यापारविषयक माहिती देणारा कोश तयार करण्याचें काम सुरू केलें होतें. त्या कामीं त्यास तिच्या मदतीची फार अपेक्षा होती. परंतु वरील कारणामुळें ती त्यास मिळेना. तेव्हां त्यांनीं मॅडम ग्रँडचँप नामक स्त्रीची मदत घेतली. ही बाई एका खानदानी घराण्यांतील असून मॉं. व मॅडम रोलंद या उभयतांशीं तिचा निकट स्नेह जडलेला होता. मॅडम रोलंदच्या ह्या वेळच्या मनस्थितीसंबंधानें ह्या स्त्रीनें आपल्या स्मरणवहींत असें लिहून ठेवलें आहे कीं, ' तिला या वेळचा खेदजनक व निराशाजन्य प्रसंग पाहून जीविताचाही कंटाळा आला होता. ' तिच्या मनाची अशी निरुत्साहात्मक स्थिति असतां एके दिवशीं संध्याकाळीं (मार्च २१ सन १७९२) जिरॉंदिस पक्षाचा एक

पुढारी ब्रिझो हा तिला येऊन भेटला व त्यानें, ' मॉं. रोलंद हे मुख्य प्रधानपद स्वीकारतील काय ? ' असा प्रश्न केला ! प्रथमतः तिला ही थट्टाच वाटली. कारण आपल्या नवऱ्याला एकदम एवढी मोठी जागा मिळण्याचा संभव तिला वाटत नव्हता. तथापि ही थट्टा नसून खरो-खरच तसा प्रसंग लवकरच येणार आहे अशी जेव्हां ब्रिझोनें तिची खात्री केली तेव्हां तिचें औदासिन्य नष्ट होऊन तिला एक प्रकारची हुषारी वाटूं लागली ! राज्यक्रांतीस योग्य वळण लावून देशाचें कल्याण कर-ण्याची सधी या प्रसंगामुळें आपणास प्राप्त होईल, या विचारानें तिचे मनावर पुन्हा पगडा बसविला व ' जरी सध्यांची वेळ आणीबाणीची आहे तरी बहुतकरून मॉं. रोलंद हे त्या जागेचा स्वीकार करतील तथापि त्यांना प्रत्यक्ष विचारून त्यांचें मत उद्ईक कळवीन, ' असें तिनें ब्रिझोस सांगितलें. पुढें कांहीं वेळानें मॉं. रोलंदजवळ जेव्हां तिनें ही गोष्ट काढली तेव्हां हास्यवदन करून ते म्हणाले, " काय हर-कत आहे ? ह्या जागेवर असणाऱ्या लोकांच्या योग्यतेचा विचार केला तर त्यांच्या हातून तें काम कसें होतें याचेंच आश्चर्य वाटूं लागतें. अशा स्थितींत त्या जागेची जबाबदारी ओळखून आपलें काम करणें मला फारसें कठीण वाटत नाहीं. हल्लींची वेळ चम-त्कारिक व धोक्याची आहे हें खरें पण आपल्या बहाली बडतर्फीविषयीं बेफिकीर राहून प्रामाणिकपणें आपलें कर्तव्य करणारास सद्यःस्थितीचें भय वाटण्याचें कांहीं एक कारण नाहीं. शिवाय ही जागा पत्करल्या-मुळें देशाला जर माझा कांहीं उपयोग होत असेल तर देशसेवा कर-ण्याची अनायासें चालून आलेली ही संधी आपण कां टाळावी " मॅडम रोलंदला पाहिजे होतें तेंच उत्तर मॉं. रोलंदनीं दिल्यामुळें तिला विशेष समाधान वाटलें व तिचा उत्साह फिरून दुणावला. लागलींच तिनें आपले यजमान मुख्य प्रधानाची जागा पत्करण्यास कबूल आहेत, असें ब्रिझो यास कळविलें. त्यानंतर दोन दिवसांनीं म्हणजे ता. २३ मार्च रोजीं अकरा वाजण्याचे सुमारास ब्रिझो व ड्युमेरेझ (हा परराष्ट्रीय खात्याचा प्रधान होता) हे मॉं. रोलंदच्या घरीं आले व राजानें त्यांची मुख्य प्रधानाच्या जागीं नेमणूक केल्याचें वृत्त त्यास कळवून त्यांनीं

त्यांचें अभिनंदन केलें ! हें वृत्त ऐकून मॅडम रोलंदला किती आनंद किंबहुना धन्यता वाटली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी हें बरें ! इतक्या अल्पकाळांत आपला इतका भाग्योदय होईल अशी तिला कल्पना नव्हती. प्राप्त झालेल्या मानास आपण व आपले पती पात्रच आहों अशी तिची भावना असल्यामुळें त्याचा तिला विशेष बाऊ वाटला नाहीं. ह्या नवीन परिस्थितीचा लोकस्वातंत्र्याची अभिवृद्धि करण्याचें कामीं कसा उपयोग करून घेतां येईल, याचा विचार करण्याकडे आतां तिनें आपलें लक्ष वळविलें.

मॉं. रोलंद यास मुख्य प्रधानाची जागा मिळाल्याची बातमी दुसरे दिवशीं जाहीर होतांच त्यांचें अभिनंदन करण्याकरितां त्यांचे अनेक मित्र त्यांचे घरीं येऊं लागले, तसेंच सार्वजनिक रीतीनेंही त्यांचें अभिनंदन करण्याचे समारंभ होऊं लागले, परंतु मॅडम रोलंदची प्रकृति ठीक नसल्यामुळें तिला ह्या समारंभांत भाग घेतां आला नाहीं. ह्या प्रसंगीं करावयाचें काम (अभिनंदनपर पत्रास, मानपत्रास उत्तरें देणें वगैरे) तिची मैत्रीण मॅडम ग्रँदचँम्प हिजकडे सोपविण्यांत आलें होतें व तें तिनें चांगल्या रीतीनें केलें. मॉं. व मॅडम रोलंद यांच्या स्थितींत एवढा मोठा फरक पडल्यामुळें यापुढें त्यांच्या सहवासास आपणास मुकावें लागेल असें मॅडम ग्रँदचँम्प हिला वाटत होतें परंतु मॉं. रोलंद यांनीं तिला आपल्या पदरीं ठेवून घेऊन रोजच्या वर्तमान पत्रांतून आपल्या उपयोगाचे असे निवडक उतारे काढण्याचें काम तिजकडे दिलें. मॉं. रोलंदची एवढी बढती झालेली पाहून ' होतेल ब्रितानिक ' च्या मालकासही फार आनंद झाला व त्यांच्या इच्छेवरून त्यानें आपला सर्व वाडा त्यांच्या हवालीं केला. असो; आतां मॉं. रोलंद यास प्रधानकीचीं वस्त्रें कशी व कां मिळाली याजबद्दल थोडासा खुलासा करून मग ही चरित्रकथा पुढें चालवूं. १६ व्या लुईच्या धरसोडीच्या वर्तनाचें दिग्दर्शन मागें केलेंच आहे. त्याच्या ह्या वर्तनामुळें लोकपक्ष त्याच्या सत्तेस तीव्र विरोध करूं लागला. जॅकोबिन पक्षाचे लोक तर त्यास राजपदावरून दूर करण्याचा यत्न करू लागले त्यामुळें देशांतील अंतःस्थिती फार बिघडत चालली. ह्या संधीचा फायदा घेऊन

ऑस्ट्रियानें फ्रान्सवर स्वारी करण्याचा घाट घातला व तशा प्रकारची हालचालही सुरू केली. अशा वेळीं परराष्ट्राची स्वारी झाल्यास लोकस्वातंत्र्याची ' इतिश्री ' होईल या भितीनें पॅरिसची जनता फारच खवळली व राजाला पदभ्रष्ट करण्याच्या उद्योगास लागली. तेव्हां लोकांच्या मनांत स्वत:संबंधानें आदर व विश्वास उत्पन्न करण्याकरितां लोकपक्षांतील देशभक्तांचें प्रधानमंडळ नेमण्याची राजास जरूर वाटू लागली, व यासंबंधानें त्यानें कित्येक लोकपक्षीय पुढाऱ्यांची जेव्हां सल्ला घेतली तेव्हां त्यांनीं विशेषतः मॉ. रोलंदचा मित्र लँथेनस यानें—मॉ. रोलंद यास मुख्य प्रधान नेमण्याची सूचना केली. हे गृहस्थ जरी मोठे राजकारणी अथवा मुत्सद्दी म्हणून प्रख्यात नव्हते तरी शुद्ध देशाभिमान, थोर नितीमत्ता, अढळ कर्तव्यनिष्ठा, नेकी, स्पष्ट, सरळ व शांत स्वभाव, उद्योगशीलता इत्यादि गुणांमुळें त्यांच्याबद्दल सर्व तऱ्हेच्या लोकांत आदर व पूज्यभाव वसत होता. त्यांच्यासंबंधानें अद्याप कोणाच्याही मनांत हेवा, मत्सर अगर द्वेष उत्पन्न झालेला नव्हता. यामुळें त्यांच्या हातीं फ्रान्सच्या राज्यकारभाराचीं सूत्रें दिल्यास सर्व निदान बहुतेक सर्व—पक्षांचें समाधान होऊन राजाच्या हेतुसंबंधानें विपर्यास होण्यास फारशी जागा राहणार नाहीं असें उपरोक्त सल्लागारांनीं राजास सांगितल्यावरून त्यानें त्यांची मुख्य प्रधानाच्या जागीं नेमणूक केली. ह्या नेमणुकीच्या योगानें उभयपक्षांचे (राजास लोकपक्ष) हेतु कितपत सफल झाले हें पुढें ओघानें कळून येईलच !

मॉ. रोलंद यांची मुख्य प्रधानाच्या जागीं नेमणूक होऊन ३।४ दिवस होतांच मॅडम रोलंदची प्रकृती आपोआप सुधारली ! कांहीं दिवसांपूर्वीं तिच्या चेहऱ्यावर जी उद्विग्नतेची छटा दिसूं लागली होती ती पार जाऊन तिचें मुखकमल प्रसन्न व तेजस्वी दिसूं लागलें. तिचा काम करण्याचा—देशकार्य करण्याचा—उत्साहही दिवसानुदिवस सारखा वाढूं लागला. ता. २७ मार्च रोजीं रॉबिस्पियर यास लिहिलेल्या पत्रांत ती म्हणतेः—" आम्हाला सध्यां जें स्थान व महत्व प्राप्त झालें आहे त्याचें चीज होणें हें पुष्कळ अंशीं उत्साही व उत्कट देशभक्तांच्या सहकारितेवर अवलंबून आहे. माझ्या मतें, अशा वर्गांतील लोकांत तुम्ही अग्रेसर

आहां. तुम्ही ताबडतोब या. मी तुम्हास भेटण्यास फार उत्सुक झालें आहे. आपल्यापुढें किती तरी महत्वाचीं कामें आहेत—वगैरे." रॉबिस्पियरनें पुढें मॅडम रोलंदचा जो छळ केला त्याचा विचार मनांत आला म्हणजे या पत्रांतील उद्गार कानाला कसेसेंच लागतात! असो; मॉ. रोलंद यास महत्वाचा अधिकार मिळाला खरा. परंतु (राजाचें आजपर्यंतचें वर्तन पाहतां) तो किती काल टिकेल हें सांगणें दुरापास्त होतें! ह्या अनिश्चितपणाची, इतरांपेक्षां मॅडम रोलंदला विशेष जाणीव होती आणि त्यामुळें, मॉ. रोलंद यांनीं आपणाकरितां जें एक छोटेसें घर भाड्यानें घेतलें होतें तें तिनें तसेंच आपल्याकडे ठेऊन घेतलें. हेतु हा कीं, प्रसंग पडल्यास एकांतवासाचा अथवा अज्ञातवासाचा काळ घालविण्यास त्याचा उपयोग व्हावा. मॉ. रोलंद प्रधान होऊन थोडे दिवस होतात न होतात तोंच, मॅडम ग्रंदचॅम्पचा व त्यांचा, राजकारणांत पडलेल्या त्याच्या कित्येक स्नेहांशीं ठेवावयाच्या वर्तनासंबंधानें तीव्र मतभेद होऊन तिला तूर्त रजा देणें त्यास भाग पडलें. मॉ. रोलंद यांच्या घरीं राजकारणाची चर्चा करण्याकरितां त्यांचे अनेक स्नेही, सहाध्यायी व अधिकारी लोक येत असत. त्यांपैकीं कांहींचें खासगी वर्तन नीतिदृष्ट्या दोषास्पद होतें, परंतु जोंपर्यंत हे लोक लोकस्वातंत्र्याचें रक्षण करण्यास तयार असतील तोंपर्यंत त्यांच्या खासगी वर्तनाकडे आपणास लक्ष देण्याचें कारण नाहीं, किंबहुना तसें करून चालणार नाहीं, असे मॉ. रोलंदचें म्हणणें होतें. उलटपक्षीं, ज्या लोकांचें खासगी आचरण चांगलें नाहीं ते सार्वजनिक बाबतींतही भ्रष्ट होण्यास चुकणार नाहींत. सबब अशांशीं मुळीं संबंधच ठेऊं नये असें मॅडम ग्रँदचॅम्पचें म्हणणें होतें. तें जरी पुष्कळ अंशीं खरें असलें तरी मनुष्यें जोंपर्यंत रक्त-मांस व विविध प्रकारचे मनोविकार यांनीं लिप्त आहेत तोंपर्यंत तें व्यवहार्य होणें शक्य नाहीं. सबंध देशाचें कल्याण करण्याचें व्यापक कार्य ज्याला करावयाचें असतें त्याला तरी असा निर्बंध पाळतां येणें शक्य नाहीं. परंतु मॅडम ग्रँदचॅम्पच्या हें लक्षांत येईना व ती मॉ० आणि मॅडम रोलंदच्या एतद्विषयक वागणुकीसंबंधानें जाहिरपणें निषेध प्रकट करू लागली तेव्हां

अर्थात्च अधिकारावर असेतोंपर्यंत तरी तिचा संबंध तोडणें त्यांस भाग पडलें.

मॉ. रोलंद यांनीं जेव्हां प्रधानपद स्वीकारलें त्या वेळची राजकीय परिस्थिति फारच चमत्कारिक होती. प्रत्येक पक्ष व प्रत्येक मनुष्य एकमेकांविरुद्ध कारस्थानें करीत होता. राजाकडे पहावें तर त्याच्या मनांत सर्वांविषयीं सारखाच अविश्वास होता. फ्रान्सच्या दरवाजावर–सरहद्दीवर–शत्रूंची हालचाल चालू होती. याशिवाय प्रधानमंडळापुढें आणखी एक अशी अडचण होती कीं, निरानिराळ्या खात्यांत पूर्वीपासून जे नोकर लोक होते ते ह्या नवीन लोकपक्षीय प्रधानाशीं निष्ठापूर्वक सहकारिता करण्यास तयार होण्याचा संभव नव्हता. बरें, ह्या लोकांना काढून टाकून त्यांच्या जागीं नवीन माणसें नेमावीत तर तीं अननुभविक असल्यामुळें कामाचा घोटाळा होण्याचा संभव होता. ह्या विचित्र परिस्थितींत आपलें काम शक्य तितकें नीट व्हावें ह्मणून मॉ. रोलंद यानीं पुष्कळ दक्षता बाळगिली. मॅडम रोलंदच्या शिफारसीवरून त्यानीं पॅचे नामक एका देशभक्तास आपला मुख्य सेक्रेटरी नेमलें व सर्व महत्वाचे आणि गुप्त असे कागदपत्र त्यानें स्वतः तपासून मग त्याची विल्हेवाट लावावी अशी व्यवस्था केली. पॅचे हा लोकस्वातंत्र्याचा कट्टा अभिमानी असून दिसण्यांत मोठा सरळ व प्रामाणिक मनुष्य दिसत असे. त्याची वागणूकही अगदीं साधी होती व तो बराच बुद्धिवान आणि हुषार माणूस होता. साधेपणाची तर त्याला इतकी आवड होतीशी दिसली कीं, त्यानें वरील जागा पत्करितांना आपणास कोणतीही पदवी अथवा वैभवाचीं इतर चिन्हें मिळतां कामा नयेत अशी मुद्दाम अट घातली होती ! हा माणूस ज्याप्रमाणें प्रामाणिक व एकनिष्ठ दिसत होता तसा तो खरोखर असता तर मॉ. रोलंदची कारकीर्द चांगली यशस्वी झाली असती; परंतु दुर्दैवानें तसा तो निघाला नाहीं व पुढें लवकरच त्याचें खरें हीन स्वरूप बाहेर पडून तो रोलंदच्या नाशास कारण झाला. तो कसा हें पुढें कळून येईलच. मॅडम रोलंद ही सामान्यतः मनुष्याची पारख बरोबर करीत असे–निदान मॉ. रोलंदपेक्षां तरी ती या कामांत जास्त प्रवीण असे. असें असून 'पॅचे'च्या बाबतींत ती कशी फसली कोण जाणें ! पॅचे-

शिवाय लांथेनस नांवाच्या आपल्या एका मित्रासही मॉं. रोलंद यांनीं आपल्या हाताखालीं मोठ्या अधिकाराची जागा दिली होती. हाही मनुष्य पुढें मॅडम रोलंदच्या शत्रुपक्षास जाऊन मिळाला! मात्र त्यानें त्यांचा विश्वासघात केला नाहीं. मॉं. रोलंद यांची स्वतःची राहणीही अगदीं साधी होती. ते जेव्हां प्रथम राजदरबारीं गेले तेव्हां त्यांचा साधा पोषाख पाहून पुष्कळ दरबारी लोक चकित झाले व एकानें तर जनरल डूमरीझजवळ त्याबद्दल तक्रारही केली; परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

प्रधानमंडळांत या वेळीं जे लोक होते ते सर्व एकदिलाचे व एक विचाराचे नव्हते. त्याची योग्यताही बेताबाताचीच होती. ते जेव्हां आपापल्या खात्यांतील कागदपत्रावर सह्या घेण्यास राजाकडे जात तेव्हां राजा त्यांच्याशीं फार सलगीचीं व मिठास भाषणें करून त्यांना खुष करीत असे. राजाची व प्रधान मंडळाची पहिली बैठक होतांच 'राजाविषयीं आपलें काय मत आहे?' म्हणून मॅडम रोलंदनें आपल्या पतीस प्रश्न केला, तेव्हां ते म्हणाले—'लोक समजतात त्यापेक्षां राजा अधिक बहुश्रुत असून गोड बोलण्यांत इतका प्रवीण आहे कीं, जर आम्ही सावध राहिलों नाहीं तर तो आम्हास केव्हां चकवील याचा नेम नाहीं.' राजाविषयीं मॉं. रोलंदचें प्रथमदर्शनीं हें जें मत बनलें तेंच खरें होतें. पण पुढें कांहीं दिवसांनीं त्याच्या मिठास भाषणाचा त्यांचे मनावरही परिणाम झाल्याचें दिसून येतांच मॅडम रोलंद एके दिवशीं त्यास म्हणाली, 'तुम्ही राजासंबंधानें इतका विश्वास बाळगितां हें पाहून मला असें वाटतें कीं, तुम्ही केव्हां चूक कराल याचा नेम नाहीं.' यावर तेथें जवळच असलेला राजमंत्री (हा फडणीस होता) क्लेव्हेरे म्हणाला, "लोकांना नुकत्याच दिलेल्या नवीन शासनपद्धतीप्रमाणें वागण्यांतच आपलें खरें हित आहे असें प्रामाणिकपणें राजाचें मत आहे, याबद्दल आपली खात्री असू द्या" मॉं. रोलंदही म्हणाले कीं, "जर तो प्रामाणिक मनुष्य नसेल तर त्याच्यासारखा पाजी कोणी नाहीं असें म्हणावें लागेल." परंतु या बोलण्यानें मॅडम रोलंदचें समाधान झालें नाहीं. आणि तें होणें शक्यही नव्हतें. कारण राजाची वागण्याची विचित्र तऱ्हा त्याच्या हेतूसंबंधानें संशय उत्पन्न करणारीच होती. मंत्रीमंडळाशीं

खलबतें करण्याचा जेव्हां प्रसंग येई तेव्हां तो मुद्याच्या गोष्टींची निर्णायक चर्चा करण्याचें होता होईल तोंपर्यंत टाळीत असे. जेव्हां परराष्ट्राच्या स्वारीविषयीं बोलणें निघे तेव्हां तो प्रवासाची वाटाघाट करी; जेव्हां परराष्ट्रांच्या राजकीय डावपेचासंबंधीं चर्चा सुरू होई तेव्हां तो तेथील समाजाच्या संवयी व चालीरीती यासंबंधानें चर्चा करी; देशाच्या अंतःस्थितीविषयीं विचार सुरू होतांच औद्योगिक व शेतकी बाबींची चर्चा करी; व तसें करितांना मधून मधून, मॉ. रोलंद यांनीं त्या विषयावर लिहिलेल्या पुस्तकांची स्तुति करी. त्याचा परराष्ट्रीय खात्याचा प्रधान ड्यूमरेझ हा मधून मधून कित्येक आख्याइका व गोष्टी सांगे, त्यासही राजा उत्तेजन देत असे. ही कामाची पद्धत मॅडम रोलंदला मुळींच पसंत नव्हती; व त्याबद्दल तिनें आपल्या नवऱ्याची खरमरीत शब्दांनीं कानउघाडणी केली. आठवड्यांतून दोनदां ती मॉ. रोलंदचे सहाध्यायी व जिरॉंदिस पक्षाचे प्रमुख पुढारी यांस मेजवानीच्या निमित्तानें आपल्या घरीं बोलावीत असे व तेथें त्यांच्याशीं मोकळ्या मनानें प्रचलित राजकारणासंबंधानें चर्चा करून त्यांचे ठायीं धैर्य व उत्साह उत्पन्न करीत असे. मॉ. रोलंदकडून तयार होणारे महत्वाचे खलिते तयार करण्याचे व त्यांचा पत्रव्यवहार चालविण्याचें कामही तिजकडेच होतें. मॉ. रोलंदपेक्षां तिच्या लेखणींत ओज व तेज फार होतें यामुळें मॉ. रोलंदचे या वेळचे कित्येक खलिते भाषेच्या व विचाराच्या दृष्टीनें फार श्रेष्ठ प्रतीचे उतरलेले आहेत.

देशभक्तांचें प्रधानमंडळ नेमून सुमारें एक महिना होतो न होतो तोंच परराष्ट्राशीं युद्ध पुकारण्याचा प्रसंग राजावर येऊन ठेपला. आस्ट्रियन सरकारनें फ्रान्सवर स्वारी करण्याची तयारी केली व त्याचें कांहीं सैन्यही फ्रेंच हद्दीवर येऊन दाखल झालें. युद्ध टाळावें म्हणून प्रधानमंडळानें पुष्कळ प्रयत्न केले; परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. राजाच्या मनांतून युद्ध पुकारण्यास संमति द्यावयाची नव्हती. कारण, आस्ट्रियन सरकार राजाच्या विरुद्ध नसून राष्ट्रीय सभेच्या विरुद्ध होतें. त्यांचेकडून राष्ट्रीय सभेचा पाडाव झाल्यास आपलें आयतेंच काम होईल अशी अद्याप राजास आशा वाटत होती; परंतु उघडपणें तसें

बोलण्याची अथवा आस्ट्रियन सरकाराशीं संगनमत करण्याची त्याची छाति नव्हती. तथापि तो युद्धास संमति देण्याची होईल तितकी टाळाटाळ करीत होता. त्याची दिरंगाई पाहून लोकमत विशेष खवळत चाललें होतें व राष्ट्रीय सभेंत या प्रश्नावर मोठमोठीं रणें माजून राहिलीं होतीं. परराष्ट्रीय प्रधान ड्युमेरेझ यानेंही आतां लढाई पुकारल्यावांचून गत्यंतर नाहीं असा आपला अभिप्राय व्यक्त केला. इतर प्रधानांचेंही तसेंच मत पडलें. तेव्हां नाइलाज म्हणून युद्ध जाहिर करण्यास परवानगी देणें लुईला भाग पडलें व त्याप्रमाणें ता. २० एप्रिल रोजीं आस्ट्रियाशीं युद्ध पुकारण्यांत आलें. फ्रान्सच्या सरहद्दीवर जें सैन्य जमविलें होतें तेंही या वेळीं आस्ट्रियन सैन्यास जाऊन मिळालें. हें पाहून तर लोकांस फारच चीड आली व त्यांनीं देशांत असलेल्या राजपक्षीय लोकांस निष्ठुरतेनें वागविण्याचा उपदेश सुरू केला. या बाबतींत जिरॉंदिस पक्षाच्या लोकांनीं कांहींसें नेमस्त व कायद्यास अनुसरून वागण्याचें धोरण स्वीकारलें होतें. त्यासंबंधानें रॉबिस्पिअरचा व त्यांचा मतभेद होऊन राष्ट्रीय सभेंत त्यानें उघडपणें त्यांच्यावर हल्ला केला होता. हा प्रकार पाहून मॅडम रोलंदला फार वाईट वाटलें व त्याची कानउघाडणी करण्याकरितां तिनें त्यास पुढील आशयाचें पत्र लिहिलें:—

" ज्या लोकांच्या प्रामाणिकपणाबद्दल व दूरदर्शित्वाबद्दल माझी पूर्ण खात्री आहे अशा लोकांशीं तुमचा तीव्र मतभेद झालेला पहातांच त्यांच्या व तुमच्या दरम्यान सलोखा राखण्याची मला जरूर भासूं लागली. ज्यांच्यावर तुम्ही हल्ला करिता, त्यांचें व तुमचें अंतिम साध्य एकच आहे. आपणा सर्वांचे हेतु एकच आहेत परंतु ते सिद्धीस नेण्याच्या मार्गासंबंधानें ज्यांच्याशीं तुमचा मतभेद होईल ते सर्व लोक वाईट असा तुम्ही आपला ग्रह करून घेत असल्याचें पाहून मला फार वाईट वाटतें. तुमच्याहून ज्यांचीं मतें भिन्न आहेत असे पुष्कळ चांगले लोक माझ्या परिचयाचे आहेत व त्यांच्याशीं तुमचीं मतें जुळत नाहींत म्हणून मी तुमची योग्यता कधींच कमी मानिलेली नाहीं. तुमच्या या पूर्वग्रहाबद्दल मला फार वाईट वाटतें. त्याबद्दल तुमचीं काय कारणें आहेत तीं ऐकण्याची मला फार इच्छा आहे. ती सांगण्याचें तुम्ही कबूल

केलें होतें व त्याकरितां तुम्ही मजकडे येणार होता; परंतु अद्याप तुमचा पत्ता नाहीं. तुम्ही मजकडे येण्याचें टाळतां, व मला कांहींएक न कळू देतां ज्यांच्याशीं तुमचा मतभेद होईल त्यांच्याविरुद्ध लोकमत बनविण्याची खटपट करितां, हा कांहीं सरळपणाचा मार्ग नव्हे असें मी तुम्हांस स्पष्ट कळवितें......"कालांतरानें सर्व गोष्टींचा उलगडा होईल. कोण चांगला व कोण वाईट याचा निर्णय होण्यास वेळ लागेल; पण अखेर तो होईल हें खास. चांगल्या माणसांना हीच गोष्ट समाधान प्राप्त करून देऊन त्यांचे ठायीं आशा उत्पन्न करणारी आहे. कालांतरानें होणारा हा निर्णय तुमची कीर्ति अजरामर करण्यास कारणीभूत होईल किंवा त्यामुळें ती कायमची नष्ट होईल याचा विचार करणें मी तुम्हांकडेच सोंपवितें. " ह्या पत्राचा रॉबिस्पियरच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं असें त्याच्या पुढील वर्तनावरून कळून येण्यासारखें आहे. परंतु त्यांतील अधिकारयुक्त भाषासरणीवरून जिरॉंदिस पक्षांतील लोकांस व त्यांच्या राजकारणांत मॅडम रोलंदला केवढें महत्त्व प्राप्त झालें होतें, याचा चांगला अंदाज होण्यासारखा आहे. युद्धमंत्री सर्व्हन यास तिनें या वेळीं लिहिलेल्या पत्रांतील पुढील उद्गारावरूनही या मुद्यावर विशेष प्रकाश पडण्यासारखा आहे. ती म्हणतेः—

" ह्या वेळपर्यंत, योग्य अशा युद्धमंत्र्याच्या अभावामुळें प्रधानमंडळाची कुचंबणा होत होती; परंतु तुमच्या नेमणुकीमुळें ती दूर झाली. आतां सर्व प्रधान क्रांतिपक्षाचे असून जर त्यांनीं या पंधरावड्यांत प्रसंगानुरूप योग्य कामगिरी करून आपलें शहाणपण प्रकट केलें नाहीं, तर त्यांची कांहींच किंमत राहणार नाहीं. अधिकाऱ्यांना दाबांत ठेवून शिपायांत विश्वास उत्पन्न करण्यासंबंधींच्या तुमच्या योजना अंमलांत आणा. राजाकडून जें पत्र लिहविलें जाणार आहे त्याचें महत्त्व लक्षांत आणून त्याप्रमाणें वागण्याची तजवीज करा. ब्रॅबंटच्या सरहद्दीवर लहान लहान तुकडयांऐवजीं मोठें सैन्य जमविण्याचा तुम्हीं जो ठराव केला तो नीट लक्षांत ठेवा. तसेंच माझ्या परम योग्य मित्रा, अधिकारावर असणाऱ्या लोकांनीं न्याय, हाच दयाळुपणा आहे असें समजून करारीपणाचें अव-

लंबन करणें जरूर आहे ही गोष्टही नीट लक्षांत ठेवा. " ह्या पत्रांतील भाषा तर विशेष अधिकारयुक्त आहे.

युद्ध पुकारल्यानंतर देशाचें रक्षण करण्यास्तव पॅरिस येथें २० हजार स्वयंसेवकाचें सैन्य तयार करण्याचा व पळून गेलेल्या पाद्री व सरदार लोकांशीं गुप्त कारस्थानें करणाऱ्या पाद्री लोकांस हद्दपार करण्याचा, असे दोन ठराव प्रधानमंडळानें राष्ट्रीय सभेंत पास करून घेतले; परंतु त्यास आपली मंजुरी देण्याचें राजानें नाकारलें! यामुळें पुन्हां मोठी अडचणीची वेळ येऊन ठेपली! परराष्ट्राशीं युद्ध सुरू असल्यामुळें देशांत शांतता राखण्याकरितां वरील उपाय योजण्याची प्रधानमंडळास व राष्ट्रीय सभेस विशेष आवश्यकता भासत होती; पण लोकपक्षाचें एवढें मोठें सैन्य पॅरिसमध्यें उभारून देणें आत्मरक्षणाच्या दृष्टीनें लुईला इष्ट वाटलें नाहीं. तसेंच पाद्री लोकांची हाकालपट्टी करणेंही त्याच्या जिवावर आलें. यास्तव त्यानें त्या गोष्टींस आपली संमति दिली नाहीं. पण त्यामुळें लोकांचा त्याजवर जो थोडासा विश्वास होता तोही उडाला. अशा स्थितींत प्रधानमंडळाला आपलें काम करणें अशक्य होऊन बसलें. तेव्हां राजाची कानउघाडणी करण्याकरितां सर्वांनीं मिळून त्यास एक पत्र लिहावयाचें व त्यांत त्याच्या कृतीबद्दल नापसंति व्यक्त करून त्यामुळें होणाऱ्या अनिष्ट परिणामाविषयीं त्यास इषारा द्यावयाचा असें ठरलें. परंतु प्रथम पत्रांतील मसुद्याच्या भाषेसंबंधानेंच मंत्रिमंडळांत मतभेद झाल्यामुळें तें काम तसेंच पडून राहिलें. ह्या अस्वस्थेच्या दिवसांत मॅडम रोलंदनें आपल्या पक्षाच्या लोकांस धीर देण्याचें व त्यांचे ठायीं धैर्य उत्पन्न करण्याचें काम सारखें चालू ठेवलें होतें. तिच्या लेखणीस व तोंडास बिलकूल विसावा नव्हता. या वेळीं लोकांचें कर्तव्य व राजाचें कर्तव्य काय या संबंधानें तिनें मॉ. रोलँदच्या सहाध्यायी व सहकारी मंडळाशीं फार मार्मिक चर्चा केली. राजाची कानउघाडणी करून त्यानें मंजूर केलेल्या शासनपत्रिकेनुसार लोकांस प्राप्त झालेल्या हक्कांचें रक्षण करणें हें या वेळीं त्यांचें मुख्य कर्तव्य आहे असें तिनें त्यांस बजावून सांगितलें. राजाला पत्र लिहिण्याचा प्रधानमंडळाचा बेत फिसकटला हें पाहून तिला फार वाईट वाटलें, व दुसरा कोणी प्रधान तयार नसेल तर आपण एक-

त्यानेंच राजास तें पत्र सादर करावें असा तिनें आपल्या पतीस सल्ला दिला. तेव्हां मॉं. रोलंद यांनीं तसें करण्याचें कबूल केल्यावरून राजास सादर करावयाचें पत्र तत्काळ एका बैठकींत तिनें लिहून काढलें. हें मूळ पत्र बरेंच लांब आहे सबब तें सर्व येथें न देतां त्यांतील महत्त्वाचा भाग सारांशरूपानें देतों:—

" राजानें फ्रान्सला नुकतीच जी लोकनियंत्रित ' शासनपद्धति ' प्राप्त करून दिली आहे तिची लोकांस फार महती वाटत असून त्या पद्धतीचें रक्षण करण्याकरितां ते जिवावर उदार होण्याचाही संभव आहे. अशा वेळीं राजानें तिला चिकटून राहणेंच इष्ट नाहीं काय? फ्रान्स हें आतां नांवाचें राष्ट्र नसून ' राष्ट्र ' ह्या शब्दाच्या अर्थानुसार खरोखर राष्ट्र बनलें आहे. त्याला धुडकावून लावणें अथवा स्तिमित करणें आतां शक्य नाहीं. जों जों त्यांच्या हक्कावर गदा येईल तों तों तें रक्षण करण्याविषयींचा त्याचा उत्साह वृद्धिंगत होत जाणार. तशांत फ्रान्सच्या सरहद्दीवर शत्रूचें ठाणें बसलें असून त्यास गुप्तपणें मदत करण्यास तयार असलेले अनेक लोक सध्यां देशाच्या अंतर्भागीं आहेत. अशा वेळीं लोकांस जेणेंकरून आपल्यासंबंधानें विश्वास उत्पन्न होईल असें वर्तन राजाकडून व्हावें अशी सर्वांची अपेक्षा आहे. हें वर्तन नुसत्या शब्दांत नव्हे तर कृतींत व्यक्त होणें जरूर आहे. राष्ट्रीय सभेनें पास केलेले वादविषयक दोन ठराव मंजूर केल्यावांचून लोकांचें समाधान होणें शक्य नाहीं. लोकांच्या राजकीय विचारांत क्रांति झालेली असून त्यांचे ठायीं स्वसामर्थ्याची जाणीव उत्पन्न झालेली आहे. जें काम आज केवळ समंजसपणानें सहज होण्यासारखें आहे त्याची टाळाटाळ केल्यास तें सिद्धीस नेण्याकरितां रक्तपात होण्याचाही संभव आहे. दपटशाहीनें राष्ट्रीयसभेचें तोंड बंद करणें शक्य आहे, पॅरिसमध्यें दंडुकेशाही सुरू करून लोकांना गर्भगाळित करून टाकणेंही शक्य आहे; परंतु त्याचे अखेर परिणाम अनिष्ट होऊन ते राजा व प्रजा ह्या सर्वांस सारखेच भोंवतील. राजा व फ्रान्सची शासनसंस्था ह्यांचे हितसंबंध एकच आहेत. राष्ट्रीय सभेच्या ठरावांना तावडतोब संमति देऊन त्या हितसंबंधांचें रक्षण करण्याची संधि गमावल्यास राजाच्या सिंहासनास (गादीस) धोका येण्याचा संभव

आहे. ह्या कामीं आणखी कांहीं काल दिरंगाई झाल्यास लोक राजाला फ्रान्सच्या शत्रूचा सांथीदार समजूं लागतील. नागरिक व प्रधान ह्या नात्यानें सद्यःस्थितीचें स्पष्ट चित्र निर्भिडपणें आपणापुढें मांडणें हें माझें कर्तव्य असून तें मी ह्या पत्रद्वारें बजावीत आहे. कर्तव्य हें–मग तें कितीही कठोर असो मला प्राणापेक्षां अधिक महत्त्वाचें वाटतें व पुढें मागें माझें कांहींही होवो मीं योग्य वेळीं आपलें कर्तव्य बजावलें याबद्दल मला नेहमीं समाधानच वाटेल. वगैरे. " हें पत्र लिहून झाल्यावर मॅडम रोलंदनें जेव्हां तें आपल्या पतीस वाचून दाखविलें तेव्हां त्याचा विश्वासू चिटणीस पॅंचे हा तेथें होता. पत्र वाचून झाल्यावर तो म्हणाला ' हें फार धिटाईचें आहे ' त्यावर मॅडम रोलंद म्हणाली ' होय. आतां धिटाईनें वागण्याचीच वेळ आली आहे. ' त्यानंतर दुसरे दिवशीं सकाळीं मॉ. रोलंद यांनीं तें पत्र राजास सादर केलें. त्यांतलि मजकूर राजास आवडण्यासारखा नव्हता. तथापि जर त्यानें त्यांतील आशय लक्षांत घेऊन राष्ट्रीय सभेचे वादविषयक पूर्वोक्त ठराव मंजूर केले असते तर अजूनही त्याला लोकांत आपल्या संबंधानें विश्वास उत्पन्न करतां आला असता; परंतु त्याला बुद्धि झाली नाहीं. त्याच्या राणीला तर हें पत्र फारच उर्मटपणाचें व असह्य असें वाटलें. ह्या पत्राचा परिणाम लवकरच दिसून आला. ज्या दिवशीं तें राजाच्या हातीं गेलें त्याच्या दुसऱ्या दिवशीं युद्धमंत्री सर्व्हन हा पॅरिस येथें लष्करी ठाणें बसविण्याबद्दल बोलण्याकरितां राजाकडे गेला. परंतु राजाची मिजास नाराज असल्यामुळें तो त्याच्याशीं सरळ बोलला नाहीं व पुढें थोड्या वेळानें त्यास बडतर्फ करून त्याचे जागीं ड्युमेरझची नेमणूक केल्याची राजाज्ञा त्याचे हातीं पडली. त्यानें ताबडतोब ती गोष्ट मॅडम रोलंदच्या कानावर घातली. तेव्हां ' माझ्या नवऱ्यासही लवकरच तो मान मिळेल; त्याच्या आधीं तो तुम्हांस मिळालेला पाहून मला तुमचा हेवा वाटतो,' असें ती म्हणाली! झालेला प्रकार पाहून मॉ. रोलंद यांनीं आपल्या सहाध्यायांची एक परिषद बोलाविली व पुढें काय करावें याची चर्चा आरंभिली. मॅडम रोलंद तेथें होतीच. तिनें असें सुचविलें कीं, राजानें केलेल्या गोष्टीबद्दल निषेध प्रदर्शित करण्याकरितां सर्व मंत्रिमंडळानें एकदम राजीनामा घ्यावा. ड्युमेरझनें आपल्या

सहाध्यायांस न विचारतां राजाशीं संगनमत करून युद्धमंत्र्याची जागा स्वीकारल्यामुळें, अशा विश्वासघातकी मनुष्याबरोबर काम करणें शक्य नाहीं, असें राजीनाम्याचें कारण दर्शविण्यांत यावें असें तिचें म्हणणें होतें. परंतु या संबंधानें प्रधानमंडळाचें एकमत होईना. राजीनामा देण्यापेक्षां राजास आपलें म्हणणें तोंडींच कळवावें असें कित्येकांचें मत पडलें; तेव्हां तो विचार तसाच तहकूब राहिला. पण पुढें एक दोन दिवसांतच मॉं. रोलंद व जमाबंदीखात्याचा प्रधान क्लेव्हेरे यांस राजानें बडतर्फ केलें. मॅडम रोलंद ह्या गोष्टीची जणु काय वाटच पहात होती ! तिला ह्या बडतर्फीबद्दल बिलकुल वाईट वाटलें नाहीं. मॉं. रोलंद यांनीं बडतर्फीचा हुकूम तिला दाखवितांच ती म्हणाली " ज्या अर्थी तुमच्या पत्रांतील उपदेश राजानें ऐकला नाहीं त्या अर्थी तें छापून त्याच्या प्रती राष्ट्रीय सभेच्या सभासदांस नजर करा; म्हणजे तुम्हाला कां बडतर्फ करण्यांत आलें आहे हें त्यांना कळेल. " मॉं. रोलंद यास ती गोष्ट बरी वाटली व त्यांनीं त्याप्रमाणें केलें. त्याचा परिणाम मॅडम रोलंदच्या अपेक्षेप्रमाणें झाला. राष्ट्रीय सभेनें लौकरच बडतर्फ झालेल्या सर्व प्रधानासंबंधानें सहानुभूति व खेद प्रदर्शित करणारा ठराव पसार केला व त्यामुळें मॉं. व मॅडम रोलंद यांचें लोकांवरील वजनही फार वाढलें. आपल्या नवऱ्याच्या बडतर्फीचा हा इष्ट परिणाम पाहून मॅडम रोलंदला फार समाधान वाटलें व तिनें त्याबद्दल आपलें अभिनंदन करून घेतलें. याप्रमाणें मॉं० रोलंदच्या प्रधानकीची पहिली कारकीर्द संपली.

प्रकरण ७ वें.

---*---

मॉं. रोलंदची दुसरी कारकीर्द.

मॉं. रोलंद यांनीं (मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें) प्रसंग पडल्यास राहण्याकरितां म्हणून जें एक वसतिगृह भाड्यानें घेऊन

ठेवलें होतें, तेथें आतां, ते मॅडम रोलंदसह जाऊन राहिले. ह्या वसति-गृहाचें नांव 'रू द ला हार्प' असें होतें. त्यांच्या बडतर्फीनंतर राजानें जें नवें प्रधानमंडळ नेमलें त्यांत ड्युमरेझ खेरीज बाकीचे सर्व लोक नेमस्त पक्षांतील (यास ' फ्युइलन्त्स ' असें म्हणत असत) होते व तेही अगदीं सामान्य प्रतीचे होते. अशा आणीबाणीच्या वेळीं आवश्यक असणारें धैर्य, करारीपणा व तडफ इत्यादि गुण त्यांचें अंगीं नव्हते. यामुळें लोकमत शांत करून अथवा त्यांच्या अत्याचारी वृत्तीचें दमन करून राज्यशकट सुयंत्रित चालविण्याचें काम त्यांचेकडून होण्याचा रंग दिसेना. ड्युमरेझ यानें, राष्ट्रीय सभेचे वादग्रस्त ठराव (पाद्र्यांना हद्दपार करण्याचा व पॅरिस येथें लष्करी ठाणें स्थापण्याचा) मान्य करण्याबद्दल राजास फिरून सल्ला दिली. ' हद्दपारींतच पाद्र्यांची जास्त सुरक्षितता आहे व पॅरिस येथील ठाण्यांतून आपण वरचेवर सरहद्दीकडे सैन्य पाठविणार असल्या-मुळें त्याबद्दलहि भिण्याचें कांहीं कारण नाहीं ' असें त्यानें राजास सांगि-तलें. परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. फ्रेंच सेनापति लाफेती यानें, जॅकोबिन पक्षाची चळवळ दाबांत ठेवण्याकरितां कडक उपाय सुचविणारें एक पत्र राष्ट्रीय सभेस उद्देशून या वेळीं लिहिलें, परंतु त्याचा परिणाम इष्ट न होतां अनिष्टच झाला. राष्ट्रीय सभेंत जॅकोबिन पक्षाचें वर्चस्व अधिकाधिक होत चाललें होतें. ह्यामुळें लाफेतीचा उपदेश ऐकणें त्या सभेच्या आटोक्यांत नव्हतें. शिवाय लाफेतीच्या हाताखालचे सैन्याचा परशत्रूकडून सारखा पराभव होत असल्याच्या बातम्या येत असल्यामुळें त्याच्या प्रामाणिकपणाबद्दलही पुष्कळ लोकांस संशय येऊं लागला होता. तो गुप्तपणें शत्रूस सामील असल्याचीही शंका कित्येकांनीं व्यक्त केली. त्याच्या उपरोक्त पत्रामुळें जॅकोबिन पक्षाचे लोक फार बिथरले व राजाला पदभ्रष्ट करून सर्व सत्ता राष्ट्रीयसभेच्या हातीं देण्याचा आग्रह धरूं लागले, प्रधानमंडळ दुर्बल राजा दुर्बल व हेकेखोर, लोक उतावीळ व संशयग्रस्त अशी स्थिती असल्यामुळें सर्वत्र बेबंदशाही माजूं लागली व अत्याचारही होऊं लागले. आपल्या देशाची ही स्थिती पाहून मॉं. व मॅडम रोलंद यांस अतोनात वाईट वाटलें. रू द ला हार्प येथें, बार्बरोक्स-नामक एका तरुण देशभक्त स्नेह्यांशीं या विषयासंबंधानें वाटाघाट करि-

तांना मोठा गहिवर येऊन ते म्हणाले–" राजाच्या कृष्णकारस्थानांस जर आळा घातला नाहीं, तर स्वातंत्र्याचा नायनाट झाला म्हणून समजा. लाफेती हा आंतून शत्रूला सामील असावा असें दिसतें. त्याच्या सैन्यांत बिलकुल शिस्त नसून शत्रूचा प्रतिकार करण्यास तें असमर्थ आहे. ही राज्यक्रांती यशस्वी करण्याकरितां तीन वर्षे आह्मीं जी मेहनत केली व कष्ट सोसले ते तिची अशी वाताहत झालेली पहाण्याकरितांच काय ? जर फ्रान्समध्यें स्वतंत्रतेची अशी वाताहत झाली तर सर्व जग तिला मुकणार ह्मणून समजा तसें झाल्यास तत्वज्ञाच्या सर्व आशा विफल होऊन सर्व जगभर जुलमाचें साम्राज्य माजेल. हा अनिष्ट प्रसंग टाळण्याचा प्रयत्न करूं या; पॅरिस व उत्तर फ्रान्सांतील सर्व लोकांस सशस्त्र करून युद्धास पुकारूं या; दुर्दैवानें जर त्यांचा पराभव झाला तर स्वतंत्रतेचा पुतळा घेऊन दक्षिण फ्रान्सांत जाऊं या व तेथें कोठें तरी तिच्या भक्तांची एक वसाहत स्थापन करूं या." मॉं रोलंदच्या तोंडून हे शब्द निघत असतांना त्यांचें हृदय भरून येत होतें; त्यांचा कंठ दाटला होता व त्यांचे डोळे पाण्यांनीं भरून आले होते ! तो देखावा पाहून मॅडम रोलंद व बार्बरोक्स यांच्या डोळ्यांतून पाणी आलें ! बार्बरोक्स हा दक्षिण फ्रान्सचा रहिवाशी होता व जिरॉंदिस पक्षाचीं सर्व राजकीय मतें त्यास पसंत असल्यामुळें मॉं. रोलंदचा मित्र लॅंथेनस यांच्या मार्फत त्याची व मॉं. व मॅडम रोलंदची ओळख झाली होती. हा मनुष्य अगदीं तरुण, उत्साही व तरतरीत होता. हा पुढें या राज्यक्रांतींत बराच प्रसिद्धीस आला. परराष्ट्राच्या स्वारीमुळें जर क्रांतिकारक मंडळास पॅरिस सोडावें लागलें तर दक्षिणेंत जाऊन स्वातंत्र्याचें युद्ध कसें चालवावें या संबंधानें मॉं. रोलंद व बार्बरोक्स यांच्या दरम्यान बरीच वाटाघाट झाली. बार्बरोक्स यानें दक्षिण फ्रान्सचा एक नकाशा बरोबर आणला होता. त्यावरून कोणकोणती स्थानें आपल्या कार्याच्या दृष्टीनें सोयीचीं आहेत; तेथील लोकांची आपणांस किती व कोणत्या प्रकारची मदत होण्यासारखी आहे वगैरे गोष्टींची चर्चा त्यांनीं केली. मॅडम रोलंदनेंही त्या चर्चेंत प्रमुखपणें भाग घेतला होता. याप्रमाणें चर्चा व बेत होऊन बार्बरोक्स निघून गेला, पण पुढें

निराळीच परिस्थिती उद्भवल्यामुळें पुन्हा त्याची व मॉ. रोलंदची भेट होऊ शकली नाहीं.

ऑस्ट्रियन्स व प्रशियन्स यांनीं फ्रान्सवर सारखे हल्ले सुरू केले होते. परंतु त्यांचा प्रतिकार करण्याचे कामीं फ्रेंच सेनापतींकडून ढिलाई होऊं लागली त्यामुळें पॅरिसचें लोकमत फारच खवळलें. शहरांतील सर्व भागातर्फे हजारों लोक राष्ट्रीय सभेपुढें येऊन या स्थितीबद्दल तक्रार करून हल्लींचें प्रधान मंडळ मोडून पूर्वीचें देशभक्तांचें, प्रधान मंडळ नेमण्याची सूचना करूं लागले. तसेंच फ्रेंच सैन्याच्या शैथिल्याबद्दल निषेध प्रदर्शित करून ह्या शैथिल्यास जर राजा कारण असेल तर त्याची सत्ता काढून घ्यावी असेंही ते म्हणूं लागले ! कांहीं लोकांचा जमाव राजवाड्यांत शिरून त्यांनीं खुद्द राजापुढेंही आपलीं गाऱ्हाणीं मांडलीं व सध्याचें प्रधान मंडळ मोडून पूर्वीचें प्रधान मंडळ नेमण्याबद्दल मागणी केली ! जनतेचा हा अति प्रसंग पुष्कळ लोकांस आवडला नाहीं. जिरॉंदिस पक्षाच्या कांहीं पुढाऱ्यांसही तो आवडला नाहीं. त्यांच्यापैकीं कांहींजण राजाच्या रक्षणार्थ धांवून आले; परंतु लोक दंगाधोपा न करितां राजाला आपलीं गाऱ्हाणीं स्पष्ट शब्दांनीं सांगून आले तसे परत गेले. तथापि भावी भयंकर वादळाचें हें पूर्वचिन्ह होतें, त्यामुळें राष्ट्रीय सभेच्या सभासदांना त्याकडे दुर्लक्ष करणें शक्य नव्हतें. शत्रु जोरांत होता; राजाचा कल शत्रूकडेच असल्याचें दिसत होतें. त्यामुळें शत्रूचा विजय होऊन क्रांतिकारकांवर भयंकर संकट ओढवण्याचा संभव स्पष्ट दिसत होता. क्रांतिकारक लोकांमध्यें जरी अनेक पंथ व अनेक मतें व तज्जन्य चुरस यांचा सुळसुळाट झालेला होता तरी सर्वांनीं ह्या वेळीं एक होऊन परकीय शत्रूंपासून फ्रान्सचा बचाव करणें जरूर होतें व ही गोष्ट सर्वांच्या लक्षांत आणून देण्याकरितां जिरॉंदिस पुढारी व्हर्ग्निऑद यानें राष्ट्रीय सभेंत फार सुंदर भाषण केलें व त्याचा परिणामही चांगला झाला. 'सर्व देशावर मोठें संकट आलें असून, त्याचा प्रतिकार करण्याकरितां राष्ट्रीय सैन्य उभारणें जरूर आहे व त्या सैन्यांत प्रत्येक देशभक्तानें सामील व्हावें' असा ठराव राष्ट्रीय सभेनें पास केला. तेव्हां लोक भराभर सैन्यांत सामील होऊं लागले व सॉइसॉन्स येथें त्याचें ठाणें स्थापन करण्यांत आलें.

राष्ट्रीय सभेच्या ह्या ठरावास राजाची अनुमति मिळाल्याखेरीज त्याची अंमलबजावणी करणें प्रधानमंडळास शक्य नव्हतें व राजाची तर त्यास अनुमति मिळण्याचा संभव दिसेना. तेव्हां प्रधानमंडळानें ता. १० जुलई (स. १७९२) रोजीं राजीनामा दिला ! राजा राष्ट्रीय सभेच्या उपरोक्त ठरावास संमति देत नाहीं असें दिसून येतांच 'राजाला पदभ्रष्ट करा' अशी लोक गर्जना करूं लागले होते. तशांत, प्रशियन सेनापति ड्यूक ऑफ ब्रून्सिक यानें फ्रेंच लोकांस उद्देशून असा जाहिरनामा काढला कीं, 'सर्वांनीं आपणांस येऊन मिळावें व फ्रेंच राजाशीं निष्ठेनें वागून त्याज-विषयींचें आपलें कर्तव्य करावें. आपण देशाच्या अंतर्भागीं येईपर्यंत राष्ट्रीय सभेनें सर्व किल्ले व शहरें यांचें नीट रक्षण करावें. जो कोणी हें ऐकणार नाहीं त्यास देशद्रोही मानलें जाईल व जो कोणी राजास इजा करील अथवा त्यास पॅरिसमधून हालवील त्यास कडक शासन करण्यांत येईल.' हा जाहिरनामा वाचून तर पॅरिसच्या लोकांचें पित्त भडकलें व त्यांनीं बंड करून राजास पदभ्रष्ट करण्याचा घाट घातला. बार्बरोक्स यानें या कामाकरितां मार्सेलसहून जीवावर उदार होऊन लढणारे ६०० जवान आणविले. पॅरिसची म्युनिसिपालटी मोडून तिच्या ऐवजीं 'कम्यून' ह्या नांवाची लोकपक्षीय संस्था स्थापण्यांत आली. ह्या 'कम्युन' मध्यें शहरांतील सर्व भागांचें प्रतिनिधि असून तींत जॅकोबिन पक्षाच्या पुढाऱ्यांचें वर्चस्व होतें. ह्या लोकांनीं ता. १० आगष्ट रोजीं सकाळीं बंडास आरंभ केला. राजपक्षाचें सैन्य व त्यांचें सैन्य ह्यांच्या दरम्यान त्या दिवशीं झालेल्या चकमकींचें वर्णन देण्याचें हें स्थळ नव्हें. इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं, लोकांनीं आपला हेतु सिद्धीस नेला. त्यांनीं, राजास राज्यभ्रष्ट करून राष्ट्रनियंत्रणाकरितां 'नॅशनल कन्व्हेन्शन' नांवाची नवीन लोकसभा निर्माण करण्याचा ठराव पास करण्यास राष्ट्रीय सभेस भाग पाडलें. हा ठराव पास होतांच राष्ट्रीय सभेनें पुन्हा पूर्वीच्या देशभक्त प्रधान मंडळाचें हातीं फ्रान्सचीं राज्यसूत्रें दिलीं. अर्थात् मॉं. रोलंद फिरून एकवार मुख्य प्रधान झाले. त्यांच्याशिवाय क्लेव्हेरे (जमाबंदीखात्याचा प्रधान), सर्व्हन (लष्करी खात्याचा), मोंगे (आरमारीखात्याचा), लेब्रन (परराष्ट्रीयखात्याचा),

दँतन (न्यायखात्याचा) इतक्या देशभक्तांचा प्रधान मंडळांत समावेष झालेला होता. पैकीं क्लेव्हेरे व सर्व्हन हे पूर्वीही मॉं. रोलंदचे सहाध्यायी असून त्यांच्या मताचे पूर्ण अनुयायी होते. लेब्रन व मोंगे हे सामान्य प्रतीचे लोक असून त्यांचें फारसें महत्त्व नव्हतें. परंतु दँतनची गोष्ट तशी नव्हती. तो मोठा महत्त्वाकांक्षी, कावेबाज व हुषार असून जनतेवर त्याचें मोठें वजन होतें. जॅकोबिन पक्षाचा तो एक प्रमुख पुढारी होता. त्याचा चेहरा कुरूप व स्वभाव दुष्ट होता. देशहितापेक्षां स्वतःचें हित व महत्त्व त्याला अधिक प्रिय होतें. तथापि देशाभिमानाचा आविर्भाव दाखवून लोकप्रियता संपादन करण्याची कला त्यास चांगली साधलेली होती, तो नेहमीं लोकांचा कल पाहून आपल्या वागणुकीचें धोरण ठरवीत असे, सत्य, न्याय, नेकी, कायदेशीरपणा व शिस्त ह्यांविषयीं तो बेफिकीर असे. ‘ वारा वाहील तशी पाठ वळवावयाची ’ हें त्याच्या वर्तनाचें मुख्य धोरण होतें. अशा मनुष्यास प्रधानमंडळांत घेतल्याबद्दल मॅडम रोलंदला फार वाईट वाटत असे व ती इतर प्रधानांस त्याबद्दल दोषही देत असे. परंतु अशा मनुष्यास बाहेर ठेऊन प्रधानमंडळावर हल्ले करूं देण्यापेक्षां त्यास जबाबदारीच्या कामांत गुंतविल्यास त्याचें समाधान होऊन सध्यांच्या आणीबाणीच्या वेळीं राज्यकारभाराचें गाडें अधिक सुरळीत चालेल अशा समजुतीनें त्यांनीं त्यास प्रधानमंडळांत घेतलें होतें व तसें त्यांनीं मॅडम रोलंदजवळ अनेकदां बोलूनही दाखविलें; पण मॅडम रोलंदचें ह्या बुद्धिवादानें समाधान झालें नाहीं. त्याची व तिची यापूर्वीं ओळख नव्हती, तथापि प्रधानमंडळांत तो शिरल्यानंतर मॉं. रोलंदबरोबर खलबतें करण्याकरितां इतर प्रधानाप्रमाणें तो त्यांच्या घरीं येऊं लागला. तेव्हां साहजिकच त्याची ओळख करून घेण्याचा तिला प्रसंग आला. तेव्हां पहिल्या एक दोन मुलाखतींतच त्याची चर्या, बोलणेंचालणें, व वागण्याची तऱ्हा पाहून त्याजविषयीं तिचे मनांत एकदां जो अनिष्ट ग्रह उत्पन्न झाला तो अखेरपर्यंत तसाच कायम राहिला. ‘हा मनुष्य अखेर शिरजोर होऊन तुमच्या नाशास कारण होईल’ असा इषारा तिनें प्रधानमंडळांस आरंभींच दिला, पण त्याकडे कोणीं विशेष लक्ष दिलें नाहीं. तथापि अखेरीस मॅडम रोलंदचें हें भविष्य

खरें ठरलें तें कसें हें पुढें समजेल. आपणाविषयीं मॅडम रोलंदचा ग्रह ठीक नाहीं, ही गोष्ट लवकरच दँतनच्या लक्षांत आली व त्यांत इष्ट असा फरक व्हावा म्हणून त्यानें पुढें निरानिराळ्या निमित्तानें वारंवार तिच्या मुलाखती घेऊन पाहिलें; पण तिचा ग्रह बदलण्याचा जेव्हां त्याला कांहीं रंग दिसेना, तेव्हां त्यानें तो नाद सोडून दिला व तो तिचा आणि मॉं. रोलंदचा पाडाव करण्याच्या उद्योगास लागला. याच सुमारास मॉं. रोलंद यास आणखी एक महत्त्वाचा शत्रु उत्पन्न झाला; त्याचें नांव 'मारात' असें होतें. हा एक छापखानेवाला असून मोठा बोलका व हुषार होता. जॅकोबिनपक्षाच्या लोकांवर त्यानें आपल्या वक्तृत्वशक्तीमुळें चांगली छाप बसविली होती. ता. १० आगष्ट रोजीं पॅरिसच्या कम्यूननें राजास पदच्युत करण्याकरितां जें बंड केलें त्यांत यानें प्रमुख भाग घेतला होता. त्यानंतर त्यानें सरकारी छापखाना जबरदस्तीनें आपल्या ताब्यांत घेतला व आपलीं कांहीं पुस्तकें छापून काढण्याकरितां त्यानें (क्रांतिकारक) सरकारांपाशीं १५००० लिव्हर्सची मदत मागितली होती. मॉं. रोलंद यास त्याचें पाहिलें कृत्य बेकायदेशीर वाटल्यामुळें त्यांनीं त्यास सरकारी छापखाना ताब्यांत घेण्यास हरकत केली व ज्या पुस्तकांच्या छपाईकरितां सरकारी मदत घ्यावयाची, त्यांची हस्तलिखित प्रत प्रथम राजमंडळानें (कौन्सिल) पसंत करणें जरूर आहे असें त्यांनीं त्यास कळविलें. त्यावर मारातनें राजमंडळाकडे अर्ज केला. राजमंडळानें, * ही बाब न्यायखात्याच्या प्रधानाच्या अखत्यारांतली आहे. असें ठरवून त्या अर्जाचा निकाल करण्याचें काम दँतनकडे सोंपविलें. रोलंदचा पाडाव करण्याचें दँतननें पूर्वींच ठरविलें असल्यामुळें त्यानें मारातचा अर्ज मंजूर करून त्यास हवी होती ती रकम दिली. तेव्हां मारात हा दँतनचा गुलाम व मॉं. रोलंदचा शत्रू बनला. मॉं. व मॅडम रोलंद हीं क्रांतिपक्षाचीं होतीं खरीं परंतु त्यांना अराजकता, अत्याचार व क्षणो-

---

* सर्व प्रधानांचें मिळून कार्यकारी कौन्सिल असे त्यासच आम्ही ' राजमंडळ ' अशी संज्ञा दिली आहे. हे प्रधान एकंदर ६ होते. त्यांचीं नांवें मागें आलींच आहेत.

क्षणीं कायद्यांचा भंग करणें, ह्या गोष्टी पसंत नव्हत्या. जिरॉंदिस पक्षाचे बहुतेक पुढारी त्याच्या मताचेच होते. परंतु जॅकोबिन पक्षाचे पुढारी वरील गोष्टींचा विधिनिषेध बाळगणारे नव्हते, किंबहुना लोकप्रियता संपादण्याकरितां अथवा आपलें महत्त्व वाढविण्याकरितां ते त्या गोष्टीस उत्तेजनही देऊं लागले होते असें म्हटलें तरी चालेल ! पॅरिसच्या लोकांनीं म्युनिसिपालिटी मोडून तिच्या जागीं कम्यूनची स्थापना केल्यानंतर त्या कम्यूनमध्यें अत्याचारी लोकांचाच विशेष भरणा झाला होता. दँतन, रॉबिस्पियर, मारात हे जॅकोबिन पक्षाचे पुढारी ह्या लोकांस वारंवार उचलून धरून त्यांच्या मनोविकारांचें उद्दीपन करीत होते. अशा स्थितींत देशांत शांतता राखण्याचें काम फार बिकट होतें तथापि शक्य तितके प्रयत्न करून तें करण्याचा उद्योग मॉ. रोलंद यांनीं चालू ठेवला होता. परंतु शत्रु दाराशीं असून त्याचा एकसारखा विजय होत असल्याच्या बातम्या सारख्या येत गेल्यामुळें पॅरिसच्या लोकांत फार अस्वस्थता माजली. शत्रचा प्रतिकार करण्यास फ्रेंच सैन्य गेलें असूनही शत्रु एकामागून एक फ्रेंच शहरें काबीज करीत असलेलें पाहून त्यास गुप्तपणें फ्रान्समधून मदत मिळत असावी अशी लोकांस शंका आली. इतक्यांत लाव्हेंदी प्रांतांत बंड उपस्थित झालें ! तेव्हां जॅकोबिन पक्षाच्या लोकांनीं राष्ट्रीय सभेस घाबरवून टाकून तिजकडून अनेक कडक कायदे पास करून घेतले. संशयित लोकांच्या घरांची तपासणी करून त्यांचीं हत्यारें काढून घेण्याकरितां एक कमेटी नेमण्यांत येऊन तिचें अधिपत्य दँतनला देण्यांत आलें. संशयिताला पकडून अटकेंत ठेवण्याचा अधिकारही ह्या कमेटीस देण्यांत आला होता. तसेंच गुन्हेगाराची तडकाफडकी चौकशी करून त्यास शासन करण्याकरितां 'क्रांतिकारकांचें एक न्याय मंडळ'ही नेमण्यांत आले. ह्या मंडळांत दँतन, रॉबिस्पियर, मारात, वगैरे जॅकोबिन पक्षाचे पुढारी व मॉ. आणि मॅडम रोलंदचे शत्रु प्रमुख होते. देशांतील पाद्री लोकांना १५ दिवसांत फ्रान्स सोडून जाण्याचा हुकूम करण्यांत आला होता व या हुकमाची अवज्ञा करणारास देहांत शासन ठरविण्यांत आलें होतें. मात्र त्यांच्यापैकीं जे कोणी अज्ञान व वृद्ध होते त्यास सरकारी अधिकाऱ्यांच्या स्वाधिन होऊन देशांतल्या देशांत राहण्याची

मुभा ठेवली होती. याप्रमाणें घडामोडी चालू असता सप्टेंबर तारीख २ रोजीं व्हर्डून शत्रूनें घेतल्याची बातमी पॅरिसमध्यें येऊन पोंचली. शत्रूचा हा विजय पाहून पॅरिसच्या जनतेचा क्रोधाग्नि भडकला व त्यांनीं दंगा करण्यास सुरवात केली. हा दंगा होऊं नये, निदान त्याला उग्र स्वरूप येऊं नये, म्हणून मॉं. रोलंद यानीं अटोकाट यत्न केले. परंतु जॅकोबिन पक्षाच्या वक्त्यांनीं लोकांच्या बेहोषवृत्तीस देशाभिमानाच्या नांवाखालीं उत्तेजन दिल्यामुळें व राष्ट्रीय सभेस आणि अधिकारी वर्गास भिवबून सोडल्यामुळें मॉं. रोलंदच्या हुकमाची अंमलबजावणी व्हावी तशी झाली नाहीं. त्या कारणानें लोकांच्या उच्छृंखलपणास आळा बसला नाहीं व त्यांनीं २।३ दिवस पॅरिसमध्यें धुमाकूळ माजवून संशयावरून शेंकडों लोकांची कत्तल केली ! ! मॉं. रोलंदच्या वाडयासही २०० लोकांनीं वेढा दिला ! त्या वेळीं ते घरीं नसून राजमंडळाच्या बैठकीकरितां आरमार खात्याच्या कचेरींत गेले होते. ते घरीं नाहींत असें त्यास सांगण्यांत आलें परंतु त्यांस तें खरें वाटेना ! तेव्हां त्यांच्यापैकीं दहाजणांची मॅडम रोलंदनें मुलाखत घेतली. ते व्हर्डूनचा सूड उगविण्याकरितां शत्रूवर चाल-करून जाण्यास तयार होऊन हत्यारें मागण्याकरितां आलेले होते. मॅडम रोलंदनें त्यांस युद्धखात्याच्या कचेरींत जाण्यास सांगितलें. तेव्हां, 'आम्ही तेथें गेलों होतों पण आम्हांस हत्यारें मिळालीं नाहींत; सबब त्याचा जाब विचारून तीं मिळविण्याकरितां आम्ही मुख्य प्रधानास भेटूं इच्छितों ' असें ते म्हणाले. परंतु ' ते सध्यां घरीं नाहींत; आरमार-खात्याच्या कचेरींत राजमंडळाची बैठक आहे त्याकरितां तिकडे गेले आहेत; वाटल्यास तुम्ही तेथें जाऊन त्यांची गाठ घ्या ' असें मॅडम रोलंदनें त्यास कळविल्यावरून ते मुकाट्यानें तेथून आपल्या जमावासह निघून गेले. परंतु जातांना, त्यांपैकीं कांहींजण मॉं. रोलंदवर देशद्रोहाचा आरोप करीत असल्याचें ऐकून मॅडम रोलंदचें काळीज चर्र झालें ! लोक निघून गेल्यावर तत्काळ झालेली हकीकत कळविण्याकरितां ती मॉं. रोलंदकडे निघून गेली. लोकांनीं तारीख २ सप्टेंबरच्या रात्रीं तुरुंग फोडून तेथें संशयावरून अटकेंत ठेवलेल्या लोकांची कत्तल केल्याची बातमी दुसरे दिवशीं सकाळीं मॉं. रोलंद यास समजली. हे लोक जरी

संशयावरून पकडलेले होते तरी त्यांत पुष्कळजण निरपराधी असण्याचा दृढ संभव होता. अशा लोकांची कत्तल करणें न्यायास व कायद्यास धरून नव्हतें. तेव्हां त्याबद्दल नापसंती व्यक्त करून ती बंद करण्याची व्यवस्था करणें हें मुख्य प्रधान या नात्यानें त्यांचें कर्तव्य होतें. व तें त्यांनीं बजावण्याचा प्रयत्न केला; परंतु दँतन, लेब्रन, मोंगे वगैरे प्रधानांचें ह्या कामीं त्यास पाठबळ मिळेना ! दँतनला जरी लोकांचे हे अत्याचार पसंत नव्हते तरी जाहिरपणें त्याबद्दल निषेध व्यक्त करून आपली लोकप्रियता गमावण्यास तो तयार नव्हता. किंबहुना लोकांच्या ह्या अत्याचारावर पांघरूण घालण्याचीही त्याची खटपट चालू होती व उपरोक्त दुसरे दोघे प्रधान त्याच्या लौकिक वजनामुळें त्यास भीत होते. त्याला नाराज करून आपल्यावर नसतें संकट ओढून घेण्यास ते तयार नव्हते. तेव्हां सदरहू कत्तलीबद्दल सरकारतर्फे निषेध प्रकट करण्याचें काम एकट्या मॉं. रोलंदलाच करावें लागलें व त्यांनीं तें शक्य तितक्या सौम्य शब्दांनीं केलें. असले प्रकार चालू दिल्यास राज्यक्रांतीचें पावित्र्य नष्ट होऊन तिला हिडीस स्वरूप प्राप्त होईल असा त्यांनीं सर्व लोकांस स्पष्ट पण मर्यादशीर शब्दांनीं इषारा दिला. व असल्या प्रकारांची पुनरावृत्ती न होऊं देण्याकरितां उपाय योजण्याची त्यांनीं राष्ट्रीय सभेस विनंति केली. त्यांचें म्हणणें राष्ट्रीय सभेला पसंत पडलें व तिनें त्यांचा एतद्विषयक खलिता छापून जाहीर करण्याचीही व्यवस्था केली. पण पॅरिसच्या कम्यूनचें सामर्थ्य आतां इतकें वाढलें होतें कीं, त्याच्यापुढें राष्ट्रीय सभेचें तेज फिकें पडूं लागलें. यामुळें मॉं. रोलंद यांनीं सुचविलेल्या उपायांची तिला योजना करिता आली नाहीं ! कम्यूनला अडथळा करणें म्हणजे आपल्यावर आपल्या—जीवितावर—संकट ओढवून घेणें आहे अशा कल्पनेनें राष्ट्रीय सभेचे पुष्कळ सभासद गर्भगळित होऊन स्वस्थ बसले. यामुळें कम्यूनच्या लोकांनीं २।३ दिवसपर्यंत मनमुराद कत्तल करून अमानुषपणाचें प्रदर्शन केलें ! ही गोष्ट मॉं. व मॅडम रोलंद आणि त्यांचे स्नेही व कित्येक सहकारी त्यांना बिलकूल आवडली नाहीं. ती त्यांच्या मनास सारखी झोंबून राहिली. मॅडम रोलंदला तर त्याबद्दल अत्यंत तिटकारा उत्पन्न झाला. जुलमी राजाचा बळी घेऊन राज्यक्रांती

करण्यांत तिला पातक वाटत नव्हतें. परंतु निरपराधी व निःशस्त्र अशा लोकांची कत्तल करणें हें महापातक असून असल्या कृत्यानें लोकस्वातंत्र्याऐवजीं अराजकता मात्र माजेल असें तिचें मत होतें. ' लोकस्वातंत्र्याकरितां जुलमी राजसत्तेशीं सुरू होणारा झगडा मनुष्यजातीची उन्नति करण्यास कारणीभूत होत असल्यामुळें अत्यंत पवित्र मानला जातो; परंतु त्यास जर निरपराधी लोकांच्या रक्ताचा विटाळ झाला तर त्याचें पावित्र्य नष्ट होऊन त्यास हिडीस स्वरूप प्राप्त होतें आणि हा क्रम असाच चालू राहिल्यास खऱ्या लोकस्वातंत्र्याची प्राप्ती न होतां राजसत्तेहूनही भयंकर अशा जुलमाखालीं स्वातंत्र्याकांक्षी लोकांस आपली मान वांकवावी लागते, ' अशी मॅडम रोलंदची विचारसरणी असल्यामुळें पॅरिसच्या कम्यूननें केलेली कत्तल तेथील लोकांनीं निमूटपणें पाहिलेली पाहून तिचें मन अत्यंत उद्विग्न झालें व तिला भावी कालाविषयीं निराशा वाटूं लागली. यावेळीं, बॅंकाल नामक एका मित्रास तिनें जें पत्र लिहिलें त्यांत या विषयासंबंधानें पुढील उद्गार काढले आहेतः—" राजक्रांतीविषयींचा माझा उत्साह तुम्हास माहित आहेच. पण आतां मला तिची लाज वाटूं लागली आहे. ह्या हलकटांनीं तिला काळोखी आणली आहे. तिचें स्वरूप हिडीस बनलें आहे. " दुसऱ्या एका पत्रांत ती लिहिते—"रॉबिस्पियर व मारात यांच्या तरवारीच्या घाकाखालीं आम्हांस रहावें लागत आहे. जर पॅरिसबाहेरच्या प्रांतांतून राष्ट्रीयसभा व कौन्सिल यांचे रक्षणार्थ सैन्याची फलटण आली नाहीं तर ह्या दोहोंचीही सत्ता संपुष्टांत येण्याचा संभव आहे. बाह्यशत्रूच्या भयाचें निमित्त पुढें करून अत्याचारी लोकांचे पुढारी अत्याचारास उत्तेजन देणारे कायदे घडवून आणीत आहेत. दॅंतन हा सर्व सत्ताधीश बनला आहे. रॉबिस्पियर व मारात हे त्याचे हस्तक बनून आमच्याशीं शत्रुत्व करीत आहेत. ह्या लोकांनीं पॅरिसच्या कम्यूनच्या भयंकर कृत्यावर पांघरूण घालण्याचा यत्न चालविला आहे; इतकेंच नव्हे तर इतर प्रांतांत त्यांचें अनुकरण करण्याबद्दल गुप्तपणें हस्तपत्रकेंही पाठविलीं असल्याचें समजतें. " वगैरे.

पॅरिसच्या कम्यूनच्या अत्याचाराचा निषेध करणारा मॉ. रोलंदचा खलिता राष्ट्रीयसभेनें छापून जाहिरनाम्याप्रमाणें तो शहरांतील सर्व

प्रमुख भागांत भिंतीस चिकटविला; तेव्हां दँतन, मारात, रॉबिस्पियर वगैरे लोकांची त्यांजवर फार इतराजी झाली. मारातनें तर त्यांच्यावर व मॅडम रोलंदवर नानाप्रकारचे हिडीस आरोप करणारा जाहिरनामा शहरांतील प्रमुख जागीं लावला. तो पाहून मॅडम रोलंद आपल्या पतीस म्हणाली—" हें सर्व त्या दँतनचें कृत्य आहे. त्याच्याविषयीं मीं तुम्हास पूर्वींच बजावलें होतें. तुम्हां सर्वांचें अवसान जरी त्यानें जोखलें असलें तरी मी त्याच्या आहारीं जाणार नाहीं. आपल्या सरकारी कृतींशीं माझा संबंध जोडून मला जाहिर रीतीनें वादविवादांत ओढण्याचा व तशा रीतीनें आपला उपहास करण्याचा त्यानें जो घाट घातला आहे तो सिद्धीस जाईल असें जर त्यास वाटत असेल तर तो त्याचा भ्रम आहे. ह्या लोकांना माझ्या अंगच्या कांहीं गुणांची कल्पना असेल पण माझ्या मनोदेवतेची परीक्षा करणें त्यांना शक्य नाहीं. ते माझी हवी तितकी निंदा करोत; मीं त्याकडे लक्षही देणार नाहीं व त्याबद्दल संतापही करून घेणार नाहीं. त्यास उत्तर तर मुळींच देणार नाहीं. " मारातनें उपरोक्त जाहिरनाम्यांत मॅडम रोलंदवर जे निरर्गल आरोप केले होते त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून स्वस्थ बसणें हेंच तिच्या योग्यतेस व पदवीस अनुरूप होतें. मॅडम रोलंदला जरी या बाबतींत मौन धरणेंच श्रेयस्कर वाटलें तरी अधिकारी या नात्यानें आपणावर प्रतिपक्षानें विवक्षित प्रकारचे आरोप केले असतां त्यास उत्तर न दिल्यास लोकांत आपणासंबंधानें गैरसमज होऊन सद्यस्थितींत राज्यशकट हांकण्याचें काम अधिक बिकट होईल, अशी मॉ. रोलंदची समजूत असल्याकारणानें त्यांनीं मारातच्या जाहिरनाम्यास उत्तर म्हणून आपल्यातर्फे एक जाहिरनामा तारिख १३ सप्टेंबर रोजीं प्रसिद्ध केला. त्यांत त्यांनीं आपल्यावरील आरोपांचें खंडण करितांना असें लिहिलें कीं " आपल्या हेतुसंबंधानें जाणूनबुजून गैरसमज करण्यांत येत आहे. ता. १० आगष्ट रोजीं पॅरिसच्या कम्यूननें राजाची सत्ता झुगारून देऊन जी क्रांती केली तिचें मी अभिनंदन केलें व अद्यापही करितों. परंतु त्यासमयीं लोकांनीं अतिप्रसंग करून केलेल्या अत्याचाराचें समर्थन मला करतां येणें शक्य नाहीं. सप्टेंबर २ रोजीं व नंतर झालेल्या कत्तलीबद्दल खेद व निषेध प्रदर्शित करणें माझें कर्तव्य होतें व तें मी विचारपूर्वक

बजावलें. त्याबाबतींत मी घाईनें कांहीं तरी मत दिलेलें नसून सर्व बाजूंचा शांतपणें विचार करूनच तें दिलेलें आहे. ह्या कत्तलीस ज्यांनीं उत्तेजन दिलें त्यांच्या देशोद्धाराच्या कल्पना तरी चुकीच्या आहेत किंवा ते दुष्ट व क्रूर तरी आहेत असें मानल्यावांचून गत्यंतर नाहीं. राज्यक्रांती झाली तरी त्यांत शिस्त व कायदा यांस मान दिलाच पाहिजे अत्याचार करून अराजकता माजविणें व निष्कारण प्राणहानी करणें हें राज्यक्रांतीस व लोकस्वातंत्र्याच्या पवित्र कार्यास अपायकारक आहे. हें लक्षांत न घेतां जे लोक अशा कृत्यांस उत्तेजन देतात त्यांचें दमन करणें जरूर आहे. परंतु ही गोष्ट ज्यांस पसंत नाहीं तेच मजवर घाणेरडे आरोप करून, राष्ट्रीय सभेची बदनामी करून व प्रधानमंडळाच्या हेतूसंबंधानें विपर्यास करून लोकक्षोभाचा वन्ही चेतवीत आहेत. राष्ट्रीय सभेला नादान व प्रधानमंडळास विश्वासघातकी व देशद्रोही ठरविणें आणि सर्वत्र अविश्वास व अस्वस्थता उत्पन्न करून सर्व सत्ता आपल्या आवडत्या व्यक्तींच्या हातीं देऊन पुन्हा एकसूत्री अंमल गाजविणें हें ह्या लोकांचे हेतु असावेत असें त्यांच्या वर्तनावरून स्पष्ट दिसून येत आहे. ” वगैरे मॉं. रोलंदचा हा जाहिरनामा वाचून मारात फार चिडला व त्यानें त्याबद्दल त्यांचा सूड घेण्याचा मनांत निश्चय केला. असो; याच सुमारास ‘ नॅशनल कन्व्हेन्शन् ’ च्या निवडणुकीची धामधूम चालू असल्यामुळें पॅरिसच्या लोकांचें सर्व लक्ष तूर्त त्याकडे वेधलें. ह्या निवडणुकींत जिराँदिसपक्षातर्फे पॅरिसमध्यें फार थोडे उमेदवार निवडून आले. परंतु इतर प्रांतांतुन निवडून आलेल्या उमेदवारांत त्या पक्षाचेच लोक फार होते; त्यायोगानें या नव्या लोकसभेंत (नॅशनल कन्व्हेन्शन) त्याच पक्षाचें बहुमत होणारें होतें. हें पाहून मॅडम रोलंदला पुन्हा आशा वाटू लागली व तिचा उत्साह दुणावला. ह्या लोकसभेची बैठक तारिख २१ सप्टेंबर (स. १७९२) रोजीं सुरू झाली. प्रथमतः “ लोकसत्ताक राज्याची स्थापना” केल्याबद्दलचा ठराव सर्वानुमतें पास करण्यांत आला. त्यानंतर राजाची संस्था नष्ट करण्याचा व लोकांच्या मालमत्तेचें रक्षण करण्याचा असे दोन महत्वाचे ठरावही एकमतानें पास झाले. पुढें परकीय शत्रूपासून व अंतःस्थ शत्रूपासून लोकसत्ताक राज्याचें रक्षण करण्याचे कामीं अवश्यक

असणारे कायदे करण्यास सुरवात झाली. संशयितांवर देखरेख करण्याकरितां पूर्वीच्या राष्ट्रीय सभेनें नेमलेली 'सर्व्हेलन्स' कमेटी, तसेंच राजकीय गुन्हेगारांचा तडकाफडकी निकाल लावण्याकरितां नेमलेलें क्रांतिकारकांचें न्यायमंडळ (रेव्होल्युशनरी ट्रिब्युनल) हीं कायम करण्यांत येऊन शिवाय कमेटी ऑफ कॉरस्पांडन्स (पत्रव्यवहार करणारें मंडळ) व कमेटी ऑफ पब्लिकसेफ्टी (राष्ट्ररक्षण करणारें मंडळ) अशा आणखी दोन संस्था निर्माण करण्यांत आल्या. याप्रमाणें कन्व्हेन्शननें कामास सुरवात केलेली पाहून व त्यांत आपल्या पक्षाचें बहुमत आहेसें पाहून शिस्त व सुव्यवस्था राखण्यासंबंधानें मॉं. व मॅडम रोलंद यांना फिरून उमेद उत्पन्न झाली. तशांत, लाफेतीच्या जागीं गेलेल्या डुमरेझनें परकीय शत्रूंचा पराभव करून विजय मिळविल्याच्याही बातम्या येऊं लागल्यामुळें लोकांचीं मनें स्वस्थ होऊन प्रधानमंडळावर त्यांचा विश्वास बसूं लागला; तेव्हां तर त्यांना पुष्कळच समाधान वाटलें. परिस्थितीमध्यें जरी इतकी सुधारणा झाली असली तरी तेवढ्यानें त्यांचा मार्ग निष्कंटक होण्याजोगा नव्हता. दँतन, रॉबिस्पियर, मारात वगैरे त्यांचे शत्रू त्यांचा पाडाव करण्यास टपून बसलेले होते व वरील परिस्थितीमुळें सध्यां जरी त्यांचीं तोंडें बंद होतीं तरी त्यांना चावा घेण्याच्या प्रसंगाची ते अगदीं वाट पहात होते. दँनन यानें तर त्यांच्यासंबंधानें लोकसभेंत उघडपणें आपला विरोध प्रकट केला होता. सोमे प्रांतानें लोकसभेस निवडून दिलेल्या उमेदवारांत मॉं. रोलंदचा समावेश झालेला होता व तदनुसार त्या सभेचा सभासद होणें झाल्यास तत्कालीन कायद्याप्रमाणें त्यास प्रधानकीचा राजिनामा देणें जरूर होतें. तसें करण्याचा त्यांचा विचारही दिसत होता. तेव्हां त्यांना आपल्या अधिकारावर रहाण्याबद्दल आग्रह करण्यासंबंधाची वाटाघाट लोकसभेंत सुरू झाली असतांना दँतन उपरोधिक भाषेंत म्हणाला "रोलंदची योग्यता माझ्याइतका दुसरा कोणी जाणत असेल असें मला वाटत नाहीं. परंतु त्यांना अधिकारावर राहण्याची विनंति करण्यांत तुम्ही त्यांच्या बायकोलाही त्या जागेवर बोलावीत आहां, हें लक्षांत आणा. कारण मॉं. रोलंद हे तिच्या सल्लयाबांचून कांहींएक करीत नाहींत ही गोष्ट सर्व जगाला माहीत आहे." त्याच्या ह्या बोल-

ण्याकडे त्यावेळीं फारसें कोणी लक्ष दिलें नाहीं. शिवाय पुढें, मॉ. रोलंदच्या निवडणुकींत कायद्याच्या दृष्टीनें कांहीं व्यंग आढळून आल्यामुळें ते आपल्या अधिकारावरच राहिले. पण त्यामुळें दँतनचा व त्यांचा विरोध मात्र जास्त वाढला. तथापि तो अद्याप तीव्र झालेला नव्हता व परशत्रूंचा पाडाव करण्यांत प्रधानमंडळ यशस्वी झाल्यामुळें लोकमतही त्यांच्याविरुद्ध जाण्यास तयार नव्हतें. सप्टेंबर अखेरीस फ्रेंच सैन्यानें प्रशियन्स व ऑस्ट्रियन्स यांना फ्रेंच सरहद्दीवरून खूप मागें हटविलें व त्यांच्या स्वारीचें भय तूर्त तरी दूर केलें. प्रधानमंडळानें व लोकसभेनें आतां आपलें लक्ष अंतःस्थ राज्यकारभाराची घडी बसविण्याकडे लावलें. मॉ. व मॅडम रोलंदच्या घरीं जिरॉंदिस पक्षाचे पुढारी व त्यांचे कांहीं सहकारी पुन्हा राजकारणाची चर्चा करण्याकरितां आठवड्यांतून दोनदां जमूं लागले. जिरॉंदिस पक्षानें लोकसभेंत घडवून आणावयाच्या गोष्टींचा खल व कार्यक्रम ह्या ठिकाणीं अगोदर ठरत असे. व्हर्ग्निऑद बुझो, ब्रिझो, कोथन, लँथेनस, सर्व्हन, बँकॉल, गॉदेत, क्लेव्हेरे, जेनसोने, लॅक्रोई, रॅब्यू, चँपेल्यु, पेतिऑ, ब्युपरेत, लोव्हे, फौके, वगैरे प्रख्यात जिरॉंदिस पुढारी या ठिकाणीं जमून मॅडम रोलंदशीं मोकळ्या मनानें तत्कालीन परिस्थितीची वाटाघाट करीत व तिच्या धैर्यप्रचूर सूचनांचा उपयोग करून घेत असत.

मॉ. रोलंद यानीं, चेपॅल्यु, लँथेनस व पॅचे ह्या आपल्या विश्वासुक स्नेह्यांस आपल्या हाताखालच्या महत्त्वाच्या जागेवर नेमलें होतें. त्यांपैकीं पॅचे यास युद्धमंत्री सर्व्हन यानें मागितल्यावरून त्यास त्याच्या मुख्य चिटणीसाच्या जागेवर नेमण्यांत आलें व पुढें युद्धमंत्र्याच्या जागेवरही त्याची नेमणूक झाली. परंतु हा मनुष्य गुप्तपणें रोलंदच्या शत्रूंस सामिल झाला. तो युद्धमंत्री होण्यापूर्वीच त्यांस जाऊन मिळाला होता; पण मॉ. व मॅडम रोलंद यांस बराच कालपर्यंत त्याच्या बेइमानीपणाचा संशय आला नाहीं व जेव्हां तो आला तेव्हां त्यास शिक्षा करणें त्यांना शक्य नव्हतें. कारण युद्ध खात्यांत व लष्करांत त्यानें दँतनचीं माणसें भरून दँतनचा पक्ष बलीष्ठ करून ठेवला होता. दँतन हा स्वतः न्यायमंत्री असल्यामुळें प्रधानमंडळांत व राजमंडळांतही त्याचा समावेष झालेला होता

व पॅरिसच्या कम्यूनचें त्यास पाठबळ असल्यामुळें लोक सभेंत व अधिकारीमंडळांतही त्याचा दरारा बसलेला होता. मॉ. रोलंदखेरीज इतर प्रधानांसही त्याची दहशत वाटत असे. 'त्याचें न ऐकल्यास तो कम्यूनच्या लोकांस चिथावून आपला प्राणघात करील' असें एकदां आरमार खात्याच्या प्रधानानें खुद्द मॉ. रोलंदजवळ बोलून दाखविलें! याप्रमाणें मॉ. व मॅडम रोलंद यांचा व त्यांच्या पक्षाचा पाडाव करण्याची तयारी दँतन व रॉबिस्पियर यांनीं चालविली होती. पॅरिसच्या कम्यूनमध्यें जॅकोबिन पक्षाचेच बहुतेक लोक होते व स्वातंत्र्याच्या नांवाखालीं ते सामान्य जनतेस अघोर कृत्यें करण्यास उत्तेजन देत होते. राज्यक्रांतीच्या कालांत, दीर्घ काल जुलमानें गांजलेली सामान्य जनता नेहमीं उच्छृंखल व बेहोष बनून जुलमाचा नायनाट करण्याच्या निमित्तानें अतिप्रसंग करिते. अशा वेळीं देशांतील समंजस लोकांनीं त्यांच्या उच्छृंखलपणास आळा घालणें जरूर असतें. परंतु स्वार्थी, अहंमन्य व आत्मप्रौढी वाढविण्यास उत्सुक असलेले अनेक लोक अशा वेळीं देशाभिमानाचा आविर्भाव आणून या लोकांचे स्वयंनिर्मित पुढारी होतात आणि त्यांच्या बेहोषपणाचें कौतुक करून आपलें महत्व वाढवीत असतात. अशा प्रकारचे लोक बहुदा सर्वकाळीं व सर्व देशांत असतात. परंतु जोंपर्यंत त्यांची संख्या थोडी असते व त्यांना दाबांत ठेवणाऱ्या कर्तृत्ववान आणि विचारी लोकांची संख्या जास्त असते तोंपर्यंत त्यांच्या बागणुकीनें देशांचें फारसें नुकसान होत नाहीं. पण जेव्हां त्याच्या उलट स्थिती होते म्हणजे जेव्हां स्वार्थलंपट लोकांचाच अशावेळीं देशांत फाजील सुळसुळाट होतो तेव्हां तेथील राजक्रांती पासून फायद्यापेक्षां तोटाच अधिक होतो. दुर्दैवानें फ्रान्सची स्थिती सध्यां अशीच होती व त्याचे भयंकर परिणाम पुढें त्यास भोगावे लागलेच, जिरॉंदिस लोक खरोखर मोठ्या नेकीचे, खरे देशाभिमानी व लोक स्वातंत्र्याकरितां जिवापाड मेहनत व स्वार्थत्याग करणारे असूनही केवळ मत्सर व द्वेष या भावनांच्या अधीन होऊन ज्या जॅकोबिन्स पुढाऱ्यांनीं पॅरिसच्या जनतेच्या मनांत त्यांच्या विषयीं भलताच ग्रह उत्पन्न करून तिच्या कोपाग्नींत त्यांच्या प्राणांच्या आहुति दिल्या तेच पुढें स्वतःही एकामागून एक आपण पेटविलेल्या याच होमकुंडात बळी पडले! आपल्या प्रतिपक्षांचा बळी घेण्याकरितां

लोकांच्या दुष्ट मनोवृत्ती जागृत करून कायदा व शिस्त यांस धाब्यांवर बसविण्याचें जें उदाहरण त्यांनीं लोकांस घालून दिलें तेंच अखेरीस त्यांच्याही नाशास कारण झालें ! या लोकांच्या वर्तनामुळें फ्रान्सांतील एका पिढीचे बहुतेक कर्ते सवर्ते लोक निष्कारण प्राणास मुकले व त्यामुळें पुढें तें राष्ट्र पोरकें होऊन लवकरच त्यास नेपोलियनच्या दंडुक्याखालीं मान वांकवावी लागली व लोकस्वातंत्र्यांकरितां जी राजक्रांती सुरू झाली तिचें अखेर पर्यवसान साम्राज्य स्थापनेंत--म्हणजे एकतंत्री अंमलांत झालें !! फ्रान्सच्या या इतिहासापासून भावी कालांतील लोकस्वातंत्र्याची चळवळ करणाऱ्या समाजास पुष्कळ बोध घेतां येण्यासारखा आहे. समता लोकस्वातंत्र्य यांच्या खऱ्या मर्यादा कोणत्या व त्याच्या बाहेर गेल्यास त्यापासून कसें अनिष्ट परिणाम होतात हें ह्या इतिहासावरून विचारी व समंजस लोकांच्या चांगलें लक्षांत येईल. असो; दँतनच्या शिरजोरपणामुळें मॉं. रोलंदचें व त्याचे वारंवर खटके उडूं लागले व शिस्त आणि व्यवस्था राखण्याबद्दल मॉं. रोलंदनीं योजलेले उपाय निष्फळ होऊं लागले. त्यांनीं सोडलेल्या हुकमांची अंमलबजावणी व्हावी तशी होईना व तीं करण्याबद्दल यांनीं आग्रह धरला कीं, दँतनच्या पक्षानें, ' हे राजपक्षास सामिल अहेत ' असा त्यांचेवर व त्यांच्या पक्षाचे लोकांवर आरोप करून त्यांच्याविषयीं पॅरिसच्या जनतेचीं मनें कलुषित करण्याचा प्रयत्न करावा, असा प्रकार सुरू झाला !! आक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांत लोकसभेपुढें राजाची चौकशी चालू होती व ही चौकशी चालू असतांना दंगा, धोपा अथवा अत्याचार न होऊं देण्याबद्दल मागिल अनुभवावरून कडक बंदोबस्त ठेवण्याची मॉं. रोलंद यांस जरूर भासत होती. राज्यक्रांतींतील अत्यंत महत्वाचा व अत्यंत नाजुक असा हा प्रसंग असल्यामुळें त्या वेळीं लोकांच्या मनोवृत्ती भडकल्यास त्यांचे हातून बेहोषपणाचें अथवा बेकायदेशीर कृत्य न होऊं देण्याबद्दल दक्षता बाळगणें हें जबाबदार अधिकाऱ्यांचें कर्तव्य होतें. निस्पृह, सरलमार्गी आणि नेहमीं सद्सद्विवेक बुद्धीस अनुसरून चालणारे मॉं. रोलंद हे प्रामाणिकपणें तें कर्तव्य बजावीत असतां त्यांच्या संबंधानें वरील प्रकारचा गैरसमज उत्पन्न करण्याचा जॅकोबिन पक्षाच्या लोकांनीं जणूंका

विडाच उचलला होता असें दिसून येतें ! या पक्षाचे लोक जिराँदिस पक्षावर अशा प्रकारचे आरोप लोकसभेंत उघडपणें करूं लागले होते. त्यांचीं तोंडें बंद करण्याकरितां जिराँदिस पक्षाचा पुढारी बुझो यानें स्वतःच लोकसभेंत, " राजाची संस्था पुन्हा स्थापन करण्याचा प्रयत्न करणारास देहांत शासन मिळावें; राजाची सत्ताच काय पण लोकसत्तेशिवाय दुसरी कसलीही सत्ता स्थापन करूं पहाणारासही तेंच शासन मिळावें " अशा आशयाचा ठराव पुढें आणला व तो सर्वानुमतें मंजूर झाला. आपल्या पक्षासंबंधानें प्रतिपक्षियांनीं माजविलेला गैरसमज दूर करण्याच्या भरांत बुझोनें हा जो ठराव पास करून घेतला त्यांनें त्याचा हेतु सफळ न होतां उलट ' पिशाचाचे हातीं कोलीत ' ह्या म्हणीनुसार प्रथम जिराँदिस व नंतर जॅकोबिन्स पुढाऱ्यांचा नाश करण्यास मात्र पॅरिसच्या जनतेच्या हातीं पुढें तें एक खासें साधन होऊन बसलें ! तो मंजूर करणें जितकें सोपें गेलें तितकें पुढें त्याचा दुरुपयोग होतोसें पाहून त्यांत सुधारणा करणें मात्र सोपें नव्हतें. यामुळें त्याकामीं पुढें कोणासही यश आलें नाहीं. व पॅरिसच्या कम्यूननें गुंड व बंडखोर लोकांच्या साह्यानें लोकसभेस नेहमीं आपल्या कह्यांत किंबहुना धाकांत ठेऊन त्या ठरावाच्या अर्थाची शक्य तितकी ओढाताण करून तिजकडून त्याचा अत्यंत कठोरपणानें अंमल करविला. तो कसा याची हृदयद्रावक कहाणी पुढील प्रकरणांसून येणारच आहे.

प्रकरण ८ वें.

मॉं. रोलंदच्या कारकिर्दीचा शेवट.

मागिल प्रकरणांत कळविल्याप्रमाणें बुझोनें स्वपक्षाच्या हेतूसंबंधानें लोकांच्या मनांत किल्मिष राहूं नये म्हणून जो ठराव लोकसभेंत पास करून घेतला त्यानें त्याचा कार्यभाग झाला नाहीं; कारण जॅकोबिन पक्षाच्या पुढाऱ्यांनीं ' जिराँदिस लोकांचें हें सर्व ढोंग आहे ' असा

बाहणा केला व आपल्या अनुयायांची तशी खात्री करून देण्याचा उद्योग त्यांनीं सुरू केला. बुझोचा उपरिनिर्दिष्ट ठराव पास होऊन दोन दिवस झाले नाहींत तोंच तारिख ७ डिसेंबर रोजीं व्हिअर्द नांवाच्या घाडसी मनुष्यानें दिलेल्या बातमीच्या आधारावर लोकसभेंतील चॅवो नामक जॅकोबिन पक्षाभिमानी सभासदानें, जिरॉंदिस पक्षाच्या पुढाऱ्यांवर आणि मुख्यतः मॅडम रोलदवर, " राजाचें जीवित राक्षण्याकारितां लंडन येथें पळून गेलेल्या देशद्रोही फ्रेंच लोकांशीं संगनमत करून लोकसभेस धाक घालण्याकारितां नेमस्त राजकीय मताचे दहा हजार लोक पॅरिमतध्यें आणण्याचा गुप्त कट केला," असा उघड आरोप करून त्यावद्दल चौकशी करण्याची मागणी केली. हा आरोप धडधडीत खोटा होता व केवळ वर वर पाहाणारांसही तसें दिसत होतें. परंतु पक्षाभिमान, असूया व स्वार्थ साधुपणा ह्या गोष्टींचा पॅरिसच्या लोकांवर व विशेषतः जकोबिन पक्षाच्या पुढाऱ्यांवर या कालीं अतिशय पगडा बसलेला असल्यामुळें कोणिकडून तरी प्रतिपक्षाचा पाडाव करण्यास ते अगदीं उत्सुक झाले होते व त्याप्रीत्यर्थ यःकश्चित काडीचाही आधार सांपडल्यास त्याचा उपयोग करण्यास ते एका पायावर उभे असत, अर्थात व्हिअर्दनें दिलेल्या उपरोक्त बातमीच्या खरेखोटेपणाविषयीं विशेष विचार न करितां त्यांनीं मॉं. व मॅडम रोलंद यांची सद्दर आरोपावरून चौकशी करण्याची मागणी करावी हें अगदीं साहजिक आहे. त्यांच्या मागणीप्रमाणें लोकसभेनें मॉं. व मॅडम रोलंद यांस आपल्या न्यायासनासमोर जाब देण्यास बोलाविलें. त्या वेळीं मॅडम रोलंदनें व्हिअर्दची उलट सुलट तपासणी करतांना त्याची फटफजिती उडवून दिली व आपल्यावरील आरोपांचें निराकरण इतक्या उत्कृष्ट रीतीनें केलें, कीं लोकसभेंतील सर्व सभासदांनीं सन्मानपूर्वक तिचें अभिनंदन व गौरव करून तिला व तिच्या पक्षास सदर आरोपांतून दोषमुक्त केलें ! लोकसभेच्या सभासदांनीं जरी याप्रमाणें तिचा गौरव केला तरी गॅलरींतील (सज्जांतील) प्रेक्षकसमूहानें मात्र पूर्णपणें मौन स्वीकारलें होतें (कारण त्यांत जॅकोबिन पक्षाचे आततायी लोकच मुख्यत्वेंकरून भरलेले होते) तें पाहून मारात, आपल्या एका स्नेहाजवळ म्हणाला. ' पहा ते लोक कसे स्तब्ध आहेत. ते आपल्यापेक्षां खाचित शहाणे

आहेत.' त्याच्या ह्या उद्गारांवरून लोकसभेंत घडलेला प्रकार जॅकोबिन पक्षाचे सूत्रधार व अनुयायी यांस पसंत पडला नाहीं हें उघड दिसतें. लोकसभेंत त्यांचें हेत सफळ झाले नाहींतसें पाहून हे लोक फारच चिडले व त्यांनीं वर्तमानपत्रांतून आपल्या प्रतिपक्षावरगहला करून त्यांच्या संबंधानें जनतेचीं मनें पूर्णपणें कलुषित करून टाकण्याचा प्रयत्न अधिक नेटानें चालविला. ह्या सुमारास ध्युमरीझ यानें जकोबिन्स व जिरॉंदिस पक्षांत समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला व दँतनच्याहि मनांतून जमल्यास हा समेट घडवून आणावा असा विचार होता; परंतु त्याच्या ह्यावेळपर्यंतच्या वागणुकीवरून त्याच्यावर विश्वास ठेवणें जिरॉंदिस पुढाऱ्यांना शक्य वाटलें नाहीं त्यामुळें हा समेटाचा प्रयत्न फुकट गेला. समेट होणें शक्य नाहीं असें दिसून येतांच दँतन व तत्पक्षीय लोक यांनीं जिरॉं-दिस पक्षांचा पाडाव करून त्या पक्षांतील पुढाऱ्यांचा सूड घेण्याचा निश्चय केला व ते त्या उद्योगास लागले. लेख व व्याख्यानें यांच्याद्वारां त्यांनीं जिरांदिस पक्षाच्या पुढाऱ्यांवर आग पाखडून त्याबद्दल लोकांच्या मनांत द्वेष व तिरस्कार उत्पन्न करण्याचा प्रयत्न अव्याहत चालू ठेवला. सामान्य जनतेची सारासार विचारशक्ती नेहमींच बेताची असल्यामुळें असले प्रयत्न सतत चालू राहिल्यास ते बहुधा यशस्वी होतात असा इतिहासाचा अनुभव आहे व तोच या वेळींहि खरा ठरला ! या वेळीं राजाची चैकशी चालू होती म्हणून मागें सांगितलेंच आहे. जॅकोबिन्स लोकांच्या मनांतून राजाला देहांत शासन द्यावें, असें होतें. परतु जिरॉंदेस पक्षाच्या कांहीं (सर्व नव्हे) लोकांस हा अघोर उपाय पसंत नव्हता. राजाची सर्व सत्ता नष्ट झालेली असल्यामुळें दांत पाडलेल्या नागाप्रमाणें त्याची स्थिती होती, अर्थांत आतां त्याचा वध करण्यापासून लोकपक्षास विशेष कांहीं फायदा होण्याजोगा नव्हता. उलट त्यास पक्क्या बंदोबस्तानें कैदेंत ठेवल्यास तें कृत्य त्या परिस्थितींत विशेष श्रेयस्कर होतें. कारण त्यामुळें परराष्ट्रांतील राजांचा कोप अनिवार होण्याचा संभव टळण्याजोगा होता. राज्यक्रांतीसारख्या नाजुक परिस्थितींत वरील दोन भिन्न मतांपैकीं कोणाचें मत अधिक श्रेयस्कर व राष्ट्रहितकारक होतें याचा निर्णय करणें कठिण आहे. तथापि या बाबतींत प्रामाणिक मतभेदास जागा आहे ही गोष्ट जॅकोबिन्स पक्षाच्या

पुढाऱ्यांनी लक्षांत आणली नाहीं अथवा प्रतिपक्षाचा सूड उगविण्यास्तव त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केलें असें त्यांच्या वर्तनावरून म्हणणें भाग पडतें. निदान याबाबीसंबंधानें तरी त्यांनीं आपल्या प्रतिपक्षाच्या हेतूसंबंधानें –आणि तेंही त्यांतील कांहीं थोड्या लोकांच्या समजुतीवरून–विपर्यास व गैरसमज करावयास नको होता. परंतु पक्षाभिमानजन्य चुरशीच्या भरांत त्यांना ह्या गोष्टींचें भान राहिलें नाहीं ! त्यांच्या ह्या विपरीत वर्तनामुळें जिरॉंदिस पुढाऱ्यांसंबंधानें सामान्य जनतेचा भलताच ग्रह झाला, हे लोक लोकसत्तेच्या विरुद्ध आहेत असें त्यास वाटूं लागलें. अर्थात राजाप्रमाणें त्यांचाही नायनाट करण्याची भावना त्यांचे ठिकाणीं उद्भवली व जॅकोबिन्स पुढाऱ्यांनीं ती जास्तच प्रदिप्त केली यामुळें जिरॉंदिस पुढाऱ्यांना आपल्या जीविताचाही भरंवसा न वाटण्यासारखी स्थिती उत्पन्न झाली. दिसेंबर अखेरीस लोकसभेच्या न्यायासनासमोर राजातर्फे बचावाचें काम चालू असतांना तर फार धोक्याची स्थिती उत्पन्न झाली होती, असें मॅडम रोलंदच्या एका पत्रांतील पुढील सारांशावरून दिसून येईल.

" उद्यां काय होईल तें सांगता येत नाहीं. कित्येक लोकांना आजच्या दिवसाचाही शेवट पाहावयास मिळेल कीं नाहीं कोण जाणें ! लुईची कत्तल करण्याचे बेत चालले असून त्या संधीस कित्येक लोकसभेचे सभासद व मुख्य प्रधान यांचाही समाचार घेतला जाईल असा रंग दिसतो. मी आपली सर्व तयारी केली असून शांतपणें त्या प्रसंगाची वाट पहात आहें. मृत्युचें मला मुळींच भय वाटेनासें झालें आहे. माझा खून करण्यास्तव जर कोणी लोक येतील तर मी त्यांस निर्भयपणें भेटेन. त्यांच्या कृत्याविषयीं धैर्यानें व शांतपणानें तिरस्कार व्यक्त करून त्याविषयीं बेफिकिर राहिल्यासच कदाचित ते त्यापासून परावृत्त होतील. " हें पत्र तिनें युद्धमंत्री सर्व्हन यास लिहिलेलें असून तें त्यांस तिचें अखेरचें पत्र असल्याप्रमाणें लिहिलेलें आहे. त्यांत तिनें आपली स्मृति म्हणून त्यास आपलें एक छायाचित्र पाठविलें असून आपले पति व मुलगी यांचें संरक्षण करण्याबद्दल विनंती केली आहे. या पत्रावरून मॉं. व मॅडम रोलंद व त्यांच्या पक्षाचे पुढारी हे किती धोक्याचे स्थितींत होते

याची वाचकांस चांगली कल्पना करितां येईल. दिसेंबरच्या २५।२६ तारखेच्या सुमारास उपरिनिर्दिष्ट कत्तलीचा प्रसंग उद्भवेल अशी मॅडम रोलंदची समजूत होती. परंतु तसें घडून आलें नाहीं. राजाची चौकशी पुरी झाल्यावर त्यास बहुतेक सर्वानुमतें देहांतशासन करण्याचा ठराव झाल्यामुळें बहुधा तो प्रसंग टळला असावा एकंदरींत इ. सनाचें १७९२ वें वर्ष कसें तरी जिरॉंदिस पक्षाची विशेष हानी न होता पार पडलें.

सोळाव्या लुईस झालेली देहांत शिक्षा तारीख २१ जानेवारी सन १७९३ रोजीं अंमलांत आली व त्याच्या मागून त्याच्या राणीचीही तीच अवस्था झाली. लोकक्षोभ शमविण्याकरितां जिरॉंदिस पक्षाच्या कित्येक लोकांनीं जरी राजाच्या देहांतशासनास अनुमति दिली तरी त्यामुळें जनतेचें समाधान न होता उलट ह्या लोकांच्या पदरीं भित्रेपणा मात्र आला ! त्यांची ही वृत्ती पाहून त्यांचे प्रतिपक्षि त्यास जास्तच चेपूं लागले. राजाच्या चौकशीपासून तों त्याचा वधापर्यंत जो काळ गेला त्यांत जनतेकडून अत्याचाराचें वर्तन न होऊं देण्याबद्दल मुख्य प्रधान या नात्यानें मॉं. रोलंद यास जो कडक बंदोबस्त ठेवावा लागला त्याबद्दल त्यांच्या हेतूचा विपर्यास करुन लोकांनीं त्यास व त्यांच्या पत्नीस छळण्याचा निश्चय केला होता. दँतन, रॉबिस्पियर, वगैरे जॅकोबिन पक्षाचे पुढारी ह्या कामांत अग्रणी होते. सरकारी कामांतही दँतन हा मॉं. रोलंद यास जेथें तेथें अडवूं लागला होता व त्याच्या भयानें त्यांचे इतर सहकारीही त्याच्याच बाजुनें जाऊं लागले—मतें देऊं लागले—होते. यामुळें त्याना आपले मंत्रीपदाचे कामही नीट करितां येईना. याप्रमाणें त्याना मंत्रिमंडळांत राहणें जेणें करुन अवश्य होईल असे दँतनचे प्रयत्न चालु असतां सामान्य जनतेकडून त्यांचा उच्छेद करण्याचे गुप्त व उघड प्रयत्न जेकोबिन्स पक्षाचे अन्य पुढारी करीत होते. कित्येक लोक त्यांचा खून करण्यासही उत्तेजन देत होते. हा स्थिती पाहून त्यांच्या कियेक मित्रांनीं त्यास व मॅडम रोलंदला रात्रीं आपला रांहातावाडा सोडून दुसऱ्या सुरक्षित स्थळीं निजावयास जाण्याची विनंती केली. एक दोन वेळ आपल्या मित्राची ही विनंती त्या उभयतांनीं ऐकली परंतु पुढें मॅडम

रोलंदनें तसें करण्याचें नाकारलें. ती म्हणाली– " आपल्या प्राणाबद्दल इतकी भिती बाळगणें योग्य नाहीं. प्राण वाचविण्या करितां मुख्य प्रधानानें आपली सरकारी उर्फ सार्वजनिक राहती जागा सोडून जाणें इष्ट नाहीं. त्यांचा खून होणारच असेल तर तो अशा ठिकाणींच झालेला अधिक बरा. कारण त्यामुळें लोकांचे मनावर विशेष परिणाम होऊन प्राणाचीही परवा न करितां आपलें कर्तव्य करित असलेल्या प्रधानाचा खूनकरणारा तिरस्कारास पात्र होऊन ते त्याबद्दल सूड उगवतील. उलट नित्य स्थानत्याग करण्याचा मार्ग स्विकारला आणि जातांना किंवा येतांना वाटेंत त्याचा खून झाला तर त्यांचा नामास व लौकिकास नसता बट्टा लागेल. ज्यांना ह्या जगांत प्राण हेंच सर्वस्व वाटत असेल त्यांना माझें हें म्हणणें मुर्खपणाचें वाटेल, हें मी जाणून आहे. परंतु राजक्रांतींच्या काळीं जो प्राणाचीच केवळ किंमत बाळगितो त्याला सद्गुण, सन्मान व स्वदेश यांची चाड बाळगितां येणार नाहीं. " याप्रमाणें तिचे विचार असल्यामुळें तिनें आपला राहता वाडा सोडून अन्यत्र निजावयास जाण्याचें जरी नाकारलें तरी ती गाफील अगर बेसावध राहली नाहीं. ती स्वतः मॉ. रॉलंद यांच्या खोलींत उशाला पिस्तुल घेऊन निजत असे. तथापि तिच्या मित्रांनीं तिला तें स्थान सोडण्याचा सारखा आग्रह चालविला होता. व एके दिवशीं तर एकानें तिला वेषांतर करून बाहेर पडतां यावें म्हणून एक प्रकारचा पोषाखही आणून तिला चलण्याबद्दल विशेषच आग्रह केला. तेव्हां नाइलाज म्हणून त्याच्या मिडेस्तव तिनें तसें करण्याचें कबूल केलें व तो पोषाख ठेवून घेतला. परंतु तो अंगावर घालण्याची जेव्हा वेळ आली तेव्हां तिच्या स्वाभाविक मनोवृत्तींनें फिरून उचल खाल्ली व तिनें तो पोषाख हातांतून फेकून दिला आणि जवळच असलेल्या आपल्या विश्वासुक दासीजवळ तिनें पुढील आशयाचे उद्गार काढले—

" मी हें–असें–करावें अशी त्यांची (मित्रांची) जरी इच्छा असली तरी मला त्याबद्दल लाज वाटते. मी वेषही बदलणार नाहीं व हें घरही सोडणार नाहीं. जर माझा खून व्हावयाचा असेल तर तो या घरांतच होऊं दे. मी अशा प्रकारच्या निग्रहीं बाण्याचें उदाहरण घालून देणें ज-

रूर आहे व तसें मी करणारच. " मॅडम रोलंदचा हा करारी बाणा मॉ. रोलंद यांसही पसंत होता. ते स्वतःही सर्वस्वी प्रतिकूल होत चाललेल्या परिस्थितींत मोठ्या धैर्यानें आपल्या मंत्रिपदास चिकटून राहिले होते. परंतु दँतनच्या कारस्थानामुळें दिवसांनुदिवस त्याचा मार्ग फारच बिकट होत चालला होता. कौन्सील ऊर्फ राजमंडळांतील बहुमत दँतनच्या बाजूस होतें व मॉ. रोलंदची हरएक योजना म्हणून पाडण्याचा उपक्रम दँतनें सुरू केला होता. व पुढें पुढें तर त्यांना आपलें स्वतंत्र मत कारणासह राजमंडळाच्या दप्तरीं नोंदून ठेवण्यासही प्रतिबंध होऊं लागला. त्या वेळीं मात्र त्यांना राजिनाम्यावाचून गत्यंतर नसल्यामुळें त्यांनीं ता० २२ जानेवारीस आपल्या मंत्रिपदाचा राजिनामा दिला ! ह्या राजिनाम्याचा मसुदा मॅडम रोलंदच्याच हातचा होता. त्यांतील मजकूर गंभीर व नेमस्त भाषेंत लिहिला होता. मॉ. रोलंदवर येणाऱ्या आरोपांचें त्यांत निरसन केलेलें असून लोकांत त्यांचे संबंधानें कसे वृथा गैरसमज उत्पन्न केले गेले हे मुद्देसूदरीतीनें दाखवून दिलें होतें. "आपल्या सद्धेतुंचा प्रतिपक्षाकडून जरी विपर्यास होत होता तरी जोंपर्यंत आपल्या हातून प्रामाणिकपणें देशहित होण्याचा संभव होता तोंपर्यंतच आपण राजिनामा दिला नाहीं परंतु देशविघातक गोष्टी मात्र आपल्या सदसद्विवेक बुद्धीस बाजूस ठेऊन करण्याचें जेव्हां नशिबीं येतें तेव्हां प्रामाणिक मनुष्यास अधिकार सोडण्यावांचून गत्यंतर नसतें. माझ्या कारकिर्दींत या वेळीं हा प्रसंग मजवर आलेला आहे. माझ्या संबंधानें सामान्य जनतेंतच नव्हे तर लोकसभेंतही गैरसमज उत्पन्न करण्यांत आलेले आहेत. हा सर्व प्रकार अन्यायाचा आहे. बेशिस्त व गैर कृत्यांबद्दल निषेध प्रगट करणें हें दुष्ट मनोविकाराचें लक्षण मानण्यांत येत आहे व माझ्या कार्यबाहुल्यास सत्ताभिलाषाचें रूप देण्यांत येत आहे. परंतु माझे हेतू किती शुद्ध आहेत हें परमेश्वरास ठाऊक आहे. तोच माझ्या कृतींचा साक्षी आहे. भावी पिढ्या त्यासंबंधानें योग्य तो निर्णय करतील. कांहीं कालानें सध्याच्या पिढीचीही माझ्या प्रामाणिकपणाबद्दल आणि देशभक्तीबद्दल खात्री होईल व ज्या उदात्त भावनेमुळें मी दोनदां मंत्रिपद स्वीकारलें तीच भावना माझ्या प्रस्तुत अधिकारत्यागास कारण आहे हेंही त्यांच्या लक्षांत येईल." वगैरे मजकूर ह्या राजिनाम्यांत होता.

ह्या राजिनाम्यासंबंधानें लोकसभेंत जेव्हां वादविवाद सुरू झाला तेव्हां जिरॉंदिस पक्षाची सरशी होऊन बहुमतानें, त्याबद्दल सहानुभुती व्यक्त करून त्याच्या छापील प्रती फ्रान्सांतील सर्व परगण्यांत वांटण्याचा ठराव पास झाला. तथापि ह्या ठरावास विरोधही कांहीं कमी नव्हता. हा ठराव पास झाल्यामुळें लोकसभेंत अद्याप जिरॉंदिस पक्षाचे बहुमत डळमळीत असून कमजोर होतें. मॉं. रोलंद हे अतिशय प्रामाणिक, सत्यप्रिय व सद्सद्विवेकबुद्धीस क्षणभरही न सोडणारे असे असल्यामुळें त्यांचा कारभार चोख व न्यायनिष्ठुर असे. शिस्त व कायदा यांची अवहेलना करणें त्यास खपत नसे. सुव्यवस्था हेंच खऱ्या लोकस्वातंत्र्याचें लक्षण आहे असें त्यांचें मत होतें, यामुळें त्या वेळच्या कित्येक अत्याचाराबद्दल त्यांनीं तीव्र निषेध स्पष्टपणें प्रकट केलेला आहे. मॅडम रोलंदचीही प्रवृत्ती जवळ जवळ अशीच होती; परंतु त्यांचे सर्वच अनुयायी अशा बाण्याचे नव्हते. व असणें शक्यही नाहीं. सामान्यतः पुष्कळसे लोक परिस्थिती पुढें मान वांकवून स्वमताविरुद्ध—वेळ पडेल तसें—वर्तन करणारेच असतात. कसलाही प्रसंग आला तरी सद्सद्विवेकबुद्धीस अनुसरून स्वमतास चिकटून राहण्याचें धैर्य फार थोड्यांच्या अंगीं असतें. कारण तो मार्ग बहुत कष्टतर व संकटग्रस्त असतो. जिरॉंदिस पक्षाचे लोक या नियमास अपवाद नव्हते. मॉं. व मॅडम रोलंद यांच्याबद्दल त्यांना फार कळकळ व सहानुभुति वाटत होती, तसेंच त्यांचें सार्वजनिक वर्तनही त्यांस पूर्णपणें पसंत होतें व त्यांच्या धारिष्टाबद्दल योग्य तो आदरही त्यांच्या ठायीं वसत होता. परंतु मागें वर्णिलेल्या विपरीत (लोकक्षोभजन्य) परिस्थितींत त्यांच्या प्रत्येक कृतीचें उघडपणें लोकसभेंत समर्थन करण्याचें धाडस करून स्वतःवर तत्काल संकट ओढवून घेण्यास ते तयार नव्हते. हा त्यांचा भित्रेपणाच पुढें त्यांच्या नाशास कारण झाला हें खरें; परंतु त्यांचें हें वर्तन सामान्य मनुष्यस्वभावास अनुसरूनच होतें. मात्र ते ज्या उदात्त कार्यांत पडले होते त्या कार्याचा विचार करितां तें अगदीं अक्षम्य होतें यांत शंका नाहीं. आणि या स्थितीमुळेंच मॉं. रोलंदला वरीलप्रमाणें राजिनामा द्यावा लागला. यासंबंधानें मॅडम रोलंदच्या एका इंग्रजी चरित्रकारानें पुढील उद्गार काढले आहेतः—

आहेत व त्यासंबंधानें त्यांनीं मला कांहीं एक कळविलेलें नांहीं, यापेक्षां मला जास्त कांहीं सांगावयाचें नाहीं, " असें मॅडम रोलंदनें उत्तर दिलें. नंतर आलेले लोक तिच्या घरावर पहारा ठेऊन निघून गेले. ते गेल्यानंतर मॅडम रोलंदनें थोडेंसें अन्नग्रहण केलें व ती झोंपी गेली. पूर्व रात्रीच्या श्रमसायासामुळें तिला पडतांक्षणीं गाढ झोंप लागली. परमेश्वराच्या मनांतून तिला असें स्वस्थ निजूं द्यावयाचें नव्हतें ! तिला गाढ झोंप लागून सुमारें तासदीडतास होतो न होतो तोंच तिच्या दासीनें तिला जागें करून बाहेर कोणी लोक तिची गांठ घेण्याकरितां आल्याची वर्दी दिली ! इतक्या अपरात्रीं ह्या लोकांच्या येण्याचें कारण काय हें ती समजली व आपला पोषाख चढवून दिवाणखाण्यांत आली. तेथें येतांच आलेल्या लोकांनीं तिला पकडण्याचा व तिची मालमत्ता जप्त करण्याचा हुकूम दाखविला ! थोडा वेळ मनाशीं विचार करून तिनें तो हुकूम मान्य करण्याचें ठरविलें व झालेली हकीकत एका मित्रास कळवून स्वाधीन आपल्या मुलीस करण्याच्या हेतूनें तिनें एक पत्र लिहिलें. परंतु पत्रांतील मजकूर पाहिल्यावांचून व तें कोणास लिहिलें आहे तें कळल्यावांचून तें पाठविण्याची तिला मनाई करण्यांत आल्यामुळें तिनें तें फाडून टाकलें. पत्रांतील मजकूर तिनें आपल्यास अटक करणारांस वाचून दाखविला; परंतु तें कोणास लिहिलें हें सांगण्यास ते तयार होणें शक्य नव्हतें. कारण त्यावेळीं गुन्हेगार मानलेल्या व्यक्तींविषयीं सहानुभूती दाखविणारांसही जबर प्रायश्चित्त भोगावें लागत होतें. तिनें फाडून टाकलेल्या पत्राचे तुकडे जेव्हां आलेल्या लोकांनीं जमा केले तेव्हां तिला त्या कृत्याबद्दल हसूं आलें. कारण तिनें त्या पत्रावर पत्ता अगर कोणाचें नांव मुळींच लिहिलेलें नव्हतें. असो; रीतीप्रमातें तिच्या घराची झडती घेऊन व तिची तेथील मत्ता जप्त करून ता. १ जून रोजीं सकाळीं ७ वाजण्याचे सुमारास मॅडम रोलंदला कैद करून तुरुंगाकडे नेण्यांत आलें. घरांतून बाहेर पडतांना तिची मुलगी युदोरा व सर्व नोकरचाकर यांनीं अश्रुपूर्ण नेत्रांनीं आपल्या ह्या प्रेमळ पालकाचें अखेरचें दर्शन घेतलें ! तो देखावा अत्यंत हृदयद्रावक होता ! तो पाहून तिला पकडून नेण्यास्तव आलेल्या लोकांचेंही मन द्रवलें व त्यांपैकीं एकानें 'ह्या माणसांचें तुम्हा-

परराष्ट्रीय शत्रुपक्षास जाऊन मिळाला ! त्यामुळें पॅरिसच्या जनतेंत पुन्हा जोराची खळबळ सुरू झाली. लोकांचा एकमेकांवरील विश्वास नष्ट होऊन कोण सच्चा व कोण लबाड हें कळेनासें झालें ! ड्युमरेझच्या विश्वासघातास गुप्त कटाचें स्वरूप प्राप्त होऊन त्याचा संबंध पुष्कळ लोकांशीं जोडण्यांत येऊं लागला, ह्या संधीचा फायदा घेऊन कित्येक लोक खासगी वैमनस्यावरून आपल्या शत्रूचा अगर प्रतिपक्षियाचा सूड घेण्यास उद्युक्त झाले. यामुळें बेबंदशाहीस उत्तेजन मिळूं लागलें. प्रत्यक्ष स्नेहाचाही विश्वास कितपत धरावा याबद्दल शंका उपस्थित होऊं लागली. दँतन इतका लोकप्रिय होता तरी त्याजवरही ड्युमेरझच्या कटांत सामील असल्याचा आरोप लोकसभेंत करण्यांत आला होता ! त्यांतून तो निसटला ही गोष्ट निराळी. मॉ. रोलंद यांचीही ह्याच संबंधांत झडती घेण्यांत आली परंतु त्यांत कांहीं एक निष्पन्न झालें नाहीं. तथापि त्याना ह्या झडतीची बातमी पूर्वींच लागल्यामुळें त्यांनीं एतत्संबंधीं पत्रव्यवहार नष्ट केला असें जाहिर करून त्यांच्यावरील संशय दृढ करण्यांत आला. तसेंच ह्या सुमारास मॅडम रोलंदची अब्रू खराब करणारे दोषारोपही अप्रत्यक्षपणें करण्यांत येऊं लागले, परंतु तिचें खासगी वर्तन शुद्ध व चोख अग. त्यामुळें सदर आरोपांनीं तिच्या चारित्र्यास कलंक* लागण्याचा संभव नव्हता. पण ही गोष्ट त्यावेळीं तिच्या प्रतिपक्षियांच्या लक्षांत आली नाहीं. मॅडम रोलंदनें ह्या आरोपांची मुळींच परवा केली नाहीं. तिनें त्याकडे लक्षच दिलें नाहीं. मॉ रोलंद हे ड्युमरेझच्या कटांत सामिल

---

* मॅडम रोलंदचे पति तिच्याहून वयानें पुष्कळ मोठे असल्याकारणानें तिच्या खासगी वर्तनासंबंधानें तिच्या शत्रूंनीं तिजवर शिंतोडे उडविण्याचा प्रयत्न केला. त्यांचे हे आरोप अस्पष्ट व मोघम स्वरूपाचे होते. सुमारें दहा निरनिराळ्या तरुण जिराँदिस लोकांशीं तिचा अनिष्ट संबंध असल्याचें ध्वनित करण्यांत आलें होतें; परंतु हें सर्व खोटें ठरलेलें आहे. बुझोशीं मात्र तिची विशेष सलगी असल्याचें व तिचे त्याच्यावर प्रेम बसल्याचें तत्कालीन पत्रव्यवहारावरून सिद्ध झालेलें आहे; पण त्याबरोबरच तिनें आपला मनोनिग्रह करून आपलें पातिव्रत्य रक्षिल्याचेंही त्याच पत्रव्यवहारावरून स्पष्ट झालें आहे.

प्रकरण ९ वें.

धाडस व अटक !

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मॅडम रोलंदनें पॅरिस सोडण्याचा जो बेत केला तो स्वःच्या जिवाच्या भीतिमुळें केलेला नसून मॉं. रोलंदच्या रक्षणाकरितांच केवळ तिनें तसें करण्याचें ठरविलें होतें. स्वःच्या रक्षणाची किंबहुना जीविताचीही तिनें कधींच फारशी परवा बाळगिली नाहीं, हें तिच्या चरित्रांतील पुढें येणाऱ्या अनेक प्रसंगावरून स्पष्ट दिसून येणार आहे. असो. पॅरिसहून इतरत्र जाण्याकरितां तिनें सरकारचीं अनुमतिपत्रें मिळविलीं खरीं; परंतु त्यानंतर लागलीच ती आजारी पडल्यामुळें तिला ठरल्या दिवशीं प्रवास करितां आला नाहीं. पुढें थोड्या दिवसानंतर ती बरी झाली व मे ३१ रोजीं आपल्या प्रवासाच्या अनुमतिपत्रांवर म्युनिसिपल अधिकाऱ्यांची सही घेण्याकरितां जाण्याचा तिनें विचार केला. परंतु त्या दिवशीं सकाळीं पॅरिसच्या जनतेनें बंडाळीस सुरवात केल्यामुळें तिला घराच्या बाहेर पडतां येईना ! शहरांतील रस्ते बंडखोरांनीं व्यापून टाकले होते व त्यांच्या भयामुळें त्यावरील रहदारी बंद झाली होती ! सर्व दुकानांस कुलपें पडलेलीं असून सर्व घरांचे दरवाजेही आंतून बंद करण्यांत आले होते. बंडखोरांनीं एक जंगी मिरवणूक काढली होती व ती लष्करी वाद्यांच्या गजरांत मोठ्या थाटानें चालली होती. कित्येक हलक्या दर्जाच्या स्त्रियाही या मिरवणुकींत सामिल झालेल्या होत्या. सर्व रस्त्यांतून धांगडधिंगा करीत ही मिरवणूक कन्व्हेन्शन ऊर्फ लोकसभा जेथें भरत असे त्या तुलरीज नामक राजवाड्यासमोर येऊन दाखल झाली. तेथें ह्या लोकांचे पुढारी जमलेले होते व ते जिरॉंदिस पक्षाच्या लोकांवर उघडपणें देशद्रोहाचा आरोप करून त्यांस पकडून शासन करण्याबद्दलची मागणी लोकसभेपाशीं करीत होते. ह्या सर्व प्रकारामुळें लोकसभेंतही अस्वस्थता व अव्यवस्था उत्पन्न झाली होती. तिचें काम चालण्यास वरचेवर अडथळा होत होता. अद्याप

असणें शक्य नाहीं असें रॉबिस्पियरनें बुझोजवळ खाजगी संभाषणांत बोलून दाखविलें होतें. त्यांच्या प्रमुख प्रातिपाक्षियाची ही कबुली लक्षांत घेतली असतां त्यांच्यावरील संशय वृथा होता हें उघड आहे. रॉबिस्पियरप्रमाणेंच दँतन वगैरे इतर जॅकोबिन पुढाऱ्यांचीही रोलंदच्या नेकीविषयीं व देशनिष्ठेविषयीं बालंबाल खात्री होती. परंतु त्यास आपल्या मार्गांतील कंटक समजून त्यांचें उच्चाटन करण्यास त्यांनीं कंबर कसली असल्याकारणानें त्यांना त्याजविषयींचें आपलें खरें मत दाबून ठेवणें भाग होतें व तसेंच त्यांनीं केलें. मॉं. व मॅडम रोलंदची मैत्रिण मॅडम ग्रँदचँप हिनें यावेळीं लोकसभेंतलि कांहीं सभासदांस त्यांच्यासंबंधीं कांहीं माहिती विचारल्यावरून त्यांनीं पुढील उद्गार काढल्याचें तिनें नमूद करून ठेवलें आहेः—

"जर रोलंद पॅरिस सोडून जातील तर त्यांला कांहीं भय नाहीं. परंतु जर ते आपल्या हिशेबाची यादी मंजूर करून घेण्याचा आग्रह धरतील तर त्यांचें व त्यांच्या बायकोचें तोंड बंद करणें भाग पडेल."

या उद्गारांवरूनही मॉं व मॅडम रोलंद हीं उभयतां वस्तुतः निरपराधी होतीं असें दिसून येईल. मॅडम ग्रँदचँपनें वरील उद्गार मॉं रोलंद यास कळवून पॅरिस सोडून जाण्याचा इषारा दिला होता; परंतु त्यावेळीं त्याकडे त्यांनीं लक्ष दिलें नाहीं. बहुधा अशा स्थितींत पॅरिस सोडून जाणें त्यांस विशेषतः मॅडम रोलंदला इष्ट वाटलें नसावें. परंतु पुढें मे महिन्याच्या अखेरीस त्यांनीं पॅरिस सोडण्याचा निश्चय केला व पासपोर्टहि मिळविले. पण भवितव्यता कांहीं निराळीच असल्यामुळें त्यांना यावेळीं पॅरिस सोडतां आलें नाहीं !

लोकसभेंत जिरॉंदिस पक्षाचें बहुमत होतें, परंतु जॅकोबिन पक्षाला पॅरिसच्या कम्यूनचें पाठबळ असल्यामुळें आणि ह्या कम्यूनला उपरोक्त बंडखोरांचा (पॅरिसच्या सामान्य जनतेचा) आधार असल्यामुळें त्या बहुमताचें तेज पडणें दुरापास्त होतें. गेल्या २।३ महिन्यांत कायदा व व्यवस्था यांची पॅरिसमध्यें सारखी पायमल्ली होत गेल्यामुळें जिरॉंदिस लोकांच्या कायदेशीर परंतु शाब्दिक बहुमताला आतां फारसा मान मिळत नव्हता. ह्या पक्षाचे बहुतेक सभासद फ्रान्सांतील इतर प्रांतांतून आलेले असल्यामुळें त्यांना पॅरिसच्या जनतेचा पाठींबा अशा आणिबाणीच्या वेळीं मिळणें शक्य नव्हतें; उलट जॅकोबिन पक्षाच्या लोकांच्या चिथावणीमुळें ती जनता त्यांस आपले शत्रु मानून पाण्यांत पाहूं लागली होती. राज्यकारभार चालविणाऱ्या मंडळांतही जॅकोबिन पक्षाचे अथवा त्या पक्षाच्या अरेरावीस भिणारे असेच लोक पुष्कळ भरले होते. अशा स्थितींत जिरॉंदिस पक्षाचें लोकसभेंतील बहुमत निर्माल्यवत् झाल्यास त्यांत आश्चर्य कसलें ? तशांत ह्यांपैकीं कांहीं लोक पॅरिसच्या क्रुद्ध जनतेस भिऊन मौन धारण करूं लागले होते व त्यामुळें खुद्द लोकसभेसही एक प्रकारचा दुर्बलपणा प्राप्त झालेला होता. जिरॉंदिस पक्षाचेलोक पॅरिसव्यतिरिक्त इतर ठिकाणचे असल्यामुळें आप- पल्या प्रांतांतील जनसमूहाच्या साह्यानें ते एक निराळाच लोकसत्ताक राज्यांचा संघ स्थापन करून पॅरिसमध्यें स्थापन झालेलें लोकसत्ताक रा(मोडून टाकण्याचा कट करीत आहेत असा जॅकोबिन पक्षाकडून त्याजवर आतां उघड उघड आरोप करण्यांत येत होता. वस्तुतः हा आरोप यावेळीं तरी खोटा होता परंतु पॅरिसच्या तत्कालीन स्थितींत तेथील सामान्यजनतेस तो खरा वाटणें अगदीं साहजिक होतें व त्यामुळें जिरॉंदिसपक्षावर आग पाखडण्यास त्यांनीं सुरवात केली होती. ' जिरॉंदिस लोकांना लोकसभेंतून हांकून द्या ' 'त्यांचें कायमचें उच्चाटन करून त्यांचा सूड घ्या,' वगैरे वाक्यांचा घोष त्यांच्या जमावांतून होऊं लागला मॉं. व मॅडम रोलंद यांच्यासंबंधानेंही द्वेषमूलक व निंदाव्यंजक शब्द त्यांच्या तोंडून निघू लागले होते.

वर वर्णन केलेल्या परिस्थितीचा विचार करितां मॉं. व मॅडम रोलंद यांजवर केव्हां संकट येईल याचा नेम नव्हता. परंतु तें अगदीं नेमकें

वरील मंडाळीच्या दिवशींच (ता. ३१ मे) येईल असें मात्र त्यांना वाटलें नव्हतें. त्या दिवशीं संध्याकाळीं सहा इसम मॉं. रोलंदच्या घरीं आले व त्यांनीं, 'रेव्होल्युशनरी कमेटी ' च्या हुकमावरून आपणास पकडण्याकरितां आम्हीं आलों आहों ' असें त्यांस कळविलें. ही कमेटी नवी असून तिची स्थापना कायदेशीर रीतीनें झालेली नव्हती. अर्थात अशा ' बेकायदेशीर मंडळाचा हुकूम मी मानीत नाहीं. तुमचा प्रतिकार करण्यास वयोवृद्धत्वावांचून मजजवळ दुसरें कांहीं साधन नाहीं हें खरें पण मी जिवंत जीव आहे तोंपर्यंत प्रतिकार केल्यावांचून मात्र राहणार नाहीं ' असें मॉं. रोलंद यांनीं आलेल्या इसमांस कळविलें तेव्हां त्यांच्यापैकीं मुख्य, बाकीच्या लोकांस पहारा करण्यास सांगून आपण स्वतः त्यांचें म्हणणें अधिकाऱ्यांस कळविण्याकरितां निघून गेला. दरम्यान मॉं. व मॅडम रोलंद यांनीं झटपट खलबत करून असें ठरविलें कीं, ज्याअर्थीं मॉं. रोलंद यांस बाहेर पडणें शक्य नाहीं त्याअर्थीं मॅडम रोलंदनें लोकसभेंत जाऊन झालेला प्रकार त्या सभेस निवेदन करून मॉं. रोलंदला अटक करण्याचा हुकूम रद्द करवावा व तसें होणें शक्य नसल्यास त्याची सुटका करण्याचे उपाय योजावेत. मॅडम रोलंदच्या धैर्याच्या परीक्षेचीच ही वेळ होती. व ती तिनें फुकट जाऊं दिली नाहीं. राज्यक्रांतीच्या विपरीत स्थित्यंतरामुळें तिचें मन खट्टू झालेलें होतें व त्याकारणानें तिला एक प्रकारचें औदासिन्य व शैथिल्यही प्राप्त झालेलें होतें; होतें; परंतु प्रत्यक्ष संकट दारीं उभें राहतांच तिचें औदासिन्य व शैथिल्य पार लयास जाऊन तिच्या अंगीं विद्युत्संचार झाल्याप्रमाणें उत्साह भरला ! पतीची सुटका करण्याकरितां ती एका गाडींत बसून तत्काळ तुलरीज राजवाड्याकडे निघून गेली. ह्या ठिकाणीं लोकसभेची बैठक चालू होती. तेथें ती येऊन पोंचली; परंतु दरवाजे बंद असून आंत जाण्याची मनाई आहे असें तिला आढळून आलें ! तिला तर प्रत्येक क्षण महत्त्वाचा वाटत होता. अशा स्थितींत आंत प्रवेश होण्यास्तव तिनें पुढील युक्ती योजिली. आपण रॉबिस्पियरचे भक्त आहों असा आविर्भाव आणून ती म्हणाली:—

" नागरिक हो ! आपल्या देशोद्धाराच्या प्रस्तुतसमयीं, व आपणांभोंवतीं देशद्रोही लोकांचें जाळें पसरलें असतांना, किती महत्वाचे कागदपत्र लोक-

सभेच्या अध्यक्षास सादर करण्यास्तव मी आलें आहें याची तुम्हांस कल्पना नाहीं. आत्तांच्या आंता कोणा दूताची व माझी गांठ घालून द्या म्हणजे मी ते त्याच्या हवालीं करीन." ह्या युक्तीचा उपयोग झाला. तिच्या तोंडून वरील उद्गार बाहेर पडतांच द्वाररक्षकांनीं दरवाजे उघडून तिला आंत, अर्जदार बसण्याच्या जागेंत दुताची वाट पहाण्याकरितां नेऊन बसविलें. सुमारें पावतासानंतर रोझे या नांवाचा एक गृहस्थ तिजकडे आला. त्याजपाशीं तिनें तत्काळ लोकसभेस सादर करण्यास्तव तयार केलेलें एक पत्र दिलें. हा गृहस्थ तिच्या माहितीचा असून त्याच्या मनांत तिजविषयीं पुष्कळ सहानुभूति होती. सबब तिचें पत्र लोकसभेंत वाचलें जावें म्हणून शक्य तितकी खटपट करण्याचें आश्वासन देऊन तो पुन्हां सभागृहांत गेला. या सभागृहाचे दरवाजे लावलेले होते. मुख्य दरवाजांतून वरचेवर माणसें आंतून बाहेर व बाहेरून आंत जात येत असत, त्यावेळीं तो क्षणभर उघडला जाऊन पुन्हां लावला जाई. दरवाजा उघडला कीं, आपल्या पत्रासंबंधीं बातमी देण्याकरितां कोणी येतो कीं काय हें पहाण्याकरितां मॅडम रोलंदनें दारासमोर यावें व तो पुन्हां लागला कीं परत आपल्या जागेवर जाऊन बसावें अशा स्थितींत सुमारें एक तास निघून गेला! या अवधींत तिच्या मनांत अनेक विचारतरंग उद्भवून तें अस्वस्थ बनलें होतें. मॉं. रोलंदचें, घरीं काय झालें असेल याची तर काळजी तिला वाटत होतीच पण सभागृहांत माजलेला घोटाळा व तेथें चाललेली हमरीतुमरी हीही तिच्या कानावर येत असल्यामुळें तिचें मन विषण्ण झालें होतें. सभागृहांतील कांहीं वक्ते—सभासद—जिरॉंदिस पुढाऱ्यांवर नाहीं नाहीं ते दोषरोप करून त्यांस गिरफदार करण्याचा आग्रह धरीत असल्याचेंही तिच्या कानावर येत होतें. अशा स्थितींत तिच्या अंतःकरणांत कोणत्या प्रकारची कालवाकालव सुरू असेल याची कल्पना वाचकांनींच करावी हें बरें! अशा विषण्ण व सचिंत मनःस्थितींत वर सांगितल्याप्रमाणें एक तास निघून गेल्यावर रोझे पुन्हा तिजकडे आला व "सद्यःस्थितींत आपलें पत्र वाचलें जाण्याचा संभव नाहीं" असे निराशात्मक उद्गार त्यानें काढले. "लोकसभेंत धिंगाणा माजून राहिला असून पॅरिसच्या कम्यूनचें शिष्टमंडळ (डेप्युटेशन)

जिरोंदिस पुढाऱ्यांवर देशद्रोहाचे आरोप करून त्यांस अटक करण्याची मागणी करीत आहे व न ऐकल्यास दंगाधोपा करण्याची धमकी देत आहे, हें पाहून कित्येक जिरोंदिस सभासद पश्चाद्वारानें सभेंतून पळ काढीत आहेत. अशा स्थितींत आजच्या बैठकीचें अखेरीस काय पर्यवसान होईल हें समजत नाहीं. " वगैरे हकीकत सांगून निदान सध्यांतरी तिचें पत्र वाचलें जाण्याचा संभव नाहीं, असें त्यानें तिला सांगितलें. तेव्हां शेवटचा उपाय म्हणून व्हर्ग्निऑद यास आपल्याकडे पाठवून देण्याविषयीं तिनें त्यास सांगितलें. तें कबूल करून तो आंत निघून गेला. थोड्याच वेळांत व्हर्ग्निऑद तेथें आला व तिचें म्हणणें ऐकून घेऊन आंत गेला व कांहीं वेळानें परत येऊन त्यांनेंही रोझेप्रमाणेंच उत्तर दिलें. तेव्हां मॅडम रोलंदनें त्यास सभेंत आपला प्रवेश करून देण्याची विनंती केली; परंतु ' त्याचा कांहीं उपयोग नाहीं. सद्यःस्थितींत लोकसभा पंगु आहे, तिचे हातून कांहीं होणार नाहीं. ' असें हर्ग्निऑद म्हणाला. त्यावर मॅडम रोलंद मोठ्या आवेशानें म्हणाली—" सर्व कांहीं करण्यास ती समर्थ आहे. तींतील बहुमत आपण कोणता मार्ग स्वीकारावा हें जाणण्याची अपेक्षा करीत आहे. जर माझा तींत (सभेंत) प्रवेश झाला तर ज्या गोष्टी तुम्हास बोलतां येणार नाहींत त्या बोलून दाखविण्याचें मी धाडस करीन व त्यांना योग्य मार्ग दाखवीन. मला या जगांत कशाचीच भीती वाटत नाहीं. आणि माझ्या भाषणानें जरी माझ्या पतीचें रक्षण होऊं शकलें नाहीं तरी मी ज्या सत्य गोष्टी स्पष्ट व जोरदार भाषेंत सांगेन त्यांचा आपल्या लोकसत्ताक राज्याला फार उपयोग होईल, ही गोष्ट तुम्ही आपल्या सहाध्यायांस कळवा. अशा वेळीं धारिष्टपूर्वक केलेल्या भाषणाचा पुष्कळ परिणाम होण्याचा संभव आहे. निदान उदाहरणादाखल तरी त्याचा खास उपयोग होईल. "+ मॅडम रोलंदची ही विचारसरणी केवळ अगदींच भ्रामक नव्हती. लोकसभेच्या अंगीं जर पूर्वीप्रमाणें सामर्थ्य असतें तर तिच्या भाषणाचा तिच्या कल्पनेनुसार इष्ट परिणाम झाला असता यांत शंका नाहीं. परंतु पॅरिसच्या कम्यूननें लोक-

× यावेळीं तिचा आत्मविश्वास किती दांडगा होता हें पुढें या प्रसंगाविषयीं तिनेंच लिहिलेल्या हकीकतींतील पुढील उताऱ्यावरून कळून येईल.

सभेस धाकदपटशाच्या (दंगाधोप्याच्या) जोरावर निर्माल्यवत् करून टाकलेलें असल्यामुळें आतां तिच्या भाषणाचा तसा परिणाम होणें शक्य नव्हतें. म्हणून व्हर्निऑदनें तिला तो नाद सध्यां तरी सोडून देण्याचा व घरीं जाऊन आपल्या पतीची काय अवस्था आहे हें पाहून मग वाटल्यास पुन्हा तेथें येण्याचा आग्रह केला. तेव्हां निरुपायास्तव आपल्या मित्राच्या सल्ल्यास मान देऊन ती आपल्या घराकडे वळली. घरीं येऊन पहाते तों मॉं. रोलंद तेथुन निघून गेल्याचें वृत्त तिला समजलें!

मॉं. रोलंद यांस पकडण्यास जे लोक आले होते त्यांस त्यांनीं काय उत्तर दिलें हें मागें सांगितलेंच आहे. त्यानंतर त्यांजवर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न न करितां त्यांचें लेखी उत्तर घेऊन ते लोक परत निघून गेले. ते गेल्यावर मॉ. रोलंद मागल्या दारानें बाहेर पडून आपला मित्र बॉस्क याच्या घरीं गुप्तपणें जाऊन राहिले होते. त्यांचा शोध करीत मॅडम रोलंदही तेथें आली व तिनें लोक-सभागृहांत झालेला सर्व वृत्तांत त्यांस निवेदन केला. नंतर ती पुन्हा त्या स्थानाकडे आली; परंतु त्यावेळीं लोकसभेची बैठक खलास झाली होती. तेव्हां "लोकसभेनें क्रांतिकारक बंडखोरांपुढें मान वांकविली काय? अशा आणिबाणीच्या वेळीं तिला वाऱ्यावर बसविण्याइतकें सामर्थ्य या लोकांच्या ठायीं उत्पन्न झालें कीं काय?" वगैरे प्रश्नांचा आपल्या मनाशीं विचार करीत ती आपल्या घराकडे वळली. रस्त्यानें एके ठिकाणीं तिला कांहीं माणसांचा घोळका आढळला. त्यास तिनें 'नागरिकांनो, सर्व कांहीं ठीक आहेना?' असा प्रश्न केला. त्यावर त्यांनीं 'हो, सर्व कांहीं उत्तम आहे' असें उत्तर दिलें व स्वातंत्र्यदेवतेप्रीत्यर्थ एक गाणें गाऊन दाखविलें! नंतर 'लोकसभेंतील उजव्या बाजूचें (जॅकोबिन पक्षाचें) शांतवन झालें काय? असा तिनें प्रश्न केला. त्यास "होय, लवकरच जिरॉंदिस पक्षाच्या २२ पुढाऱ्यांस पकडण्याचा ठराव झाल्यामुळें त्यांचें शांतवन झालें." असें उत्तर मिळालें. ही बातमी ऐकतांच मॅडम रोलंदचें काळीज चर झालें! व क्षणभर ती गोंधळली! परंतु आपले मनोविकार बाहेर पडूं न देतां तिनें आपली गाडी पुढें चालविली. यावेळीं सुमारें ११॥ प्रहर रात्र झाली होती व दुसऱ्या दिवशीं सकाळ होण्यापूर्वीं मॉ. रोलंद यांस सुरक्षित

स्थळीं पोंचविण्याची तजवीज करणें जरूर होतें; म्हणून ती तितक्या रात्रीं एका मित्राच्या घरीं गेली व त्यास पहांटेच्या सुमारास आपल्या घरीं येण्यास सांगून घरीं आली. वाटेंत नगररक्षकानें तिला अडवून इतक्या रात्रीं बाहेर पडण्याचें कारण विचारलें. तेव्हां तिनें ' तसेंच कांहीं महत्त्वाचें काम होतें ' असें उत्तर दिलें. यावर ' पण एकटी कशी ' अशी त्यानें आणखी पृच्छा केल्यावरून ती म्हणाली " एकटी कां ? सत्य व निरपराधीपणा हे दोन सोबती मजबरोबर असलेले तुम्हांस दिसत नाहींत काय ? यापेक्षां आणखी सोबत ती काय पाहिजे ? " या उत्तरानें त्याचें समाधान झालें कीं नाहीं कोण जाणें पण त्यानें तें ऐकून तिला पुढें जाऊं दिलें.

घरीं येतांच मॉं. रोलंदच्या भेटीकरितां एक गृहस्थ येऊन बसलेले तिला आढळले. त्यांस, ' त्यांची प्रत्यक्ष गांठ पडणें शक्य नाहीं तुम्हांस कांहीं निरोप सांगणें असेल तर सांगा ' असें तिनें कळविलें. तेव्हां ' त्यांना आज रात्रीं पकडण्याचा अधिकाऱ्यांचा निश्चय झाला आहे ' असें ते गृहस्थ म्हणाले. यावर ' जर ते तसें करतील तर ते फारच हुषार आहेत असें म्हणावें लागेल. ' असें मॅडम रोलंद उद्गारली ! नंतर आलेल्या गृहस्थाशीं चार औपचारिक शब्द बोलून व त्यांनी दिलेल्या सूचनेबद्दल त्यांचे आभार मानून तिनें त्यांस निरोप दिला. ते निघून गेल्यावर सुषुप्तावस्थेंत असलेल्या आपल्या प्रिय कन्येचें एकवार चुंबन घेऊन ती मॉं. रोलंद यांजकडे पाठविण्याकरितां पत्र लिहिण्यास बसते न बसते तोंच पॅरिसच्या कम्यूनचें एक शिष्टमंडळ मॉं. रोलंद यांस पकडण्याकरितां तेथें येऊन धडकलें ! ते घरांत नाहींत असें समजतांच त्या मंडळाचा पुढारी तिला अनुलक्षून म्हणाला— ' ते कोठें असतील ? केव्हां येतील ? तुम्हांस त्यांच्या सवयी माहित असल्या पाहिजेत अर्थात् त्यांची गांठ केव्हां पडेल हें तुम्ही सांगूं शकाल. " यावर " अशा प्रकारचे प्रश्न मला करण्याचा आपणास हुकूम आहे कीं काय, हें मला माहित नाहीं. परंतु त्या प्रश्नांचे उत्तर देण्यास मला कोणी भाग पाडूं शकणार नाहीं हें मात्र मी जाणतें. मी लोकसभेच्या दिवाणखान्यांत असतांनाच माझे पति घर सोडून गेले

" Had be (Roland) found a single man among the Cirondist majority in the Convention bold enough to mount the tribuune and to demand for him gustice inquiry, punishment, or acquittal, he wonld havc faced the tempest. ×××× It was probably true that, Conscientious, high-minded and scrupulously honest, his presence in the Cabinet had been an embarrassment to men of morc elastic principles. "

असो; राजिनामा दिल्यानंतर मॉं. रोलंद आपल्या कुटुंबासह पुन्हा रू द ला हार्प नामक गृहांत येऊन राहिले. त्यांनीं जरी अधिकारत्याग केला तरी राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें नाहीं. अर्थात् त्यांच्या प्रतिपक्षियांनीं त्यांचा व मॅडम रोलंदचा पाडाव किंवहुना नाश करण्याचे जे प्रयत्न चालविले होते त्यांस खळ पडली नाहीं. उलट ते जास्त जोरानें चालू झाले. जॅकोबिन लोकांच्या क्लबांत होणाऱ्या भाषणांतून त्यांच्यावर सारखे हल्ले करण्यांत येत होते व अधिकारावर असतांना त्यांनीं सार्वजनिक पैशाचा दुरुपयोग केल्याचाही आरोप त्यांजवर करण्यांत आला होता. त्याचें निरसन करण्याकरितां मॉं. रोलंद यांनीं आपल्या कारकीर्दींत खर्चिलेल्या पैशाचा खुलासेवार हिशेब प्रसिद्ध केला व तो तपासून आपणांस त्या आरोपांतून मुक्त करण्याबद्दल त्यांनीं लोकसभेस मागणी केली. सुमारें ३ महिन्यांच्या अवधींत आठ वेळां त्यांनीं ही मागणी केली; परंतु दिवसानुदिवस लोकसभेंत जॅकोबिन पक्षाचें वर्चस्व होत गेल्यामुळें त्यांच्या ह्या मागणीकडे कोणी लक्ष देईना. त्यांच्या मित्रांनाही त्याबद्दल लोकसभेंत आग्रह धरण्याचें धारिष्ट होईना ! तेव्हां शेवटीं कंटाळून त्यांनीं तो नाद सोडून दिला. ह्याविषयीं एका पत्रांत त्यांनीं असे उद्गार काढले आहेत—" इतिहास आमच्याबद्दल व विशेषतः माझ्याबद्दल-सूड उगवील. भ्याड व दुष्ट लोक माझ्या शरिराचा उच्छेद करूं शकतील परंतु माझ्या चारित्र्याचा नाश त्यांच्यानें होणार नाहीं. " त्यांचे हे उद्गार सर्वस्वीं खरे ठरले, हें त्या वेळच्या इतिहासावरून स्पष्ट होत आहे. असो; ह्या वर्षाच्या मार्च अखेरीस फ्रेंच सेनापति ड्युमरेझ हा विश्वासघात करून

वर फार प्रेम आहे, असे उद्गार काढले. त्यांस मॅडम रोलंदनें ' मजवर प्रेम नसणारीं माणसें मजजवळ कधींच नव्हतीं ' असें गंभीरपणें उत्तर दिलें.

मॅडम रोलंदला पकडण्यांत आलें खरें; परंतु तिजवर निश्चितपणें कोणताच आरोप ठेवलेला नव्हता. तसेंच ज्या रेव्होल्युशनरी कमेटीच्या हुकमावरून तिला पकडण्यांत आलें त्या कमेटीची स्थापना कायद्यास अनुसरून झालेली नसल्यामुळें तिला पकडण्यासंबंधीं झालेला सर्वच विधि बेकायदेशीर होता. परंतु प्रस्तुतसारख्या बेबंदशाहींत कायद्याच्या प्रश्नाकडे कोणी विशेष लक्ष न दिल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. अशा स्थितींत ह्या लोकांच्या हातीं लागून आपला नाश करून घेण्यापेक्षां मॅडम रोलंदनें फरारी होऊन अथवा परदेशांत पळून जाऊन आपलें रक्षण केलें असतें तर पुढें तिला आपल्या देशाच्या कल्याणाचा मार्ग स्वीकारण्यास अवसर मिळाला नसता काय ? मॉं. रोलंद व जिरॉंदिस पक्षाचे इतर पुढारी हे अशाच हेतूनें पळून गेले नाहींत काय ? वगैरे प्रश्न ह्या ठिकाणीं उद्भवतात, त्यांचें निराकरण करणें जरूर आहे. व्यवहारिक राजकारणी पुरुष अथवा मुत्सद्दी यांच्या दृष्टीनें पाहिल्यास वरील प्रश्न कांहींसे सयुक्तिक दिसतात परंतु ध्येयवादी अथवा तत्ववादी यांच्या दृष्टीनें पाहिल्यास ते तितके सयुक्तिक नाहींत. ध्येयवादी अथवा तत्ववादी लोकांचें खरें ब्रीद म्हटलें म्हणजे आपल्या ध्येयास—तत्त्वास–मतांस–कोणत्याही परिस्थितींत सारखेंच चिकटून राहणें व त्याप्रित्यर्थ जरूर पडल्यास आपल्या आपल्या प्राणांचीही आहुति देणें हें होय. इंग्रजींत ज्याला ' मार्टरशीप ' म्हणतात तेंच अशा लोकांचें ब्रीद असलें पाहिजे. त्यावांचून त्यांच्या तत्वाचा व त्याच्या मुळाशीं असलेल्या सद्‌गुणांचा विजय होणें शक्य नाहीं. मॅडम रोलंद ही कांहीं मुत्सद्दी अथवा व्यवहारिक राजकारणी स्त्री नव्हती. तिच्या चारित्र्याचा एकंदरींनें विचार केला तर तिची भूमिका ध्येयवाद्याचीच असल्याचें दिसून येईल. तसेंच नसतें तर व्यवहारिक सोयीकडे लक्ष देऊन तिनें दँतनशीं समेट केला असता, तसें केल्यास आपल्या तत्वाची हानी होईल हें जाणून जसें तिनें तें कृत्य केलें नाहीं त्याची धोरणानुसार

वरील प्रसंगींही पळून जाण्याचा मार्ग तिला स्वीकारतां आला नाहीं. यासंबंधानें खुद्द तिचे स्वतःचे विचार पुढील प्रमाणें होते:—

" मॉ. रोलंद हे कार्यकर्ते राजकारणी पुरुष असल्यामुळें व ते हल्लीं अधिकारावर नसल्यामुळें त्यांनीं व त्यांच्याबरोबरीच्या मित्रांनीं भावी काळांत योग्य संधि आल्यास आपल्या देशाच्या उपयोगीं पडतां यावें म्हणून सध्यां पळून जाऊन आपले प्राण वांचविणें इष्ट आहे परंतु मला तसें करतां उपयोगी नाहीं. माझ्या स्वातंत्र्यनाशानें कर्त्या पुरुषाची हानी होण्याजोगी नाहीं. मजसारख्या स्त्रीचा वध जर माझे शत्रु करतील तर त्यांचें तें कृत्य लोकक्षोभास कारण होऊन त्यांनाच पुढें बाधक होईल. माझी उघडपणें चौकशी झाल्यास मला माझ्या पक्षाचे लोक व विशेषतः माझे पति यांजवर केल्या जाणाऱ्या आरोपांचें खंडण करण्याची संधि मिळेल व त्यावेळीं ज्या तत्वांकरितां आम्हीं झगडत आहों त्यांचेंही उत्कृष्टपणें आविष्करण मला करितां येईल. जर त्या आविष्करणाचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं आणि त्यामुळें आमचे शत्रु आमचा जास्तच छळ करण्यास प्रवृत्त झाले तर त्यांच्या छळास बळी पडल्यानेंच मी आपल्या देशास उत्तम उदाहरण घालून दिल्यासारखें होईल. सत्य, न्याय, सुव्यवस्था, कायद्यांचा आदर ह्या गोष्टींची लोकांस केव्हां तरी आवश्यकता उत्पन्न होईलच आणि त्यांची तीव्र जाणीव उत्पन्न करण्याकरितां मला मृत्यु पत्करावा लागला तरी माझी त्यास तयारी असणें जरूर आहे. "

वरील उताऱ्यांत नमूद केल्या मासल्याचे विचार देशभक्त म्हणविणाऱ्या पुष्कळ लोकांचे ठायीं असूं शकतात परंतु प्रत्यक्ष संकट आल्यानंतरही त्यांस चिकटून राहाण्याचें धैर्य फारच थोड्यांच्या ठायीं असतें. आणि म्हणूनच समाजांत अशा लोकांचें फार महत्व वाढतें. हे लोक सद्गुणांचे व सत्तत्वाचे केवळ आधार होत. अनेक उत्तम तत्वांचा व त्याबरोबरच मानवजातीचा उत्कर्ष करण्यास हेच लोक परंपरेनें कारणीभूत झालेले आहेत, आणि यामुळें ते सर्वत्र वंद्य व माननीय ठरत आले आहेत. मॅडम रोलंद ही अशांपैकींच एक होती. सामान्य जनतेची गुलामगिरी पाहून तिच्या मनांत लोकस्वातंत्र्याच्या व लोक-

सत्ताक राज्याच्या कल्पना उद्भवल्या व त्यांना मूर्तस्वरूप देण्यांकरितांच तिनें आपलें तन, मन, धन खर्च केलें होतें. ह्या कल्पना अत्यंत उदात्त व पवित्र असल्यामुळें त्या सिद्धीस नेण्याचे मार्गही तसेच उदात्त व शुद्ध असले पाहिजेत असें तिचें मत होतें. अत्याचार, अनाचार यांचा त्या कल्पनेस विटाळ होऊं दिल्यास लोक स्वातंत्र्याचें कार्य सिद्ध न होतां उलट नासेल अशी तिची प्रामाणिक समजूत होती. परंतु दुर्दैवानें पॅरिसच्या जनतेस —तत्कालीन पक्षभेदांच्या चुरशीस ती बळी पडल्यामुळें—तिचें व तिच्या पक्षाचें म्हणणें पटलें नाहीं व त्याचे अनिष्ट परिणाम तिच्या मित्रांस व शत्रूसही पुढें सारखेच भोगावे लागले. तथापि ह्या संकटांस भिऊन आपलीं मतें बदलण्यापेक्षां खरेपणाची साक्ष जगास पटाविणें तिला अधिक श्रेयस्कर वाटलें व या कामीं तिनें जें अलौकिक धारिष्ट दाखविलें त्यांतच तिच्या चारित्र्याचें खरें रहस्य व थोरपणा आहे.

असो; मॅडम रोलंदला गार्डीतून ' ॲबे ' नामक तुरुंगांत नेण्यांत आलें. वाटेंत कांहीं अडाणी बायका तिची गाडी पाहून " वधस्थानाकडे, वधस्थानाकडे, " असें ओरडल्या ! तेव्हां तिच्या रक्षकांनीं गाडीचे पडदे सोडूं काय ? म्हणून तिला विचारलें. त्यास तिनें " नको, निरपराधीपणाला अपराधीपणासारखें तोंड लपविण्याचें कारण नाहीं. मला कोणच्याही डोळ्याचें भय वाटत नाहीं " असें उत्तर दिलें. तुरुंगांत पाय ठेवतांना तिच्या रक्षकांनीं तिला तिच्याच वरील विचारसरणीचा अवलंब करून " तर मग मॉ. रोलंद पळून गेल्यामुळें ते अपराधी आहेत असें ठरत नाहीं काय ?" असा प्रश्न केला. त्यावर " छे ! ते ॲरिस्टिडससारखे न्यायी व केटोप्रमाणें शिस्तप्रिय आहेत आणि याच त्यांच्या सद्गुणामुळें त्यांना फार शत्रु झालेले आहेत. ह्या लोकांनीं आपला राग मजवर उगवून घ्यावा. मी त्यास तयार आहें. माझ्या पतींनीं देशाच्या भावी हिताकरितां त्यांच्या आटोक्यांतून निसटणेंच इष्ट आहे. ते जगले तर पुढें ह्या देशास त्यांचा उपयोग होईल. " असें तिनें उत्तर दिलें. तुरुंगांत आल्यावर तेथील जेलरानें—जरी तिला कडकपणें वागविण्याची त्यास आज्ञा होती तरी—तिला दयाळूपणानें वागविण्यास सुरवात केली. त्यानें तिला एका स्वतंत्र खोलींत नेऊन ठेवलें व तत्कालीन परिस्थितींत शक्य

तेवढ्या सवलती त्यानें तिला दिल्या. त्याची बायकोही तिच्याशीं प्रेमानें वागूं लागली. या कारागृहांत आल्यावर तिच्या मनाची स्थिति कशी होती याचें वर्णन तिच्याच एका पत्रांत असलेलें पुढें देतों—" एकंदरींत, तो काळ मला अत्यंत सुखाचाच वाटला. त्याची मला केव्हांही विस्मृति होणार नाहीं. त्या क्षणीं माझ्या मनांत जे विचार घोळत होते ते जरी अनिश्चित स्वरूपाचे होते तरी माझें अंतःकरण शुद्ध असल्याबद्दलची जीं जाणीव मला होती ती तसल्या संकटाच्या कालांत मला धीरोदात्त बनविण्यास समर्थ असल्याचें पाहून मला एकप्रकारचें समाधान वाटत होतें. तेथें गतगोष्टींचें मी समालोचन केलें व भावी कालाविषयीं अनुमानें बांधिलीं. माझ्या वागणुकींत लज्जास्पद असें कांहींच आढळून आलें नाहीं. उलट मी धैर्यानें वागावें अशीच प्रेरणा त्याकडून (अंतःकरणाकडून) मला होत होती. अर्थात् मी भवितव्यतेच्या आधीन होऊन जो प्रसंग येईल त्यास निर्धास्तपणें सादर होण्याचा निश्चय केला. "

मॅडम रोलंदनें वरील पत्रांत काढलेले उद्गार गर्वोक्तिचे अथवा क्षणिक मनोविकाराचे द्योतक नव्हते. आपल्या पुढील वर्तनावरून तिनें त्यांचें सार्थकत्व पूर्णपणें सिद्ध केलेलें आहे. आत्मविश्वास, सार्वजनिकहितबुद्धि, बौद्धिक तेज व स्वार्थत्यागक्षमता हे गुण तिच्या ठायीं अत्यंत उत्कटत्वानें वास करीत असल्यामुळें शत्रूच्या हातून तिचा वध होण्याचा प्रसंग आला तरी देखील ती तिळमात्र डगमगली नाहीं. कर्तव्य व सदसद्विक बुद्धि यांचें ऋण फेडण्याकरितां तिनें आपल्या प्राणांचीही आहुति दिली*

*टायलर नामक एका इंग्रजी चरित्र लेखकानें तिच्या एतद्विषयक गुणासंबंधानें काढलेले उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे असल्यामुळें येथें देतोः—

" By her bearing during these last months of her life Madam Roland disarms Criticism, and, so to speak, justifies an estimate of herself that might have seemed too high. × × × her heroism in facing peril, the Calm with which she was prepared to meet deatte, Showed that She had not mis calculated her strength, and that her's was not the Courage of the braggart that fails when brought to the test. "

कारागृहांतील तिची वागणूक व मानसिक स्थिति एखाद्या साधूस शोभण्यासारखी होती. तिची गंभीरमुद्रा स्वतःच्या सुखदुःखाविषयीं तिचे ठायीं दिसून येणारा बेफिकीरपणा व तिची शांत वृत्ती हीं पाहून तिच्या भेटीस गेलेल्या चँपेग्न्यु नामक मित्रानें 'तिच्या भेटीस मी गेलों असतां एकाद्या सत्पुरुषाच्या दर्शनाप्रींत्यर्थ आपण देवालयांत आलों आहों कीं काय असा भास झाला.' असे उद्गार काढले ! असो; मॅडम रोलंदला अॅबेच्या तुरुंगांत येऊन कांहीं तास झाले नाहींत तोंच तुरुंग–तपासनीस मॉ. ग्रांदप्रे यानीं तिला भेट दिली. ह्या गृहस्थांची ह्या कामावर मॉ. रोलंद यांनींच नेमणूक केलेली असल्यामुळें साहाजिकच कृतज्ञबुद्धीनें त्यानीं मॅडम रोलंदविषयीं सहानुभूति व्यक्त करून तिचा बंदिवास शक्य तितका सुखावह करण्याची तजवीज केली. त्यांच्या सूचनेवरून तिनें आपल्यावरील आरोपाचा खुलासा करण्याविषयीं लोकसभेस एक पत्र लिहिलें, परंतु तत्कालीन परिस्थितींत त्याचा फारसा उपयोग होण्याजोगा नव्हता, व त्याप्रमाणें तो झाला नाहींच. त्याचदिवशीं (ता. १ जून) तिनें आपला मित्र बॉस्क यासही पुढील आशयाचें पत्र लिहिलें:—

" आज सिंहासनावर तर उद्यां बंदिवासांत अशी क्रांतिकारक काळांत सद्गुणाची अवस्था होत असते. आज सकाळीं तुमची गांठ घेण्याविषयीं मी किती उत्सुक होतें हें सविस्तर लिहिल्यास तुम्हास खरें वाटणार नाहीं. माझ्या स्थित्यंतराविषयीं विचार करणारांत तुम्ही एक आहां अशी माझी समजूत आहे. परमेश्वरी इच्छा असेल तोंपर्यंत मी येथें सुखानें राहीन. या नवीन स्थित्यंतराचा माझे मनावर कांहीं एक परिणाम झालेला नाहीं. कोणतेंहि स्थित्यंतर माझ्या आत्म्याचें सामर्थ्य व समतोलपणा नष्ट करूं शकणार नाहीं."

बास्क हा तिचा विशेष निकट स्नेही होता. तिला पकडून नेल्यानंतर लागलींच त्यानें तिच्या कन्येस आपल्या एका स्त्रीमित्राचे छत्राखालीं नेऊन ठेवलें व संध्याकाळच्या आंत ती बातमी तिला पोचविण्याची व्यवस्था केली. त्याप्रमाणें ती तिला कळतांच मुलीसंबंधानें पुढें मागें उत्पन्न होणारी काळजी दूर झाली म्हणून तिला समाधान वाटलें. त्या रात्रींच्या, दिवसाच्या व पूर्व रात्रींच्या श्रमानें आणि दगदगीनें तिला थकवा आ-

लेला असल्याकारणानें त्या रात्रीं तिला गाढ झोंप आली. दुसरे दिवशीं सकाळीं बऱ्याच उशिरानें ती उठली; तथापि तिचा थकवा गेला नव्हता. सुमारें दहा वाजतां ग्रांदप्रे पुन्हा तिच्या भेटीस आले व त्यांनीं 'कालची रात्र कशी काय गेली' म्हणून तिला प्रश्न केला. तेव्हां "मला इतका थकवा आला आहे कीं, कोणी, मारावयास काढलें तरी हा बिछाना सोडूं नये असें वाटतें;" असें तिनें उत्तर दिलें. तथापि दोन प्रहर उलटून गेल्यावर तिला हळु हळू हुषारी वाटूं लागली, त्यासरशीं ती आपल्या खोलींतील सामानाची लावालावी व पुस्तकांची जुळवाजुळव करूं लागली. तें काम करीत असतांना 'मरेपर्यंत मी आपला व्यासंग सोडणार नाहीं. जर ते मला (वधस्थानीं) नेण्यास येतील तर हा आयुष्यक्रम येथेंच सोडून मी कायमची शांती मिळविण्याकरितां त्यांच्याबरोबर जाईन.' असें स्वतःशींच बोलत होती.

तुरुंगातील नियमानुसार मॅडम रोलंदला पैसे भरून एखादा नोकर-चाकर मिळवितां येणें शक्य होतें. परंतु तसें न करितां खोली झाडण्यापासून तों जेवण करण्यापर्यंत सर्व कामें स्वतःच करण्याचें तिनें ठरविलें. तिचें जेवणही अगदीं साधें असे. त्यामुळें तिला त्याप्रीत्यर्थ मिळणाऱ्या भत्त्यांतून जी कांहीं थोडी शिल्लक उरे तीं शेजारच्या कैद्यास ती वाटून टाकीत असे, व तेथील नोकरांनाहि ती त्यांच्या अपेक्षेप्रमाणें कांहीं बक्षीस देई.

मॅडम रोलंदला पकडून कांहीं दिवस झाल्यानंतर जिरॉंदिस पक्षाच्या बहुतेक सर्व पुढाऱ्यांस पकडण्याचा ठराव लोकसभेंत पास झाला. हें वृत्त मॅडम रोलंदला समजतांच आपल्या देशाच्या उद्धाराविषयीं तिला अद्याप जी थोडीशी आशा वाटत होती तीही लयास गेली व त्यामुळें ती फारच खिन्न झाली! तथापि आपली चौकशी लवकर सुरू झाल्यास त्यावेळीं आपल्या मित्रावरील आरोपांचें खंडण करण्याची आपणांस संधी मिळेल अशा समजुतीनें तिनें अधिकाऱ्यांस आपणांस बेकायदेशीर रीतीनें अटक केल्याबद्दल निषेध करणारीं व आपल्यावरील आरोप काय हें सांगण्याबद्दल आव्हान करणारीं पत्रें लिहिण्याचा उपक्रम सुरू केला होता. त्यावरून एका पोलिस अधिकाऱ्यानें तिजकडे येऊन तिजवर व

तिच्या इतर मित्रांवर " फ्रान्सांतील इतर परगण्यांचा संघ उभारून पॅरिसच्या लोकसत्ताक राज्यास विरोध करण्याचा कट केल्याचा आरोप " असल्याचें कळविलें व त्यासंबंधानें तिची जबानी घेतली. या जबानींत तिनें हा आरोप नाकबूल करून त्याचें वैयर्थ्य त्या अधिकाऱ्याच्या नजरेस आणून दिलें, परंतु सध्यां पॅरिसच्या अधिकाऱ्यांची न्यायबुद्धि भ्रष्ट झालेली असल्याकारणानें तिच्या उपरोक्त निराकरणाचा कांहींच उपयोग होणें शक्य नव्हतें !

तुरुंग–तपासनीस ग्रांदप्रे याच्या कृपेमुळें मॅडम रोलंदला आपल्या बहुतेक नोकरांच्या व कांहीं मित्रांच्या भेटी घेणें सुलभ झालें. अर्थात् बॉस्स, चँपेक्यु व तिची पूर्वीची मैत्रिण मॅडम ग्रँदचँप ही मंडळी तिला वारंवार भेटावयास येऊं लागली. मॅडम ग्रँदचँप ही जेव्हां प्रथम तिला भेटण्याकरितां आली तेव्हां तिच्या पूर्वीच्या व सध्यांच्या स्थितींतील अंतर पाहून तिला रडण्याचा हुंदका आला व मॅडम रोलंदलाही तिची आपणावरील इतकी भक्ती पाहून गहिंवर आला. परंतु तिनें आपले मनोविकार दाबून ठेऊन उलट मॅडम ग्रँदचँपचेंच सांत्वन केलें ! असो; ता० २२ जून रोजी तिला आपले पति रुयेन येथें व इतर मित्र–विशेषतः बुझो हे केन येथें सुरक्षितपणें पळून गेल्याचें वृत्त समजलें. तेव्हां त्यांच्या संबंधानें तिला वाटत असलेली काळजी अंशतः दूर झाली. पॅरिसच्या कम्यूनच्या धाकामुळें तेथील लोकसभेनें या लोकांस पकडण्याचा ठराव केल्यानंतर त्यांना पॅरिसमध्यें सुरक्षितपणें राहतां येणें शक्य नव्हतें. लोकसभा इतकी दुर्बल झालेली, जनता अधिकाधिक बेहोष बनत चाललेली व सत्ताधारी रुधिरप्रिय होत चाललेले पाहून उपरोक्त जिराँदिस पुढाऱ्यांनीं तेथून पलायन केलें व त्यानंतर त्यांनीं फ्रान्सांतील इतर परगण्यांच्या साह्यानें पॅरिसच्या लोकांस ताळ्यावर आणण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यांची काय वाट झाली हें पुढें कळेलच. मध्यंतरी मॅडम रोलंदला तुरुंगांतून गुप्तपणें सोडवून नेण्याचा विचार तिच्या मित्रांनीं चालविला. या कामांत बुझो हा प्रमुख होता. त्यांचा हा बेत तिला समजतांच तिनें असला निंद्य व अपमानकारक प्रकार न करण्याबद्दलचें पत्र बुझोला पाठविलें ! याच सुमारास तिची नालस्ती करणारा कांहीं मजकूर

वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाला होता व त्यासंबंधानें तिनें तत्कालीन मुख्य प्रधान गॅरत याजकडे तक्रार केली व त्यांसच आपणांस कोणत्या आरोपावरून व कोणत्या कायद्याच्या आधारें पकडण्यांत आलें आहे तें कळवून आपली लवकर चौकशी करण्याबद्दल आग्रहाची मागणी केली. त्यावरून गॅरतनें तिचें म्हणणें 'कमेटी ऑफ पब्लिक सेफ्टी' ला कळवून त्यांचें उत्तर मागविलें; परंतु तें येण्यापूर्वींच तिला सोडून देऊन पुन्हां पकडण्याचा फार्स करण्यात आला. तिला प्रथम केलेली अटक बेकायदेशीर होती व तिजवरील वारंटावर तिच्या गुन्ह्याचाही उल्लेख नव्हता. गॅरतच्या उपरोक्त पत्राचा विचार करितांन ह्या गोष्टी अधिकाऱ्यांच्या लक्षांत आल्या तेव्हां तारीख २४ जून रोजीं तिची मुक्तता करून तिला आपल्या घरीं नेऊन पोंचविण्यांत आलें. परंतु ती घरांत जाऊन आपलें बरोबर आणलेलें सामान ठेवते न ठेवते तोंच दोन पोलीस अधिकारी तेथें आले व त्यांनीं तिला पकडण्याचें वारंट दाखविलें! हा सर्व प्रकार पाहून तिला किती विस्मय वाटला असेल व तिच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी!

प्रकरण ८ वें.

कारागृहवास व अंत!

मॅडम रोलंदला सोडून देऊन पुन्हां पकडण्याचा जो फार्स करण्यांत आला तो केवळ पूर्वींच्या पकडसमानांत असलेला बेकायदेशीरपणा दूर करण्याकरितांच होय. ह्या बेकायदेशीरपणाबद्दल तिनें लोकसभेस व मुख्य प्रधानास पत्रें लिहून सारखी हाकाटी चालविली होती; त्यामुळें तिच्या शत्रूंस हा फार्स करून तिचें तोंड बंद करणें भाग पडलें. ह्या खेपेस तिला पकडतांना मात्र कायद्याच्या बाह्य स्वरूपाकडे पूर्णपणें लक्ष देण्यांत आलें होतें. पॅरिस येथील लोकसत्ताक राज्यांशीं बेइ-

मानी करण्याच्या अथवा त्या राज्याविरुद्ध कारस्थानें करण्याच्या संशयावरुन लोकांस पकडून अटकेंत ठेवण्याचा अखत्यार ' कमेटी ऑफ पब्लिक सेफ्टी' नामक मंडळास देण्याचा कायदा लोकसभेंत पूर्वी पास झालेला वाचकांच्या स्मरणांत असेलच. त्या कायद्याअन्वयें व त्याच कमेटीच्या हुकमावरून तिला दुसऱ्या खेपेस पकडण्यात आलें होतें. अशा चमत्कारिक तऱ्हेनें आपल्या स्वातंत्र्यावर घाड घालणाऱ्या लोकांच्या स्वाधीन होऊं नये असें प्रथम तिला वाटलें व ती ज्या भागांत रहात होती त्या भागांतील सर्व लोक तिला अनुकूल असल्यामुळें त्यांच्या साह्यानें आपणास पकडावयास आलेल्या लोकांस प्रतिकार करावा असेंही क्षणभर तिच्या मनांत आलें; परंतु एकंदर परिस्थितीचा विचार मनांत आणून तिनें तसें केलें नाहीं. तिला पकडून नेल्यावर तिच्या आळींतील लोकांनीं पॅरिसच्या कम्यूनजवळ तिला सोडण्याबद्दल पुष्कळ रदबदली केली परंतु त्यांचा काहींएक उपयोग झाला नाहीं !

ह्या खेपेस मॅडम रोलंदला ' सेंत पिलेज ' नामक तुरुंगांत आणून ठेवण्यांत आलें. हा तुरुंग वाईट होता बदमाश स्त्रियांचीच तेथें विशेष भरती असून तेथील हवापाणीही चांगलें नव्हतें. ज्या ' सेप्टेंबरांतील कत्तली' बद्दल मॅडम रोलदनें तीव्र निषेध प्रगट केला होता. (त्यास ह्याच तुरुगांत प्रथमारंभ झाला होता.) अशा ठिकाणीं तिला आणून टाकल्यामुळें प्रथम कांहीं दिवस तिला खिन्नता वाटून तिची प्रकृतीही बिघडली. तिला भलभलतीं स्वप्नें पडून नीट झोंप येईनाशीं झाली. तथापि लवकरच तिनें आपली वृत्ती पुन्हां ताळ्यावर आणली व ॲबेच्या तुरुंगाप्रमाणें येथेंही लिहिण्या-वाचण्याचा व्यासंग सुरू ठेवला. परंतु ॲबेप्रमाणें येथील तिची जागा निवस्त नव्हती. तिच्या खोलीसमोर कित्येक बदमाष कैदी स्त्रिया जमून वरचेवर भांडणें करून एकमेकांवर अपशब्दांचा वर्षाव करीत. त्यामुळें तिच्या स्वास्थ्याचा वारंवार भंग होत असे व कित्येक वेळां तर असल्या लोकांच्या सहवासांत राहण्यापेक्षां मरण बरें असेंही तिला वाटे ! परंतु आपल्या चौकशीच्या वेळीं आपले पति व मित्र यांजवरील आरोपांचें खंडण करून आपल्या देशाच्या हिताच्या कांहीं धैर्यप्रचुर सूचना करण्याची आपणांस संधि मिळेल

ह्या आशेवर ती हा खेदजन्य काळ कंठीत होती. तिनें तत्कालीन प्रसिद्ध व्यक्तींचीं सार्वजनिक चरित्रें असणारा एक ऐतिहासिक ग्रंथ व आत्मचरित्र लिहिण्यास सुरवात केली होती व त्या उद्योगाच्या नादांत तिचा अनिष्ट काळ भराभर जात होता.

सेंत पिळेज येथें आल्यावर कांहीं दिवसांनीं एस् ब्यूपरेत नांवाच्या एका ओळखीच्या गृहस्थामार्फत तिला अज्ञातवासांत असलेल्या आपल्या पतीचें व मित्रांचें वर्तमान समजूं लागलें व तीहि त्याच्या मार्फत त्यांस आपलें वृत्त व विचार कळवूं लागली. हे लोक स्वतःच्यापेक्षां मॅडम रोलंदच्या स्थितीचाच विशेष विचार करीत असून तिच्या सुटकेविषयीं प्रयत्न करीत असल्याचे वृत्त त्यानें तिला कळविलें. तसेंच फ्रान्सांतील कांहीं परगण्यांचे साह्यानें सैन्य जमवून पॅरिसच्या जुलमी सत्ताधाऱ्यांचा पाडाव करण्याची योजनाही त्यांनीं चालविली असल्याचें त्यानें तिला सांगितलें. यापैकीं पहिली गोष्ट तिला पसंत नव्हती व त्याप्रमाणें तिनें ब्यूपरेतमार्फत आपल्या मित्रांस निरोपही पाठविला. पण त्यापूर्वींच मॉं. रोलंद यांनीं तिला सोडवून नेण्याचा एक धाडसी प्रयोग केला होता. ते रुयेन येथें अज्ञातवासांत असतां, त्यांस मॅडम रोलंदला सोडून नंतर पुन्हां पकडल्याची बातमी कळली. तेव्हां त्यांनीं आपली जुनी मैत्रिण (तरुणपणीं प्रथम हिचें मॉं. रोलंदवर प्रेम जडलें होतें परंतु कांहीं कारणामुळें तिजबरोबर त्यांस लग्न करतां आलें नाहीं.) हेनरियेत कॅनेत हिच्या साह्यानें आपल्या स्त्रीस सोडविण्याचा घाट घातला. यासंबंधाची हकीकत खुद्द या बाईच्याच मुखांतून एका ग्रंथकारापाशीं पुढील प्रमाणें निघालेली आहे.:—

" मी विधवा असून मला मुलेंबाळें नव्हतीं. उलटपक्षीं मॅडम रोलंदला नवरा असून तो वयोवृद्ध झालेला होता व शिवाय तिला एक सुंदर मुलगी होती. अशा स्थितींत तिच्या कुटुंबाला तिचा फार उपयोग होता. तेव्हां तिच्यासारख्या उपयुक्त मनुष्याकरितां माझ्यासारख्या निरुपयोगी मनुष्यानें आपला जीव धोक्यांत घालण्यास तयार व्हावें हें स्वाभाविक आहे. तिला माझा पोषाख देऊन तुरुंगाच्या बाहेर निघून जाण्यास सांगण्याचा व तिचा पोषाख करून तिचे जागीं आपण बस-

ण्याचा मीं निश्चय केला व त्याप्रमाणें तिला भेटून कळविलें. माझें ऐकण्याबद्दल मीं तिची पुष्कळ मनधरणी केली, डोळयांत आसवें आणून तिची करुणा भाकली परंतु हें सर्व फुकट गेलें! ती म्हणाली ' माझ्या प्रिय मैत्रिणी, ते तुला ठार मारतील व तुझ्या हत्येचें पातक माझ्या शिरावर बसेल. तुझ्यासारख्या परोपकारी स्त्रीची मजकरितां हत्या होऊं देण्यापेक्षां मला एकदां सोडून शंभरदां मरण आलें तरी बेहत्तर; असें वारंवार सांगून तिनें माझी विनंती अमान्य केल्यामुळें निरुपायास्तव मीं मोठ्या कष्टानें तिचा निरोप घेतला! त्यानंतर पुन्हां तिची व माझी गांठ पडली नाहीं."

मॅडम रोलंदनें जरी वरील स्त्रीची विनंती मान्य केली नाहीं तरी असल्या आपत्कालांत व विपरीत देशस्थितींत आपणाकरितां प्राण देण्यास तिच्यासारख्या स्त्रिया तयार झालेल्या पाहून तिला मोठें समाधान वाटलें. वरील प्रसंग घडून थोडे दिवस झाल्यावर तिच्या द्वाररक्षकाच्या स्त्रीनेंही तिची सुटका करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यासही तिनें अनुमति दिली नाहीं. आपल्यासाठीं दुसऱ्यास संकटांत लोटून देण्यास ती तयार नव्हती. शिवाय जोंपर्यंत आपण कारागृहांत आहोंत तोंपर्यंत तरी आपल्या नवऱ्यास त्यांच्या शत्रूकडून फारसा त्रास होणार नाहीं अशी तिची समजूत होती. व " माझें कांहीं झालें तरी हरकत नाहीं ते जगले पाहिजेत. म्हणजे पुढें मागें देशाला त्यांचा फार उपयोग होईल " असें ती तिच्या भेटीस येणाऱ्या स्नेह्यांजवळ नित्य म्हणत असे.

मॉं. रोलंदप्रमाणें बुझोही तिला सोडवून आणण्याची खटपट करीत होता. ती करून त्यानें संकटांत पडूं नये म्हणून तिनें कारागृहांतील आपल्या स्थितीचें पुढीलप्रमाणें गोंडस वर्णन केलें आहे:—" अॅबेपेक्षां येथील हवा बरी आहे. मला वाटेल तेव्हां माझ्या रक्षकाच्या मनोहर दिवाणखान्यांत जाऊन करमणूक करितां येते. मला भेटावयास येणाऱ्या मित्रांची गांठ मला याच ठिकाणीं घ्यावी लागते. तेथें जाण्याकरितां वाटेंतील कित्येक खराब स्त्रियांच्या खोलीवरून जाण्याचा प्रसंग येतो म्हणून मी तेथें जाण्यास फारशी धजत नाहीं. माझी स्वतःची खोलीही कांहीं वाईट नाहीं. तेथें एक खुर्ची व एक टेबल असून मला आवड-

णारीं कांहीं पुस्तकेंही आहेत. येथें मी लिहितें, वाचतें व चित्रेंही काढतें. बॉस्सकडून रोज मजकडे फुलें येतात त्यानें माझ्या खोलींत सर्वत्र सुगंध पसरलेला असतो. समोर तुमचें चित्रहि मीं काढून ठेवलें आहे. याप्रमाणें माझा काल बरा चालला आहे, माझी सुटका करण्याकरितां वाम मार्गाचें अवलंबन करूं नका. माझी सुटका होणें असेल तर परिस्थितींत सुधारणा होऊन ती उघडपणेंच झाली पाहिजे. व जरी आज परिस्थिति सर्वत्र प्रतिकूल असलेली दिसत आहे तरी त्यांत कालेकरून सुधारणा होणार नाहीं, असें अद्याप मला वाटत नाहीं."

जुलई महिना अर्धाअधिक गेल्यावर मॅडम रोलंदला ह्या तुरुंगांतही ग्रांदप्रेच्या मेहरबानीनें शक्य तितक्या सवलती मिळाल्या. तेथील वार्डरची बायको तर तिला आपल्या घरांतील स्त्रियांप्रमाणें समजून हरएक प्रकारें तिच्या उपयोगीं पडूं लागली. 'तिच्या सहवासांत असतां मी कैदी आहे हें मी सहज विसरून जातें' असें तिनें आपल्या मित्रास लिहिलें. येथें तिचें लिहिण्याचें कामही निर्वेधपणें चालू होतें.

इकडे जिरॉंदिस पक्षाचे जे लोक पळून जाऊन इतर प्रांतांच्या साह्यानें पॅरिसवर स्वारी करण्याच्या उद्योगांत होते त्यांना त्या कामीं अपेश येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्यांचा मुख्य भरंवसा बिंपेन नामक सेनापतीवर होता; परंतु त्याच्या वागणुकीचा संशय घेण्यासारखीं कांहीं कृत्यें त्याच्या हातून घडलीं. तसेंच नॅशनलगार्डांचे लोकांनींही या लोकांस येऊन मिळण्याचीं जीं आश्वासनें दिलीं होतीं त्याप्रमाणें वागण्याचें धैर्य त्यांच्याकडून होईना. एकंदरींत, जुलईअखेर जिरॉंदिस लोकांना निराश होऊन पॅरिसवर चाल करून जाण्याचा नाद सोडून द्यावा लागला. मध्यंतरीं एका माथेफिरू स्त्रीनें 'मारात' चा खून केला. मारात हा दँतनरॉबिस्पियरच्या कूटांतला अग्रणी होता. त्याचा अकस्मात खून झाल्यामुळें जॅकोबिन्स लोक फार खवळले व त्यांनीं त्याबद्दल आपल्या विरुद्ध पक्षाच्या लोकांवर जास्तच आग पाखडण्यास सुरवात केली. जिरॉंदिस लोकांचे पॅरिसला ताळ्यावर आणण्याचे प्रयत्न फुकट गेलेले पाहून मॅडम रोलंदला आपल्या देशाच्या भविष्यकाळाबद्दल निराशा वाटू लागली, तथापि हताश न होतां तिनें या लोकांस तूर्त अमेरिकेंत पळून जाण्याची

सूचना केली. परंतु ती अंमलांत आणणें शक्य नव्हतें. ह्या लोकांस सरहद्दा पकडण्याचा ठराव पूर्वीच झालेला असल्यामुळें त्यांना उघडपणें देशांतर करतां येण्याजोगें नव्हतें. गुप्तपणें करावें तर त्यांच्या हालचालींवर कडक नजर ठेवण्यांत आली होती. भारातच्या खुनानंतर तर ह्या लोकांपैकीं २२ ठळक पुढाऱ्यांस तत्काळ पकडण्यांत आले. मॉ. रोलंद व बुझो हे मात्र अखेरपर्यंत अधिकाऱ्यांच्या हातीं लागले नाहीत ! ज्याचा संशय येईल त्यास पकडून अटकेंत ठेवण्याचा व क्रांतिकारक मंडळाच्या न्यायासनासमोर त्याची झटपट चौकशीकरून त्यास देहांतशासन देण्याचा क्रम झपाट्यानें सुरू झाला ! आरोपीची फक्त एकदां जबानी घेऊन त्याजवरील आरोपाचा निकाल तडकाफडकी होऊं लागला. उलटतपासणी, सरकारी वकीलाचे भाषणास प्रत्युत्तर वगैरे नेहमींचे रिवाजास संक्षेप मिळूं लागला ! आणि अशा रितीनें आपणास वावडे असलेले लोक जगांतून नाहींसे करण्याचा, जॅकोबिन्स पक्षाच्या सत्ताधारी लोकांनीं, धूमधडाका चालविला ! ही हकीकत कळतांच मॅडम रोलंदचें हृदय विदीर्ण झालें व तिला सर्वत्र अंधार व निराशा दिसूं लागली ! लोकस्वातंत्र्याकरितां जो झगडा आरंभीं तिनें व तिच्या मित्रांनीं सुरू केला त्याचे असे धिंडवडे होऊन अखेर देशाची दुर्दशा होण्याचा समय आलेला पाहून तिला अतोनात वाईट वाटलें ! स्वदेशाच्या भावीस्थितीविषयीं तिला मोठी चिंता उत्पन्न झाली. तिची ही चिंता निराधार नव्हती. खरोखरच फ्रान्सची स्थिती या वेळीं फार चमत्कारिक झालेली होती. पॅरिसचें सरकार पक्षाभिमानानें मदांध होऊन नित्य अनेक निरपराधी लोकांच्या रक्तानें आपले हात विटाळीत होतें. लाव्हेंदी प्रांतांत बंडाळी सुरू होती; देशाच्या सरहद्दीवर परराष्ट्रांचीं सैन्यें फ्रान्सवर झडप घालण्याकरितां सज्ज होऊन राहिलीं होतीं ! अशा स्थितींत पुढें नेपोलियनसारखा वीर उदयास न येता तर फ्रान्सची खरोखरच वाताहात झाली असती. नेपोलियनच्या उदयामुळें फ्रान्सची देश ह्या नात्यानें अब्रू वांचली व पुढें थोडीशी वाढलीही; परंतु लोकस्वातंत्र्य हा जो तेथील मूळ क्रांतिकारकांचा हेतु तो कांहीं सिद्धीस गेला नाहीं. उलट त्याबाबतींत नेपोलियनच्या

कारकीर्दींत पुष्कळशी पिछेहाटच झाली! क्रांतिकारक लोकांच्या अत्याचारांचें व अविचारीपणाचें हें फळ होय!

त्याचसुमारास, मॅडम रोलंदनें लिहिलेल्या ऐतिहासिक चरित्र ग्रंथाचा नाश झाल्याची बातमी तिला समजली. जिरँदिस पुढाऱ्यांना पकडण्यापूर्वीं एकाजवळ तिनें ह्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत रक्षणार्थ दिली होती. पुढें त्याच्यावर जेव्हां अनिष्ट प्रसंग आला व त्याच्या कागदपत्रांची झडती सुरू झाली तेव्हां त्यानें हें हस्तलिखित पत्र अग्निमुखांत टाकून दिलें*! हें वृत्त ऐकून तिचा बराच मनोभंग झाला; तथापि हताश न होतां तिनें आपल्या आत्मचरित्राचें काम अधिक जोरानें चालू ठेवलें. या प्रकारानंतर तुरुंग तपासनीस ग्रांदप्रे याजवरही मारातचा खून करण्याच्या कटांत सामिल असल्याचा संशय येऊन त्यांना पकडण्यांत आलें. त्यावेळीं मॅडम रोलंदनें आपल्या एका मित्रास देण्याकरितां त्याजपाशीं दिलेलें एक पत्र होतें. परंतु सुदैवानें तें नाहींसें करण्याचें कामांत त्यास यश आल्यामुळें त्यांचा बचाव झाला. पुढें सदर आरोपांतून त्यांची मुक्तता होऊन ते पुन्हां आपल्या कामावर रुजू झाले. परंतु यापुढें सावधपणानें वागणें भाग असल्यामुळें मॅडम रोलंदची व त्यांची गांठ फार क्वचित पडत असे. तसच आतां मॅडम रोलंदला तुरुंगांत मिळालेल्या सवलतही सरकारी हुकमावरून काढून घेण्यांत आल्या व एकाद्या सामान्य कैद्याप्रमाणें तिला वागविण्यांत येऊं लागलें. परंतु स्वतःच्या सुखदुःखासंबंधानें ती बेफिकीर असल्यामुळें तिला त्याबद्दल कांहीं वाटलें नाहीं. तिचें लक्ष आतां जिरँदिस पुढाऱ्यांच्या चौकशीकडे लागून राहिले होतें. ह्या चौकशीस प्रारंभ झाला होता व त्याप्रसंगीं तिची साक्ष होणार असल्याचेंही तिला कळलें होतें. आपणास साक्षीस केव्हां बोलावतात याची ती अगदीं वाट पहात होती. कारण त्यावेळीं आपल्या मित्रांच्या रक्षणार्थ पुष्कळ सत्य गोष्टी आपणांस निर्भयपणें सांगता येतील व त्यायोगानें जरी सध्यां त्यानां न्याय मिळाला नाहीं तरी इतिहास व भावी पिढी यांच्या दृष्टीनें ते खास निर्दोषी ठरतील अशी तिची भावना होती. जिरॉदिस पुढाऱ्यांना त्यांचे

---

* सुदैवानें हा सर्व ग्रंथ न जळतां त्यांतील शेवटचा कांहीं भाग मात्र जळला व बाकीचा भाग तसाच राहिला. तो पुढें कांहीं कालानें छापून प्रसिद्ध झाल.

चौकशीचे वेळीं कोणाचें साह्य होऊं नये म्हणून सबंध जिरॉंदिसपक्षास कायद्यानें देशद्रोही ठरविण्यांत आलें होतें. अर्थात ह्या पक्षाचा जो कोणी असेल त्यास धरून अटकेंत टाकण्याचा मार्ग मोकळा झाल्यानें त्या पक्षांतील जे लोक अद्याप अधिकाऱ्यांच्या तावडींत सापडले नव्हते तें सर्व पळून गेले व कांहींनीं मतांतरही केलें ! हें ऐकून मॅडम रोलंदला फारच उद्विग्नता वाटली. पुढें ता० २४ आक्टोबर रोजीं तिची साक्ष घेण्यांकरितां तिला कोर्टांत नेलें. परंतु ती न घेतांच तिला पुन्हां परत आणलें व तारीख ३० आक्टोबर रोजीं जिरांदिस पक्षाच्या २२ पुढाऱ्यास देहांतशासनाची शिक्षा फर्मावण्यात आली ! तेव्हां मात्र मॅडम रोलंदची सर्वतोपरी निराशा होऊन तिला आपल्या जीविताचा कंटाळा वाटूं लागला ! अशा स्थितींत जगण्यापेक्षां मरण बरें असें वाटून तिनें आपल्या एक दोन मित्रांस आपणास विष पाठवून देण्याची विनंती केली. परंतु तसें करणें त्यावेळीं सोपें नसल्यामुळें तिची विनंती मान्य करण्यास कोणी धजेना. आपल्या मित्रांना झालेली शिक्षा ऐकतांच तिच्या अंतःकरणास जो धक्का बसला त्यामुळें ती आजारी पडली. या वेळा तिनें आपल्या एका मित्रास लिहिलेल्या पत्रांत आपणांस काळजाचा विकार झाला असून त्यांतून आपण वांचणार नाहीं, असें लिहिलें आहे. शिक्षा झालेल्या २२ पुढाऱ्यांपैकीं एकानें कोर्टांतच आत्महत्या केली व बाकीच्यांचा ता. ३१ आक्टोबर रोजीं गिलॉटिन नामक यंत्राच्या साह्यानें शिरच्छेद करण्यांत आला ! ही बातमी मॅडम ग्रँद्र चँमच्या द्वारें मॅडम रोलंदला समजली ! ती ऐकतांच तिला रडें कोसळलें ! तिची ती अवस्था पाहून मॅडम ग्रँद्चँपलाही रडयाचा हुंदका आला ! तेव्हां मॅडम रोलंद आपले मनोविकार दाबून तिला म्हणाली " माझ्या देशाच्या दुर्दैवाबद्दल मला खेद वाटला आणि त्यामुळें मला रडें आलें. माझ्या मित्रांकरितां रडून दौर्बल्य व्यक्त करणें इष्ट नाहीं, ते स्वातंत्र्याकरितां बळी पडले आहेत. माझा रस्ताही आतां ठरल्याप्रमाणें आहे. मी लवकरच त्यांच्या सहवासास पात्र आहें, हें दाखवून देईन."

जिरॉंदिस पुढाऱ्यांचा शिरच्छेद झाला त्याच दिवशीं मॅडम रोलंदला सेंत पिलेजच्या तुरुंगातून काढून 'कॉन्सरगिरी' नामक तुरुंगांत

आणून ठेवलें, या तुरुंगांत पुष्कळ मोठमोठे लोक कैदी होऊन पडले होते. त्यांत पूर्वी क्रांतिकारक न्यायमंडळाचा सभासद असलेलाही एक गृहस्थ होता. तसेंच पूर्वी राजपक्षाचे असलेलेही कांहीं लोक होते. त्यांच्या सहवासांत मॅडम रोलंदचा काल बरा चालला होता. तिची स्वतःची चौकशीही तारीख १ नोव्हेंबरपासून सुरू झाली होती. त्यामुळें मित्रांच्या चौकशीच्या वेळीं साक्षीच्या रूपानें सांगून टाकावयाच्या गोष्टी या प्रसंगीं सांगतां येतलि अशी तिला आशा वाटूं लागल्यामुळें ती आपली खिन्नता बाजूस सारून स्वतःच्या खटल्याची तयारी करूं लागली. तारीख १ नोव्हेंबर रोजीं तिची प्राथमिक चौकशी झाली. त्यासंबंधानें तिनें आपल्या मित्रांस पुढील हकीकत कळविली आहे:—

"माझ्या उत्तरांची नोंद करून ठेवण्यासंबंधानें मला पुष्कळ वाद घालावा लागला. ते क्षणोक्षणीं माझ्या बोलण्यास अडथळा करीत होते. त्यांच्या प्रश्नांस नुसतें 'होय' किंवा 'नाहीं' एवढेंच उत्तर मी द्यावें असें त्यांचें म्हणणें होतें. त्यांच्या एकंदर धोरणावरून माझा नाश करण्याचा त्यांचा ठाम बेत ठरलेला दिसतो. मी माझ्या अब्रूस अथवा योग्यतेस कमीपणा आणणारें वर्तन करून जगण्याची इच्छा धरीत नाहीं हें जरी खरें तरी सरकारी आक्षेपकांना सहज चुटकीसरसा माझा निकाल करूं देण्यास मी तयार नाहीं."

ह्या प्राथमिक चौकशीच्या स्वरूपावरून आपणावर कोणता आरोप ठेवण्यांत येईल याचा तिला अंदाज करितां आला व त्याचें निराकरण करण्याच्या हेतूनें तिनें पुढील लेखी जबानी तयार करून क्रांतिकारक न्यायमंडळास सादर केली:—

"देशद्रोही गणलेल्या लोकांची मी साथिदार आहें असा मजवर आरोप करण्यांत आला आहे. परंतु त्यांपैकीं कांहीं लोकांशीं माझा सख्यत्वाचा असलेला संबंध फार पुरातन, म्हणजे ज्या गोष्टीवरून त्यांना देशद्रोही मानण्यात आलें आहे, त्या घडून येण्यापूर्वीचा आहे. त्यांनीं पॅरिस शहर सोडल्यापासून त्यांच्यांशीं माझा जो पत्रव्यवहार झालेला आहे तो अगदीं खासगी आहे. वास्तविक पहातां राजकारणासंबंधीं कसलाही उलाढालीचा पत्रव्यवहार मीं केलेला नाहीं व त्या बाबतींत स्पष्ट नाक-

बुली देण्यापेक्षां जास्त कांहीं सांगण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. माझ्या विवक्षित स्नेहसंबंधाचा खुलासा मागण्याचा कोणास अधिकार नाहीं. या स्नेहसंबंधाबद्दल अभिमान बाळगिण्याच्या मला हक्क आहे व तसें करण्यांत मला आनंद वाटतो. मी कांहींही छपवूं इच्छित नाहीं. मी हें कबूल करितें कीं, मजवर आलेल्या प्रसंगाबद्दल खेद व्यक्त करणारा व मजकारितां ध्यूपरेतच्या स्वाधीन दोन पत्रें केलीं आहेत अशा अर्थाचा निरोप मला तुरुंगांत आला होता. हीं पत्रें माझ्या एक किंवा दोन मित्रांनीं, पॅरिस सोडण्यापूर्वीं किंवा नंतर लिहिलीं हें मला कळण्यास मार्ग नाहीं. कारण ध्युपरेतनें तीं दुसऱ्याच्या स्वाधीन केलीं व तीं माझ्या हातीं आलीं नाहींत. दुसऱ्या एका प्रसंगीं मला बंधमुक्त करून पाहिजे तिकडे नेण्यास तयार असल्याबद्दलची व मी ह्या बेतास संमति द्यावी म्हणून आग्रहाची विनंति (मित्राकडून) करण्यांत आली होती हेंही, खरें आहे. परंतु स्वाभिमान व कर्तव्य या गोष्टीकडे लक्ष देऊन मी ती विनंति नाकारिली. कर्तव्य असें कीं, माझ्या पळून जाण्यानें माझ्या रक्षकांच्या प्राणावर संकट येणार; तेव्हां तसें होऊं देणें हें नीतिदृष्ट्या अयोग्यच. अशा पळपुटेपणापेक्षां अन्याय व संशय यांस बळी पडणेंच मला जास्त श्रेयस्कर वाटलें. मी जी अधिकाऱ्यांच्या स्वाधीन झाले, ती मागून पळून जाण्याकरितां नव्हे. आतां, हें खरें कीं, जर माझा बाहेरच्या जगाशीं संबंध तोडण्यांत आला नसता तर माझ्या मित्रांचें काय झालें, याबद्दल मी मोठ्या उत्सुकतेनें चौकशी केली असती. असें करण्यास मनाई करणारा एकही कायदा असेल असें मला वाटत नाहीं. बांधवाभिनंदन व बंधुप्रीति या मनुष्यांचा परस्परांशीं संयोग घडवून आणणाऱ्या भावनांना चिकटून राहणें, हा कोणत्या युगांत व कोणत्या राष्ट्रांत गुन्हा मानिला आहे ?

ज्या लोकांना गुन्हेगार मानलेलें आहे त्यांच्या सर्व कृतींचा बरेवाईटपणा ठरविण्याच्या भानगडींत मी पडत नाहीं. परंतु त्यांच्या प्रामाणिकपणाविषयीं व स्वदेशाभिमानाविषयीं माझी पूर्ण खात्री असल्यामुळें त्यांच्यावर वाईट हेतूचा आरोप केल्यास त्यावर माझा केव्हांही विश्वास बसणार नाहीं. जर त्यांच्या कांहीं चुका झाल्या असतील तर त्या

नकळत, जाणूनबुजुन नव्हे, झाल्या असतील. कोणत्याही प्रकारचा काळिमा न लागतां ते प्रतिपक्षाच्या जुलमास बळी पडले आहेत आणि त्यासंबंधानें त्यांना कोणताही दोष न देतां ते केवळ दुर्दैवी आहेत असेंच मी मानतें त्यांची कीर्ति अजरामर होईल याबद्दल मला शंका वाटत नाहीं. आणि त्यांच्या शत्रूंकडून होणाऱ्या हल्लयांत सांपडण्याचा मान मी मोठ्या संतोषानें स्वीकारतें. त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप करण्यांत आला आहे. परंतु मला पक्कें माहित आहे कीं, ते तेथील लोकसत्ताक राज्याचे खरे मित्र व कट्टे अभिमानी होते. त्यांच्या अंगीं मानुष्य असल्यामुळें हें राज्य टिकण्यास चांगल्या कायद्यांची व सुव्यवस्थेची जरूर आहे असें त्यांना वाटत होतें. ठार मारण्यापेक्षां तडजोड करून लोकांस आपल्या बाजूस वळविणें हें काम फार बिकट आहे. प्रत्येक युगाचा इतिहास पाहिला तर दूरदर्शीपणानें लोकांस सद्‌गुणाकडे वळविण्यास अपरिमित चातुर्य लागतें; परंतु त्यांच्यावर जुलूम करून त्यांचा नाश करण्यास नुस्ती दंडेली बस् होते, असें दिसून येईल. राज्यपद्धति जर समन्यायी, संरक्षक, व उपकारक अशी असेल तरच सुबत्ता व सुख यांचा लाभ होतो; बंदुकीच्या धाकानें भीति उत्पन्न करतां येईल; पण त्यापासून अन्न उत्पन्न करतां येणार नाहीं, असे उद्गार काढतांना त्यांना मीं वारंवार ऐकिलें आहे. तसेंच लोकांची खुषामत करण्याच्या प्रवृत्तीचा निषेध व त्याग करून त्यांच्या खऱ्या कल्याणाविषयीं मोठ्या उत्साहानें झटतांनाही मीं त्यांना पाहिलेलें आहे. त्याचप्रमाणें लोकांच्या भ्रामक समजुतींस प्रोत्साहन अथवा पुष्टी देण्यापेक्षां त्यांस स्वतः बळी पडलेलें पुरवलें अशा तऱ्हेचा त्यांचा बाणा होता, हेंही मला ठाऊक आहे. त्यांचीं हीं मतें व वागणुक जुलमी व लोकांना आपल्या अंकित करण्यास्तव त्यांची खुषामत करणाऱ्या महत्त्वाकांक्षी लोकांच्या स्वार्थपर मनोगताहून अगदीं भिन्न प्रकारचीं आहेत, हें मला कबूल आह. परतु त्यामुळेंच त्यांच्याविषयीं माझ्या मनांत अतोनात आदर उत्पन्न झाला व ही जर माझी चूक असेल तर ती मला सुखेनैव वधस्थानाकडे नेवो ! ज्यांच्या सहवासांत शेवटचा क्षण घालविण्याची मला मनाई—करण्यांत आली त्या थोर महात्म्यांच्या मागोमाग जाण्यास मला भूषणच

वाटेल. माझी ही जबानी मजपेक्षा, ज्यांना सत्याची व न्यायाची विशेष चाड असेल त्यांना जास्त महत्वाची आहे. स्वकर्तव्य केल्याच्या जाणिवे-मुळें संतुष्ट व शांत होत्साती माझी आत्मज्योती भावी कालाकडे प्रशांत-पणें पहात राहील. माझा गंभीर स्वभाव व विद्याव्यासंग यानीं मला दुर्व्यसनें व कृष्णकारस्थानें यांपासून अलिप्त ठेविलें आहे. इतिहासाच्या मननानें लोकस्वातंत्र्याची खरी महती कळून आल्यामुळें त्यावर माझें प्रेम जडलें आणि त्याप्रीत्यर्थ सुरू झालेल्या राज्यक्रांतीच्या चळवळींत मी आनंदानें सामिल झालें. कारण ज्या गरीब लोकांची दीन स्थिती मी पाहिली होती तिचा ह्या क्रांतीमुळें शेवट होऊन त्यांना चांगले दिवस येतील असें मला वाटलें. क्रांतिकारक चळवळींत माझें लक्ष गढून गेलें व सार्वजनिक प्रश्नासंबंधानें मी उत्साहपूर्वक चर्चाही केली हें खरें; परंतु तसें करितांना मीं आपल्या स्त्रीजातीची मर्यादा उल्लंघिली नाहीं. थो-डीशी बुद्धिमत्ता, कांहींसें तत्वज्ञान-प्राविण्य, असाधारण प्रकारचें थोडेसें धैर्य, कीं ज्यामुळें संकटप्रसंगीं मी आपल्या पतीचें सामर्थ्य कमी होऊं दिलें नाहीं-हेच काय ते माझ्या अंगचे गुण असून मला ओळखणाऱ्या लोकांनीं त्यांची अतिशयोक्ति केलेली आहे. व त्या अतिशयोक्तीमुळेंच मला न ओळखणाऱ्या जनसमूहांत मला शत्रू उत्पन्न झालेले आहेत. मॉ. रोलंद ह्यानीं कधीं कधीं मला आपल्या चिटणीसाचें काम करावयास सांगितलें होतें व त्यांच्या पहिल्या कारकीर्दीच्या शेवटीं राजास त्यांनीं पाठविलेलें प्रख्यात पत्र माझ्याच हातचें आहे. जर ऑस्ट्रीयन लोकांनीं माझी चौकशी सुरू केली असती व त्यांना जर मंत्र्याची जबाबदारी त्यांच्या स्त्रीवर टाकणें इष्ट वाटतें, तर मजवरील गुन्ह्याच्या यादींत त्या बाबीचा त्यांना प्रमुखपणें समावेश करितां आला असता. परंतु फ्रेंच कायद्यान्वयें तो गुन्हा होईलसें मला वाटत नाहीं. शिवाय मी जरी त्यांच्या चिटणीसाचें काम केलें तरी तेवढ्यानें त्यांच्या सर्व कृत्यांचें सूत्र-चालकत्व मजकडेच येतें असें नाहीं. ते स्वतः कांहीं कमी विद्वान अथवा अल्प कर्तबगारीचे पुरुष नव्हते. १५ वर्षांत त्यानीं अर्थशास्त्रासंबंधानें जे अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत त्यांवरून त्यांची योग्यता जगजाहीर झालेली आहे. त्यांच्या कारकीर्दींचें व त्यानीं केलेल्या प्रत्येक कृत्याचें

सूक्ष्म निरीक्षण केलें तर त्यांच्या कर्तव्यदक्षतेविषयीं य प्रामाणिकपणाविषयीं कोणाचीही खात्री होण्यासारखी आहे.

आतां, मजवर करण्यांत आलेल्य आरोपासंबंधानें माझें असें म्हणणें आहे कीं, ब्रूपरतेचें व माझें सख्य कधींच नव्हतें. मॉ. रोलंदच्या कारकीर्दींत मीं त्याला कित्येकदां पाहिलें आहे इतकेंच. त्यानीं राजिनामा दिल्यानंतर तो आमच्या घरीं कधींही आला नाहीं. बाकीच्या सभासदांसंबंधानें व मित्रासंबंधानेंही वरील शेवटचें विधान करितां येईल. ब्रूपरेत यास लिहिलेल्या माझ्या पहिल्या पत्रावरून असें उघड होत आहे कीं, त्याला जें मीं लिहिलें तें केवळ दुसऱ्या कोणास लिहिणें—त्यांचे पत्ते व निवासस्थान ठाऊक नसल्यामुळें—शक्य नसल्यामुळेंच, होय. तेव्हां त्याच्याशीं माझा जो पत्रव्यवहार झाला त्याचा विपरीत अर्थ करतां येणार नाहीं व त्याचा संबंध भलतीकडेच जोडतां येणार नाहीं. त्याच्या व माझ्या दरम्यान पूर्वीं कांहीं बेत ठरून त्या अनुरोधानें हा पत्रव्यवहार झाला आहे असें मानतां येणार नाहीं. त्या पत्रव्यवहाराचा फक्त एकच उद्देश होता व तो हाच कीं, माझ्या गैरहजर असलेल्या कित्येक मित्रांची हकीकत कळण्याचा मार्ग मला कळावा. राजकारणाच्या बाबींशिवाय इतर कारणांमुळें ह्या लोकांशीं माझा स्नेहसंबंध जडलेला होता आणि त्यांच्या गैरहजिरीच्या कालांत प्रारंभीं त्यांच्याशीं माझा जो पत्रव्यवहार झालेला आहे त्यांत आक्षेपार्ह असा मजकूर मुळींच नाहीं. यासंबंधांत मजविरुद्ध लेखी पुरावा काडीमात्रही नाहीं. जे कागदपत्र पुराव्याकरितां पुढे आले आहेत त्यांवरून देशद्रोही गणलेल्या लोकांचीं मतें व भावना हीं मला पसंत होतीं एवढेंच फार तर सिद्ध होईल. ही गोष्ट विशेष महत्वाची आहे. पुराव्याच्या ह्या अभावसूचक स्वरूपाबद्दल मला अभिमान वाटतो. त्याच्या द्वारें सिद्ध होणारी वरील गोष्ट मीं कबूल करितें. ती कबूल करण्यांतही मला एक प्रकारें अभिमानच वाटतो. त्यांच्या व माझ्या विचारांचें जरी ऐक्य असलें तरी मी आपलमत गुन्ह्याच्या सदराखालीं येण्यासारखें अथवा ज्यामुळें दंगाधोपा उद्भवेल अशा रीतीनें कधींही व्यक्त केलेलें नाहीं. कोणत्याही कारस्थानांत साथिदाराचें काम करणें असेल तर त्यासंबंधानें सल्लामसलत तरी दिली

पाहिजे अथवा तें घडवून आणण्याचीं साधनें तरी पुरविलीं पाहिजेत. मीं ह्या दोहोंपैकीं कांहींही केलेलें नाहीं. अर्थात् मला कोणत्याही कायद्यान्वयें दोषी ठरवितां येणार नाहीं.

मला माहीत आहे कीं, क्रांतीच्या काळांत कायदा व न्याय यांना घाब्यावर बसविण्यांत येतें. मजवरील खटला हें त्याचेंच प्रत्यंतर आहे. मोठमोठ्या चळवळीच्या काळांत मत्सरग्रस्तपणामुळें जीं भयंकर वितुष्टें उत्पन्न होतात—आणि ज्यांचा सर्व मारा प्रसिद्ध, कर्तबगार, बाणेदार आणि सत्वशील लोकांवरच होतो—त्यांपासूनच माझ्या खटल्याचा उगम झालेला आहे. ह्या खटल्यांत मला होणारी शिक्षा टाळणें हें माझ्या धैर्याच्या आटोक्यांतील काम होतें, परंतु ती टाळण्यापेक्षां ती भोगणेंच मला जास्त श्रेयस्कर वाटलें म्हणून मीं ती टाळण्याचा प्रयत्न केला नाहीं. सत्याकरितां व स्वमताकरितां प्राण खर्ची घालून देशाला उदाहरण घालून द्यावें हेंच मला अधिक बरें वाटलें. जर मला देहांतशिक्षा देण्यांत आली तर, जिचा मोठा अपराध म्हणजे अंगीं थोडीशी बुद्धिमत्ता—जिचा कधींही दुरुपयोग करण्यांत आला नाहीं—असणें, दुर्दैवानें संकटांत सांपडलेल्या मित्राविषयीं सहानुभूति दाखविण्याचें धारिष्ट करणें, आणि प्राणाचीही पर्वा न करितां सद्‌गुणांस चाहणें, हाच होय; अशा एका स्त्रीला बळी देण्याचें पातक प्रचलित जुलमी सत्तेच्या माथीं ठेवून जावें हेंच मला विशेष प्रशस्त दिसतें. जीं मनें थोर असतात त्यांना आपल्या प्रांतांतून स्वार्थपर विचारांना हाकून लावण्याचें सामर्थ्य असतें. अशा विभुतींना असें वाटत असतें कीं, आपण सर्व मानवी जातीचे मित्र आहों. त्यांचें लक्ष भविष्य कालाकडे विशेष असतें व त्यांचीं मतें आणि विचार हीं त्या कालास अनुलक्षून प्रदर्शित होत असतात. निष्कारण छळ होत असलेल्या एका सद्‌गुणी गृहस्थांची मी स्त्री आहें. मत्सरयुक्त द्वेष व भ्रामकपणा यांनीं अंध झालेल्या सामान्य प्रतीच्या माणसांनीं देशद्रोही ठरविलेल्या थोर लोकांची मी मैत्रिण असल्यामुळें मजवरही त्यांच्या रोषास बळी पडण्याची पाळी यावी हें रास्तच आहे. कारण जुलमी सत्तेचा हा नियमच आहे कीं, ज्यांना तिनें फार गांजलें असेल त्यांचे बळी घेऊन आपल्या दुष्कृत्यांचें साक्षीदार नष्ट करावयाचे. ह्या

दोन्ही दृष्टीनीं पहातां तुमच्या हातून मरण्याचा हक्क पोचतो व तुम्ही तो प्रसंग मजवर आणाल अशी माझी खात्री आहे. जेव्हां निरपराधी मनुष्याला अन्याय व जुलूम यांच्या हुकुमावरून वधस्तंभाकडे नेण्यांत येतें तेव्हां त्याचें पुढें पडणारें प्रत्येक पाऊल भव्य व दुर्भेद्य अशा कीर्तिमंदिराचा मार्ग आक्रमित असतें ! पक्षभेदाच्या तीव्र क्षोभास माझा देह हा शेवटचाच बळी होवो ! न्यायप्रिय लोकांचे रक्त प्राशन करणारी व सद्‌गुणांच्या चहात्यांना गिळून टाकणारी ही दुर्दैवी भूमि (इहलोक) मी मोठ्या आनंदानें सोडीन !

अंतःकरणापासून मला जीव कीं प्राण असणाऱ्या सत्य, मैत्री, स्वदेशभक्ति, स्वातंत्र्यप्रेम आदिकरून पवित्र भावनांनो ! माझा हा शेवटचा आत्मत्याग स्वीकारा ! माझें सर्व आयुष्य तुम्हांस वाहिलेलें होतें, तेव्हां तुम्ही माझा मृत्यु सुखकर व कीर्तिदायक करालच ! न्यायप्रिय स्वर्गस्थ देवतांनो ! ज्यांना स्वातंत्र्य मिळावें म्हणून मीं धडपड केली त्या ह्या दुर्दैवी लोकांना शहाणे करा ! स्वातंत्र्य हें थोर मनाच्या व मृत्यूस तुच्छ मानून प्रसंगीं कर्तव्यदक्ष असणाऱ्या लोकांसच योग्य आहे. दुर्बल, गुन्हेगारीस प्रवृत्त होणाऱ्या अथवा त्यांत सामील असणाऱ्या आणि स्वार्थी व भेकड मनोवृत्ती दूरदर्शीपणाच्या नांवाखालीं छपविणाऱ्या लोकांस तें योग्य नाहीं. तसेंच तें नितिभ्रष्ट कपाळकरंट्यांना व उल्लू, कंगाल, बुभुक्षित आणि रुधिरप्रिय अशा खुनशी लोकांनाही योग्य नाहीं. लोकसमूहाचा जो भाग माणुसकीला चहातो, न्यायानें वागतो, खुशामतीचा तिरस्कार करितो आणि सत्याला मान देतो, तोच तेवढा स्वातंत्र्यास पात्र असतो. माझ्या नागरिक बंधूनो ! जोंपर्यंत तुमच्या अंगीं वरील गुण येणार नाहींत तोंपर्यंत स्वातंत्र्याकरितां चाललेली तुमची धडपड व्यर्थ आहे ! तुमच्या हल्लींच्या स्थितींत स्वातंत्र्याऐवजीं बेबंदशाही तुमच्या वांट्यास येईल व तिला तुम्ही एकामागून एक सारखेच बळी पडाल. तुम्ही अन्न मागाल पण तुम्हांस मृतांचे देह (शवें) देण्यांत येतील ! आणि सरतेशेवटीं तुम्हांला स्वतःच्या मानाही त्या बेबंदशाहीच्या चरकाखालीं वांकवाव्या लागतील ! या ठिकाणीं मीं आपलें मनोगत अथवा मतें यांपैकीं कांहींही छपविलेलें नाहीं. एका रोमन स्त्रीला आपल्या

मुलाच्या मृत्यूविषयीं खेद प्रदर्शित केल्याच्या आरोपावरून फांशी देण्यांत आलें होतें हें मला ठाऊक आहे. तसेंच लोकभ्रमाच्या व पक्षाभिमानाच्या तीव्र चळवळींत अपराधी ठरलेल्या लोकांशीं मित्रत्वानें वागण्याचें जो कोणीं धैर्य दाखवील त्याची अपराध्याप्रमाणेंच वाट लागते हेंही मी जाणून आहें. परंतु मला मृत्यूचें भय वाटत नाहीं. गुन्ह्याव्यतिरिक्त (अनीतिमूलक) इतर कोणत्याहि गोष्टीचें मीं आजवर भय बाळगलें नाहीं आणि अपमानास्पद अशा कोणत्याही उपायानें अथवा युक्तीनें आपला जीव वांचविण्यास मी तयार होणार नाहीं. ज्या कालांत व ज्या लोकांत पायमल्ली केलेल्या सत्याविषयीं सहानुभूति व कळकळ व्यक्त करणें भयावह होतें त्या कालाला व त्या लोकांना धिःक्कार असो! अशा समयीं प्राप्त होणारें दुःख धैर्यानें भोगण्यास जो समर्थ होईल तो खरोखरच सुखी (भाग्यवान) समजला पाहिजे."

"झालें, मला जें सांगावयाचें होतें तें मीं सांगितलें. आतां, पुराव्याशिवाय व कायद्याच्या आधाराशिवाय केवळ मताच्या जोरावर मला दोषी ठरवून तुमचें काम भागतें कीं काय हें पहाणें सर्वस्वी तुमच्याकडे आहे."

याप्रमाणें मॅडम रोलंदनें आपली जबानी सादर केल्यानंतर तिच्या घरच्या नोकरांच्या व इतर कांहीं साक्षी घेण्यांत आल्या; परंतु त्यांत तिच्याविरुद्ध असें फारसें कांहीं निष्पन्न झालें नाहीं. तथापि त्यामुळें तिची सुटका होणें शक्य नव्हतें. तिचा इंग्रजी चरित्रकार म्हणतो "तिचें मरण ठरलेलें होतें, सूर्यप्रकाशाइतका स्पष्ट जरी तिचा निरपराधीपणा दिसून येता तरीही तिची सुटका होण्याचा संभव नव्हता. जिराँदिस पक्षाचीं मतें तिला पसंत होतीं व त्या पक्षांतील ती एक प्रमुख कर्तबगार स्त्री होती, एवढीच बाब तिला गुन्हेगार ठरविण्यास तिच्या शत्रूस पुरेशी होती." तथापि बाह्यात्कारें तिजवर कांहीं तरी आरोप ठेवणें भाग होतें म्हणून त्यांनीं पॅरिसच्या लोकसत्ताक राज्यास उलथून पाडण्याचा कट केल्याबद्दल जिराँदिस पुढाऱ्यांवर आरोप करून त्या कटांत सामिल असल्याचा आरोप मॅडम रोलंदवर केला होता. हा आरोप पुराव्यानें शाबित करण्याची त्यांना आवश्यकता नव्हती. कारण ज्यूरर्स व न्यायाधीश हे त्यांच्याच मताचे असल्यामुळें फिर्यादी तर्फेच्या म्हणण्या-

नुसार आरोपीची व्यवस्था होईल अशी त्यांची खात्री होती. आपल्यावरील खटल्याची ही स्थिति पाहून मॅडम रोलंदनें आपल्यातर्फे कोणी वकील दिला नाहीं. एक दोन प्रसिद्ध वकील आपण होऊन तिचा खटला चालविण्यास पुढें आले होते. परंतु त्यांच्या कौशल्याचा वरील कारणामुळें व त्यांच्या त्या कृत्यानें पुढें मागें त्यांच्यावरही संकट येण्याचा संभव दिसल्यामुळें मॅडम रोलंदनें त्यांना आपल्यातर्फे काम चालवूं दिलें नाहीं. तेव्हां अखेरच्या दिवशीं न्यायमंडळानेंच ग्युयोनामक एका वकिलास तिच्यातर्फे काम चालविण्यास सांगितलें. त्याचें भाषण झाल्यावर ती स्वतः भाषण करण्यास पुढें सरसावली; परंतु राजकीय विषयांची चर्चा करण्याची मनाई असल्याच्या सबबीवर तिचें भाषण बंद करण्यांत आलें. त्यानंतर ज्यूरीनें तिला दोषी ठरविलें व न्यायाधीशांनीं देहांतशासनाची शिक्षा सांगितली ! शिक्षा सांगितल्यानंतर न्यायाधीशांस अनुलक्षून मॅडम रोलंदनें पुढील उद्गार काढले:—

" तुम्हीं ज्या थोर पुरुषांचे खून केलेत त्यांच्या दुर्दैवाची भागिदारीण होण्यास मला तुम्हीं पात्र ठरविलें आहे. अर्थात् त्यांनीं अंतकाळपर्यंत जें धैर्य दाखविलें त्याचें अनुकरण करण्यास मी चुकणार नाहीं."

मॅडम रोलंदला ता० ८ नोव्हेंबर रोजीं सकाळीं शिक्षा सुनावण्यांत आली व त्याच दिवशीं तिसऱ्या प्रहरीं ती अंमलांत आणण्याचा हुकूम होता. ती एका माजी प्रधानाची बायको असल्यामुळें तिला वधस्थानाकडे नेतांना वाटेंत लोकांची गर्दी होण्याचा संभव होता म्हणून त्या प्रसंगीं मुख्य सेनापतीस सैन्याच्या एका तुकडीसह हजर राहण्याचा हुकूम झाला होता. खुद्द मॅडम रोलंद ही आपल्या मरणकालाची उत्सुकतेनें वाट पहात होती. शिक्षा ऐकून कारागृहांत परत आल्यावर तेथील तिच्या सोबत्यांनीं तिजविषयीं करुणास्पद उद्गार काढले व कांहीं कालानें आपलीही अशीच अवस्था होणार म्हणून कांहीं रडूं लागले; परंतु त्यांचें सांत्वन करून त्यांस तिनें धीर दिला व आलेल्या प्रसंगास धैर्यानें तोंड देण्यास सांगितलें ! त्यानंतर तिनें नित्याप्रमाणें भोजन केलें व आपणास वधस्थानाकडे न्यावयास येणाऱ्या लोकांची ती मार्ग प्रतीक्षा करीत बसली. आपल्या मुलीचें संगोपन करण्याबद्दल व तिला आपली जिनगी देण्या-

बद्दल तिला जी काय व्यवस्था करावयाची होती ती तिनें शिक्षा होण्या-ऱ्या आदल्या दिवशींच करून टाकली होती व तिचा नवराही सुरक्षित स्थळीं असल्याचें तिला ठाऊक होतें यामुळें तिला आतां कोणत्याही प्रकारची ऐहिक काळजी उरलेली नव्हती. तिनें आपलें निरपराधित्व व्यक्त करण्याकरितां ह्या दिवशीं शुभ्र व साधा पोषाख केला होता व त्यावर आपले केस मोकळे सोडले होते. सुमारें ३ वाजण्याच्या वेळीं वधस्थानाकडे नेण्याकरितां तेथील वृद्ध जेलरानें तिला तिच्या खोलींतून बाहेर काढलें व पोलीस अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केलें. त्यांनीं तिला गाडींत घातलें व गाडीचे पडदे सोडूं काय म्हणून विचारलें. तेव्हां "पडदे कशास सोडतां ? यांत मला कमीपणा थोडाच आहे ! मी उघड रीतीनें वधस्थानाकडे जाण्यास तयार आहें. लोक मला तिकडे नेत असतांना खुशाल पाहूं देत" असें तिनें उत्तर दिलें ! तेव्हां अधिकाऱ्यांनीं तिला उघड्या गाडींतूनच वधस्थानाकडे नेलें. तेथें जमलेल्या समूहांतून एक स्त्री तिच्याबद्दल आपला जीव घ्या म्हणून अधिकाऱ्यांपाशीं आग्रह धरून बसली तेव्हां त्यांनीं तिला एका बाजूस नेऊन बंदोबस्तानें ठेवलें. असल्या विपरित कालांतही आपल्याकरितां जिवावर उदार होणारे प्राणी आहेत हें पाहून त्या भयानक प्रसंगींही मॅडमरोलंदला कौतुक व धन्यता वाटली!

ती वधस्थाकडे येत असतां वाटेंत कांहीं लोकांनीं 'ला गिलॉटिन' (शिरच्छेद करणाऱ्यास न्या.) अशी हर्षयुक्त स्वरानें गर्जना केली. त्यास अनुलक्षून ती म्हणाली, "मी वधस्थानाकडेच जात आहें. लवकरच मी तेथें पोंचेन्, पण जे लोक मला तेथें पाठवीत आहेत ते सुद्धां माझ्यामागून लवकरच तेथें जातील. मी निरपराधी तरी आहें पण ते खरोखरीचे गुन्हेगार होऊन तेथें जातील व जे आज तुम्ही माझ्या मृत्यूबद्दल आनंद व्यक्त करीत आहां तेच तुम्ही त्यांच्यासंबंधानेंही तसेंच कराल."

मॅडम रोलंदचें हें भविष्य अक्षरशः पुढें खरें ठरलें !

तिचा शिरच्छेद करण्याची तयारी झाल्यावर जवळच असलेल्या स्वतंत्रतेच्या पुतळ्याकडे तिची नजर गेली, तेव्हां त्यास अनुलक्षून तिच्या तोंडून पुढील उद्गार बाहेर पडले:—

"हे स्वतंत्रते ! तुझ्या नांवावर ह्या जगतांत किती तरी गुन्हे केले

जात आहेत ! " हे तिचे शेवटचेच उद्गार होत ! ते निघाल्यानंतर एक दोन क्षणांतच तिचें शीर धडापासून वेगळें होऊन तिचा इहलोकचा अवतार संपला !

\+ + + + +

मॅडम रोलंदच्या मृत्यूची बातमी मॉं. रोलंद यांस रूयेन येथें समजली. ती ऐकून त्यांना इतकें वाईट वाटलें कीं, यापुढें जगण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें समजून त्यांनीं एका झाडास टांगून घेऊन आत्महत्या केली ! बुझोनेंही तोच मार्ग आक्रमिला ! मॅडम रोलंदची कन्या युदोरा ही या वेळीं १२ वर्षांची झालेली होती. तिचें संरक्षण व संगोपन तिच्या एका आप्तानें केलें व पुढें योग्य प्रसंगीं एका श्रेष्ठ व प्रसिद्ध घराण्यांतील पुरुषाशीं तिचा विवाहही करण्यांत आला. याप्रमाणें ह्या धीरोदात्त स्त्रीच्या कुटुंबाची व्यवस्था झाली. मॅडम रोलंदचें नश्वर शरीर नष्ट होऊन आज सुमारें २०० वर्षें झालीं, पण ती कीर्तिरूपानें अद्यापही फ्रान्स देशांत जिवंत असून तिच्या कीर्तीचा परिमल जगांतील इतर सुधारलेल्या देशांतही पसरला आहे ! फ्रेंच भाषेंत तिचीं अनेक चरित्रें प्रसिद्ध झालीं असून युरोपांतील इतर बहुतेक भाषेंत तिचें एखादें तरी चरित्र अस्तित्वांत आहेच. फ्रान्सच्या थोर स्त्री-पुरुषांत तिच्या नांवास सध्यांही विलक्षण मान मिळत असतो व तिच्या धारिष्टाबद्दल आणि कर्तव्यनिष्ठेबद्दल हल्लीं फ्रान्सचे लोक तिचे पोवाडे गात असतात.

मॅडम रोलंदच्या वधानंतर थोड्याच महिन्यांच्या आंत दँतन व रॉबिस्पियर यांचाही पॅरिसच्या काम्यूननें तिच्या प्रमाणेंच निकाल लावला! व त्यांच्यामागून त्यांच्या कित्येक साथिदारांचीही तीच अवस्था झाली ! आपल्या प्रतिपक्षियांचा उच्छेद करण्याकरितां त्यांनीं जी शक्ति निर्माण केली, तीच त्यांच्याही नाशास कारण झाली ! सामान्य जनतेस स्वैराचाराची एकदा मुभा दिली म्हणजे त्याचे परिणाम किती अनिष्ट होतात हें जॅकोबिन व जिरॉंदिस पक्षांच्या चुरशीचा हा जो अखेर परिणाम झाला त्यावरून चांगलें लक्षांत येईल. वस्तुतः मुळारंभीं हे दोन्ही पक्ष एकाच विचाराचे व मताचे होते. दोघांनाही लोकस्वातंत्र्यच पाहिजे होतें दोघांचीही धडपड त्याकरितांच होती. पण त्यांपैकीं एक पक्ष सारा-

सार विचार व सद्सद्विवेकबुद्धि यांस अनुसरणारा होता व दुसरा त्या दोदोंसही घाब्यावर बसविणारा होता. त्यामुळें उभयतांत द्वैत उत्पन्न होऊन चुरस वाढली व तिचा अखेर असा अनिष्ट परिणाम घडून आला. त्याकारणानें फ्रान्सची एक पिढी निष्कारण खची झाली. कर्त्या व मुत्सद्दी लोकांचा नाश झाल्यामुळें परक्या शत्रूंना त्या देशावर हल्ले करण्यास फावलें व ह्या संकटांतून फ्रान्सचें रक्षण करण्याकरितां जाकोविन-सारख्या लष्करी बाण्याच्या व साम्राज्याकांक्षी माणसाच्या हातीं फ्रान्सचीं राज्यसूत्रें देणें नवीन पिढीस भाग पडलें !

समाप्त.

शुद्धिपत्र.

या पुस्तकांत नजर चुकीमुळें झालेल्या अगदीं अर्थविपर्यास करणाऱ्या शब्दापुरतेंच हें शुद्धिपत्र जोडलें आहे.

पृष्ट.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
२	२९	दवत	दैवत
३	१०	महत्त्वाकांक्षा	महत्त्वाकांक्षी
४	२१	असल्ययामुळें	असल्यामुळें
५	१२	ती	तो
८	८	अप्रतहित	अप्रतिहत
९	१९	विवंचनतें	विवंचनेंत
१०	३	धंघ्याचेंही	धंद्याचेंही
१३	२०	वषाच्च्या	वर्षांच्या
१६	१२	यावनावस्था	यौवनावस्था
२१	११	पगू	पंगू
२६	१०	व्यबस्थित	व्यवस्थित
२८	१५	विषयप्रतिादनशैली	विषयप्रतिपादनशैली
२९	१७	आपला	आपली
३९	१८	असतिन	असें तिनें
४४	७	राम्यकारभार	राज्यकारभार
४९	४	घडवन	घडवून
५५	२९	क्षशा	अशा
५७	२०	सूत्रचालणा	सूत्रचालना
७४	३	हद्युभरेझ	हद्युमेरझ
९०	४	संख्या	संस्था
९०	१८	प्रकरणांसून	प्रकरणांतून
९२	१८	चैकशी	चौकशी
९६	६	म्हणून	ह्मणून
१०३	७	मजजुवळ	मजजवळ
९८	१	be	he
९८	२	Cirondist	Girondist
१०८	सर्व	१०८ पानावरील	९८ पानावर पाहण

१०८पानावर ९८ पान व ९८ पानाचे जागीं १०८ अंक पान चकन पडलें आहत. दोष।